# पाश्चात्य स्त्रीसमाजदर्शन



म. ग्रं. सं. पुणे
विषय निबंध
REFBK-0006133

ाई थत्ते

'वाचा, आणि विचार करा'—पुस्तक ३ रें

# पाश्चात्य
# स्त्री-समाज-दर्शन

लेखक
नारायण परशराम थत्ते
साहाय्यक
डॉ. सौ. मनोरमाबाई थत्ते,
L. C. P. S., L. M., (Rot. Dublin).

REFBK-0006133

प्रथम मुद्रण | किंमत २ रुपये | ऑगस्ट १९४१

प्रकाशक

**कृष्णाजी नारायण सापळे,**

**रामकृष्ण प्रकाशन मंडळ,**

ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवनरोड, मुंबई ४

[ या पुस्तकाचे सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक

**कृष्णाजी नारायण सापळे,**

**रामकृष्ण प्रिन्टिंग प्रेस,**

ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, मुंबई ४

ग्रं.नं. ८२५



**तीर्थरूप परशुराम हरी थत्ते**

ज्यांनीं
मला जगाकडे हंसक्षीर दृष्टीनें
पहावयास शिकविलें
व
माझ्या आयुष्यास यशोमार्ग लावला
त्यांचे पवित्र चरणीं
समर्पण

**नारायण**

## निवेदन—

केसरींतील आमची 'वाचा आणि विचार करा' ही लेखमाला पुस्तक रूपानें प्रसिद्ध केल्यानंतर महाराष्ट्रीय वाचकांनीं व टीकाकारांनीं तिचें केलेलें स्वागत पाहून समाधान तर वाटलेंच; पण फिरून अशी इच्छा निर्माण झाली कीं, गेल्या लेखमालेमध्यें पाश्चात्य स्त्रीसमाजाचें परीक्षण करण्याचें अर्धवट राहिलेलें काम एक नवीन लेखमाला लिहून पूर्ण करावें व बृहन्महाराष्ट्रांतील सुजाण वाचक-वर्गाची आणखी एकवार सेवा करावी. आणि या इच्छेचें मूर्त स्वरूप म्हणूनच हा ग्रंथ वाचकवर्गापुढें येत आहे. आमच्या गेल्या लेखमालेंत स्त्रीविषयक प्रचलित प्रश्नांची एक दुसरी बाजू दाखविणें एवढा एकच उद्देश आम्हीं ठेविला होता. या ग्रंथांतहि पाश्चात्य स्त्रीसमाजाचें परीक्षण करतांना कोणत्याहि मताचा अगर ध्येयाचा पुरस्कार करण्याचा आविर्भाव आम्हांस आणावयाचा नसून समाजापुढें फक्त वस्तुस्थिति मांडावयाची आहे. आमचीं निश्चित मतें मांडण्यासाठीं आम्हीं कोणतींच विधानें न करण्याची खबरदारी घेऊनहि कित्येकांनीं तीं मतें आमचीं असावीं असें समजून टीका केली, पण त्यांची भूमिकाच चुकीची असल्यानें आम्हांला त्यासंबंधीं कांहींच बोलावयाचें नाहीं. महाराष्ट्रांतील अनेक विद्वानांनीं आमच्या मागील कृतींचें जें कोडकौतुक केलें व अप्रत्यक्षपणें आम्हांला प्रोत्साहन दिलें त्यामुळेंच आम्हीं हें दुसरें साहस करण्यास सज्ज झालों आहोंत ! आणि यामध्येंहि आमची हीच अपेक्षा आहे कीं, पहिल्या इतकेंच त्याचें स्वागत व्हावें. अर्थात् आमची ही अपेक्षा सफल व्हावीच असा आग्रह आम्हांला धरतां येणार नाहीं, ही गोष्ट आम्ही ओळखून आहोंतच. रशिया, जर्मनी, इंग्लंड इत्यादि देशांतील स्त्रियांचे नांवावर कोणतीहि गोष्ट हिंदुस्थानांत खपविण्याचा व्यवसाय कित्येक लोक करीत असतात. आपल्या देशांतील स्त्रिया

जणूं कांहीं तुच्छ आहेत असें समजून, या परस्त्रियांच्या कृतीचें कोडकौतुक करण्याचा चंगच जणूं कांहीं साहित्यिकांनीं बांधला आहे, व यामुळें बहुजन-समाजाची बरीच दिशाभूल होऊं लागली आहे; आणि म्हणूनच शक्य तों प्रचारकी पेशापासून अलिप्त अशा अनेक ग्रंथावर व प्रत्यक्ष नजरेखालून गेलेल्या परिस्थितीवर आधारलेलें लिखाण लिहून या राष्ट्रांतील स्त्रीजीवनावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न आम्हीं केला आहे. त्याचें यशापयश वाचकांनीं ठरविण्याचें असल्यानें आम्हीं त्यासंबंधीं सध्यां कांहींच बोलूं शकत नाहीं. हिंदी स्त्रियांसंबंधीं कित्येक पाश्चात्य लेखकांनीं दाखविलेली अनुदारवृत्ति त्यांना सव्याज परत करण्या-इतपतच येथील स्थिति आहे, पण निव्वळ परधार्जिणें वृत्तीनेंच आम्ही त्यांचा आजपर्यंत उदोउदो करीत आलों, एवढें जरी वाचकांना पटलें तरी आम्ही आमचें कार्य यशस्वी झाल्याचें समाधान मानूं.

या ग्रंथाचें हस्तलिखित तयार होत गेलें तसतसें तें क्रमानें प्रसिद्ध करावें अशा अनेक मित्रांनीं सूचना केल्या. परंतु अशा त्रुटित प्रसिद्धीनें विषयाची पकड वाचकांचे मनावर पडत नाहीं, तेव्हां तें एकदमच पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. आणि माझे स्नेही श्री. बाबुराव सापळे, मालक, रामकृष्ण प्रिं. प्रेस यांनीं प्रकाशन कार्य हौसेनें स्वीकारून तें ते आजच्या आकर्षक स्वरूपांत वाचकांच्या हातीं देत आहेत याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्यांच्या छाप-खान्यांतील कामगारांनीं व विशेषतः श्री. बाळोबा यांनीहि ह्या पुस्तकाचे कामीं हौसेनें कष्ट केले, ह्याबद्दल त्यांचें कौतुक वाटतें. चित्रकार श्री. दलाल यांची पुस्तकाच्या सजावटीस झालेली मदत मोलाची आहे.

आणि शेवटीं माझे स्नेही श्री. गो. वा. पाध्ये यांचा, त्यांचे इच्छेविरुद्ध उल्लेख करतों. लेख लिहिण्याचे वेळेपासून त्यांच्याशीं चर्चा करतांना त्यांनीं केलेल्या सूचना आणि पुरविलेली माहिती अत्यंत मोलाची होती. त्यांचे आभार मात्र मानीत नाहीं, कारण तें त्यांना पटणार नाहीं; शिवाय उल्लेखाबद्दलच ते रागाव-णार, तो आणखी वाढूं नये.

युसुफ बिल्डिंग,<br>३१-३२, व्हिन्सेन्ट रोड,<br>दादर, मुंबई

ना. प. थत्ते

‘ वाचा आणि विचार करा ’ पुस्तक ३ रें

# पाश्चात्य – स्त्री – समाजदर्शन

## अ नु क्र म णि का


| | | |
|---|---|---|
| निवेदन | | पृष्ठ |
| प्रकरण १ लें | भूमिका ... ... ... ... | १ |
| प्रकरण २ रें | रशिया ... ... ... ... | १८ |
| प्रकरण ३ रें | रशिया [ पुढें चालू ] ... ... ... | ३१ |
| प्रकरण ४ थें | रशिया ,, ... ... ... | ४४ |
| प्रकरण ५ वें | जर्मनी ... ... ... ... | ५७ |
| प्रकरण ६ वें | जर्मनी [ पुढें चालू ] ... ... ... | ६९ |
| प्रकरण ७ वें | जर्मनी ,, ... ... ... | ८५ |
| प्रकरण ८ वें | इंग्लंड ... ... ... ... | ९९ |
| प्रकरण ९ वें | इंग्लंड [ पुढें चालू ] ... ... ... | ११५ |
| प्रकरण १० वें | इंग्लंड ,, ... ... ... | १२८ |
| प्रकरण ११ वें | इंग्लंड ,, ... ... ... | १४३ |
| उपसंहार | ... ... ... ... ... ... | १५७ |

रंगभूमीवर गाजत असलेलीं

## लोकप्रिय नाटकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रेम संन्यास संगीत द्वितीय आवृत्ति | | [कै. रा. ग. गडकरी] | १ | ४ |
| भ्रमाचा भोपळा सचित्र नाटक | | [प्रिं. प्र. के. अत्रे] | १ | ४ |
| साष्टांग नमस्कार | ,, | [ ,, ] | १ | ० |
| घराबाहेर | ,, | [ ,, ] | १ | ० |
| गुरु दक्षिणा | ,, | [ ,, ] | ० | १० |
| प्रेम शोधन | ,, | [ कै. कोल्हटकर ] | १ | ० |
| बेबंदशाही | ,, | [ श्री. औंधकर ] | १ | ० |
| दख्खनचा दिवा | ,, | [ श्री. टिपणीस ] | १ | ० |
| हिरा हरपला | ,, | [ श्री. गुप्ते ] | १ | ० |
| पेशवाईनंतर | ,, | [ ,, ] | ० | १२ |
| यज्ञमंडप | ,, | [श्री. श्री. कृ. ओक] | ० | १२ |
| खुनी सम्राट | ,, | [ ,, ] | ० | १२ |
| आमची जात | ,, | [ स. बा. जोग ] | ० | ४ |
| मिल मजूर | ,, | [ बा. ल. सावंत ] | ० | १२ |
| बनावट बायको | ,, | [ मा. कृ. शिंदे ] | ० | १० |
| हुंडा | ,, | [ ग. सो. त्रिलोकेकर ] | १ | ० |
| टाकलेले पोर | ,, | [ के. सी. ठाकरे ] | ० | ८ |

पराक्रमी पेशवा [ श्री. कृ. ओक ] द्वितीय आ. छापत आहे.

**रामकृष्ण प्रकाशन मंडळ**

त्रिभुवन रोड, मुंबई ४



साहाय्यक

**डॉ. सौ. मनोरमाबाई थत्ते**

लेखक

**नारायण परशुराम थत्ते**

ग्रं. ५८
अ. क्र. 8733
७८५८

# पाश्चात्य

# स्त्री–समाज–दर्शन

## प्रकरण १ लें — भूमिका

स्त्रियांचा मानस व शरीरशास्त्र दृष्ट्या विचार करून त्यांचें खरें कार्यक्षेत्र ठरविण्याचा अल्प प्रयत्न आमच्या कुंवतीनुसार आम्हीं मागें केलाच आहे. या आमच्या नवीन लिखाणांत आम्हास युरोपांतील तीन भिन्न विचारसरणींच्या राष्ट्रांतील प्रातिनिधिक राष्ट्रांच्या स्त्रीसमाजाचें यथातथ्य दर्शन घडवून आणावयाचें आहे. फॅसिझम, कम्युनिझम आणि लोकशाही अशा तीन भिन्न विचारसरणींचीं राष्ट्रें आज युरोपमध्यें वावरत आहेत. या तीन प्रमुख पंथांतील राष्ट्रांच्या सामाजिक व राजकीय जीवनक्रमामध्यें फार मोठी भिन्नता असल्यानें आज युरोपमध्यें प्रवास करणाऱ्या माणसाला किती तरी भिन्न चालिरीती, संघटना व कायदे पहावयास मिळतात. या तीन पंथांखेरीज युरोपमध्यें चवथा असा पंथच आज अस्तित्वांत नसल्यानें, या तीन पंथांतील प्रमुख अशा तीन राष्ट्रांच्या स्त्रीसमाजांचा विचार झाल्यास, सर्व साधारण पाश्चात्य स्त्रियांच्या जीवनाची यथार्थ कल्पना येणें शक्य आहे. आणि म्हणूनच आम्हीं तीन प्रमुख राष्ट्रांतील स्त्री–समाजाचें परीक्षण करण्याचें ठरविलें आहे. हें परीक्षण झाल्यानंतर स्त्रीची खरी भूमिका आणि हे समाज यांचें कितपत सहमत होण्याजोगें आहे याचा निर्णय घ्यावयाचा आहे. परंतु प्रत्यक्ष विषयाला सुरवात करण्यापूर्वी फिरून एकदां थोडक्यांत आमची स्त्रीविषयक भूमिका स्पष्ट करणें अवश्य आहे.

## सुखाची कल्पना सापेक्ष असते !

भिन्नभिन्न कालखंडामध्यें मानवांच्या सौख्य कल्पना भिन्न भिन्न असतात; फक्त एका कालखंडांतील मानव दुसऱ्या कालखंडांतील मानवांकडे पाहून हंसत असतो, एवढेंच ! आतांच पहाना, नित्य नव्या शास्त्रीय शोधांनीं जीवन सुलभ झाल्यामुळें इतिहासपूर्व-कालीन अगर शंभर दोनशें वर्षांपूर्वीच्या मानव समाजाची आपण कींव करतो. आपणाला वाटत असतें, 'ते जगत तरी कसें असतील बुवा !' परंतु पृथ्वीच्या पाठीवरील अशा एखाद्या भूप्रदेशाकडे जा कीं, ज्या ठिकाणीं आजच्या या शास्त्रीय युगानें अद्याप प्रवेश केलेला नाहीं; आणि आपल्याला तेथील लोकांच्या जीवनांत आपल्याइतकाच आनंद दिसून येईल. आगगाड्या नाहींत, मोटारी नाहींत, निरनिराळ्या खाद्यपेयांचा पुरवठा करणारीं उपहारगृहें नाहींत, म्हणून तेथील जनता खट्टू झाल्याचें आढळून येणार नाहीं. सुखसोई वाढविण्याची भावना मानवी मनांत दृढ असल्यानें तो त्या दृष्टीनें धडपड करीत असतो, आणि यांतच त्याचा आनंद सांठविलेला असतो. आज ज्या सुखसोई [?] आपण उपभोगीत आहोंत त्याही अशाच एका झगड्याचें दृश्य फल आहेत. परंतु ज्या कालांत त्या नव्हत्या त्या कालांत त्यांची कल्पना व अनुभव नसल्यानें त्यांच्या अभावामुळें मानव दुःखी असेल असें मानण्यास मुळींच जागा नाहीं. जो सिद्धान्त सर्वसाधारण मानव समाजाला लागू तोच स्त्रियांनाही ! आज राजकीय व सामाजिक दृष्ट्या पुढारलेल्या [?], स्वतंत्र म्हणविणाऱ्या स्त्रिया त्यांच्या दृष्टीनें अज्ञ स्त्रियांची अगर त्यांच्या प्राचीन भगिनींची जेव्हां कींव करूं लागतात तेव्हां त्यांनीं वरील विवेचनांतील रहस्य जरूर लक्षांत ठेविलें पाहिजे. चालू काळीं मुंबईच्या उत्तुंग फरसबंद चाळींमधून राहणारी आंग्लविद्याविभूषित स्त्री ही कडेकपारीं, खेडोपाडीं वावरणाऱ्या प्राचीन वा अर्वाचीन स्त्रियांपेक्षां सुखी आहे असें म्हणून चालणार नाहीं. कारण ज्या उत्तान सौख्याच्या क्षितिजाची रंगीबेरंगी कड तिनें दुरूनहि पाहिली नाहीं त्यासाठीं ती कशी झुरेल ? दोघींच्या सौख्य कल्पना भिन्न आहेत, एवढें मात्र आपण म्हणूं शकूं. पण ही अधिक सुखी असा निश्चित अभिप्राय आपणांस कोणाबद्दलच देतां येणार नाहीं. अज्ञात सुखसाधनें त्यांच्या अभावीं आपणास दुःखी करूं शकणार नाहींत व त्यामुळें प्राचीन समाजाच्या स्त्रीविषयक कल्पना हल्लींच्या मानानें कितीहि अप्रगल्भ

वाटल्या तरी त्यामुळें तत्कालीन स्त्रीसमाज दुःखांतच असला पाहिजे असें मात्र म्हणतां येणार नाहीं.

## स्त्रियांची पूर्वकालीन स्थिति

प्राचीन काळीं सर्वच राष्ट्रांच्या स्त्रीविषयक कल्पना एकाच नमुन्याच्या होत्या, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्याजोगी आहे. ग्रीक लोक तिला प्रजोत्पादनाचें एक साधन व आत्माहीन निर्बुद्ध प्राणी एवढेंच महत्त्व देत. रोमन लोक सुधारणेच्या शिखरावर पोहोंचले, पण ग्रीकांचाच स्त्रीविषयक दृष्टिकोन त्यांनींही उचलला होता. ' सीमांडीस ' नांवाचा एक ग्रीक कवि म्हणतो,

' Women are the greatest evil that Zens has created.'

हिंदु तत्त्ववेत्त्यांचा दृष्टिकोन तर प्रसिद्धच आहे, त्याचा निराळा उल्लेख या ठिकाणीं करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. प्राचीन खिश्चन राष्ट्रांमधूनही याच कल्पना रूढ होत्या. स्त्रियांना ' चांगली ' हें विशेषणच मुळीं तीं लावण्यास तयार नव्हतीं. प्राचीन एकच तत्त्ववेत्ता असा आढळतो, कीं जो स्त्रियांना पुरुषांपेक्षां कमी लेखण्यास फारसा तयार नाहीं; आणि तो म्हणजे प्लेटो होय. तो म्हणतो, ' स्त्री–पुरुषांमध्यें कोणताच असा महत्त्वाचा भेद नाहीं, कीं ज्यामुळें त्यांनीं कोणत्याहि बाबींत पुरुषांपेक्षां कमी दर्जाचें ठरावें.' स्त्रियांना राजकारण, लष्कर, शिक्षण इत्यादी निरनिराळ्या उद्योगधंद्यांत खुशाल वावरूं द्यावें एथपर्यंतही त्याची मजल गेली होती. आदर्श लोकसत्तेचा तो पुरस्कर्ता असल्यानें स्त्रीविषयक उदार धोरण त्यानें प्रथम पुढें आणलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण या गोष्टीस ॲरिस्टॉटल्चा मात्र विरोध होता. स्त्रीपुरुषांतील लैंगिक भेद त्यांच्या व्यवसायभिन्नत्वाचा पाया म्हणून मानण्यास हरकत नाहीं, असें त्याचें मत होतें. रोमन साम्राज्यामध्यें स्त्रियांना थोडेंफार महत्त्व प्राप्त झालें, पण तें केवळ लैंगिक स्वेच्छाचारापुरतें. कॅरो नांवाचा लेखक याबद्दल म्हणतो,

' Men of the foreign races rule their wives, we Romans extend our rule over all men and in trun are ruled by our own wives.'

आणि या वृत्तीनेंच शेवटीं रोमन साम्राज्याचा नाश केला ! हिंदू समाजाचें स्त्रीविषयक धोरण फार प्राचीन कालापासून आजतागायत एकाच नमुन्याचें

आहे. आध्यात्मवाद्यांनीं तिचा धिःकार केला, पण समाजशास्त्रज्ञांनीं तिला गृह-देवतेचा पवित्र मान दिला. जगांतील इतर समाजामध्यें दिसून येणारी स्त्रीविषयक अनिश्चित परंपरा हिंदुसमाजामध्यें दिसून येणार नाहीं.

## स्त्री-स्वातंत्र्याचा प्रारंभ-१९ वें शतक

युरोपांतील स्त्रीविषयक चळवळींचा आरंभ काल म्हणजे १९ वें शतक होय. १८६९ सालीं मिलनें आपला 'स्त्रियांची गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून युरोपमध्यें स्त्रीविषयक नव्या युगाचा पाया घातला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तो म्हणतो, 'सृष्टीशीं झगडणाऱ्या अपूर्ण मानवानें आपल्यांतीलच निम्या विभागाला आपल्या मानानें अपूर्ण ठेवावें हें कधींही योग्य नाहीं. सृष्टीशीं चाललेला आपला झगडा यशस्वी करण्यास आपल्यांतील अर्ध्या विभागासही आपण बरोबरच घेतलें पाहिजे.' मिलनें स्त्रियांना राजकीय हक्क मिळावेत म्हणून तयार केलेल्या कायद्याच्या मसुद्याला त्या वेळच्या इंग्लिश समाजानें जरी वाटाण्याच्या अक्षता लाविल्या तरी त्याच्या विचारप्रणालीचा वहुजन युरोपियन समाजाचे मनावर थोडा फार परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं, व स्त्री-दास्यविमोचनाची एक लाटच युरोपमध्यें आली. पण स्त्रीदास्यविमोचन म्हणजे काय ? याची शास्त्रीय कल्पना मात्र त्या काळीं निश्चितपणें कोणालाच आली नव्हती, असें खेदानें म्हणावें लागतें. कारण या कालांतच काय पण परवां परवांपर्यंत युरोपियन राष्ट्रांची स्त्रीदास्यविमोचन चळवळ शास्त्रशुद्ध पायावर उभारलेली नव्हती असें आतां निश्चितपणें म्हणण्यापर्यंत कित्येक शास्त्रज्ञांची मजल गेली आहे. 'स्त्री-स्वातंत्र्य म्हणजे तिच्या विशेष लैंगिक जबाबदारीपासून मुक्तता नव्हे, तर प्राणी शास्त्रदृष्ट्या, शारीर-मानसशास्त्रदृष्ट्या तिला योग्य कार्यक्षेत्र देऊन तिला समाजप्रगतीच्या दृष्टीनें अधिक कार्यक्षम करणें, हें खरें स्त्री-स्वातंत्र्य होय!'

(Emancipation, if it means anything at all, means freedom, not from woman's sex personality, but freedom to develop her specific biologic and psychologic back-ground to the fullest advantage in the interest of social progress.)

## स्त्रीस्वातंत्र्याची शास्त्रीय दृष्टि

स्त्री-स्वातंत्र्याची खरी शास्त्रीय दृष्टि ही आहे. पुरुषांनीं स्त्रियांच्या स्वातंत्र्या-

वर घाला घालून त्यांना बंधनांत टाकलें आहे व त्यांतून त्यांना मुक्त करून बाहेर आणावयाचें आहे, ही जी स्त्रीहितवाद्यांची भूमिका होती अगर आहे तीच मुळीं चुकीची असल्यानें त्यांच्या खटाटोपाचा परिणाम स्त्रियांना सुखी करण्यापेक्षां दुःखी करण्यांतच अधिक झाला. त्यांच्या या विचित्र कल्पनेला उत्तर देतांना प्रो. होलिंग्सवर्थ म्हणतो—'स्त्रियांना तुम्हीं म्हणतां त्या पारतंत्र्या [!]-मध्यें पुरुषांनीं टाकलेलें नाहीं, त्यांच्या नैसर्गिक शरीरधर्मानें टाकलें आहे.'

[ Woman is not caged by man, but by her physiological nature. ]

प्रो. होलिंग्सवर्थच्या म्हणण्याचा अर्थ हा कीं, स्त्रीला मिळालेलें स्त्रीत्व याच्या बुडाशीं आहे. स्त्रीहितवादी ज्याला पारतंत्र्य म्हणून भितात, अगर तसें भासवितात तें स्त्रीधर्माचें खरें प्रतीकच आहे असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांच्या दृष्टीला दिसणारें पारतंत्र्य हा एक भास आहे. प्राणिशास्त्रदृष्ट्या स्त्री ही अशीच आहे, त्याला आमचाहि इलाज नाहीं आणि त्याचाहि नाहीं. हें सत्य आहे; कटु असेल कदाचित, पण तें तसें मानणाऱ्या दृष्टीचा दोष असेल हेंच खरें! मानव्याचा आव आणणाऱ्या दयावंतांनीं याविरुद्ध कितीहि ओरड केली तरी स्त्रियांचें स्त्रीत्व नष्ट केल्यास तिला या पोकळ स्वातंत्र्याची मातब्बरी काय वाटणार? कल्पनेच्या स्वैर भराऱ्या आणि प्रत्यक्ष परिस्थिति यांच्यामध्यें फार तफावत असते. स्त्री–पुरुषांच्या शरीररचनांचा थोडासाहि अभ्यास केल्यानें निसर्गानें स्त्रीला पुरुषापेक्षां एका दृष्टीनें कसें मागें टाकलें आहे याचा चटकन उलगडा होतो. पुरुषांची सर्वसाधारण उंची व वजन हे सर्वसाधारण स्त्रियांच्या उंची व वजनाचे मानानें अधिक भरतात. शक्तींत स्त्रिया ७/१० ते ८/१० पर्यंत असतात. स्त्रियांचा मेंदू पुरुषांच्या मानानें किती तरी कमी दर्जाचा असतो; एवढेंच काय पण रक्तामध्यें असणाऱ्या पेशींच्या संख्येमध्येंसुद्धां कमीअधिकपणा आढळतो. शारीर आणि मानसशास्त्र दृष्ट्या पुरुष हा स्त्रीपेक्षां सरस असतो ही गोष्ट आतां तज्ञांचेकडून शास्त्रशुद्ध रीतीनें प्रस्थापित करण्यांत आलेली असल्यानें 'तें असें असावें, तसें असावें; असें होईल, तसें होईल' ही भूतभविष्याची अंदाजी भाषा करण्याचें कारणच उरलेलें नाहीं. निसर्गानें केलेला हा भेद निव्वळ स्त्रीविषयक सूडबुद्धि म्हणून खास नाहीं. पुरुषांची श्रेष्ठता जशी त्याच्या कार्याला उपयुक्त तशी, कांहीं बाबींतील स्त्रियांची

कनिष्ठताहि पण स्त्रियांच्या कार्यक्षेत्रांत त्यांना तितकीच उपयुक्त आहे. निसर्गानें स्त्रीवर लादलेलें स्त्रीत्व ती कशी झुगारून देणार? अखिल मानव समाजाची ती माता आहे आणि निव्वळ या कार्यासाठीं तिचें शरीर घडविण्यांत आलें आहे. स्त्रिया त्यांच्या दृष्टीनें अन्यायी निसर्गाला धिक्कारण्यासाठीं आपणांवर त्याच्याकडून टाकण्यांत आलेल्या जबाबदाऱ्या त्या टाळतील, पण त्यामुळें त्यांची शरीररचना थोडाच बदलणार आहे! आपल्या मनाप्रमाणें आपल्या शरीराची व मनाची घडण घडवून आणण्याचें सामर्थ्य तिच्या ठिकाणीं थोडेंच आहे? आणि जोंपर्यंत स्त्रीच्या शरीररचनेंत बदल होत नाहीं, झालेला नाहीं, तोंपर्यंत त्या आपले मनोधर्महि थोडेच बदलूं शकणार आहेत. तिला शाळेंत न्या, कॉलेजांत न्या, कारखान्यांत न्या, अपत्याची गोड हुरहुर तिला वेडावून सोडल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. शरीरधर्मानें मानसिक धर्म निर्माण होत असल्यानें स्त्रियांचें नुसतें मन बदलूं पाहणें म्हणजे त्यांच्यावर शुद्ध जुलूम होय! शरीर एकीकडे राबत असतांना मनानें दुसऱ्या कशाची तरी अपेक्षा करीत असावें हेंच खरें पारतंत्र्य आहे, आणि या पारतंत्र्यांतून स्त्रियांची मुक्तता होणें अधिक अवश्य आहे, जरूर आहे—

> The three mental complexes, especially that of motherhood, a function inherent in woman's life-process, make such a drain on woman's mental and physical energies that comparatively little remains for pure intellectual pursuits. Woman is not only sex, but all sex. There are, we admit, exceptional women burdened with the seeds and fruits of procreation, who have made lasting contributions to science, literature or social progress; but these are exceptional cases.

स्त्रियांच्या गुणदोषांची चर्चा करतांना, स्त्रियांचे दोष म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टी स्त्रीधर्माचें पालन होण्याच्या दृष्टीनें गुणच कसा ठरतात याचें विवेचन आम्हीं मागील लेखमालेंत केलेंच आहे. परंतु आधुनिक स्त्रीहितवाद्यांना या दोषामध्यें पुरुषी अरेरावी दिसते व **म्हणून ते स्त्रीदाक्षिण्याच्या भलत्याच कल्पनांचा पसारा मांडून तिला काव्यमय स्वरूप** देऊं पाहतात, व या काव्यमय स्त्रीची आराधना सुरू करतात. अर्थात् त्यांच्या या काव्यकल्पना प्रत्यक्ष त्यांच्या पदरीं पडलेल्या स्त्रीला लागू पडत नाहींत असें

पाहून ते खट्टू होतात. व निदान बाकीच्या स्त्रिया तरी आपल्या कल्पनेप्रमाणें असतील असें जिवाचें समाधान करून घेत ते काळ काढीत असतात; व बहुतेक स्त्री–हितवादी कवींच्या बाबतींत हाच प्रकार घडतो. सर्वसामान्य माणसांच्या स्त्रीविषयक कल्पना अगदीं निश्चित असतात, आणि त्यांना पाहिजे असलेल्या स्त्रीचें ठिकाणीं काव्यापेक्षां व्यवहाराचीच अपेक्षा त्यांना अधिक असते. आणि स्त्रियांनाही पण तेंच पाहिजे असतें. एक इंग्लिश ग्रंथकार याबद्दल मोठ्या मार्मिकतेनें म्हणतो—

'The middle class needs a thrifty type of woman, the woman of Kitchen, Kirk, and Kids.'

## स्वातंत्र्याचा फुफाटा

स्त्रीदास्य–विमोचकांचा अगदीं अलीअलीकडे इकडे आलेला ऊत युरोपमध्यें १९ व्या शतकांतच येऊन गेला आहे. या हितवाद्यांची दास्यविमोचनाची कल्पना म्हणजे स्त्रीला पुरुष करणें ही होय. शरीरानें मनानें स्त्री, पण व्यवसायानें पुरुष असा हा चमत्कार घडवून आणण्याचा चंग या मंडळींनीं बांधला आणि त्यांत त्यांना थोडें फार यशही आलें, नाहीं असें नाहीं. पण यांत स्त्रियांचें मात्र सर्वस्वीं नुकसान झालें. स्त्रीचें आयुष्य व देह, लैंगिक क्रिया व तिची पूर्तता यासाठीं निव्वळ बनविण्यांत आले आहे असा निसर्गाचा सिद्धान्त असल्यानें; हें कार्य सुरळीत करावयाचें म्हटल्यास स्त्रीला बाह्य व्यवसाय करण्यास शक्तिच राहूं शकत नाहीं. स्त्रीला एका तज्ञ इंग्लिश ग्रंथकारानें Omisexual म्हटलें आहे, आणि तें अगदीं सत्य आहे. तिचें सर्व शरीर म्हणजे तिच्या लैंगिक व्यवहाराशीं समरस होणाऱ्या अनेक अवयवांचें आश्रयस्थान आहे.

[The parts capable of receiving sexual stimuli are spread over the entire surface of the body. The vagina, the annal region, the cervix, and the breast nipples are highly sensitive parts of the body, most responsive to direct sex stimuli.]

पुरुषांच्या बाबतींत मात्र अशी स्थिति नाहीं. लैंगिक व्यवहार हा त्यांच्या बाबतींत एक तात्कालिक आचार ठरतो, तर स्त्रियांच्या जीवनाचें सार त्यांत सांठविलेलें असतें. एक फ्रेंच डॉक्टर म्हणतो—

'Sex for the male is an episode, for women it is quite essence of life.'

एका तज्ञानें मुलामुलींची शारीरिक व मानसिक परीक्षा करून असा निकाल दिला कीं, मुलापेक्षां मुलींत लैंगिक भावना अधिक तीव्र असते; आणि हें स्वाभाविकहि पण आहे. अविवाहित प्रौढ स्त्रियांच्याबद्दल संशोधन करून प्रस्थापित करण्यांत आलेले पुढील आंकडे पाहून विवाहित स्त्रियांची व लग्नाची अवहेलना करणारी प्रौढा कुमारी कोणत्या दिव्यांतून जात असेल याची कल्पना येण्यास हरकत नाहीं. मॉस्को विश्वविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या कुमारिकांपैकीं शेंकडा ५२ कुमारिका कृत्रिम तऱ्हेनें लैंगिक भूक शमविण्याचा प्रयत्न करून आरोग्य बिघडवून घेतात, असें आढळून आलें. कॅथरीन बेनेटचें हें एक दुसरें विधान आम्ही जसेंच्या तसें तिच्याच शब्दांत देतों तें पहा—

'Slightly over 50 percent of a group of 1200 women college graduates, at least 5 years out of college, state that they have experienced intense emotional relations with other women, and that in slightly more than half these cases, 26 percent of the entire group, the experience has been accompanied by overt physical practices.'

स्त्रियांच्या ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या लैंगिक भुकेची स्पष्ट ओळख करून देणारीं हीं विधानें आहेत, हें कोणासहि नाकबूल करून चालणार नाहीं. निसर्गानें स्त्रीवर टाकलेली जबाबदारी एवढी जबरदस्त आहे; कीं तिच्या शरीरावर व मनावर असलेलें त्याचें नियंत्रण किंचितहि कमी करून चालत नाहीं; आणि यामुळें स्त्रियांना विवाहाचा शास्त्रीय मार्ग हितकारी ठरतो. 'विधियुक्त आणि समाज-संमत स्त्री-पुरुष-युती म्हणजे विवाह' अशी विवाहाची स्पष्ट भूमिका आहे. त्यांत भयंकर हाल, आपत्ति आणि पारतंत्र्यहि आहे असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. डॉक्टर म्युलर लियर म्हणतो, 'विवाहानें दोन कार्यें साधतात-निसर्गानें लादलेल्या लैंगिक आचाराची पूर्ति त्यानें होते व आर्थिक प्रश्नांची सोय कुटुंबरूपी लहान लहान गटांनीं करून घेतल्यानें फाफटपसारा होत नाहीं.' आणि लग्न संस्था अस्तित्वांत येण्याचें खरें कारण हेंच असलें पाहिजे. स्वैराचारानें सर्व समाजाचें कुटुंब बनून एकदम एवढ्या पसाऱ्याचें आर्थिक नियंत्रण करण्याचा प्रसंग येऊं लागतो, त्यापेक्षां लहान लहान गट

करण्यानें ही गोष्ट अधिक सोपी जाते, आणि रशियामध्यें आज याचें प्रत्यंतर येऊं लागलें आहे. हे गट करण्याचे दृष्टीनेंसुद्धां विवाह संस्था अत्यंत उपयुक्त ठरते. एका दगडानें दोन पक्षी मारण्याचें कार्य या संस्थेनें केलें आहे यांत शंका नाहीं.

## स्त्रीत्व विसरूं नका !

समाजाच्या प्रथमावस्थेंत अन्न मिळविणें म्हणजे फळफळावळ, कंदमुळें गोळा करणें असाच प्रकार असे. अर्थात या कालांत स्त्रीपुरुषांच्या व्यवसायभिन्नत्वाच्या कल्पना लैंगिक आचारापुरत्याच मर्यादित असल्या पाहिजेत. परंतु पुढें शस्त्रास्त्रांचा शोध लागून शिकारीपर्यंत जेव्हां मानव समाजाची मजल वाढली तेव्हां जीवनाच्या झगड्याला अधिक धडाडीचें, कर्तबगारीचें स्वरूप प्राप्त झालें व पुरुषांच्या कार्यक्षेत्राचा व आर्थिक जीवनाचा पसारा वाढला. शिकार करून आणणें व ती खाणें, एवढेंच या व्यवहाराचें स्वरूप न राहतां मनुष्याला पुढें संग्रहाची कल्पना आली व हळूहळू शेतीचें आणि भविष्यकालीन अडचणीसाठीं म्हणून संग्रहाचें अर्थशास्त्र उदयाला आलें; आणि वाढत्या व्यापाराला हातभार लावण्याचें कामीं स्त्रियांच्या स्त्रीत्वानुरूप दुय्यम प्रतीचें कार्य स्वाभाविकच त्यांच्याकडे आलें; व हीच परंपरा पुढें चालून तिला रूढीचें स्वरूप जगांतील सर्वच देशांमध्यें प्राप्त झालें. अर्थात हा निसर्गप्रेरणेचा प्रभाव असावा. जगाच्या एका भागांत जें स्थान स्त्रियांना प्राप्त व्हावें तेंच जगाच्या प्रत्येक भागांतील स्त्रियांनाहि व्हावें, आणि तेंही एकमेकाशीं कोणताहि परिचय नसतांना, हीं कांहीं निव्वळ एक आकस्मिक घटना म्हणून चालण्याजोगी गोष्ट नाहीं. निसर्गप्रेरणेचा हा एक सर्वसामान्य चमत्कार आहे. जगाच्या प्रत्येक भागांतील स्त्रिया पुरुषांच्या—अलीकडे मानण्यांत येणाऱ्या दास्यांत राहतात याचा अर्थच हा कीं, हें दास्य नसून स्त्रियांना निसर्गानें प्राप्त करून दिलेला हा एक विशिष्ट दर्जा आहे, आणि स्त्रिया ह्या स्त्रिया आहेत तोंपर्यंत त्यांना तो प्राप्त होणारच ! निसर्गप्रेरणेनें घडूं पाहणाऱ्या कृतीला व्यवस्थित स्वरूप देऊं पहाणें मानवाचें काम व कर्तव्य ठरेल, पण ती क्रिया तशी घडूंच नये म्हटलें तर मात्र चालणार नाहीं; आणि चालविण्याचा हट्टच धरल्यास यातना सहन कराव्या लागतील. स्त्रियांच्या नैसर्गिक प्रवृत्ति लक्षांत घेऊन आजच्या पाश्चात्य स्त्रियांकडे पाहिल्यास त्यांना आज प्राप्त झालेल्या

स्वातंत्र्याचा त्यांना तात्विक दृष्ट्या कितपत उपयोग आहे याची कल्पना येणें फारसें कठीण नाहीं.

## यंत्रयुगाचे परिणाम

पाश्चात्य राष्ट्रांतील स्त्री–जीवनाला लागलेली आजची दिशा ही औद्योगिक क्रान्तीचा अप्रत्यक्ष परिणाम म्हणून आहे. यांत्रिक युगानें नुसत्या गृहांचीच उलथापालथ केली असें नाहीं, तर मनुष्याच्या एकंदर जीवनक्रमांत व मनोवृत्तींतहि त्यानें बदल घडवून आणला आहे. घरगुती कामाचा बराचसा पसारा कमी झाल्यानें स्त्रियांना आपलें शरीरसामर्थ्य वृथा वायां जातें असें वाटूं लागलें. या आळशी पडून राहिलेल्या सामर्थ्यानें त्यांना त्याच्या उपयोगाच्या भलत्याच कल्पना सुचवून दिल्या. गृहकृत्यांतून मुक्त झालेल्या या सामर्थ्याचा उपयोग करून घेण्यासाठीं त्या नवीन कार्यक्षेत्र शोधूं लागल्या, आणि योग्य अशा कार्यक्षेत्राच्या अभावीं नवीन निघालेल्या आर्थिक स्वातंत्र्याच्या कल्पनेच्याच आहारीं त्या गेल्या; आणि यांतूनच स्त्री–पुरुष–समतावाद निर्माण झाला. पतिपत्नी नात्यांतील सौजन्य, प्रेमादि सात्विक गुणांचा भाग नष्ट होऊन त्याला बाजारी आर्थिक व्यवहाराचें स्वरूप प्राप्त झालें. उद्योगधंद्यांत राबून पैसे मिळविणाऱ्या पुरुषालाहि पण मग असें वाटूं लागलें कीं, आपली पत्नि एक गुलाम तरी आहे अगर तसें नसेल तर मग तिनें नुसतें बसून खाण्यापेक्षां कांहीं तरी अर्थनिष्पत्ति तरी करावी ! एकमेकांची योग्यता पैशांत मोजण्याचा प्रसंग या यांत्रिक युगानें आणला, व त्यामुळें गृहांतील स्वास्थ्य नष्ट झालें. होतां होतां आज स्त्रीसमाज एथपर्यंत आला आहे कीं, स्त्रियांना घर म्हणजे पारतंत्र्यांत नेऊन टाकणारा सोनेरी पिंजरा वाटूं लागला, विवाहांत पारतंत्र्य दिसूं लागलें, व त्यांनीं सरसहा उद्योगधंद्यांत पदार्पण करण्यास सुरवात केली. पण निसर्गानें त्यांची पाठ सोडली नाहीं व त्यामुळें त्यांना गृहविहीन वैवाहिक जीवनाचा मार्ग उपलब्ध करून घेण्याची आवश्यकता भासूं लागली. पुरुषांना तेंच पाहिजे होतें आणि त्यांनीं संततीनियमनाचीं साधनें उपलब्ध करून स्त्रियांच्या या मनोवृत्तीचा पुरेपूर फायदा घेतला. गृहसंस्थेचा अशा तऱ्हेनें होत असलेला नाश परिणामीं समाजाला हानिकारक आहे ही गोष्ट विचारवंताना कळत नव्हती असें नाहीं, पण प्रवाहाबरोबर या वाव्हटीला लागलेल्या समाजाला एकदम खेंचून कडेला आणणें शक्य नसल्यानें, फिरून या चक्राला पहिली गति देण्याचा

प्रयत्न युरोपियन राष्ट्रांमध्यें आतां थोड्याफार प्रमाणांत सुरू झाला आहे. युरोपांतील बरेचसे विद्वान डॉक्टर्स, मानसशास्त्रज्ञ, फिरून गृहसंस्था कशी ताळ्यावर आणतां येईल याचा विचार करूं लागले आहेत. आदर्श गृहिणी-वांचून घराला शोभा नसल्यानें, स्त्रियांनीं या यांत्रिक जीवनक्रमांतून आपली मुक्तता करून घ्यावी, असा सल्ला कित्येकांनीं पाश्चात्य स्त्रीला दिला आहे. स्त्रियांच्या नैसर्गिक सौन्दर्याचा व जीवनक्रमाचा नाश करणाऱ्या या कृत्रिम जीवनक्रमाला उद्देशून जोसेफ टेनन बॉम नांवाचा विख्यात डॉक्टर म्हणतो—

> ' The tired factory woman is or becomes in many instances an industrial Amazon, with little of that mysterious charm of Feminity, which Goethe so felicitously expressed in " Das ewing weibliche " and for which men readily sell their souls to devil.'

## आजची शिक्षित स्त्री-एक असमाधानी व्यक्ती

स्त्रियांनीं स्वातंत्र्याचा झेंडा उभारून पुरुषांशीं प्रत्येक कार्यक्षेत्रांत सामना देण्याचें ठरवितांच त्यांना स्वाभाविकच समान शिक्षणाची आवश्यकता भासूं लागली, व शाळाकॉलेजांतून त्यांची एकच गर्दी उसळली, पण आतां फिरून यालाहि कलाटणी मिळूं लागली आहे. स्त्रियांच्या विश्वविद्यालयीन शिक्षणक्रमा-संबंधीं कांहीं पाश्चात्य राष्ट्रांत आतां तितकासा आदर राहिलेला नाहीं. उत्तम गृहिणी या स्त्रियांच्या प्रथम ध्येयाच्या दृष्टीनें हें शिक्षण निरुपयोगी असल्याचा शेरा डॉ. सी. पी. विल्सन यांनीं मारिला आहे. ते म्हणतात, ' शाळाकॉलेजां-तून शिकणाऱ्या मुली पत्नि व गृहिणी या नात्यानें अगदीं टाकाऊ असतात.' डॉक्टर मजकुरांचा हा अभिप्राय जरी सर्वस्वीं ग्राह्य मानला नाहीं तरी त्यांत बराच सत्यांश आहे हेंही विसरून भागणार नाहीं. यानंतर पुढें ते म्हणतात, ' कॉलेज कन्यांच्या विवाहाचा उडणारा बोजवारा अगर त्यांना पत्करावें लागणारें कौमार्य माझ्या म्हणण्यास पुष्टी देण्यास समर्थ आहेत.' डॉक्टर साहेबांचे हे विचार येथें कित्येकांना प्रतिगामी वाटतील, पण युरोपमध्यें ते पुरोगामी वाट-ण्याची वेळ आली आहे. आमा रिचर्डसन, औद्योगिक क्रांतीनें स्त्रीचें जीवनावर झालेल्या परिणामासंबंधीं म्हणते, ' मनुष्य स्वभाव आणि त्याचें व्यक्तित्व यांची उभारणी व विकास करण्यास कारणीभूत होणाऱ्या आपल्या जन्मसिद्ध

हक्कांस स्त्रिया यामुळें विकीत आहेत. गृहाला एक स्पृहणीय स्थान प्राप्त करून देणाऱ्या आपल्या हक्कांना त्यांनीं दृढपणें चिकटून राहिलें पाहिजे.' स्त्रियांच्या प्रचलित स्वातंत्र्य–कल्पनांचा उदय करण्यांत घरगुती उत्पादनकार्य स्थगित होण्यानें बरींच मदत झाली. कांतणें, विणणें, धुणेंपाणी, दळण कांडण, स्वयंपाक इत्यादि कामें यांत्रिक युगापूर्वी एथल्याप्रमाणेंच पाश्चात्य स्त्रियांनाही करावीं लागत; त्यामुळें आपण बसून खाणारे गुलाम आहोंत ही भावना त्या वेळीं स्त्रियांच्या मनांत येणें शक्य नव्हतें. औद्योगिक क्रांतीनें या सर्व घरगुती उद्योगांचा नाश केला, वैयक्तिक कार्य सामुदायिक करून त्याला सुलभता आणली, त्यामुळें स्वाभाविकच स्त्रियांना आपल्या उद्योगधंद्याला मुकावें लागलें व त्यांच्या घरगुती व सामाजिक स्थानामध्यें कांहीं तरी स्थित्यंतर घडवून आणण्याची आवश्यकता भासूं लागली. औद्योगिक क्रांति होऊन आज जो भांडवलशाहीचा व यंत्रयुगाचा उदय झाला आहे तो झाला नसता, तर लोकशाही तत्त्वांचा व स्त्रीपुरुष–समतेचा क्वचितच उदय झाला असता. आणि या म्हणण्याची सत्यता अद्यापहि कांहीं मागासलेल्या [!] खेड्यापाड्यांचें निरीक्षण करतांच पटण्याजोगी आहे. स्त्रीस्वातंत्र्याच्या आजच्या कल्पना म्हणजे भांडवलशाहीचा एक परिणाम आहे, भांडवलवृक्षाची ही एक शाखा आहे. वेबेल म्हणतो—

'Feminism was graduated from the factory, from the stench and pallor of the sweat shop. A child of capitalism, it has become the problem–child of industrial society.'

यंत्रानें स्त्रियांना जितकें स्वतंत्र केलें [!] तितकेंच त्यांना परतंत्रही पण केलें. बर्नार्ड शॉनें एके ठिकाणीं म्हटलें, 'मनुष्य यंत्राचा गुलाम झाला आणि स्त्रिया गुलामाच्या गुलाम झाल्या.' शॉच्या या म्हणण्याला एक विशिष्ट अर्थ आहे. स्त्रिया इतके दिवस निव्वळ पुरुषांच्या गुलाम होत्या; पण आतां त्या यंत्राच्या तर आहेतच, पण निसर्गयोजनेप्रमाणें पुरुषांच्याहि आहेत. या खटाटोपानें त्यांनीं आपल्या गुलामगिरीचें क्षेत्र मात्र वाढवून घेतलें आहे. विवाह, लैंगिक आचारांची भूक, मातृत्व या सर्वांची स्त्री–देहावरील व मनावरील पकड जोंपर्यन्त ढिली होत नाहीं तोंपर्यंत स्त्रियांनीं आरंभलेल्या या उपद्व्यापांना काडीचेंही मोल नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांत स्त्रियांना कामावर घेणारे कारखानदार व इतर लोक एक

गोष्ट गृहीत धरून असतात आणि ती म्हणजे, आज आपणांकडे कामावर असणारी स्त्री ही, पुरुषांप्रमाणेंच स्थिर स्वरूपाची नोकरी करणारी व्यक्ति नव्हे, ही होय ! उद्यां लग्न होईल, चार मुलेंबाळें होतील आणि मग हिची व आपल्या नोकरीची फारकत होणार, निदान आपल्या कामाच्या दृष्टीनें कां होईना पण ती आपणांस करावी लागणार ! याचा परिणाम कित्येक वेळां असा होतो कीं, स्त्रियाही आपली नोकरी कायम स्वरूपाची नाहीं हें गृहीत धरून चालतात व आहे त्या कामापेक्षां अधिक कांहीं तरी करून बढती मिळविण्याची अपेक्षा धरीत नाहींत, आणि यामुळें त्यांच्या औद्योगिक दर्जांत कधींच फारसा फरक पडत नाहीं; त्यांना कामावर नेमणारांचीहि पण ती अपेक्षा नसते. एक कारखानदार या संबंधीं म्हणतो, ' स्त्रियांना आम्हीं विशेष रीतीनें वाकबगार करण्याच्या भरीस पडत नाहीं; कारण त्यांना खटपटीनें तयार करावें व एक दिवस त्यांनीं लग्न करून खुशाल आमच्या नोकरीवर लाथ मारून चालतें व्हावें असा प्रकार होतो.'

## नोकरीवाल्या स्त्रियांची स्थिति

पाश्चात्य राष्ट्रांतून अर्थनिष्पत्ति करणाऱ्या स्त्रियांपैकीं बऱ्याचशा स्त्रिया टंकलेखन व शिक्षण या दोनच व्यवसायांत विशेष आढळून येतात. अमेरिकेंत टंकलेखनामध्यें ८ लाख स्त्रिया काम करीत आहेत; याचा अर्थच हा कीं, कमी शारीरिक श्रमाचीं कामें पत्करण्याकडे त्यांचा अधिक कल असतो. त्यांतही एक विनोदी गृहस्थ म्हणतात, ' या व्यवसायांत शिरणाऱ्या स्त्रियांना बऱ्याच कार्यक्षेत्रांत प्रवेश असल्यानें वरसंशोधनालाहि अवसर मिळतो.' [ Husband hunting ] शिक्षणव्यवसायांतहि स्त्रियांचा भरणा वरील गोष्टीमुळेंच आहे. पण अमेरिकेनें याबाबत आतां आपलें धोरण थोडें बदललें आहे. शिक्षण–व्यवसायांत कार्य करणाऱ्या स्त्रिया विवाहामुळें या कार्यास नालायक ठरतात असें अमेरिकन तज्ञांचें म्हणणें असून विवाह होतांच त्या नवपरिणत वधूला नोकरींतून कमी करण्याचें धोरण सरकारनें आंखलें आहे. याचा उद्देश हाच कीं, मातृत्वाची जबाबदारी पत्करूं पाहणारी स्त्री दोन जबाबदाऱ्या एकदम तितक्याच कसोशीनें पार पाडण्यास समर्थ असणें शक्य नाहीं हाच होय ! अमेरिकन राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या संशोधनामध्यें असें आढळून आलें कीं, १५०० शहरांपैकीं शेंकडा ७७ शहरांमधील शिक्षण संस्थांनीं विवाहित स्त्रियांना नोकरीवर न ठेवण्याचा निर्बंध पाळला आहे. अमेरिकेसारख्या पुढारलेल्या राष्ट्राकडून पाळण्यांत येणारा हा

दंडक लक्षांत ठेवण्याजोगा आहे. विवाहित स्त्रियांच्या स्वतंत्र अर्थोत्पादनाची चौकशी अमेरिकेंत करण्यांत आली. तेव्हां असें आढळून आलें कीं, विवाहित स्त्रियांपैकीं शेंकडा १० स्त्रियाच फक्त नोकरी करतात व त्यांना घरचीं व बाहेरचीं अशीं दुहेरी कामें करावीं लागतात; याचा त्यांच्या आरोग्यावर हटकून परिणाम होतो. विवाहित स्त्रियांना घराबाहेर काम करावें लागणें ही गोष्ट अत्यंत हानिकारक आहे असें अमेरिकन तज्ञांचें म्हणणें आहे. या दुहेरी कर्तव्यांच्या जबाबदारीमुळें स्त्रियांना दोनही कार्यें यथासांग पार पाडतां येत नाहींत व 'इदंच नास्ति परं न लभ्यते' अशी त्यांची अवस्था होऊन जाते.

(The conflicting double loyalities to home and job have an unsettling influence in both directions. The woman is a poor wife, mother, and house-keeper, or else a tired and pre-occupied at her job).

अमेरिकेंतील चार महत्त्वाच्या शहरांतील विवाहित कामकरी स्त्रियांच्या परिस्थितीचें परिक्षण करण्यांत आलें. त्या वेळीं असें आढळून आलें कीं, या स्त्रियांपैकीं सुमारें दोन पंचमांश स्त्रियांना पांच वर्षांच्या आंतील मुलें असून त्यांच्याकडे व त्यांच्या रोजच्या नोकरीकडे लक्ष पुरवितांना त्यांना बेजार होऊन जाते, आणि मुलांसाठीं, कित्येक वेळां शेजारीपाजारी अगर इतर नातलग यांवर त्यांना विसंबून राहावें लागतें, यामुळें त्यांची व त्यांच्या मुलांची हानी होते!

(Sickness and over exertion and fatigue take a heavy toll of women employed in this double capacity.)

या सर्व कटकटींचा परिणाम म्हणूनच कीं काय फिरून अमेरिकन स्त्रियांनीं घरांकडे मोर्चा वळविला असावा असें दिसत आहे. डॉ. होझेल कोर्कच्या निवेदनाप्रमाणें सर्वस्वीं घरगुती व्यवसायाला वाहून घेतलेल्या पंधरा वर्षांपुढील स्त्रियांची संख्या १९२० सालीं २२१६९३८७ इतकी होती, ती १९३० सालीं ती २६०००००० इतकी झाली, आतां तर २० वर्षांपुढील शेंकडा ३५ स्त्रियांनीं सर्वस्वीं गृहकृत्यांना वाहून घेतलें आहे. स्त्रियांच्या गृहधारणेच्या मनोवृत्तीला फिरून भरती येऊं लागल्याचीं स्पष्ट चिन्हें कित्येक पाश्चात्य राष्ट्रांमधून दिसून येऊं लागलीं आहेत. चालू काळांत स्त्रियांचे गृहव्यवसाय कसें नष्ट झाले आहेत हें पाहण्याच्या दृष्टीनें पुढील कांहीं आंकडे लक्षांत ठेवण्याजोगे

आहेत. १९१९ ते २९ च्या दरम्यान घरीं रोजच्या खाण्यांत येणारी रोटी शेंकडा २७ या अधिक प्रमाणांत बाजारांतून तयार आणण्यांत येऊं लागली. त्याचप्रमाणें डब्यांतून तयार मिळणाऱ्या खाद्यपदार्थांचा खप शेंकडा २०० नें अधिक वाढला. त्याचप्रमाणें धोब्याकडून धुऊन आणण्याचें प्रमाणहि कितीतरी वाढलें. शहारंतील फक्त शेंकडा ३० टक्के घरांत कपडे धुण्याचें काम घरच्या घरीं होतें असें आढळून आलें. गृहव्यवसायांची अशी वासलात लागतांच शेंकडा ६० टक्के स्त्रिया रिकाम्या झाल्या व त्यांनीं नोकरीची खटपट सुरू केली यंत्राच्या आगमनानें भरमसाट तयार होणाऱ्या जिनसांनीं गरजा भागवून घेण्याची मनोवृत्ति वाढल्यानें घरधंदे बुडाले व स्त्रियांना नोकरीचे चाळे सुचूं लागले. हीलग्रेड नीलंडनें याबाबत केलेलें विवेचन मोठें मजेशीर आहे. ता म्हणतो, ' हीं सर्व कामें स्त्रियांनीं घरींच करवयाचीं म्हटल्यास त्यांचें व घरच्या लोकांचें आरोग्य तर चांगलें राहीलच, पण आठवड्यांतून सुमारें ५० तास काम त्यांना मिळेल व प्रचलित मजुरीच्या दरानें त्याची किंमत सुमारें २००० रु. वर्षाचे काठीं होईल; शिवाय बाह्य व्यवसायापेक्षां हीं कामें त्यांना किती तरी मानवतील तें निराळेंच ! ' स्त्रियांच्या गृहव्यवसायाची उपेक्षा करणें अगर त्यांत कांहीं कमीपणा मानणें हें किती अज्ञान आहे याची स्पष्ट कल्पना वरील विधान वाचून येणारी आहे.

## स्त्रीशिक्षणाचा दृष्टिकोन

स्त्रीपुरुष शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन यामुळें अमेरिकेंत आतां बदलूं लागला आहे. स्त्रीपुरुषांना समान शिक्षणांत गुंतविण्यानें स्त्रियांच्या नैसर्गिक प्रवृत्तींना योग्य वाव मिळूं शकत नाहीं, याची जाणीव आतां तेथें होऊं लागली आहे. एका तज्ञाचा पुढील अभिप्राय जरूर पहा—

" For the girl whose life-goal and prime duty are to become wife and mother, masculine standards of education are cumbersome and harmful. At last system trains spinisters.'

लवकरच विवाहित होऊन माता होऊं पहाणाऱ्या स्त्रियांना प्रचलित शिक्षणक्रम अगदीं कुचकामीं असल्याचा शेरा अमेरिकेंत अनेक तज्ञांनीं मारला आहे. या शिक्षणानें अमेरिकन स्त्रियांच्यावर व पर्यायानें अमेरिकन समाजावर केलेला

आघात बराच तीव्र असल्याची कबुली तेथें देण्यांत येत आहे. दीक्षा घेऊन बाहेर पडलेल्या कॉलेज कन्यकांपैकीं शेंकडा सुमारें ६० कन्यका ब्रह्मचारिणी म्हणून हिंडत असल्याचें आढळून आलें. कारण त्यांच्याशीं विवाहबद्ध होण्याची तयारी दाखविण्यास फारसे अमेरिकन तरुण तयार नाहींत. प्रत्यक्ष संसारांत भागिदार म्हणून त्या निरुपयोगी ठरतात, असा त्यांचा समज आहे.

[ But the college women are not among the most favoured for marital choice is a familiar fact ]

हिंदी कॉलेज कन्यका यावरून योग्य तो बोध घेतील अशी अपेक्षा करण्यास मुळींच हरकत नाहीं. कित्येक फाकडे अमेरिकन तरुण म्हणतात, 'पुरुषांची बरोबरी करूं पाहणाऱ्या या पुरुषी पोरीपेक्षां एखादी खेडवळ तरुणी बरी!' कॉलेजांतून बाहेर पडल्यानंतर मातृत्व पत्करलेल्या स्त्रियांपैकीं शेंकडा ७७ स्त्रियांना गृहकृत्यें व अपत्यसंगोपन याबाबत आपण पूर्ण अज्ञानी असल्याची लाजिरवाणीं कबुली देऊन खेद प्रदर्शित करण्याची पाळी आली. या साऱ्या दोषांपासून अमेरिकन स्त्रीला मुक्त करण्यासाठीं आतां नवीन संस्था निघूं लागल्या आहेत. दुय्यम शाळांमधून मुलींच्यासाठीं गृहव्यवसाय व अपत्य-संगोपन यांचें शिक्षण देण्याची सर्रास सोय करण्याबाबत योजना चालू आहेत. डॉ. हॅरी इमरसन फॉसडिक म्हणतो, 'स्त्रियांच्या चालू स्वातंत्र्याचा विचार करा! आज त्यांना राजकीय, आर्थिक सर्व प्रकारचें स्वातंत्र्य आहे; पण या स्वातंत्र्यानें त्यांच्या आयुष्यांतील अत्यंत उच्च अशा ध्येयाचा कोणता परिपोष केला आहे? त्यांच्या जीवनाशीं निगडित असलेल्या एका तरी खऱ्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल त्यानें केला आहे काय? या स्वातंत्र्यानें स्त्रियांचीं मनें मात्र द्विधा करून ठेविलीं आहेत. त्यांनीं तात्काळ आपलें स्त्रीत्व फिरून प्रस्थापित तरी करून घ्यावें, नाहीं तर सर्व नाशास तरी सिद्ध व्हावें; दुसरा मार्ग त्यांचेपुढें नाहीं.'

इथेल पफर म्हणते, 'स्त्रियांच्या चालू उच्च शिक्षणाचा पाया त्यांच्या स्वतःच्या फसवणुकीवर, आत्मघातावर घालण्यांत आला आहे.'

## समारोप

स्त्रियांची खरी भूमिका व प्रचलित कालांत त्यांना लागलेली दिशा यांचें थोडक्यांत दिग्दर्शन आतांपर्यंत करण्यांत आलें. तें करण्याचा उद्देश हाच

कीं, हें विवेचन ध्यानांत ठेवून आतां आपणांस युरोपचा प्रवास करावयाचा आहे, व त्यांतील स्त्रीसमाजांचें दर्शन घ्यावयाचें आहे. पाश्चात्त्य स्त्रीसमाजाचें दर्शन करवून देण्याचा आमचा उद्देश आतां स्पष्ट आहे. आणि तो हाच कीं, हिंदी स्त्रीला पाश्चात्य स्त्रीजीवनांतील नानाविध आंदोलनांची कल्पना येऊन त्रयस्थपणानें त्यांच्या बरेवाईटपणाचा निर्णय घेतां यावा व आपली दिशा ठरविण्यास सुलभ जावें. प्रचारकी धोरणापासून शक्य तों अलिप्त राहून हें कार्य करण्याचा आमचा मानस असून पाश्चात्य स्त्री जशीच्या तशीच आपणांस परिचित व्हावी असा हेतु आहे. आरंभींच स्त्रीजीवनाच्या खऱ्या गरजांचा उल्लेख करण्यांत आला असल्यानें पाश्चात्य स्त्रिया त्यांची कितपत पूर्तता करूं शकतात हेंही हें पुस्तक वाचतां वाचतांच वाचकांना ठरवितां येणें शक्य आहे.

---

## प्रकरण २ रें रशिया

केसरीमधील आमच्या लेखमालेंत आम्हीं आर्यांच्या समाज-बंधनांचा व स्त्रीजीवनाचा संबंध स्पष्ट केलाच आहे. तो करीत असतांना पाश्चात्य स्त्री-समाजाचें ओझरतें परीक्षण आम्हांस करावें लागलें, परंतु त्यामुळें पाश्चात्य स्त्रीचें यथातथ्य दर्शन होऊं शकलें नाहीं ही गोष्ट वाचकांप्रमाणेंच आम्हांलाहि मान्य आहे; पण सदर लेखमालेचा उद्देशच तो नसल्यामुळें त्यासंबंधीं फारशी चिकित्सा आम्हीं केली नाहीं.

### राजकीय रंग आणि स्त्रियांचें अंतरंग !

भारतीय स्त्री म्हटली कीं, 'आसेतु हिमाचल' एकच नमुना आपल्या दृष्टीस पडतो. बाह्य देखाव्यांत प्रांताभिरुचीमुळें फरक असेल, नाहीं असें नाहीं; परंतु आर्य स्त्रियांच्या अंतःकरणाची, मनोवृत्तीची, चालीरीतींची घाटणी कोठेंही गेलें तरी सारखीच. पाश्चात्य स्त्रियांच्या बाबतींत मात्र ही गोष्ट शक्य होऊं शकत नाहीं. राष्ट्रागणिक त्यांच्या बाह्य देखाव्यांत तर फरक आहेच, पण मनोवृत्ति, सामाजिक दर्जा, चालीरीती यामध्येंही त्यांच्यांत कोठेंच साम्य आढळून येत नाहीं. आणि याला एकच कारण म्हणजे स्त्री-जीवनाची राजकीय व्यवहाराशीं घालण्यांत आलेली सांगड हेंच होय. राजकीय पक्षोपपक्षांप्रमाणें पाश्चात्य स्त्रीचे रंगढंग बदलतात. आज रशियांतील स्त्री, जर्मनींतील स्त्री, फ्रान्स-इंग्लंड-मधील स्त्री, राजकीय वावटळींच्याच आहारीं गेलेली दिसेल आणि त्यामुळेंच प्रत्येकीचे ठिकाणीं व प्रत्येकीच्या सामाजिक दर्जामध्येंहि वैषम्य आढळेल. आणि म्हणूनच पाश्चात्य स्त्रीचा विचार करतांना प्रत्येक राष्ट्रांतील स्त्रीचा स्वतंत्रपणें विचार करणें भाग आहे. वस्तुतः स्त्रीजीवन हें परमेश्वर नियोजित अशा एका विशिष्ट मार्गानेंच व्यतीत होणें अधिक श्रेयस्कर आहे, हें आम्हीं

मागें प्रतिपादन केलेंच आहे. पण निसर्गाशीं द्वंद्व करून आपली खुमखुमी प्रदर्शित करण्याची जी हांव मानवी प्राण्यांचे मनांत वसती करून आहे तिच्या आहारीं जाऊन कित्येक वेळां मनुष्य हा जीवनाच्या नैसर्गिक नियमाशींहि चार हात करूं पाहतो. साहजिकच त्याचा अनिष्ट परिणाम त्याना भोगावा लागतो हें निराळें! पाश्चात्य स्त्रीसमाज म्हणजे अशा अनेकविध द्वंद्वांचे नमुनेच आहेत. या झगड्यामध्यें निसर्ग प्रभावी ठरला, कीं स्त्रियांना स्वतंत्र करूं म्हणणारे स्त्री-हितवादी प्रभावी ठरले, हें एथें सांगत न बसतां पाश्चात्य स्त्रीचें व तिच्या झगड्यांचें यथातथ्य चित्र रेखाटल्यानंतर वाचकच त्याचा योग्य निर्णय देऊं शकतील. आणि याच उद्देशानें आम्हीं हें विवेचन करण्याचें ठरविलें आहे. आपण प्रथम रशियांतच जाऊं.

## स्त्रीसमानता आणि रशियन क्रान्ति

जगाच्या इतिहासांत स्त्री-पुरुषामधील नैसर्गिक भेदाला प्राधान्य न देतां त्यांना जागतिक व्यवहारांत एकाच भूमिकेवर कार्य करूं देण्याचा प्रथम मान आजच्या रशियाला आहे. क्रांतिपूर्वकालिन रशियन स्त्रीकडे पाहिल्यास आपल्याकडील प्राचीन स्त्रीपेक्षां कोणत्याच बाबतींत ती निराळी भासणार नाहीं. मनूनें निर्माण केलेला 'पिता रक्षति कौमार्ये' हा कायदा त्या वेळीं रशियन स्त्रीलाही तंतोतंत लागूं होता. तत्कालीन रशियन स्त्रीसंबंधीं बोलतांना एक रशियन स्त्री म्हणते, 'आर्थिक दृष्ट्या, राजकीय दृष्ट्या अगर सामाजिक दृष्ट्या स्त्रियांना कोणतेंच स्वातंत्र्य रशियांमध्यें नव्हतें. प्रत्येक बाबतींत त्यांना पुरुषांच्या कलानेंच वागावें लागे.' एका अमेरिकन स्त्रीनें केलेलें रशियन स्त्री-दास्याचें वर्णन पुढील प्रमाणें आहे—

'They keep their women so secluded that nobody gets a chance to see or speak with them. They are seldom allowed to go to Church and still less often to visit friends, unless they are so old that nobody takes any further notice of them or suspects them.'

## क्रान्तिपूर्वी स्त्रियांचें जीवन!

रशियन स्त्रियांच्या बाबतींत प्रचारांत असलेल्या म्हणीसुद्धां इकडच्याच नमुन्याच्या आहेत, ही गोष्ट विशेषे करून ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

त्यांतील कांहीं वेंचक म्हणींचा सारांश पुढें दिल्याप्रमाणें आहे. 'स्त्रियांचा मार्ग उंबरा ते चूल' 'स्त्रियांना उठतां लाथ बसता बुक्की' 'बायकांना शिवण आणि तें कशासाठीं?' आज क्रान्त्युत्त्यर कालामध्येंही या जुन्या वळणाखालींच कित्येक स्त्रिया नांदतांना खेडींपाडीं दृष्टीला पडतात. परक्या पुरुषांच्या आगमनानें त्या एखाद्या भित्र्या सशाप्रमाणें घरांत दडल्या कीं फिरून त्यांना पाहण्याची आशाच नको, मग बोलण्याचें दूरच! असा अनुभव कित्येक प्रवाशांकडून सांगितला जातो. या जुन्या वळणाच्या स्त्रिया क्रांतीच्या नांवानें बोटें मोडतांनाहि पण आढळून येतात. पतीच्या हातचा मार व त्याचें दास्यत्व यांतच स्त्रीजन्माची सार्थकता अद्यापिहि त्यांना वाटते. आपल्या मुलीला न मारणारा नवरा कित्येक मातांच्या दृष्टीनें खरा जांवईच नव्हे; उलट त्या याचा असा अर्थ करतात कीं जांवयाचें आपल्या मुलीवर खरें प्रेमच नाहीं. सैबिरायांतहि अद्याप क्रांतिपूर्वकालीन अज्ञान स्त्रियांचाच भरणा विशेष आहे. गोषाची पद्धति कांहीं ठिकाणीं आढळून येते. मध्य आशियांतील कांहीं पालक तर अजूनहि इतके सनातनी आहेत कीं ते म्हणतात, 'मुलीला शाळेंत पाठविण्यापेक्षां आम्ही आमच्या हातांनींच तिला ठार करूं.' पौर्वात्य राष्ट्रांतील अडाणी समाजाच्या स्त्रीविषयक कल्पनांशीं परिचित असणाऱ्यांना रशियन स्त्रीची ही माहिती वाचून आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. अवघ्या पंचवीस वर्षांपूर्वीं सरसहा या स्थितींत असलेल्या रशियन स्त्री–समाजानें आज मारलेली आघाडी मात्र अचंबा निर्माण करणारी आहे, याबद्दल कोणाचेंच दुमत होणें शक्य नाहीं. आजच्या नागारिक रशियन स्त्रीचें चारित्र्य उदात्त आहे किंवा नाहीं, स्त्रीजातीचें सौख्यवर्धन आजच्या रशियन समाजशास्त्रानें साधलें किंवा नाहीं हे प्रश्न अगदीं स्वतंत्र आहेत. परंतु रशियन स्त्रीनें या पंचवीस वर्षांत केलेली वाटचाल केव्हांही आश्चर्यकारकच वाटणार. ही चाल अंतराच्या दृष्टीनेंच फक्त या ठिकाणीं विचारांत घ्यावयाची आहे. प्रगति–परागतीची कसोटी तिला इतक्यांत लावतां येणार नाहीं. कारण बऱ्या वाईट परिणामांची निश्चित कल्पना आपणांस आलेली नाहीं. सुरवंटांतून कांहीं कालानें सुंदर फुलपांखरूं बाहेर पडावें त्याप्रमाणें कांहीं अंशीं रशियन स्त्रीचा प्रकार झाला आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं अज्ञानांधःकारांत गाडली गेलेली रशियन स्त्री आज जीवनरसाचा आस्वाद घेत [?] सुधारणेच्या प्रकाशांत फुलपाखराप्रमाणें भ्रमंति

करतांना पाहून कोणालाहि नवलच वाटेल व त्याचबरोबर रशियन क्रांतिवाद्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतील. समाज–सत्तावादी क्रांतीच्या प्रखर ज्वालांत जुना रशिया भस्मीभूत झाला आणि त्या रक्षेमधून नवीन रशिया आपल्या नवविचारासहित बाहेर पडला. ही क्रांति घडवून आणणारे वीर अतुल शक्तिशाली असले पाहिजेत ही गोष्ट निर्विवाद आहे.

## लेनिनची घोषणा

राजकीय स्वातंत्र्याचा पाया मार्क्सच्या तत्त्वावर घालण्यास उत्सुक झालेल्या क्रांतिकारकांच्या मार्गांवर रशियन स्त्रीची धोंड होती, ती दूर करण्यासाठीं म्हणून समाजसत्तावाद्यांनीं स्त्रीलाहि अद्यावत् बनविण्याचे ठरवून त्या दृष्टीनें लेनिननें घोषणा केली—' स्त्रियांना समान सामाजिक दर्जा प्राप्त करून देण्याचा प्रथम मान मजूरवर्गाच्या सर्वाधिकारित्वाला [ Dictatorship of the Proletariat ] मिळेल. स्त्रियांच्या हक्कासंबंधीं लिहिण्यांत आलेल्या हजारों ग्रंथांनीं जें कार्य होऊं शकलें नाहीं तें ही संस्था करून दाखवील. लाखों स्त्रियांनीं आमच्या बरोबरीनें आमच्या कार्यांत भाग घेतल्याशिवाय आमचा राजकीय कार्यक्रम यशस्वी होऊं शकणार नाहीं.'

स्त्री–दास्यविमोचनास्तव समाजसत्तावादी पुढाऱ्यांनीं केलेल्या मोहिमेला त्यांनीं राजकीय क्रांतीइतकेंच महत्त्व दिलें. वर्गवारी समाजरचनेनें स्त्रियांवर लादलेलें दास्यत्व वर्गहीन समाजरचनेमध्यें नष्ट केलें जाऊन स्त्री व पुरुष यांना ' माणसें ' या सामान्य सदरामध्यें दाखल करण्याची मार्क्सची भूमिका रशियन क्रांतिवाद्यांनीं स्वीकारली. आतांपर्यंत कुटुंबाच्या मर्यादित क्षेत्रामध्यें वावरणाऱ्या स्त्रीपुढें लैंगिक व्यवहार व प्रेम यामुळें निर्माण होणारी कौटुंबिक कार्यपरंपराच फक्त असे. राजकीय समाजरचनेमध्यें अगर सामाजिक जीवनामध्यें महत्त्वाचें असें कोणतेंच स्थान तिला नव्हतें : ' For women home was their world, while for men the whole world was home.' अशी स्थिति त्या वेळीं होती. स्त्रियांचें दास्यविमोचन करतांना पुरुषांच्या हितसंबंधांना विरोध येईल अशी शंका कित्येकांना आली; पण तिचें निराकरण पुढीलप्रमाणें करण्यांत आलें– ' We are not trying to set women against men......' कोणतीहि जागा भरतांना लिंगविचाराला प्राधान्य न

देतां एक माणूस या ठिकाणीं नेमावयाचा आहे, तें काम कोण अधिक व्यवस्थित करूं शकेल त्याला ती जागा मिळेल; मग ती स्त्री असो अगर पुरुष ! रशियानें दाखविलेली ही समता कशीहि असो, पण प्रत्यक्ष परिणाम असा दिसतो कीं, पुरुषच अधिक नेमले जातात. रशियन स्त्रियांनाहि आपल्या न्यूनगंडाची कल्पना आहे. एका समीतीवर स्त्री सभासद असावा या दृष्टीनें समाजसत्तावादी पुढाऱ्याकडून 'डुनिया' नांवाच्या एका स्त्रीचें नांव पुढें करण्यांत आलें, पण तिनें चोख उत्तर दिलें—'

'If I am not good enough as a human being, I won't go to the committee at all.'

क्रांतीनंतर लवकरच स्त्रियांना समान दर्जा प्राप्त करून देणारे कित्येक कायदे तात्काळ पास करून घेण्यांत आले व हे कायदे पास झाल्यानंतर लेनिन मोठ्या समाधानानें म्हणाला, 'स्त्री-पुरुषांतील विषमता संपूर्ण नाहींशी करण्याचें श्रेय आज आम्हांला मिळालें.' परंतु पुढें लेलिनला कळून आलें कीं, कायदे करणें आणि प्रत्यक्ष ते आचरणांत आणणें यामध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे ! त्या कायद्यांच्या आचरणामुळें निर्माण होणाऱ्या असंख्य सामाजिक प्रश्नांना फिरून तोंड देतांना रशियन सरकारच्या 'नाकीं नवू' आले. वैवाहिक बंधनांची मोडतोड केल्यामुळें निर्माण झालेली अनास्था पाहण्यापूर्वी धार्मिक गुलामगिरींतून मुक्त होण्यासाठीं रशियन स्त्रियांचेवर करण्यांत आलेल्या प्रयोगाची थोडी फार माहिती घेतल्यास वावगें होणार नाहीं.

## स्त्री-स्वातंत्र्यासाठीं धर्मावर घाव !

धार्मिक प्रवृत्तींचा पगडा स्त्री-मनावर विशेष असल्यामुळें धार्मिक संस्थांचें उच्चाटण स्त्रियांच्या सहाय्यावांचून होणें अशक्य होय. बुद्धिवादानें धार्मिक निराधार समजुतींचा नाश होतो म्हणून क्रुप्स्काया म्हणते—

'Because women have no time to study, they believe in everything the priests tell them.'

धर्माचे हे जिम्मेदार नष्ट करण्यापूर्वी त्यांचें वैयर्थ्य बहुजन स्त्रीसमाजाला पटवून देणें भाग होतें, व त्याला आधिभौतिक ज्ञानदानाखेरीज दुसरा योग्य असा मार्ग नसल्यानें स्त्रियांना सुशिक्षित करण्याची मोहीम प्रथम सर्व रशियाभर सुरू करण्यांत आली. धर्मप्रवृत्तीच्या बुडाशीं असलेलें एक रहस्य क्रुप्स्कायानें मोठ्या

कौशल्यानें प्रकट केलें आहे; तिनें दिलेल्या पुढील उदाहरणांतील मानसशास्त्रीय सत्य लक्षांत घेणें अवश्य आहे. एक फिरता सिनेमा एके रविवारीं एका खेड्यांत आला, तात्काळ चर्चचा रस्ता सोडून सर्व लोक सिनेमाकडे वळले. या प्रकाराला उद्देशून क्रुप्स्काया म्हणते—

'Was it religious feeling that had brought those people to Church ? No, merely a thrust of spectacle !'

सिनेमासृष्टीचें नावीन्यही याला कदाचित कारणीभूत असेल. क्रुप्स्कायनें आपणांस अनुकूल तेवढा अभिप्राय त्यापासून घेतला. 'धर्म हा स्त्रियांचा खरा शत्रू आहे.' अशा अर्थाचा प्रचार रशियानें फार मोठ्या प्रमाणावर केला व धार्मिक बंधनासंबंधींचें शैथिल्य निर्माण करण्यांत आलें. अर्थात 'धर्म' नाहींसा केला याचा अर्थ, पूर्वापार चालत आलेलीं बंधनें व समजुती नाहींशा केल्या; नव्या रूढी, नवे आचार, अर्थात नवा धर्म प्रचलित करण्यासाठीं जुना साज उतरवून ठेवण्यांत आला. चर्चमध्यें मोठ्या सुवर्णाक्षरांत लिहिण्यांत आलें 'धर्म हा मानवांचा शत्रू आहे!' या ठिकाणीं धर्म म्हणजे रूढीप्रणित ख्रिश्चन धर्म हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. एका चर्चमध्यें लेनिनचा प्रचंड पुतळा उभा करण्यांत आला असून त्याच्या खालीं लिहिलें आहे—'स्त्रियांचा मार्ग खुला करा!' धार्मिक प्रवृत्तीमुळें स्त्रीवर्गाच्या ठिकाणीं निर्माण झालेला न्यूनगंड नष्ट करण्यासाठीं धार्मिक वृत्तीचे बारा वाजविण्याची कामगिरी रशियानें प्रथम पार पाडली व दुहेरी कामगिरी केली. 'आधिभौतिक जडवादाची' प्रस्थापना करण्याच्या दृष्टीनें ही मोहीम रशियाला उपयोगी पडली—त्याचबरोबर स्त्री-मनावरील रूढीचें व धर्माचें दडपण नाहींसें होऊन नवीन जगांत प्रवेश करण्यास तिला सुलभ झालें. उद्योगधंद्यांत पदार्पण करण्यास आतां तिला मोकळीक झाली.

## आर्थिक स्वातंत्र्याचे दुष्परिणाम

समाजसत्तावादी रशियाच्या कायद्याप्रमाणें वेतनामध्यें स्त्री-पुरुष असा भेद केला जात नाहीं. कामाच्या प्रमाणांत तेथें दाम दिला जात असे, मग तें स्त्री करो अगर पुरुष! प्रारंभीं स्त्रिया फक्त सामान्य उद्योगधंद्यामध्येंच प्रवेश करूं शकल्या, कारण शिक्षणाच्या अभावीं कौशल्यप्रधान उद्योगधंद्यांमध्यें पदार्पण करणें त्यांना शक्य नव्हतें. अलिकडील रशियन स्त्रीला ही अडचण भासत नाहीं. शिक्षणाचीं सर्व द्वारें आतां त्यांना खुलीं असल्यानें

मोठमोठ्या जबाबदारीच्या जागावरही स्त्रियांच्या नेमणुका झालेल्या दृष्टीस पडतात. अर्थोत्पादनाच्या बाबतींत आतां त्या पुरुषांच्या बरोबरीस आल्या आहेत; पण त्याच बरोबर अविवाहित राहून स्वतंत्र आयुष्यक्रम कंठण्याची प्रवृत्तिहि त्यांच्यामध्यें विशेष प्रमाणांत दिसून येऊं लागली आहे. कांहीं मुली उद्योगधंद्याचा मार्ग सोडून विवाहाचा मार्ग अनुसरतात, पण त्यांना 'सनातनी' म्हणून संबोधण्यांत येतें. पूर्वीच्या दास्याची प्रतिक्रिया म्हणूनच कीं काय आज घराची मर्यादा सोडून उद्योगधंद्यामध्यें गुंग होऊन जाण्याची प्रवृत्ति रशियन स्त्री-समाजांत फार मोठ्या प्रमाणांत दिसून येत आहे. प्रथम प्रथम समाजसत्तावादी क्रांतिवाद्यांना आपण स्त्रीदास्यावर मिळविलेला हा प्रचंड विजय वाटला, पण पुढें मात्र यांतील अनिष्टता त्यांना उमगली. स्त्री-पुरुषांची युति झाल्यावांचून राष्ट्राचें अस्तित्व संभवत नसल्यानें त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रांत व्यग्र असतांच एकत्रित आणण्याचे प्रयत्न करण्यांत आले; व त्याचा परिणाम असा झाला कीं, पक्षाच्या कार्यक्रमानुरूप चाललेला व्यवसाय हा महत्त्वाचा भाग असून स्त्रीपुरुष संबंध हा जीवनाचा अत्यंत गौण भाग आहे अशी रशियन स्त्रीपुरुषांची समजूत झाली व बेजबाबदार शरीरसंबंधांना ऊत आला. त्याचबरोबर पूर्वीपासून पत्नीच्या पावित्र्याची हाडीमासीं खिळलेली 'पुरुषी' कल्पनाही ढांसळून पडली. पत्नी आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असल्यानें क्षुल्लक कारणानेंसुद्धां ती आपणांस दुरावूं शकते ही कल्पना कित्येक 'सनातन्यांना' जरा दुस्सह वाटली, तर कित्येक चंडोलांना हात वर करून मोकळे होण्याच्या दृष्टीनें ती बरी वाटली. अपत्यें असणारांना मात्र या कल्पनेनें चांगलाच धक्का बसला. अपत्यांच्या संगोपनार्थ येणाऱ्या खर्चाची जबाबदारी रशियन कायद्यानें पित्यावर असल्यानें, पोरांच्या लेंढाराबद्दल खर्चाची मागणी करून पत्नी पळ काढण्याच्या विचारांत दिसतांच कित्येकांचें धाबें दणाणलें. एक कामगार अगदीं कळवळून म्हणतो—

I will not let my wife be taken into the Soviet. I have eight children. How can she go into the Soviet !'

स्त्री स्वातंत्र्याच्या या वाऱ्याचा तर कित्येक ठिकाणीं असा परिणाम झाला कीं, पुरुषांनीं स्त्रियांच्यावर अमानुष सूड उगविण्यास कमी केलें नाहीं. बुरखा टाकून देण्याबद्दल सरकारी हुकूम निघालेला असूनही कित्येक पुरुषांनीं आपल्या संबंधां-

तील स्त्रियांना बुरखे काढल्याबद्दल गोळ्या घालून ठार केलें. साध्या बुरख्याबद्दल ही प्रतिक्रिया, मग इतर बाबतींत काय झालें असेल तें विचारावयासच नको! एका थिएटरमध्यें एका नटीस तिच्या नवऱ्यानें 'नायकाला' तिनें चुंबन दिल्याबद्दल स्टेजवर तुकडे तुकडे करून ठार केलें. पण हा काळ आतां मागें पडला आहे. सुधारणेनें 'परपुरुष' हा शब्दच नाहींसा केला असल्यानें स्त्री 'पति' म्हणून मानलेल्या गृहस्थाखेरीज इतराशींही संबंध ठेवूं शकते, व त्याबद्दल रशियांतील 'सूज्ञ' समाज घृणाही पण बाळगीत नाहीं. रशियन स्त्री आतां पूर्णपणें 'बंधमुक्त' झाली असून No woman should sit at home any more अशी घोषणा आतां रशियन सरकारनें केली आहे.

### पेचप्रसंगांची मालिका

स्त्रियांना आर्थिक दास्यांतून मुक्त करून घराच्या कोंडवाड्यांतून त्यांची सुटका केली कीं आपला कार्य भाग संपला, परंपरेवर आपण मोठा विजय मिळविला, अशी कामगार क्रांतिवाद्यांची प्रथम कल्पना होती. पण एवढ्या गोष्टी साध्य होतांच अनेक सामाजिक पेंचप्रसंगांनीं त्यांना घायाळ करण्याची वेळ आणली. पूर्वीच्या विवाहपद्धतीवर व वैवाहिक बंधनावर वरवंटा फिरविण्यांत आल्यानें तज्जन्य समाजघटना व नियंत्रक बंधनें नष्ट झालीं. स्त्रीपुरुषांमध्यें एक नवीनच नातें प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनें प्रयोग करून पाहण्यांत येऊं लागले. पूर्वींचीं बंधनें नष्ट झालीं तरी सामाजिक नीतिमत्तेला धक्का बसूं नये अशी त्यांची कल्पना होती. पायबंद सुटतांच घोडे लाथा झाडतील—ते पशूंकोटींतील आहेत, पण मानव हा उत्क्रान्त व विचारशील प्राणी असल्यानें त्यानें बंधनविरहितहि उच्च आचारविचारांचें प्रतिपालन केलें पाहिजे या तत्त्वावर त्यांचा भर होता. 'सरकार' संस्था नष्ट करण्याची भाषा समाजसत्तावादी वरील तत्त्वास अनुसरूनच करतात. पण मानव समाज बंधनाखेरीज सूज्ञता प्रकट करण्याइतका प्रगल्भ झालेला नाहीं याचें प्रत्यंतर लेनिनला तात्काळ आलें. 'स्वैराचार' हा शिष्टसांप्रदाय होण्याची पाळी आली. क्लारा झेटकिन इला म्हणतो—

> 'Certainly thirst must be satisfied, but does a normal person, under normal conditions, lie in the street and drink from mud puddles? Or even from a glass that dozens of other people have been drinking from?"

## विवाहबंधनाचा उच्छेद

उष्ट्या भांड्यांतून अगर राडीच्या डबक्यांतून पाणी घेऊन सर्वसाधारण मनुष्य पाणी पिऊं शकेल काय ? हा वरील प्रश्न कोणास उद्देशून आहे हें एथें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. बाराजणांनीं उष्ट्या केलेल्या भांड्यांमधून पाणी पिणें रास्त नव्हे हें प्रत्येकानें ओळखून त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न सर्वांनीं करावा हें चांगलें, ही गोष्ट लेनिनला मान्य आहे; पण भांडें उष्टें होऊं नये यासाठीं घालण्यांत आलेले दंडक मात्र त्याला कबूल नाहींत. माणसांच्या सौजन्यावर या गोष्टी त्यानें सोंपविल्या आणि त्याचा व्हावयाचा तोच परिणाम होऊन सर्व भांडीं उष्टींच झालेलीं दिसूं लागलीं. लैंगिक व्यवहाराला इतर ठिकाणीं असलेलें महत्त्वच रशियानें काढून टाकल्यानें विवाहसंस्थेचें अस्तित्व संपुष्टांत आलें. ' भूक लागतांच खानावळींत शिरून पोट भरणाऱ्याकडे जसें आपण कोणत्याच महत्त्वाचे दृष्टीनें पहात नाहीं, त्याचप्रमाणें लैंगिक भूक शमविण्याचा कोणताही मार्ग चोखाळल्यास त्याबद्दल समाजानें चिकित्सा करूं नये ' असें प्रतिपादन करण्यासहि कित्येक समाजसत्तावादी चुकत नाहींत. रशियांत लग्नाची सर्वसामान्य म्हणून पुढील व्याख्या मान्य करण्यांत आली आहे—

Our Soviet Law recognizes as marriage every actual living together with all its consequences.

## कांहीं नमुनेदार उदाहरणें

एकत्रित राहण्याचे परिणाम दिसून येण्यापूर्वी विभक्त होणारे, फिरून कुमार आणि कुमारिका बनून नवी विटी नवें राज्य सुरू करूं शकतात. ' मिया बिबी राजी तो क्या काम है काजी ' या इकडील म्हणीचा पुरेपुर अम्मल रशियांत पहावयास सापडतो. रशियांत विवाहासंबंधीं असलेले नियम, कायदे, इतके शिथिल आहेत कीं, त्यांचें अस्तित्व असून नसल्यासारखेंच आहे. वर नमूद केलेल्या एकत्रित राहण्याच्या कायद्यामुळें कित्येक विनोदी व हास्यास्पद प्रसंग निर्माण होतात व त्यांचा निवाडा करीत बसण्याचा प्रसंग रशियन सरकारावर येतो. उदाहरणादाखल ही एका तरुण समाजसत्तावाद्याची रशियन न्यायालयापुढील जबानी पहा. डोळ्यांत अगदीं अश्रू आणून हुंदके देत तो म्हणतो—

" Before you pronounce sentenc on me, before I am condemned to punishment for eighteen years, hear what I

have to say. I am not to blame. Only once did I have sex-relations with this socially dangerous citizeness. How is it possible that she should become pregnaut from this one time ? And is it possible that for this one time I must pay for eighteeh years ?'

[ या भयंकर स्त्रीशीं फक्त एकदाच लैंगिक व्यवहार माझे हातून घडला आहे. या एका प्रसंगानें ती गरोदर राहणें शक्य आहे काय ? १८ वर्षेपर्यंत मला पोटगी द्यावयास लागण्यापूर्वी कोर्टानें माझ्या म्हणण्याचा विचार करावा.] आतां अशा ठिकाणीं कोर्टानें काय × × × विचार करावयाचा ? एक त्या निरपराध पोराचा तरी बळी घेतला पाहिजे, नाहीं तर या गर्भवतीला तरी वाटेला लावलें पाहिजे. ज्यास्त खोलांत शिरण्याचा प्रयत्न केला कीं, ही पुढची मजा पहावयास मिळाली म्हणून समजावें.

एका मुलीनें आपल्या मुलास पोटगी मिळावी म्हणून एका गृहस्थावर, तो सदर अपत्याचा पिता आहे म्हणून फिर्याद दाखल केली. आपल्या मित्राची या संकटांतून थोडी फार सुटका करावी म्हणून पांच 'भाई' पुढें आले व त्यांनीं कोर्टांत ठणठणीत जबाब दिला—'या बाईशीं आम्हां सर्वांचाच संबंध असल्यानें या एकाच गृहस्थाला या मुलाचा पिता म्हणून कोर्टाला कोणताच निकाल देतां येणार नाहीं.' मग कोर्टानें अधिक विचार न करतां थोडक्यांत निकाल दिला—'या सहा भाईंनीं या गंगाजमनी बाळाचा चरितार्थ चालविण्या-साठीं घट सोसावी.' रशियांतील वैवाहिक कायद्यांत एक कलम येणें-प्रमाणें आहे—

'When a couple lives in the same place, keep home together, act like married people in the presence of third persons, write to each other mutually as if they were husband and wife, sign documents together, give each other mutual support and bring up their children.'

या ठिकाणीं विवाहित स्त्री पुरुषांच्या वागणुकीचे कांहीं ठराविक परिमाण रशियानें गृहीत धरलेले दिसतात. विधियुक्त लग्नाला देण्यांत आलेलें स्थैर्य मात्र रशियांत काढून टाकण्यांत आलेलें आहे. ही स्थिरता टाळूनहि वैवाहिक जबाब-दाऱ्या मात्र टाळूं नयेत अशी रशियन सरकारची इच्छा, पण तें कसें शक्य आहे ?

पुढील एक उदाहरण रशियन कायद्यानुरूप चाललेल्या वैवाहिक जीवनाची कल्पना येण्याचे दृष्टीनें आवश्यक आहे.

कोणी एका ' क्ष ' नागरिकानें आपल्याच खोलींत राहणाऱ्या ' क्षी ' नागरिकेला बाहेर काढून लावण्यांत यावें म्हणून कोर्टाकडे अर्ज केला. त्यानें अर्जांत म्हटलें होतें कीं, ' सदर स्त्रीची अत्यंत दैन्यावस्था दिसल्यानें निव्वळ दयाबुद्धीनें मीं तिला माझ्या घरांत राहण्याची परवानगी दिली. सदर परवानगी देत असतांना मी तशा अर्थाचा कागदही लिहून घेतला आहे. कारण आम्ही एके ठिकाणीं राहतो एवढ्याचा फायदा घेऊन, ती माझी बायको आहे असें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाहीं याची मला कल्पना होती. ती मजकडे आली त्या वेळीं ती गरोदर असेल अशी शंका मला आली नाहीं. पण पुढें मला ही गोष्ट कळून आली. तिच्या भावी अपत्याच्या पित्याचा मीं तपास केला व तो ' अ ' आहे हें मला कळून चुकलें. [ या ठिकाणीं ' अ 'चें पितृत्व प्रस्थापित करण्यासाठीं अवश्य तो पुरावा नमूद करण्यांत आला होता. ] मला आतां या स्त्रीचा असह्य त्रास होत आहे. शिवाय तिच्या भावी कार्ट्यांची किरकिर व उस्तवार मीं काय म्हणून सहन करावी ? तरी कोर्टानें कृपावंत होऊन ही ब्याद घराबाहेर काढून लावण्यांस मला मदत करावी.'

याच्या विरुद्ध ' क्षी 'नें सांगितलें, ' अनें मला हांकलून दिलें ही गोष्ट खरी आहे. पण क्षनें मला घरीं नेतांना पत्नीप्रमाणें वागवीन असें सांगितलें होतें.' शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या साक्षी घेतां त्यांनीं असें सांगितलें कीं, एकंदर वागणुकी-वरून क्ष व क्षी पतिपत्नी असावेत असाच आमचा ग्रह झाला. कोर्टानें तात्काळ क्षचा अर्ज फेटाळून लावला व क्षीला पत्नी या नात्यानें योग्य तें संरक्षण देण्याचा हुकूम सोडला. बिचाऱ्याला ' वत्सासह लाभे महिषी ' याचा चांगलाच अनुभव आला.

## समाजसत्तावाद्यांचे विवाहावरील विचार

विवाहासंबंधीं सर्वच समाजसत्तावाद्यांची एकवाक्यता आहे असेंही नाहीं. कित्येक वेळां अगदीं परस्पर विरोधी विधानें समाजसत्तावादी याबाबत करतांना आढळून येतात. ' लग्न हा मानव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या द्विपाद प्राण्याचा सर्वस्वीं खाजगी प्रश्न असून त्यांत समाजाचा काडीमात्र संबंध नाहीं.'

असें एकजण म्हणतो .तर लगेच दुसरा म्हणतो, ‘ प्रत्येक तरुण समाजसत्तावाद्याला आपण हें शिकविलें पाहिजे कीं, विवाह ही वैयक्तिक बाब नसून समाजाच्या तिच्याशीं अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे.’ वैवाहिक जीवन व आर्थिक स्वातंत्र्य या दोहोंचा मेळ घालण्याबाबत इतर समाजांची जी त्रेधा उडते तिचा अनुभव रशियन समाजालाही आहे. हें धरावें तर तें जातें, तें धरावें तर हें पळतें.

कांहीं रशियन स्त्रियांचे अनुभव येथें नमूद करण्यांस हरकत नाहीं. “ लैंगिक [ वैवाहिक ] सौख्य सार्वजनिक कार्याचे आड येते व त्यामुळें वैवाहिक सौख्याची आत्यंतिक तृष्णा मला असूनही मी संयम करते. या तृष्णेचें समाधान करण्याची मला भीति वाटते; कारण तदनुषंगिक बाळंतपण, अपत्यसंगोपन इत्यादि गोष्टी येतांच माझें अर्थोत्पादनाचें सामर्थ्य कमी होईल व कोणा तरी पुरुषाच्या आश्रयानें मला रहावें लागेल.’ दुसरी एक स्त्री म्हणते, ‘ माझ्या पतीला मी सदैव त्याच्या व घराच्या सरबराईंत राहावेंसें वाटतें, पण यामुळें मला माझ्या स्वतंत्र व्यवसायाकडे दुर्लक्ष करावें लागेल. मी आतां याच कारणास्तव घटस्फोट मागणार आहे.’ वैवाहिक जीवनक्रम स्त्रियांच्या बाह्य व्यवसायांत आड येऊं शकतो एवढी गोष्ट आतां रशियांतही फिरून मान्य होऊं लागली आहे, असें दिसतें. या दोहोंत निवड करण्याची मुभा रशियन स्त्रीला आहे एवढी सुधारणा [ ? ] करण्यास हरकत नाहीं. या दोहोंत वैवाहिक जीवनच पसंत करणाऱ्या रशियन शिक्षिकेचें हें उदाहरण पहा—

**पण स्त्रीचें अंतःकरण ?—**

एक शिक्षिका आपल्या पतीसह लेनिनग्राडमध्यें राहात होती. परंतु कांहीं कारणानें तिची बदली एका दूरच्या खेडेगांवच्या शाळेमध्यें झाली. दोघेही पति-पत्नी समाजसत्तावादी पक्षाचे सभासद होते. सहा महिन्यानंतर तिच्या नवऱ्यानें तिला पत्र पाठवून घरीं परत येण्याची विनंति केली. पत्नीचें उत्तर आलें, ‘ या खेड्यांत माझ्याशिवाय दुसरी शिक्षिका नाहीं. पंचवार्षिक योजनेप्रमाणें सदर खेड्याचा सांस्कृतिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीनें मला किती तरी कार्य करावयाचें आहे; मग मी तिकडे कशी येऊं ? ’ पतीनें तार केली, ‘ घरांत पत्नीशिवाय सौख्य नाहीं; मजा नाहींच नाहीं. तुला मी किंवा पंचवार्षिक योजना यांपैकीं एकाचीच कोणाची तरी निवड करणें भाग आहे.’ तारेप्रमाणें त्याच्या

पत्नीनें मनाशीं निवड केली व नोकरी सोडून ती तात्काल पतिगृहीं परत आली. बावीस वर्षांच्या एका रशियन कामगाराचे विवाहविषयक पुढील विचार स्तुत्य नाहींत असें कोण म्हणेल! 'विवाह ही मानवांच्या नैसर्गिक गरजा पुरवून त्याची आध्यात्मिक उत्क्रांति करणारी एक आदर्श संस्था आहे. या संस्थेचा पाया प्रेम, आरोग्य, संस्कृति आणि शारीरशास्त्र यावर आधारलेला पाहिजे.'

रशियन क्रांतिवादामध्यें जुन्याचा नाश करण्यासंबंधीं जो एक उत्साह होता त्याच्या भरांत त्यांनीं कित्येक चांगल्या गोष्टींचाही नाश केला व मग कांहीं तरी जोडाजोडी करीत बसण्याची पाळी आली. वैवाहिक बंधनांच्या नाशाबरोबर शिशुसंगोपन संस्था, मुलांच्या पोटगीचा प्रश्न, अनिर्बंध काडीमोड, बेवारस संतती, गर्भपात, अननुवंशिकता असे एक ना अनेक घोटाळे निर्माण झाले व या सर्वांशीं झगडतांना रशियन सरकारला अनेक उपद्व्याप करावे लागले. सरकार-हीन होऊं पाहणाऱ्या रशियाला सरकार-संस्था नष्ट करणें तर अशक्यप्राय होऊन बसलेंच, पण सरकार कशांत लक्ष घालूं शकणार नाहीं हें सांगणेंही कठीण होऊन बसलें. पोरें सांभाळण्यापासून सरकारला आतां सर्व पहावें लागत आहे. घटस्फोटादि प्रकारांची व तदनुषंगिक इतर प्रश्नांची चर्चा पुढील प्रकरणांत करूं.

---

## विवाहाचा साम्यवादी कायदा

१९१७ च्या फेब्रुआरी महिन्यामध्यें झालेल्या क्रान्तींत 'केरेन्सकीनें' आपलें सरकार अस्तित्वांत आणलें. पण या सरकारनें चर्च अगर स्त्रिया यांच्या परंपरागत परिस्थितीमध्यें बदल करण्याच्या दृष्टीनें कोणतीच उलाढाल त्यावेळीं केली नाहीं. परंतु १९१९ मध्यें समाजसत्तावाद्यांची सत्ता पूर्णपणें प्रस्थापित झाल्यानंतर व लेनिनच्या हातीं अधिकार सूत्रें गेल्यानंतर, थोडक्याच महिन्यांत पूर्वापार समाजरचनेचे आमूलाग्र बदल करणारे अनेक कायदे अस्तित्वांत आले. स्त्रियांना दास्यत्वांत [ ! ] ठेवणाऱ्या प्रत्येक कायद्याची हकालपट्टी करण्यांत आली. काडीमोड, बेवारस संतती, मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी इत्यादि बाबत असलेल्या पूर्वीच्या सर्व कायद्यांमधून स्त्रियांचेवर सरसकट अन्याय होत असे. पूर्वीच्या कायद्यांतील कांहीं कलमें. अशीं होतीं—

(1) In case the husband moves or is transferred or otherwise changes his residence, the wife must follow him. (2) The wife is required to obey her husband as the head of the family, to abide in love of him, in reverence and boundless compliance, and as mistress of the house to show him every compliance and devotion. (3) The wife's prime duty is submission to her husband's will. But this nowise discharges her from her duty to her children.

असा अन्याय चालू ठेवणें म्हणजे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांनाच हरताळ फासणें होय ! समाजामध्यें प्रत्येक बाबतींत समता प्रस्थापित झाल्याशिवाय खरी लोकसत्ता अस्तित्वांत येणेंच शक्य नाहीं, अशी रशियन क्रांतिवाद्यांची

खात्री असल्यानें, वरील अन्यायी कायद्यांना प्रथम मूठमाती देण्यांत येऊन स्त्रियांची मुक्तता करण्यांत आली. १९१७ च्या डिसेंबर १९-२० ला लेनिननें जाहीरनामा काढून पूर्वीच्या विवाहनोंदणीच्या व तदनुषंगिक इतर बंधनदायक जबाबदारींच्या कायद्यांची हकालपट्टी केल्याचें जाहीर केलें. पूर्वी बहुजनसमाजाचे बाबतींत काडीमोड जवळ जवळ अशक्य असे, त्याचबरोबर विवाहित स्त्रीला पतीचें उपनांव, घर इत्यादिकांचा सक्तीनें आश्रय करावा लागे. समाजसत्तावादी सरकारनें स्त्री-पुरुषांमध्यें समता प्रस्थापित केल्यानें वरील सर्व बाबींना आपोआपच फांटा मिळाला. आतां दोघांनाही स्वतंत्रपणें अर्थोत्पादन व अर्थसंचय [ योग्य प्रमाणांत ] करतां येऊं लागला. त्याचप्रमाणें गरज पडतांच एकमेकांना साहाय्य देतां येतें आणि बंधनाखेरीज निव्वळ तात्विक दृष्टया मिळणाऱ्या या सहाय्याचीच खरी मातब्बरी रशियन स्त्री-पुरुषांना वाटते. घटस्फोट घेण्याचे हक्क दोघांनाही सारखेच असल्यानें लग्नें केव्हांही मोडूं शकतात, त्याबाबत दोघांचेंही एकमत झालेंच पाहिजे असेंही नाहीं. औरस संतती व बेकायदा संतती यांच्या हक्कामधीलही भेद नष्ट करण्यांत आले असल्यानें लग्न नोंदविलें तरी वाहवा, नाहीं तरी वाहावा अशी स्थिति आहे. क्रांतीच्या प्रथमावस्थेंत नोंदल्या गेलेल्या लग्नाच्या संबंधापासून निर्माण झालेल्या संततीला काडीमोड होतांच पित्याकडून आर्थिक सहाय्य मिळवून दिलें जात असें, व म्हणून योग्य त्या मार्गानें लग्न नोंदवून घेण्यांस स्त्री उत्सुक असे. तर पुरुष 'समाजसत्तावादी ध्येयवादाचा बागुलबोवा' पुढें करून तें टाळण्याच्या नादांत असे. पुढील संवादावरून याची नीट कल्पना येईल—

'Andrie...why don't you marry me in the real way ?'
'Oh this is religious faith... I cannot. You just read the papers !

त्याची ही थापेबाजी ऐकून मुलीचा बाप रागानें पुढें येऊन म्हणतो,

'One can find husbands as rotten as you are every where...You are only trying to find a way out for yourself, devil—you spoiled the girl...'

### परित्यक्त स्त्रियांची नफेबाजी

मुलीच्या पित्याला आलेला हा राग स्वाभाविक नव्हता असें कोण म्हणेल ? स्त्रीपुरुषांच्या संबंधाला कोणताच धरबंद ठेवण्यांत न आल्यानें पुरुष तात्पुरतें

प्रेमाचें प्रदर्शन करीत व तात्काळ दूर होत. पण पुढील परिणाम मात्र एकट्या स्त्रियांनाच सहन करावे लागतात. अशा स्थितींत निदान अपत्यसंगोपनाची आर्थिक जबाबदारी तरी निदान आपल्या संवगड्याच्या गळ्यांत टाकावी या दृष्टीनें त्या त्याचा शोध सुरू करीत. एका लेखकानें या प्रकाराचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे–' हजारों परित्यक्त पत्नी खाकेंत मुलें घेऊन पतीच्या शोधार्थ हिंडतांना रशियांत दृष्टीला पडतात. कित्येक गरीब स्त्रिया, पतीच्या मिळकतीचा एकतृतीयांश अपत्यसंगोपनास्तव मिळूं शकतो म्हणून, जरा गबर कुळें गाठून प्रजोत्पादन करून घेण्याच्या मोहिमेवर निघालेल्या असतात.' या प्रकाराला सदर लेखकानें Alimony hunting असें म्हटलें आहे. रशियन कायद्याप्रमाणें कोर्टांत पुराव्यानें अपत्याचें पितृत्व ज्याच्याकडे जाईल त्याला आपल्या प्राप्तीचा एकतृतीयांश मुलाचे संगोपनासाठीं म्हणून स्त्रीला द्यावा लागतो. यामुळें एखादें अपत्य होतांच पतीशीं विभक्त होऊन त्याच्याकडून पैसे उकळणाऱ्या स्त्रिया रशियांत कित्येक आहेत. एखाद्याच्या पैशांवर चरितार्थ चालवून दुसऱ्याबरोबर प्रेमालाप करीत हिंडणाऱ्या या विद्येंतील वाकबगार प्रणयिनी रशियांत सरसकट पहावयास सांपडतात. या पोटगीच्या कायद्यानें तर रशियांत इतका गोंधळ उडवून दिला आहे कीं, सांगतां सोय नाहीं. पुढील उदाहरण वाचून त्याची साधारण कल्पना येईल—

कोर्टांत एका गृहस्थाला त्यानें त्याच्या प्राप्तीचा एकतृतीयांश अपत्यसंगोपनार्थ आपल्या पत्नीस द्यावा म्हणून हुकूम झाला. सदर गृहस्थ म्हणाला,

' मी आधींच माझा एकतृतीयांश दुसऱ्या एका स्त्रीस देत आहे.'

' मग दुसरा एक–तृतीयांश द्या.'

' तोही पण मी आणखी एका पत्नीस देत आहेच.'

' मग तिसरा एक–तृतीयांश द्या.'

' त्याचीही वाट आधींच लागलेली आहे.'

' आपलें सर्व उत्पन्न जर स्त्रियांना पोटगीदाखल दिले जातें, तर मग आपण जगतां तरी कसें ?'

' माझ्या सध्यांच्या बायकोला इतर पांचजणांकडून मिळणाऱ्या पोटगीवर !'

कित्येक वस्ताद स्त्रिया व त्यांचे हरीचे लाल अशा तऱ्हेनें पैसे काढून मजेंत रहात, तर कित्येक भोळ्या मातांना आपलीं अपत्यें संरक्षणाचे अभावीं सडकेवर

टाकून निष्ठुरपणें पाठ फिरवावी लागे. रशियन पोलिसांना अशीं अपत्यें गोळा करून सरकारी शिशुसंगोपन-गृहांत नेऊन ठेवण्याचा एक व्यवसायच होऊन बसला ! अनिर्बंध लैंगिक स्वातंत्र्याबरोबरच बेजबाबदार मातापित्यांची संख्याही रशियांत वाढूं लागली. कित्येक वेळां पतिपत्नी एकमतानें अपत्य टाकून मोकळी होत व दोन दिशानें दोघें चालूं लागत. तर कित्येक वेळां पोटगीचें लचांड मागें लावून पत्नी मोकळी होईल या भीतीनें हरप्रयत्नानें अपत्य नाहींसें करण्याची खटपट पती करी.

## ललित वाङ्मयांतील उदाहरणें

आपल्या ललितवाङ्मयामधूनही समाजसत्तावादी लोक लैंगिक स्वैराचाराचा पुरस्कार करण्यास चुकत नाहींत. एका कादंबरीची नायिका-'शेनिया' लैंगिक आचारासंबंधीं म्हणते, 'लैंगिक आचार म्हणजे एक शारीरिक सुख. माझ्या मनाच्या कलाप्रमाणें मी माझे प्रियकर बदलेन. ज्या वेळीं मी गरोदर राहीन त्या वेळीं त्या भावी अपत्याच्या पित्याचें नांवही मला सांगतां न आलें पाहिजे. मला काय करायचें आहे त्याच्याशीं!' आणि नंतर ती पुढें म्हणते, 'तुम्हाला आश्चर्य वाटेल, ज्या क्षणाला जो मनुष्य मला बरा वाटेल त्याच्या आधीन मी होते. प्रेम करीत बसायला सवड आहे कोणाला? इतक्या घाईच्या काळांत प्रेमाचे लपंडाव खेळत बसण्यास सवड नको का? आपलें कार्य झालें, संपलें. त्यानें त्याच्या रस्त्यानें जावें, आपण आपल्या!'

दुसरी एक स्त्री म्हणते, 'प्रेम म्हणजे मनाचा कमकुंवतणा! लैंगिक आचार व तत्जन्य शरीरसुख प्रधान, बाकी सर्व झूट!' लग्नविधि, समारंभ, प्रेम या सर्वांना उद्देशून ती म्हणते,

'The end is the same, whether with or without cherry blossom.'

शेवट एकच असल्यानें तो गाठला म्हणजे झालें. मुख्य मुद्दयाला गांठ, मार्गाचें महत्त्व नाहीं!

तिसरी एक विदुषी म्हणते, 'मला भिन्नत्वाची फार आवड आहे. एकाच नमुन्याचीं अपत्यें मला कधींच पसंत पडणार नाहींत. यासाठीं निरनिराळ्या १२ लोकांशीं संबंध ठेवून भिन्न अशा बारा अपत्यांची माता होण्याचा माझा विचार आहे.'

स्त्रिया=क्षेत्र !

एका विचारवंत पुरुष समाजसत्तावाद्यानें पुढील शोध लावून स्त्रियांची संभावना केली आहे. तो म्हणतो,

' Woman is to be regarded merely as a field to be sown and fertilised. '

लेनिननें हा भरमसाट सुटलेला नवमतवाद डोळ्याआड केला नाहीं. १९२० सालीं उष्ट्या भांड्याचें उदाहरण देऊन अप्रत्यक्षपणें त्यानें लैंगिक व्यवहारांत एकनिष्ठता असणें अवश्य असल्याचें सुचविलें. कार्ल मार्क्सचा कट्टा अनुयायी 'एनगल्स' हाही आपल्या 'Origin of the Family' या पुस्तकांत म्हणतो,

' Universal sex-impulse has been developed and purified into individual sex-love.'

सार्वत्रिक लैंगिक आचाराची व्यक्तिनिष्ठ लैंगिक आचार ही परिणतावस्था आहे, त्यांत शुद्धता आहे. 'एनगल्सनें' व्यक्तिनिष्ठ लैंगिक आचाराला हें महत्त्व दिलें आहे यांत विशेष असें कांहींच नाहीं. कारण मानवाचें पशुकोटी-पासून भिन्नत्व स्पष्ट करण्याच्या दृष्टीनें ही एकच गोष्ट अत्यंत अवश्य आहे. समाजसत्तावादी लोकांचा याबाबत चांगलाच गोंधळ झाला आहे. आपल्या या-बाबतच्या निश्चित ध्येयाची कल्पनाच त्यांना नाहीं. ज्याला जो मार्ग योग्य वाटेल त्यानें तो स्वीकारावा, असाच प्रकार बऱ्याच अंशीं सुरू आहे. १९२५ सालीं रशियाच्या प्रमुख 'प्रवदा' पत्रांत एक लेख आला. तरुण वर्गाच्या स्वैराचारावर टीका करतांना त्यांत म्हणण्यांत आलें—

The young people seem to think, that most primitive view on question of sex is communism !

'मनुष्याच्या रानटी अवस्थेंतील लैंगिक कल्पना म्हणजे समाजसत्तावाद !'

या सर्वांचा परिणाम शेवटीं असा झाला कीं, रशियन सरकारला शिक्षण, कारखाने इत्यादि इतर महत्त्वाच्या प्रश्नापेक्षां लग्नें, घटस्फोट, गर्भपात यांतच सारखें लक्ष घालावें लागलें. प्रेम म्हणून ज्या एका विशिष्ट मनोवृत्तीचे गोडवे आजपर्यंत जग गात आलें आहे, त्याचें व त्याच्या एकनिष्ठेचें उच्चाटण आज रशियानें करून टाकलें आहे. रशियन तरुण तरुणी प्रेम हा एक पोरखेळ समजतात व म्हणतात,

' We have no time to play at love, our work allows us no time for that.'

## १९२५ चा विवाहाचा कायदा

१९२५ मध्यें रशियानें सुधारलेला म्हणून जो एक विवाहाचा कायदा पुढें आणला त्याअन्वयें पुढील गोष्टी करण्यांत आल्या होत्याः [ १ ] नोंदविलेलें लग्न व न नोंदविलेलें लग्न यांमध्यें तात्विक दृष्ट्या कोणताच फरक ठेवण्यांत येऊं नये. [ २ ] कोणाही एकाच्या इच्छेनें जरी काडीमोड घेतली गेली तरी मुलांना योग्य तें आर्थिक संरक्षण पित्याकडून मिळण्याची व्यवस्था व्हावी. [ ३ ] विवाह ठरविला जात असतांना पुढील जबाबदारींची जाणीव रहावी या दृष्टीनें कांहीं हवाले घेणें अवश्य असावें.—यांतील पहिल्या मुद्द्यासंबंधीं खूप रणें माजलीं. या मुद्द्याला पाठिंबा देणारे लोक म्हणतात, ‘ आज रशियामध्यें लाखो जोडपीं अशीं आहेत कीं, त्यांचीं लग्नें अद्याप नोंदविलीं गेलेलीं नाहींत; पण लग्नें नोंदविलेल्या लोकांच्या आणि त्यांच्या व्यवहारांत कोणता फरक आहे ? त्यांना काय मुलें होत नाहींत ! कायद्याचें योग्य तें संरक्षण यांनाही मिळण्यास कांहींच हरकत नाहीं. कचेरींत जाऊन लग्न रजिष्टर करण्यांतच काय मोठें साधतें ? समाजाचा ढोंगीपणा वाढण्यास मात्र अशा निर्बंधांनीं मदत होते.’ विवाहोत्तर स्त्रीची मालमत्ता स्वतंत्र मानली जावी अशीही योजना एका कायद्यानें करण्यांत आली. त्यांतील एका कलमान्वयें असें ठरविण्यांत आलें कीं, स्त्री जर घरगुती व्यवसायामध्यें गुंतली असेल तर त्याचें आर्थिक मूल्य पुरुषांच्या बाह्य अर्थोत्पादक धंद्याइतकेंच धरण्यांत यावें; व ज्या वेळीं या जोडप्याचें विभाक्तिकरण होईल त्या वेळीं स्वाभाविकपणेंच तिला तिचा हिस्सा मिळेल. या कलमाचा फायदा घेऊन कित्येक वस्ताद स्त्रियांनीं अठरा अठरा, वीसवीस वर्षें वयाच्या मुलांना नाडल्याचीं अनेक उदाहरणें रशियन सरकारपुढें आलीं व या प्रकारांना कांहीं तरी आळा घालण्यासाठीं अनेक विनंत्याही रशियन नागरिकांकडून करण्यांत आल्या. एक नमुनेदार उदाहरण येथें देत आहों—एका अठरा वर्षें वयाच्या शेंबड्या मुलाबरोबर एका वस्ताद स्त्रीनें विवाह केला. तो मुलगा कुल्क [ Kulk ] नांवानें ओळखल्या जाणाऱ्या जमीनदार घराण्यांतील होता. पुढें कांहीं दिवसांनीं तिनें मला सासूच आवडत नाहीं, कामच जास्त पडतें, तरी आपण दोघे यांचा संबंध सोडून वेगळे होऊं एक ना दोन अशी नवऱ्यामागें सारखी ठणक लावली. मुलगा अज्ञान असल्यानें मुलाच्या

आईबापांनीं या गोष्टीस विरोध केला. शेवटीं या स्त्रीनें घटस्फोट मागितला व आपला हिस्सा मागितला, आणि कोर्टानें तिला तो दिला.

## स्वैराचाराचा परवाना

स्त्रियांच्या स्वैराचाराला या कायद्यानें अधिकच उत्तेजन मिळाल्यानें कांहीं लोकांनीं अशी तक्रार केली कीं, ‘अपत्याच्या संगोपनाबद्दल एकट्या पित्यालाच जबाबदार न धरतां मातेलाही धरावें. विभक्त पतिपत्नींचें मूल एखाद्या शिशुसंगोपन—गृहांत ठेवण्यांत यावें व त्याला लागणारा सर्व खर्च उभयतांनीं सारख्या प्रमाणांत द्यावा. प्रत्येकजण उठतो तो आपला पुरुषावर हत्यार धरतो. तें कांहीं नाहीं. अपत्याला जन्म दिला तो तें स्त्रीला हवें होतें म्हणूनच ना ? पुत्रषा-इतकीच स्त्रीही या प्रकाराला जबाबदार आहे.’

मोटीश नांवाचा एक तरुण गृहस्थ म्हणतो,

‘On all sides the men are being blamed ! It is often the woman's fault when the family breaks up...she sees her husband getting a bit old. Some young fellow comes along with his songs and his accordion. She leaves her husband with three or four children, and goes off with the younger one. At present women are doing very bad things. They are always running to the Genobdel and slandering their husbands,'

पूर्वीच्या वैवाहिक कायद्याप्रमाणें लैंगिक आचाराला कांहीं तरी मर्यादा होती. त्या कायद्यांना अनुसरून लैंगिक आचाराची दिशा ठरवावी लागे. समाज-सत्तावाद्यांनीं अनियंत्रित लैंगिक आचार प्रचारांत आणला व त्याच्या दृश्य परिणामाला अनुसरून कायदे बनविण्याचा प्रयत्न केला. विवाह सर्वस्वीं वैयक्तिक खासगी बाब म्हणून ठरविण्यांत आल्यानें बहुपत्नीकत्वाविषयीं स्पष्ट असा निर्बंध कोठेंच घालण्यांत आलेला नाहीं, परंतु एकंदर व्यवहार पहातां बहुपत्नीकत्वाला रशियन समाजांत फारशी मान्यता दिसत नाहीं. बहुपत्नीकत्व याचा अर्थ एकाच वेळीं अनेक पत्नी असाच रशियांत केला पाहिजे. तात्विक दृष्ट्या पाहिल्यास बहुपत्नीकत्व रशियांत सरसहा प्रचारांत आहे असेंच म्हणावें लागेल. कारण एकाच पत्नीशीं अगर एकाच पतीशीं जन्मभर संसार केलेले प्राणी रशियांत सांपडणें आतां फार कठिण आहे !

**घटस्फोट, लग्न, पोटगी, आणि घोटाळे !**

पोटगीच्या कायद्यानेंही असेच घोटाळे निर्माण झाले. पूर्वीच्या कुटुंबपद्धती-प्रमाणें एकत्रित असलेल्या दोघां भावांपैकीं धाकट्यास क्रांतिकालीन धामधुमींत दोन स्त्रियांपासून दोन मुलें झालीं. पुढें सदर भाऊ मरण पावला. अर्थात् या दोन मुलांच्या आयांनीं कोर्टांत आपल्या मुलांना आर्थिक संरक्षण मिळावें म्हणून अर्ज केला व थोरल्या भावाला तें संरक्षण द्यावें लागलें. कारण धाकट्या भावाचें व या दोन स्त्रियांच्या घरगुती कामकाजाचें आर्थिक मौल्य कोर्टानें गृहीत धरलें. या सर्व प्रकरणांत आपली विनाकारण आर्थिक लुबाडणूक होते म्हणून त्यानें खूप ओरड केली, पण त्याचें कांहीं चाललें नाहीं.

लग्न नोंदवितांना पुढील गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यांत येतें—[ १ ] दोघांचें वय निदान अठरा वर्षांचे पुढें असावें, [ २ ] विवाहाला दोघांचीहि संमति असावी, [ ३ ] उभयतांना ओळखणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्ति हजर असल्यास बरें, [ ४ ] एकमेकांच्या आरोग्याची व सर्व बारिकसारिक व्यथांची कल्पना आधीं एकमेकांस दिली गेली असली पाहिजे. दोघांपैकीं कोणाचेही एकाचे ठिकाणीं मानसिक दौर्बल्य दिसल्यास विवाह नोंदविला जात नाहीं. मातेच्या अगर पित्याच्या सरळ वंशावळीमधील एकदोन पिढ्यांतच विवाह होऊं नयेत असा दंडकही समाजसत्तावाद्यांनीं घातला आहे. पण आतां मातापित्यांचा पत्ताच लागणें अशक्य होऊन बसूं लागल्यानें पुढील एकदोन पिढ्यांतच या कलमाचा निकाल लागणार आहे. सख्ख्या अगर सावत्र भाऊ बहिणीमध्यें विवाह होऊं नयेत, असाहि कायदा आहे. म्हणजे कायद्याच्या अभावीं ही गोष्ट शक्य झाली असती असें दिसतें. पण पुढें या कायद्याचें महत्त्वहि असेंच नाहींसें होणार आहे. कारण आडनांव व पित्याचें नांव यावरून भाऊ बहीण ओळखण्यास मार्ग राहिला असता, परंतु हे सर्व निर्बंध टाळण्यांत आल्यानें तेथें पितृसावर्ण्य आहे, मातृसावर्ण्य आहे, बेवारस संतति आहे; मग हा भाऊ आणि ही बहीण हा पत्ता कसा लागवा ? पशूंना कोठें असते ही जाणीव, त्यापैकींच हा प्रकार ! पहिल्या लग्नां-तून मुक्त झाल्याशिवाय दुसरें लग्न करतां येत नाहीं, यालाच रशियन लोक; मोठ्या अभिमानानें एकपत्नीव्रत म्हणतात. विवाह नोंदविल्यानंतर मिळविण्यांत आलेल्या मत्तेवर पतिपत्नींचा समान हक्क राहावयाचा असून वांटा ठरविण्याचें काम कोर्टाकडे देण्यांत आलें आहे. घटस्फोटाचे वेळीं या गोष्टींचा विचार

करण्यांत येऊन पत्नीला योग्य तो हिस्सा देण्यांत येतो. या कायद्यानें इतर कोणत्याहि देशांत होऊं शकली नाहीं ती गोष्ट रशियानें साधली आहे; व ती म्हणजे स्त्रीच्या घरगुती कार्याचें आर्थिक मौल्य गणलें जाणें ही होय. या कायद्याचा फायदा कांहीं रशियन शेतकऱ्यांनीं मोठ्या खुबीनें घेतला. शेतांत भरपेट काम असे त्या वेळीं ते लग्नें करीत व आपल्या बरोबरीनें स्त्रियांना घरीं व शेतांत राबवीत; आणि कामाचा भर ओसरला कीं, काडीमोड करून शिल्लक मिळकतीचा हिस्सा देऊन मोकळे होत. त्यामुळें रशियांत कित्येक स्त्रियांना वर्षांतून ४–५ महिने पतिविरहित आयुष्य कंठावें लागे. त्या कालामध्यें त्या गरोदर राहिल्या असतील तर त्यांचे हाल पहावयासच नकोत. निव्वळ आर्थिक संरक्षण हाच कांहीं खरा मार्ग नव्हे; जिव्हाळा आणि सहानुभूति यांच्या ओलाव्याची आवश्यकताहि मानवाला आहेच. लग्न नोंदाविणें अगर काडीमोड देणें याबद्दल रशियन सरकार पैसे घेत नाहीं. हीं सर्व कामें अगदीं मोफत करण्यांत येतात. पण घटस्फोटाचा स्वतंत्र दाखला पाहिजे असेल तर मात्र दोन रुबल्स फीदाखल घेण्यांत येतात. काडीमोड घेतांना एकाच पक्षाचा रुकार असेल तर मात्र थोडीफार चौकशी करण्यांत येते व तशा अर्थाची नोटीस दुसऱ्या पक्षाला देण्यांत येते. घटस्फोट नोंदविणारा अधिकारी बाकी कोणत्याहि चौकशींत अगर पंचाईतींत पडत नाहीं. एकच स्त्री एकाच वर्षांत चौथ्यांदा अगर पांचव्यांदा काडीमोड घेण्यास आली तर तो फक्त एवढेंच म्हणेल, ‘ बाई तूं हें काय आरंभिलें आहेस ? ’ ज्या क्षणाला प्रथम लग्नांतून मुक्त होण्यांत येतें त्याच क्षणाला दुसरें लग्न करण्यास रशियांत परवानगी आहे; किंवा ज्यांनीं एकदां काडीमोड घेतली आहे त्यांनींच फिरून विवाह केल्यासहि रशियाची हरकत नाहीं. आयुष्यांत जास्तींत जास्त किती वेळां घटस्फोट करतां येतो व किती वेळां विवाह करतां येतो यासंबंधीं कांहींच निर्बंध तेथें नाहीं. घटस्फोटाचे वेळीं अपत्यांच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यांना प्रथम आपसांत तडजोड करण्यास सांगण्यांत येते. ती नच जमल्यास सदर प्रकरण कोर्टाकडे सोपाविण्यांत येतें. वयाच्या आठ वर्षांपर्यंत मूल आईनें संभाळण्याची तयारी दाखविल्यास त्याचा खर्च पित्याला द्यावा लागतो; नाहीं तर मूल शिशुसंगोपन–गृहांत ठेवण्यांत येतें, व त्याचा खर्च मातापित्याकडून घेण्यांत येतो.

### संततिनियमन गर्भपात

वारस आणि बेवारस संतति असा भागच आतां रशियांत राहिला नसल्यानें

**घटस्फोट, लग्न, पोटगी, आणि घोटाळे!**

पोटगीच्या कायद्यानेंही असेच घोटाळे निर्माण झाले. पूर्वीच्या कुटुंबपद्धती-प्रमाणें एकत्रित असलेल्या दोघां भावांपैकीं धाकट्यास क्रांतिकालीन धामधुमींत दोन स्त्रियांपासून दोन मुलें झालीं. पुढें सदर भाऊ मरण पावला. अर्थात् या दोन मुलांच्या आयांनीं कोर्टांत आपल्या मुलांना आर्थिक संरक्षण मिळावें म्हणून अर्ज केला व थोरल्या भावाला तें संरक्षण द्यावें लागलें. कारण धाकट्या भावाचें व या दोन स्त्रियांच्या घरगुती कामकाजाचें आर्थिक मौल्य कोर्टानें गृहीत धरलें. या सर्व प्रकरणांत आपली विनाकारण आर्थिक लुबाडणूक होते म्हणून त्यानें खूप ओरड केली, पण त्याचें कांहीं चाललें नाहीं.

लग्न नोंदवितांना पुढील गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यांत येतें—[ १ ] दोघांचें वय निदान अठरा वर्षांचे पुढें असावें, [ २ ] विवाहाला दोघांचीहि संमति असावी, [ ३ ] उभयतांना ओळखणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्ति हजर असल्यास बरें, [ ४ ] एकमेकांच्या आरोग्याची व सर्व बारिकसारिक व्यथांची कल्पना आधीं एकमेकांस दिली गेली असली पाहिजे. दोघांपैकीं कोणाचेही एकाचे ठिकाणीं मानसिक दौर्बल्य दिसल्यास विवाह नोंदविला जात नाहीं. मातेच्या अगर पित्याच्या सरळ वंशावळीमधील एकदोन पिढ्यांतच विवाह होऊं नयेत असा दंडकही समाजसत्तावाद्यांनीं घातला आहे. पण आतां मातापित्यांचा पत्ताच लागणें अशक्य होऊन बसूं लागल्यानें पुढील एकदोन पिढ्यांतच या कलमाचा निकाल लागणार आहे. सख्ख्या अगर सावत्र भाऊ बहिणीमध्यें विवाह होऊं नयेत, असाहि कायदा आहे. म्हणजे कायद्याच्या अभावीं ही गोष्ट शक्य झाली असती असें दिसतें. पण पुढें या कायद्याचें महत्त्वहि असेंच नाहींसें होणार आहे. कारण आडनांव व पित्याचें नांव यावरून भाऊ बहीण ओळखण्यास मार्ग राहिला असता, परंतु हे सर्व निर्बंध टाळण्यांत आल्यानें तेथें पितृसावर्ण्य आहे, मातृसावर्ण्य आहे, बेवारस संतति आहे; मग हा भाऊ आणि ही बहीण हा पत्ता कसा लागवा? पशूंना कोठें असते ही जाणीव, त्यांपैकींच हा प्रकार! पहिल्या लग्नां-तून मुक्त झाल्याशिवाय दुसरें लग्न करतां येत नाहीं, यालाच रशियन लोक मोठ्या अभिमानानें एकपत्नीव्रत म्हणतात. विवाह नोंदविल्यानंतर मिळविण्यांत आलेल्या मत्तेवर पतिपत्नींचा समान हक्क राहावयाचा असून वांटा ठरविण्याचें काम कोर्टाकडे देण्यांत आलें आहे. घटस्फोटाचे वेळीं या गोष्टींचा विचार

करण्यांत येऊन पत्नीला योग्य तो हिस्सा देण्यांत येतो. या कायद्यानें इतर कोणत्याहि देशांत होऊं शकली नाहीं ती गोष्ट रशियानें साधली आहे; व ती म्हणजे स्त्रीच्या घरगुती कार्यांचें आर्थिक मौल्य गणलें जाणें ही होय. या कायद्याचा फायदा कांहीं रशियन शेतकऱ्यांनीं मोठ्या खुबीनें घेतला. शेतांत भरपेट काम असे त्या वेळीं ते लग्नें करीत व आपल्या बरोबरीनें स्त्रियांना घरीं व शेतांत राबवीत; आणि कामाचा भर ओसरला कीं, काडीमोड करून शिल्लक मिळकतीचा हिस्सा देऊन मोकळे होत. त्यामुळें रशियांत कित्येक स्त्रियांना वर्षांतून ४–५ महिने पतिविरहित आयुष्य कंठावें लागे. त्या कालामध्यें त्या गरोदर राहिल्या असतील तर त्यांचे हाल पहावयासच नकोत. निव्वळ आर्थिक संरक्षण हाच कांहीं खरा मार्ग नव्हे; जिव्हाळा आणि सहानुभूति यांच्या ओलाव्याची आवश्यकताहि मानवाला आहेच. लग्न नोंदाविणें अगर काडीमोड देणें याबद्दल रशियन सरकार पैसे घेत नाहीं. हीं सर्व कामें अगदीं मोफत करण्यांत येतात. पण घटस्फोटाचा स्वतंत्र दाखला पाहिजे असेल तर मात्र दोन रुबल्स फीदाखल घेण्यांत येतात. काडीमोड घेतांना एकाच पक्षाचा रुकार असेल तर मात्र थोडीफार चौकशी करण्यांत येते व तशा अर्थाची नोटिस दुसऱ्या पक्षाला देण्यांत येते. घटस्फोट नोंदविणारा अधिकारी बाकी कोणत्याहि चौकशींत अगर पंचाईतींत पडत नाहीं. एकच स्त्री एकाच वर्षांत चौथ्यांदा अगर पांचव्यांदा काडीमोड घेण्यास आली तर तो फक्त एवढेंच म्हणेल, 'बाई तूं हें काय आरंभिलें आहेस!' ज्या क्षणाला प्रथम लग्नांतून मुक्त होण्यांत येतें त्याच क्षणाला दुसरें लग्न करण्यास रशियांत परवानगी आहे; किंवा ज्यांनीं एकदां काडीमोड घेतली आहे त्यांनींच फिरून विवाह केल्यासहि रशियाची हरकत नाहीं. आयुष्यांत जास्तींत जास्त किती वेळां घटस्फोट करतां येतो व किती वेळां विवाह करतां येतो यासंबंधीं कांहींच निर्बंध तेथें नाहीं. घटस्फोटाचे वेळीं अपत्यांच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यांना प्रथम आपसांत तडजोड करण्यास सांगण्यांत येते. ती नच जमल्यास सदर प्रकरण कोर्टाकडे सोपविण्यांत येतें. वयाच्या आठ वर्षांपर्यंत मूल आईनें संभाळण्याची तयारी दाखविल्यास त्याचा खर्च पित्याला द्यावा लागतो; नाहीं तर मूल शिशुसंगोपन–गृहांत ठेवण्यांत येतें, व त्याचा खर्च मातापित्याकडून घेण्यांत येतो.

## संततिनियमन गर्भपात

वारस आणि बेवारस संतति असा भागच आतां रशियांत राहिला नसल्यानें

इतर राष्ट्रांना भेडसावणारा हा प्रश्नहि आतां रशियांत शिल्लक नाहीं. त्याचप्रमाणें कुमारिका मातांचाही विचार करण्याचें कारण राहिलेलें नाहीं. कित्येक वेळां पित्यानें मुलाचें जनकत्व नाकारलें तर मात्र सार्‍या चौकशा आणि पंचायती निर्माण होतात, आणि त्यांतूनच पुढें अनेक पिते निर्माण होऊन सार्‍यांनाच भूर्दंड भरावा लागतो. या सार्‍या कटकटीमधून सुटण्यासाठीं, वैषयिक सुख तर मिळावें पण अपत्याचा त्रास तर चुकावा, म्हणून रशियन स्त्रीपुरुषांनीं संततिनियमनाकडे धांव घेतली. पण तोही उपाय रामबाण नसल्यानें गर्भपाताची योजना आंखण्यांत आली व स्त्रियांच्या या नैसर्गिक बंधनावर आणखी एक आघात केला. फक्त एका मास्कोमध्यें दरसाल दोन लाख गर्भपात होतात. एक गृहस्थ म्हणतो 'मास्कोमध्यें आढळतात तितक्या गरोदर स्त्रिया जगांत दुसरीकडे कोठेंहि दृष्टीला पडणार नाहींत.' याचें कारणच हें कीं, लैंगिक आचाराला कोणताच ताळतंत्र तेथें राहिलेला नाहीं. स्त्रीपुरुषांनीं स्वैराचार करावा, स्त्रीनें एक दिवस गर्भपात-गृहांत जाऊन डॉक्टरपुढें उभें राहावें, त्यानें दहापांच मिनिटांत सदर स्त्रीला मोकळी करून फिरून उनाडायला तिला मोकळीक करून द्यावी ! खासगी रीतीनें मात्र गर्भपात न करण्याबद्दल रशियन सरकारचा हुकूम आहे. लोक सरकारला भिऊन खाजगीकडे केव्हां वळतात !— त्यांत कांहीं लज्जेचा-लोकनिंदेचा भाग असेल तेव्हां. येथें सरकार काय आणि खाजगी काय, दोन्ही सारखेंच. गर्भपातानें प्रथम प्रथम बरींच लोकप्रियता संपादन केली, पण पुढें त्याचा वीट आला. पूर्वीचा उत्साह आतां रशियन स्त्रींत राहिलेला नाहीं. त्याबद्दल आतां तिच्याही मनांत तिरस्कार निर्माण होऊं लागला आहे. वयाच्या तीस वर्षांपर्यंत चारदां गर्भपात करून घेतलेली एक स्त्री म्हणते,

'The operation makes a woman look old, that she grows either fat or thin, that her face becomes wrinkled and loses its charm.'

रशियन स्त्रीनें पहिल्याच गर्भधारणेचे प्रसंगीं गर्भपात करूं नये असा प्रचार आतां सुरू झाला आहे. आमचे येथील विवाहाची वयोमर्यादा वाढली पाहिजे, म्हणून ओरड करणार्‍या लोकांना रशियानें पुढील उदाहरण घालून दिलें आहे,

' Girls of twenty or twenty-five have already four or five children.'

म्हणजे रशियन स्त्रीला पहिलें अपत्य होण्याचा व येथील स्त्रीला प्रथम अपत्य होण्याचा काल जवळजवळ एकच दिसतो. रशियानें लैंगिक आचाराला पूर्ण स्वातंत्र्य दिलें असल्यानें ही गोष्ट तेथें सहजासहजीं घडूं शकते. येथें तें नसल्यानें कांहीं पालक वेडगळ कल्पनांच्या नादीं लागून, विवाहाचा राजमार्ग रिकामा असतां, किती मुलामुलींची कुंचबणा करीत असतील याची कल्पनाच केलेली बरी. विवाहोत्तर कोणतें उपनांव वापरावें याबद्दलहि रशियन स्त्री-पुरुषांना समान हक्क आहे. मुलांच्या संगोपनाचा हक्क तात्काळ शाबीत व्हावा या दृष्टीनें स्त्रियांनीं शक्य तो विवाह नोंदवावेत हें बरें, असा उपदेश आतां फिरून रशियन स्त्रीला मिळूं लागला आहे. क्रांतीच्या पूर्ण आहारीं गेलेल्या कांहीं तत्त्वनिष्ठ, ध्येयवादी स्त्रिया कित्येक वेळां पुढील बाणेदार उत्तर देतांना दृष्टीला पडतात. एक गृहस्थ एका स्त्रीला म्हणतो,

'So that later on, if the man deserts you, you can get alimony easily,' त्या स्त्रीनें उत्तर दिलें 'If he is that sort, that he is to be forced to pay for his child, I won't accept anything from him this way.'

म्हणजे पतीनें कर्तव्य म्हणून मुलाच्या संगोपनाचा भार स्वीकारल्यास सदर स्त्रीला त्याची मातब्बरी आहेसें दिसतें. आपल्या इकडील पितृयज्ञ हेंच सुचवीत नाहीं काय ? लग्नाची किंमतच नाहींशी केल्यानें झालेल्या अनर्थाबद्दल एक रशियन स्त्री मोठ्या खेदानें म्हणते—

'You see what a lot of divorces there are every where now. But this is because marrying is so easy. And that is why there are so many neglected children.'

## लग्ननोंदणीचा बाजार

लग्नाला [ स्त्रीपुरुषसंबंधाला ] आलेलें बाजारी स्वरूप लक्षांत घेण्याजोगें आहे. केव्हांही कधींही लग्नें नोंदविण्याच्या कचेरींत जा, सदा आपली ही गर्दी ! काडीमोड करून आलेले लोकहि तेथल्या तेथें अदलाबदल करून फिरून नवा विवाह नोंदविण्यास तयार ! लग्नें नोंदविणारी स्त्री एकदां वैतागून म्हणते,

'Citizens, I won't register more than two couples at the most now, the rest can go home and come again to-

morrow. I am only a human being myself ! I am at the end of my tether. This is the third day that I am working overtime, for which I get nothing. Must everyone get married all at once ? '

इतक्या काकुळतीनें सांगूनही तेथें जमलेल्या थव्यांतील कोणी हललें नाहीं. बिचारीला बराच वेळ फिरून ताटकळावें लागलें. घटस्फोटाच्या कायद्यानें शहरांमधील स्त्रियांत इतका मोठासा हाहाःकार उडाला नाहीं. कारण शहरांमध्यें स्त्रियांना कारखान्यामध्यें वगैरे राबून स्वतंत्रपणें उपजीविका करण्याचीं अनेक साधनें उपलब्ध होतीं, पण खेड्यांतील स्त्रियांची गोष्ट मात्र तशी नव्हती. पतीवरच जवळ जवळ सर्वस्वीं त्यांना अवलंबून राहावें लागत असल्यानें त्या स्त्रिया म्हणूं लागल्या—

'Why does the Soviet Goverment allow our husbands to desert their wives ? '

स्त्रियांना आपल्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठीं समाजसत्तावादी स्त्रिया खेडोपाडीं प्रचार करीत हिंडतात. लग्न करून एकाच माणसाशीं संसार करीत बसणाऱ्या स्त्रियांना उद्देशून त्या म्हणतात—

'Once you are married it's all up with you. Done for ! You were a human being, now you have ceased to be one. You dig a pit for yourfelf, shut and lock it, sit in it with children and suck your thumb. '

विवाह करणें म्हणजे स्वतांचें स्वातंत्र्य गमावून कैदेंत कोंडून घेणें होय, अशी यांतील कल्पना आहे. स्वतांचीं मुलें, घर, कुटुंब–किती आकुंचित वृत्ति ही ! रशियन स्त्रीनें हिचाच प्रथम त्याग केला पाहिजे. आणि या विचारसरणीमुळें कुमारिका मातांची गर्दी जिकडे तिकडे झालेली दिसते. पुरुषांना त्या Productive machine म्हणून संबोधतात. पुरुषही या पदवीचा पुरेपुर फायदा घेतात, व पोटगीचा लकडा मागें लागूं नये म्हणून सहचारिणीला गर्भपाताचा सल्ला देतात. एवढेंच नव्हे तर तो पार पाडण्यास कित्येक वेळां धाकदपटशाचा उपयोग करण्यासहि चुकत नाहींत. आणि इतकें करूनहि स्त्रीनें हट्टानें व मातृप्रेमानें ती गोष्ट टाळलीच तर भांडणतंटे करीत बसण्याचा प्रसंग येऊन कित्येक वेळां त्याचा असा शेवट होतो—

'A student Rybak strangled the mother and child, because she wanted to hold him to the payment of the alimony, which the Court had allowed her.'

अशासारख्या गोंधळांतून खऱ्या स्त्रीस्वातंत्र्याची व सौख्याची काय निर्मिति होत असेल ती रशियाच जाणें! पतिसौख्य नाहीं; अपत्य सौख्य नाहीं; जीवनाची निश्चित कल्पना नाहीं; सरकारी भटारखान्याशिवाय संकटकाळीं आश्रयस्थान नाहीं! हीच जर स्त्रीस्वातंत्र्याची आणि सौख्याची कल्पना असेल तर आश्चर्य आहे! पिढ्यान्‌पिढ्या वाढविलेले संस्कार, बौद्धिक वाढ, एकंदर मानवजातीची उत्क्रांति या गोपाळकाल्यानें एका पिढींतच नष्ट होण्याचा प्रसंग आला आहे, आणि त्याची जाणीवहि पण हळूहळू रशियांत होऊं लागली आहे. फिरून, लहान लहान कुटुंबें असावीत, खासगी मत्ता थोड्या फार प्रमाणांत असण्यास हरकत नाहीं, मुलांना त्यांच्या आईबापांचें संरक्षण जितकें अधिक मिळेल तितकें चांगलें, अशा विचारांचीं माणसें पुढें येऊं लागलीं आहेत. पण त्यासंबंधीं आतांच निश्चित असें कांहींच म्हणतां येणार नाहीं. मात्र क्रांति-कालीन रशियापेक्षां आजचा रशिया एखादें का होईना पण पाऊल मागें हटला [?] असें म्हणावेसें वाटतें.

---

## वेश्या-व्यवसाय

रशियानें स्त्री-जीवनांत घडवून आणलेल्या क्रांतीचें चित्रीकरण गेल्या दोन लेखांत करण्यांत आलें. सदर क्रांतीची इष्टानिष्टता चर्चिण्याचा आमचा उद्देश नाहीं, अगर सदर क्रांतीनें स्त्री-जीवनावर जो एकंदर परिणाम केला तो स्त्रियांच्या नैसर्गिक सुखाशी कितपत सुसंगत आहे, अगर त्यांच्या जीवनविकासाला तो कितपत कारणीभूत झाला आहे, याची चिकित्साहि करीत बसण्याचा आमचा मानस नाहीं. रशियानें स्त्रियांच्या एका विशिष्ट वर्गामध्यें केलेल्या क्रांतीचा या ठिकाणीं थोडाफार विचार करावयाचा आहे आणि ती म्हणजे 'वेश्या-व्यवसाय-निर्मूलन' ही होय. या बाबतींत युरोपांतीलच काय पण जगांतील कोणत्याहि देशाच्या मानानें रशिया दहा पावलें पुढें आहे ही गोष्ट बऱ्याच लोकांना आतां मान्य झाली आहे.

वेश्याव्यवसायाची चलती युरोपियन राष्ट्रांमध्यें ज्या प्रमाणांत दिसून येते तितकी ती जगाच्या पाठीवरील इतर कोणत्याही देशांत दिसून येत नाहीं. इंग्लंडनें तर याबाबत पहिला नंबरच पटकावला होता, पण त्याचा विचार पुढें करणें असल्यानें तूर्त एवढ्या प्रशस्ती-पत्रावरच थांबतों. या व्यवसायामुळें सुसंस्कृत मानवसमाजाला एक कलंकच लावला आहे व पाहिजे तें करून तो धुऊन काढला पाहिजे, अशी विचारसरणी या सुधारणेच्या काळांत प्रत्येक ठिकाणीं दिसून येते; आणि या दृष्टीनें अनेक प्रयत्नहि करण्यांत येतात. पण या व्यवसायाचें संपूर्ण निर्मूलन करण्याचे दृष्टीनें जें यश रशियाला मिळालें आहे तितकें तें अद्याप दुसऱ्या कोणालाच मिळालेलें दिसत नाहीं. आणि याचें कारणहि पण एकच आहे. रशियानें वेश्याव्यवसाय अस्तित्वांत येण्याची कारणपरंपरा शोधून

काढली, ती अचूक ठरली, व ती नष्ट करतांच वेश्याव्यवसायहि नष्ट झाला. बाकीच्या राष्ट्रांना ही वेश्याव्यवसायाची कारणपरंपरा अज्ञात होती, अगर आहे, असा याचा अर्थ नाहीं. पण ती नष्ट करण्यासाठीं समाजरचनेमध्यें जो आमूलाग्र बदल व्हावयास हवा आहे तो त्यांना नको असल्यानें पोकळ बडबडीपलिकडे त्यांच्या कार्याची मर्यादा गेलेली दिसत नाहीं. वेश्याव्यवसाय नष्ट व्हावा अशी इच्छा आहे, पण त्याची कारणपरंपरा नष्ट करण्याची मात्र तयारी नाहीं; अर्थात् हा निव्वळ बोलघेवडेपणा आहे, असें रशियन टीकाकारांचें म्हणणें आहे. कांहींही असो, इंग्लंडादि युरोपियन देशांत अद्यापहि वेश्याव्यवसायाची चलती आहे एवढी गोष्ट निश्चित! या व्यवसायावर आळा घालून मानवसमाजाचा हा कलंक एकदां धुऊन टाकावा या बुद्धीनें इंग्लंडमध्यें सर्व देशांतील विचारवंत स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांनीं एक परिषद बोलाविली. तिचें वर्णन खुद्द लेनिननें केलें आहे, त्यावरून वेश्याव्यवसायासंबंधीं रशियाची भूमिका व इतर देशांची भूमिका यामध्यें कोणता भेद आहे हें स्पष्ट दिसून येणार आहे; म्हणूनच त्याचा सारांश मुद्दाम देण्यांत येत आहे.

## लेनिनची विचारसरणी

'कांहीं दिवसापूर्वी स्त्रिया व मुलें यांचा अनीतीसाठीं उपयोग करणाऱ्या व्यापाराचा विचार करण्यासाठीं 'पांचवी आंतर राष्ट्रीय परिषद' इंग्लंडमध्यें भरविण्यांत आली. त्या ठिकाणीं मोठ मोठाले धर्मोपदेशक, सरदारदरकार व त्यांच्या स्त्रिया, पोलीस अधिकारी, कायदेपंडित, इत्यादि अनेक बड्या धेडांचा मेळाच जमला होता. स्वागतसमारंभ, मेजवान्या यांची मारे एकच दंगल उडून गेली होती. वेश्याव्यवसायाच्या हीनत्वाबद्दल व त्यामुळें निर्माण होणाऱ्या अनेक व्याधिउपाधींवर लांबलचक भाषणें करण्यांत आलीं; तीं करणाऱ्यांच्या चेहऱ्यावर प्रतीत झालेलें गांभीर्य पाहून त्यांच्या सद्हेतूबद्दल शंका घेण्याचें धाडस कोणासच झालें नसतें. या ठिकाणीं जमलेल्या या धनिक श्रेष्ठींनीं यावर सुचविलेले उपाय फक्त दोनच होते-एक म्हणजे 'धर्मभावना जागृति,' व दुसरा 'पोलीस.' वेश्याव्यवसायावर हल्ला चढविण्यास या दोन्हीखेरीज दुसरीं उत्तम साधनेंच नाहींत, असा येथील सर्व भाषणांचा निष्कर्ष होता. इंग्लंडमधील एक सुधारणाप्रिय सद्गृहस्थ म्हणाले, 'कुंटणखाने चालविणाऱ्यांना फटक्यांची शिक्षा देण्याबद्दल कायदे झाले पाहिजेत.' कॅनडामधील एक

बाईसाहेब उठून जोरजोराने म्हणाल्या, 'पतित स्त्रियांवर पोलिसांची :सक्त नजर राहावी व विशेषतः अशा कामीं स्त्री पोलिसांची योजना करण्यांत यावी.' यानंतर एक जर्मन गृहस्थ उठले व त्यांनीं प्रेम-स्वातंत्र्याचे गोडवे गाणाऱ्या आधुनिक जडवादावर आपलें टीकास्त्र सोडलें. फक्त ऑस्ट्रियाचे एकच प्रतिनिधी मि. गार्टनर यांनीं समाजशास्त्राच्या दृष्टीनें वेश्याव्यवसायाचें मूळ शोधून काढावयाचा प्रयत्न केला. ते म्हणाले, 'कामगार वर्गांची शोचनीय अवस्था या व्यवसायाचे बुडाशीं आहे.' पण गंमत ही कीं, तेथें जमलेल्या सर्व लोकांनीं कुटाळी करून त्यांना स्तब्ध बसविलें. यावरून एकच गोष्ट सिद्ध होते कीं, सदर परिषद ही एक ढोंगी लोकांची परिषद होती. दारिद्र्य हेंच वेश्याव्यवसायाचें बुडाशीं असतें ही कल्पनाच त्यांना सहन झाली नाहीं; आणि म्हणूनच या ढोंगी वावदूकांनीं धर्म आणि पोलीस या फुसक्या शस्त्रांनीं वेश्याव्यवसायाचें उच्चाटन करण्याच्या बाता मारल्या.'

## वेश्या म्हणजे भांडवलशाहीचा रोग

लेनिननें परिषदेवर केलेली वरील टीका, वेश्याव्यवसाय नष्ट करण्यासंबंधींच्या त्याच्या कल्पनेवर स्पष्ट प्रकाश पाडणारीच आहे. लेनिनच्या पूर्वींही 'ऑगस्ट बेबेल' यानेंसुद्धां याच विचारसरणीचा पुरस्कार केला होता. तो आपल्या 'स्त्रिया आणि समाजसत्तावाद' या पुस्तकांत म्हणतो,

> 'In bourgeous Society prostitution was an institution similar to the police, the army, the Church and any other Capitalist enterprise.'

भांडवलशाहीनें निर्माण केलेल्या लष्कर, पोलिस, धर्मपीठें इत्यादि ज्या अनेक संस्था आहेत त्यांपैकींच 'वेश्याव्यवसाय' हीही एक आहे! म्हणजे पर्यायानें, भांडवलशाही वेश्याव्यवसायास कारणीभूत होते, असाच याचा अर्थ दिसतो. आणि यामुळेंच रशियांत भांडवलशाहीच्या नाशाबरोबर तिच्या अनुषंगिक अशा ज्या अनेक संस्थांचा नाश झाला त्यांत वेश्याव्यवसायाचाहि झाला. क्रांतिपूर्वकालीन या व्यवसायाची स्थिति व क्रांत्युत्तर स्थिति यांचा तुलनात्मक विचार केल्यास ही गोष्ट बऱ्याच अंशानें खरी असावीसे वाटतें. स्त्रियांचें सामाजिक दास्यत्व, आर्थिक परावलंबित्व त्यांना वेश्याव्यवसायाकडे खेंचतें हें सिद्ध करण्यासाठीं पुढील आंकडेवारी रशियानें उपलब्ध केली आहे. १८८९ सालीं

झालेल्या वेश्यांच्या शिरगणतीवरून असें दिसून येतें कीं, शेंकडा ८३·५ इतक्या वेश्या दारिद्यावस्थामुळें या व्यवसायांत शिरल्या होत्या. हें प्रमाण कित्येक विभागांत शेंकडा ९० पर्यंत चढल्याचें आढळून आलें. १८९७ च्या शिरगणतीप्रमाणें रशियांतील एकंदर स्त्रियांपैकीं फक्त शेंकडा ८ स्त्रिया स्वावलंबी असल्याचें आढळून आलें. बाकीच्या शेंकडा ९२ टक्के स्त्रिया आर्थिक दृष्टया परावलंबी होत्या. या कालांत पुरुष कामकरी वर्गाचें दरमहाचें वेतन १८ रुबल्स व स्त्रीचें ९ रुबल्स होतें, म्हणजे कट्टाकट्टी पोट भरलें म्हणजे बस्स ! अशा स्थितींत या वर्गांतील स्त्रियांनीं देहविक्री करून अर्थोत्पादन करण्याचा सुलभ मार्ग स्वीकारल्यास काय आश्चर्य ! स्त्रियांना पोटापाण्याचें साधन व वैवाहिक संरक्षण या दोहोंपैकीं एकही अनकूल नसेल तर त्यांचा कल स्वाभाविकच वेश्यावृत्तीकडे झुकतो. ' सेमाश्को ' नांवाचा एक रशियन अधिकारी म्हणतो—

' The fact that a woman has no work and no one to care for her is the fundamental social cause of prostitution.'

## रशियाची वेश्याव्यवसायावरील मोहीम

क्रांतीनंतर नवीन आर्थिक घटनेच्या कालांत (NEP) सुद्धां रशियांत वेश्याव्यवसायाची बरीच चलती होती; कारण स्त्रियांना वेतनाबाबत पुरुषांच्या इतकेच हक्क प्राप्त होऊनहि त्या कालीं त्यांच्या ठिकाणीं असलेल्या कौशल्याच्या अभावामुळें त्यांना सहसा नोकऱ्या मिळत नसत, आणि कागदोपत्रीं स्त्रियांचें दास्य दूर झाल्याची घोषणा होऊनहि प्रत्येक व्यवहारामध्यें तिचा अंमल होण्याचें चिन्ह दिसेना. त्यामुळें वेश्याव्यवसायहि हटेना म्हणून, त्या वेळीं रशियन सरकारनें एक सूचनावजा जाहीरनामा काढला त्यांत महत्त्वाचीं अशीं पुढील कलमें होतीं—

[ १ ] कांहीं कारणानें स्त्रियांना जर नोकरीवरून कमी करण्याचा प्रसंग आला तर त्यांची नोंद ठेवून त्यांना दुसऱ्या कांहीं तरी प्रकारांनीं संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यांत यावा.

[ २ ] अशिक्षित व कौशल्यहीन स्त्रियांनाहि उद्योग मिळूं शकेल असे सामुदायिक शेतीसारखे व्यवसाय सुरू करून, अशा निराधार स्त्रियांना त्यांत गुंतविणें.

[ ३ ] व्यापारी विद्यालयामधून व्यापारी शिक्षणांसाठीं स्त्रियांची अधिकाधिक सोय करणें.

[४] पतित स्त्रिया व मुलें यासाठीं संगोपन–गृहें व शाळा काढणें.

[५] प्रचाराचे जोरावर वेश्याव्यवसायाचे भयंकरपणाबद्दल बहुजनसमाजांत जागृति निर्माण करून पुरुषांचे मनांत याबद्दल तिटकारा निर्माण होईलसें करणें

वेश्याव्यवसाय थांबविण्यासाठीं या व याच नमुन्याच्या आणखी कित्येक योजना रशियन सरकारनें आंखल्या. त्या कालीं 'वेश्या' म्हणून वावरणाऱ्या स्त्रियांना त्या नरकांतून वर काढण्यासाठीं रशियन सरकारनें जातीनें प्रयत्न केले. वेश्या रहात असलेल्या विभागावर रशियन पोलिसांची कडक नजर राहूं लागली, मात्र यामुळें वेश्यांवर जुलूम केला जाऊं नये एवढी दक्षता घेण्यांत आली होती. सर्व अधिकारी लोकांना अशी सक्त सूचना देण्यांत आली होती कीं—

'Under no circumstances must the war against Prostitution degenerate into a war against Prostitutes.'

वेश्यागृहें शोधून काढून त्यांचा नाश करण्यासाठीं रशियन सरकारनें जितकी खटपट केली तितकी अद्याप कोणत्याच सरकारनें केली नसेल. या धंद्यांतून वर काढलेल्या स्त्रियांना योग्य तें आर्थिक संरक्षण मिळूनहि जर फिरून त्यांची प्रवृत्ति या व्यवसायाकडे झाली तर मात्र त्यांना कडक शासन करण्यांत येतें. १९२४ च्या एप्रिल पासून ते १९२५ च्या एप्रिलपर्यंत म्हणजे अवघ्या एक वर्षांत २२२८ इतके कुंटणखाने रशियांत उध्वस्त करण्यांत आले. वेश्याव्यवसायामुळें निर्माण होणाऱ्या घाणेरड्या स्पर्शजन्य रोगांवरहि रशियानें दवाखाने वगैरे उघडून मोहीम चालू ठेवली, व अशा तऱ्हेनें मानव समाजाला पिढ्यान् पिढ्या लागलेला हा दुहेरी कलंक धुऊन काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला. वेश्याव्यवसायावर घातलेल्या कायदेशीर निर्बंधामुळें अनेक खटले निर्माण होत, त्यांना वर्तमानपत्रांत प्रसिद्धी देण्यांत येऊन त्यांच्यावर खूप टीका प्रतिटीका करण्यांत येत, याचाहि परिणाम जनतेच्या मनावर चांगला होई. 'कामगार वर्गाच्या राष्ट्रामध्यें स्त्रीदेहाची अशी लुबाडणूक केली जाऊं नये' असा उपदेशाचा सूर बऱ्याच लेखांमधून असे. एका वेश्येवर झालेल्या खटल्याची हकीकत व त्याची वर्तमानपत्रांनीं केलेली चर्चा नमुन्यादाखल पुढें देत आहों—

### एक नमुनेदार खटला

एक कामकरी एका वेश्येच्या नादीं लागला व त्यामुळें त्याला हीन रोगाची

बाधा झाली. सदर वेश्या, तो कामकरी व कुंटणखान्याची मालकीण अशा तिघांवर खटला भरण्यांत आला. त्यांत कुंटिणीला जबर शासन झालें व बाकीच्या दोघांचा जाहीर धिक्कार करण्यांत आला. या खटल्याचा वर्तमानपत्रांनीं खूप गाजावाजा करून लोकमत मागविलें व भिन्नभिन्न मतांना प्रसिद्धि दिली. अनेकांनीं अनेक मतें प्रकट केलीं, त्यांतील कांहीं प्रातिनिधिक स्वरूपाचीं म्हणून पुढें दिलीं आहेत—

'वेश्येला कारावासाची शिक्षा झाली नाहीं हें ठीकच झालें. कारण स्त्रियांची बेकारी अद्याप व्हावी तशी तशी दूर झालेली नाहीं; अर्थात् उपजीविकेसाठीं कदाचित् तिनें या मार्गाचा अवलंब केला असेल. पण त्याबरोबरच दुसरी एक गोष्ट विचारांत घेणें अवश्य होतें. तिच्या संगतीमुळें त्या 'कामकऱ्याला' जो रोग जडला त्याच्या प्रसाराला बुद्ध्या कारणीभूत झाल्याबद्दल मात्र तिला जबरदस्त शासन व्हावयास पाहिजे होतें. तिला आपल्या रोगाची जाणीव नसेल असें म्हणवत नाहीं; आणि ती असतांना जर तिनें या 'कामगाराला' तशी सूचना दिली नसेल तर तिला सडकून शिक्षा होणेंच रास्त!'

दुसरे एक गृहस्थ म्हणतात, 'कामगाराचा जाहीर धिक्कार करण्यांत इंशील नव्हतें. हा व्यवसाय सुरू आहे तोंपर्यंत त्याला गिऱ्हाईक मिळणारच!'

यावर तिसरे म्हणतात, 'वेश्येचा धिक्कार व्हावयास नको होता. तिचा बिचारीचा काय दोष! या कामगाराला आपल्या कर्तव्याची जाणीव नको काय? वेश्या ही मानवरूप—बाजारांत पडलेली वस्तु आहे. तिला गिऱ्हाईक आहे तोंपर्यंत ती बाजारांत राहाणारच. गिऱ्हाईकच नसल्यावर माल बाजारांत राहतो कशाला?'

अनुकूल प्रतिकूल अशा अनेक टीका झाल्यानंतर वादाचा समारोप पुढीलप्रमाणें करण्यांत आला—'कामगारवर्गाच्या लोकशाहींत, कांहीं झालें तरी वेश्याव्यवसाय राहणें बरोबर नाहीं. होतां होईल तितक्या लवकर तो नाहींसा झाला पाहिजे.'

सोव्हिएट सरकारनें वेश्याव्यवसायप्रतिबंधक जे कायदे केले आहेत त्यांतील कांहीं महत्त्वाचीं कलमें पुढील प्रमाणें आहेत—

[ १ ] जो कोणी दुसऱ्यास आपला स्पर्शजन्य गुप्त रोग देईल त्यास तीन वर्षें सश्रम कारावासाची सजा देण्यांत येईल.

[२] आर्थिक दृष्ट्या आपणांवर अवलंबून असलेल्याची आर्थिक अगर इतर कुंचबणा करण्याचा धाक देऊन जो कोणी तिच्या अधःपातास कारणीभूत होईल त्यास कमींत कमी तीन वर्षे सश्रम कारावासाची सजा देण्यांत येईल.

[३] कुंटणखाने चालविणें अगर वेश्याबाबत दलाली करून पोट जाळणें हे गुन्हे असून हे करणारास तीन वर्षांची सजा देण्यांत येईल, व शिवाय मालमत्तेची जप्ती होईल.

वेश्याव्यवसायांतून मुक्त होऊन, निरनिराळे उद्योगधंदे शिकून, पोटापाण्याचा प्रश्न अन्य मार्गानें सुटण्यासारखी परिस्थिति असतांहि फिरून, या मार्गाकडे वळण्याची प्रवृत्ति स्त्रियांमध्यें दिसतें, असें रशियन सरकारला कित्येक वेळां आढळून येतें. या मनोवृत्तीच्या बुडाशीं असलेलें मानसशास्त्र अद्याप नीटसें अवगत झालेलें नाहीं, व त्यामुळें अशा स्त्रियांना कडक शासन करण्यापलिकडे रशियन सरकारनें कांहीं केलें नाहीं.

## वेश्याव्यवसायावरील एक काव्य

वेश्याव्यवसायप्रतिबंधक प्रचारकार्यामध्यें सर्व साधनांचा उपयोग करण्यांत येतो. विशेषतः याबाबत रशियन वाङ्मयानें बराच मोठा कार्यभाग उचलला आहे. नाटकें, कादंबऱ्या, काव्यें यांच्या द्वारां हा प्रचार मोठ्या प्रमाणांत करण्यांत येतो. एका रशियन 'मुक्त' वेश्येच्या तोंडांत पुढील गीत एका कवीनें घातलें आहे—

" मे महिन्यांतील प्रशांत चांदरात होती ती, मी ज्या कुंटणखान्यांत
पिचत होतें त्यावर छापा घालून मला पकडून नेण्यांत आलें.
ते साक्षीदार! त्या तपासण्या!! ते कठोर प्रश्न!!!
पिंजऱ्यांत उभ्या असलेल्या या वेश्येवर भडिमार होत होता त्यांचा.
शेवटीं तुरुंग!
त्या नरकापेक्षां हा तुरुंगच बरा वाटला मला. ज्या माझ्या या तरुण
देहांतून यौवनाचा बहर कित्येक लोकांनीं लुटला, त्यांना म्हणावें
तें नरक—कीटक—तुल्य जीवन मी या जन्मीं नाहीं विसरणार!
पण आतां! आतां तें दुःखद स्वप्न आहे एवढंच. लोकमतानें नांदणाऱ्या

या देशाची सुकन्या आहे मी आतां. या स्वातंत्र्यधामांत वावरणारी
भाग्यशालिनी आहे मी! त्या जुलमी भांडवलशाहीला या राष्ट्रकन्येपुढें
नमलें पाहिजे!!
अशी पुण्यभू जगांत दुसरी असेल का?
माझा भूतकाळ या पावनगंगेत धुऊन गेला.
मला त्याची आतां आठवणही नको आहे.
विसरेन मी त्याला.
मी आतां कामकरी देशाची कन्या आहे.
जगांतील कामकन्यांनों एक व्हा!
हा रक्तध्वजच तुम्हांला विजयाचा मार्ग दाखवील!!!"

६९३३

वेश्यावृत्ति हा एक परंपरागत चालत आलेला रोग आहे, मानव समाजांतील भांडवलशाहीच्या इतर रोगांप्रमाणेंच त्याचाहि आम्ही स्वीकार केला होता. पण आतां आम्हांस ही सामाजिक व्यथा दूर करणें शक्य आहे. कारण ज्या समाजरचनेमुळें ही व्यथा मानवसमाजास जडली ती समाजरचनाच आम्हीं मोडून काढल्यामुळें आतां हा रोग नाहींसा झालाच पाहिजे. दारिद्र्य आणि निराश्रितता हाच वेश्याव्यवसायाचा खरा उगम आहे; पण आतां रशियन समाजानें हा उगमच नाहींसा करून टाकला आहे.

## लैंगिकस्वातंत्र्य आणि वेश्या!—एक समस्या

रशियाच्या वेश्याव्यवसायविषयक मनोवृत्तीचें वरील एकंदर विश्लेषण वाचल्यानंतर तत्प्रतिबंधक उपायांची करण्यांत आलेली योजना स्पष्ट डोळ्यापुढें उभी राहते. स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य पुकारून वेश्यावृत्तीला पहिला तडाखा देण्यांत आला. सुधारणागृहांत वेश्यांना खेचण्यांत येऊन त्यांना चरितार्थाचीं अन्य साधनें उपलब्ध करण्यांत आलीं; प्रचारानें या व्यवसायाचें हीनत्व त्यांना पटविण्यांत आलें; आणि अशा तऱ्हेनें प्रयत्न करून आजच्या रशियानें वेश्याव्यवसाय नष्ट करीत आणल्याची ग्वाही दिली. इतक्या प्रयत्नानंतर ही गोष्ट 'अशक्य' आहे असें आम्हीहि म्हणूं इच्छित नाहीं. परंतु हा वेश्याव्यवसाय नाहींसा होण्यास समाजाची बदललेली आर्थिक घटनाच निव्वळ कारणीभूत झाली असें मात्र म्हणण्यास आमची तयारी नाहीं. **कारण स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नाहीं अशा देशांमधील वेश्याव्यवसायाचें प्रमाण पाहि-**

ल्यास, आर्थिक स्वातंत्र्याचा उपभोग घेणाऱ्या पाश्चात्य देशांच्या मानानें तें फार कमी आहे असें आढळून येणारें आहे. आर्थिक कांचणीमुळें देहविक्री करून पोट जाळणाऱ्या स्त्रिया नसतात असें आमचें म्हणणें नाहीं; पण निव्वळ या एकाच कारणास्तव स्त्री वेश्या बनते, असेंहि म्हणून भागणार नाहीं. रशियानें वेश्याव्यवसाय नष्ट केल्याची जी घोषणा केली तिचें बरेचसें श्रेय आर्थिक स्वातंत्र्यापेक्षां लैंगिक स्वातंत्र्यासच आहे असें दिसतें. लैंगिक स्वातंत्र्यानें, कुलीन स्त्रिया आणि वेश्या यांच्या भूमिका निराळ्या करून दाखविणारी जी सामान्य कल्पना आहे तीच नष्ट झाल्यानें, वेश्याव्यवसाय नष्ट झाला असें म्हणावें फार तर ! अमर्याद लैंगिक वासनातृप्तीची आकांक्षा मनांत धरून अनाचार करणाऱ्या स्त्री–पुरुषांच्या पाशवी वृत्तीमुळें हा व्यवसाय निर्माण होतो व त्यांच्या या वृत्तीमुळें त्यांना बहुजन समाजानें दूर लोटतांच स्वतःचा स्वतंत्र वर्ग निर्माण करून त्यांना उपजीविका करावी लागते. पुढें, प्रथम नसलेला अर्थोत्पादनाचा हेतु या परिस्थितीमुळें प्रधान हेतु बनतो व मग सामान्यपणें देहविक्री करून पोट भरणारी स्त्री या दृष्टीनें समाज तिच्याकडे पाहूं लागतो. या वर्गाच्या बदफैलीपणाची कीड बहुजनसमाजाला लागूं नये म्हणून या स्त्रियांच्यावर 'वेश्या' असा शिक्कामोर्तब करून अशा स्त्रियांना समाजापासून दूर राखण्यांत येतें आणि त्यांच्याशीं संबंध ठेवणारांनाहि हीन लेखण्यांत येतें. रशियानें आपल्या समाजरचनेमुळें हा वर्ग नष्ट केला म्हणण्यापेक्षां सर्व समाजच या वर्गात समाविष्ट केला असें म्हणणें अधिक श्रेयस्कर होणार आहे. आणि आतांपर्यंतच्या एकंदर लिखाणावरून तें दिसूनहि पण येणार आहे. वेश्याव्यवसायप्रतिबंधक चळवळी यामुळेंच पाश्चात्य राष्ट्रांत इतक्याशा नेटाला लागूं शकत नाहींत, कारण हा व्यवसाय बहुजनसमाजाचे हिताचे दृष्टीनें रहावा असें म्हणणारेहि कित्येक विद्वान् तेथें आहेत. वेश्याव्यवसायांत निर्माण झालेल्या संततींत जें अनुषंगिक हीनत्व भिनलें असतें तेंच हीनत्व या लैंगिक स्वातंत्र्यामुळें निर्माण झालेल्या संततींत रहाते व याचा अनुभव या कालांत निर्माण झालेल्या रशियन पिढ्यांना आलाच पाहिजे. निसर्गाचे जननशास्त्राचे नियम मानवांच्या उच्छृंखलपणाचें प्रायश्चित देण्यास सुसज्ज आहेत, तेथें दयामाया नाहीं.

प्रौढविवाह हें सुद्धां 'वेश्यावृत्ति' फोफावण्याचें एक कारण आहे असें कांहीं तज्ञांचें म्हणणें आहे. ते म्हणतात,

'Late marriages necessitate the existence of some relief measure which will preclude the deleterious alternative of repression or unnatural vice.'

### वेश्यांचा वर्ग गेला, पण वृत्ति—

रशियांत आतां लैंगिक स्वातंत्र्य असल्यानें अठरा ते वीसच्या दरम्यान असलेल्या सर्व तरुण तरुणींना वैवाहिक सौख्याचा मनसोक्त अनुभव घेतां येतो; व फिरून कोणतीहि नैतिक जबाबदारी अंगावर पडण्याची फारशी भीति नाहीं. त्यामुळें वेश्याव्यवसाय नष्ट झाला असेल, पण वेश्यावृत्ति नष्ट झाली नाहीं. वैवाहिक निर्बंध शिथिल असल्यानें ज्या लैंगिक स्वातंत्र्यासाठीं व अमर्याद वासनातृप्ती-साठीं 'वेश्या' या सदरांत मोडणाऱ्या स्त्रियांकडे धांव घेण्याची वृत्ति असते तिचें आतां कारण उरलें नाहीं. 'वेश्या' या स्वतंत्र नांवानें ओळखला जाणारा वर्ग आतां रशियांत नाहीं; याचें कारण, बहुजन स्त्रीसमाजालाच त्या वृत्तीचा अंगिकार करण्याची मुभा मिळाल्यानें तसा स्वतंत्र वर्ग राखण्याची आवश्यकता आतां समाजाला उरली नाहीं. स्त्रियांचें आर्थिक क्षेत्रांतील पदार्पण हीसुद्धां एक वेश्यावृत्तीच आहे व ती या वेश्यावृत्तीहून अधिक भयंकर आहे, असेंहि प्रतिपादन करणारे कित्येक विद्वान आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, लैंगिक वेश्यावृत्ति ही एका विशिष्ट दहापांच स्त्रियांची तरी हानी करते, पण स्त्रियांचें आर्थिक क्षेत्रांतील पदार्पण बहुजन स्त्रीसमाजाची व त्याबरोबरच मानव समाजाची हानी करते. हा दृष्टिकोन बाळगणाऱ्या एका तज्ञाचे विचार जसेच्या तसेंच खालीं देत आहोंत—

'But why is so much fuss made precisely about prosi. tution on its sexual side ? There is the prostitution of healthy rosy figured youths in hundreds of other walks of life, and nobody, or scarcely anybody, stirs to point it out. The young girls who to-day are sent by their parents at the age of sixteen to twenty, to bow their heads for forty -three hours a week before a type-writer or a ledger, or a stamping, cutting or folding machine, get ill just as quickly, lose their beauty just as surely and grow depressed and spiritless just as rapidly as the sexual prostitute, and they

get only a sixteenth or less of the prostitute's entertainment out of life into the bargain. She sells herself to a modern task master of Commerce or Industry ? Could anything be more tragic ? What sympathy or horror or righteous indignation can you rouse into the moral toads, who inveigh against prostitution, by pointing to the rounded shoulders, the touchless life, the listless eyes, the bloodless checks and hands of the type-writer or other machine drudge ? None !

'The evils of prostitution are no greater and no more tragic than those of any other form of exploitation of the female individual.'

## स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य=फोफाटा !

स्त्रियांनीं स्वतंत्रपणें उपजीविका करण्याचे दृष्टीनें स्वीकारलेला कोणताहि मार्ग रूढार्थानें असलेल्या वेश्यावृत्तिइतकाच घातक असल्यानें योग्य काळीं विवाह करून सुखी होण्यापलिकडे यावर फारसा इलाज नाहीं. अनिर्बंध विषयवासनेचे बंदी, पोटापाण्याचा प्रश्न सुटतांच स्वेच्छाचार टाकतील ही गोष्टी खोटी ! फार कशाला, सुखी पिंडामधूनच ही वृत्ति अधिक बळावत असते हें सूक्ष्म विचारांतीं दिसणारें आहे. वेश्यागृहांचे उंबरे झिजविणारे बहाद्दर जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत कांहीं स्त्रियांचे बळी पडत राहणार, कांहीं स्वखुषीनें या कार्याला वाहून घेणार; म्हणूनच या स्त्रियांना इतर समाजरक्षक संस्थांप्रमाणें थोडा फार तरी मान दिला पाहिजे. एक ग्रंथकार म्हणतात—

'We must do all we can for those women who are contributing their lives to a public service, just as we do all we can for soldiers and sailors in war time, and for all public workers who perform useful and dangerous duties for the public weal.'

निव्वळ आर्थिक परिस्थितिमुळें स्त्रिया वेश्याव्यवसायांत पदार्पण करतात हें रशियाचें तत्त्व सत्य आहे असें धरून चालल्यास, स्त्रीचें आर्थिक स्वातंत्र्य तिला आगींतून काढून फोफाट्यांत टाकते; यापलिकडे त्याला महत्त्व नाहीं असेंच

दिसतें. वेश्याव्यवसायांत पदार्पण करणारी स्त्री कोणत्या कारणानें त्यांत शिरली याची चौकशी करतांना रशियानें पुढील विभाग पाडले आहेत—

*Case form:—* **Article No. 24**

Under what circumstances did she resort to prostitution ?—( a ) Unhappy Love, ( b ) Sexual desire, (c ) In consequence of trickery, ( d ) Procuring, ( e ) Force, (f ) Hunger, (g) Umemployment, (h) Sickness, (i) Unmarried motherhood, ( J ) Distress, (k) Compulsion ?

वेश्याव्यवसायाची इतकी कारणपरंपरा डोळ्यापुढें असतां स्त्रियांच्या आर्थिक दुःस्थितीवरच त्याचें खापर सर्वस्वीं फोडण्यांत काय तात्पर्य !

### गुप्त वेश्यांचा प्रश्न

प्रत्यक्ष व्यवसाय म्हणून वेश्यागृहांतून वावरणाऱ्या स्त्रियांवर कडक नजर ठेवून रशियन सरकारनें त्यांना आपल्या देखरेखीखालीं घेतलें, व वेश्याव्यवसायावर विजय मिळविल्याचें थोडें फार समाधान मिळविलें; पण आतां, तें समाधान टिकावू नाहीं, हें रशियन सरकारला कळून येऊं लागलें आहे. कारण या राजरोस वेश्यांपेक्षां अधिक भयंकर स्वरूपाच्या वेश्या आतां दृष्टोत्पत्तीस येऊं लागल्या आहेत. रशियांतील कित्येक स्त्रिया आतां जोड धंदा म्हणून वेश्याव्यवसाय करतात. नाटकाचें तिकीट, मोजांची जोडी, अगर छानदार बूट एवढ्यावरहि त्या खुष असतात. रशियांत येणाऱ्या प्रवाशांची संख्या अलीकडे अतोनात वाढल्यानें या प्रवासी लोकांच्यावर नजर ठेवून, अगर परदेशांतून कांहीं उद्योगधंद्याचे निमित्तानें स्थायिक झालेल्या लोकांचेवर नजर ठेवून चोरटेपणानें या स्त्रिया आपला व्यवसाय चालवितात. अशा तऱ्हेनें जादा प्राप्तीचें एक साधन म्हणून हा व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना कोणत्या मार्गानें ताळ्यावर आणावें हा एक प्रश्नच आहे. याबद्दल एक ग्रंथकार म्हणतात,

'Prostitution as a part-time occupation is combated by raising the cultural level of women in general, but in particular by propaganda among working women, who are made to realize that this method of adding in one's earnings is contemptible.'

एकंदरींत विचार करतां, रशियानें वेश्याव्यवसायाच्या विरुद्ध चालविलेला लढा यशस्वी झाला असें म्हणतां येवो अगर न येवो, पण या हीन व्यवसाया-विरुद्ध तनमनधन खर्च करून मोहीम करण्याचा प्रथम मान रशियाला व त्याच्या नेत्यांना आहे याबद्दल कोणाचेंच दुमत नाहीं. याबद्दल जगांतील स्त्रियां-कडून रशियाला दुवाच मिळाला पाहिजे. त्यांच्या या झगड्याची पद्धति सदोष असो अगर निर्दोष असो, त्याच्या बुडाशीं असलेली पवित्र भावना व उच्च विचारसरणी कोणासहि नाकारतां येणार नाहीं.

## प्रकरण ५ वें — जर्मनी

गेल्या प्रकरणांत रशियन स्त्री–समाजाच्या जीवनक्रमाची सविस्तर चर्चा आपण केली. आतां त्याच्या शेजारींच असलेल्या, पण त्याहून अगदीं भिन्न आचार-विचारसरणीच्या देशामध्यें अर्थात् 'जर्मनी'मध्यें आपणास प्रवेश करावयाचा आहे. महायुद्धानंतरचा सुमारें १५ वर्षांचा काल हा जर्मनीच्या इतिहासामध्यें फारसा चिरस्मरणीय नाहीं. या कालामध्यें जर्मन जनता प्रतिकूल परिस्थितीशीं झगडण्यांत गुंतलेली असल्यामुळें, विशेष स्वरूपाची राजकीय अगर सामाजिक परंपरा निर्माण करण्याच्या दृष्टीनें कोणतीच महत्त्वाची घटना तेथें घडून आली नाहीं. पण हिटलरच्या उदयानंतर मात्र अवघ्या पांचच वर्षांत जर्मनीमध्यें आमूलाग्र बदल झालेला आपणास दिसून येतो. नाझी तत्त्वज्ञानाचा प्रसार सर्व जर्मनींत होऊन जर्मन राष्ट्रांत निर्माण झालेलें नवचैतन्य जगांतील प्रत्येक राष्ट्राला जाणवूं लागलें. पंधरा वर्षांच्या कालांत जगाच्या उपेक्षेचा विषय होऊन बसलेला जर्मनी फिरून जगाचें लक्ष आपणांकडे ओढून घेण्यास समर्थ झाला. 'नाझी तत्त्वज्ञानाच्या' उदयामुळें जर्मनीचें राजकीय, आर्थिक, सामाजिक जीवन पार बदलून प्रत्येक ठिकाणीं कांहीं तरी नाविन्य दिसून येऊं लागलें. नाझी पक्षाच्या आगमनानें जर्मन राष्ट्रांत निर्माण झालेल्या क्रांतीच्या इतर अंगा-कडे पाहण्याचें आपणांस कारण नाहीं. पण या नवीन तत्त्वज्ञानानें जर्मनीच्या सामाजिक जीवनामध्यें व विशेषतः स्त्रियांच्या जीवनामध्यें कोणता बदल घडवून आणला तेवढेंच प्रामुख्यानें पहावयाचें आहे.

पाश्चात्य राष्ट्रांतील दोन स्त्रीसमाज अगदीं दक्षिणोत्तर ध्रुवाइतके परस्पर विरुद्ध असतील याची कल्पना फार थोड्या लोकांना असेल; पण रशिया व जर्मनी या दोन देशांतील स्त्री समाजांच्या परिचयानें वाचकांना ही गोष्ट स्पष्ट दिसून येणारी आहे. यांतील कोणत्याहि समाजाचें दर्शन वाचकांना यथातथ्य

घडवून आणणें हें आमचें काम आहे. त्यांच्या सरसनीरसतेचा निर्णय वाचकांनीं आपल्या मनानें घेण्याचा आहे.

## नाझींनीं स्त्रीवर्गाचें हृदय जिंकलें !

नाझी लोकांची सत्ता जर्मनीमध्यें प्रस्थापित होतांच त्यांनीं जर्मन स्त्री-पुरुषांना उद्देशून जें एक पत्रक काढलें होतें त्यामध्यें 'नाझी कार्य-क्रमाला' सक्रिय पाठिंबा देण्याची विनंति करण्यांत आली होती. व्हर्साय तहाच्या कठोर बंधनांतून मुक्त होण्याची जाहीर घोषणा नाझी पुढाऱ्यांनीं केली असल्यानें, त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमामध्यें दुसऱ्या महायुद्धाचा हेतू स्पष्ट दिसून येई. स्वाभिमानावर झालेला आघात हा अत्यंत दुस्सह असतो; तशांत जर्मनी-सारख्या शिपाई बाण्याच्या राष्ट्राला तो अधिकच दुस्सह झाला असेल यांत काय आश्चर्य ! आणि यामुळें, व्हर्साय तह उलथून टाकण्याच्या दृष्टीनें आपण आपला कार्यक्रम आंखला आहे एवढी घोषणा नाझी पुढाऱ्यांकडून होतांच, त्याच्या शक्याशक्यतेची काडीमात्र चौकशी न करतां, जर्मन स्त्रीपुरुषांनीं त्यांस सहानुभूति दाखविली. विशेषतः, जर्मन स्त्रियांना या कार्यक्रमाविषयीं अधिक जिव्हाळा वाटूं लागला याला कारण म्हणजे व्हर्साय तहामुळें झालेली त्यांची दुहेरी उपासमार होय ! युद्धानंतरहि कांहीं कालपर्यंत जर्मनीची आर्थिक नाकेबंदी कायम ठेवण्यांत आल्यानें हजारों स्त्रीपुरुष भुकेमुळें तडफडून मरण पावले. जर्मन पतिपत्नींना उपासमारीनें तडफडून प्राण सोडणारीं आपलीं मुलें उघड्या डोळ्यांनीं पहाण्याचा प्रसंग आला. युद्धोत्तर निर्माण झालेल्या औद्योगिक मंदीमुळें व उतरलेल्या जीवनध्येयानें वैवाहिक सौख्य जर्मन स्त्रियांना अन्नाइतकेंच महाग झालें. अशा स्थितींत, नाझी प्रचारकांनीं जर्मन जनतेला या आपत्तींतून मुक्त करण्याची घोषणा करतांच, सर्व जर्मन स्त्रियांनीं त्यांना तात्काळ पाठिंबा देऊन नाझी कार्यक्रमानुसार वाटचाल करण्यास सुरवातहि केली यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

### फ्राऊ शोल्टाझिंग, जर्मन क्रुपस्काया

रशियन स्त्रियांच्या अंतःकरणांत 'क्रुपस्कायाला' जें स्थान आहे तेंच जर्मन स्त्रीच्या अंतःकरणांत 'फ्राऊ गरट्रूड शोल्टझिंग'ला आहे. सुमारें ३० वर्षें उमरीच्या या पुनर्विवाहिता स्त्रीला ५-७ मुलें आहेत. प्रांतिक स्त्री-संस्थेच्या पुढारीपणापासून चढत चढत जाऊन ती आज सर्व जर्मन स्त्रीसमाजाची

नेत्री झाली आहे. एका अमेरिकन वृत्तपत्राच्या स्त्री–प्रतिनिधीनें तिच्या-संबंधीं लिहितांना म्हटलें, ' तिची अंगकांती इतकी निर्मळ आणि तेजस्वी आहे कीं, पावडरीसारखीं कृत्रिम साधनें न वापरतां ती खुशाल समाजांत वावरूं शकते.' पुढील १० वर्षांत जर्मन स्त्रियांच्यासाठीं ती काय करूं शकेल याचा अंदाज घेण्यासाठीं सदर अमेरिकन स्त्रीनें तिला प्रश्न विचारला, पण तिनें मोठ्या विनयानें त्याचें उत्तर देण्याचें टाळलें. कारण आपल्या कार्याचा विशेष गाजावाजा करण्याचा तिला हव्यास नाहीं. ' जर्मनीच्या सुपुत्रांनीं धैर्यानें लढावें आणि हंसत मरावें ' या नाझी तत्त्वाची शिकवण जर्मन मातांना देण्यांत तिला क्वचित् वेळां किंचित् खेद होत असावा असें वाटतें, कारण आपल्या मुलांची स्मृति त्या वेळीं तिला होत असावी. पण या भावना तिच्या बाबतींत अगदीं क्षणिक असतात. आपल्या भाषणांत ती म्हणते, ' स्वतःचें पूर्ण ज्ञान करून घेऊन आम्ही भविष्य काळाला तोंड देण्याच्या तयारीनें उभ्या आहोंत. जर्मन राष्ट्राच्या स्त्रिया म्हणून त्याच्या इतिहासाची तेजस्वी परंपरा कायम राखण्याची आमची तयारी आहे. त्यांत ईश्वर आम्हांस मदत करो ! ' तिचें भाषण ऐक-णाऱ्या एका स्त्रीनें तिच्यासंबंधीं जर्मन स्त्रीला वाटणारी आत्मीयता मोठ्या मार्मिकपणें वर्णन केली आहे. ती म्हणते,

' Thousands of women feel convinced that a wife and mother like themselves is speaking from the depths of her heart to the hearts of the Captured Audience.'

जर्मन सरकारनें स्त्रीविषयक आंखलेलें धोरण पाहून जर्मन स्त्रियांना फिरून नाझी लोकांनीं दास्यत्वांत खेंचलें, असा प्रचार युरोपांतील बऱ्याच राष्ट्रांनीं केला. कित्येकांनीं यासाठीं जर्मनीवर बहिष्कार घालण्याचीहि भाषा केली. या सर्व टीकेचा रोख जर्मन स्त्रियांवर नवीन घालण्यांत आलेल्या निर्बंधावर होता. या टीकांना उद्देशून शोल्टाझिंग म्हणते, ' जगाच्या पाठीवर असें सरकार क्वचित्च असेल कीं ज्यामध्यें जर्मनीप्रमाणें स्त्रियांच्या हालचाली एका विशिष्ट संघटनेनें आपल्या देखरेखीखालीं आणल्या आहेत. जर्मनींतील राष्ट्रीय स्त्रीसमाजानें स्त्रियांच्या दृष्टीनें उपयुक्त असा प्रत्येक कायदा अस्तित्वांत आणला आहे. त्याला कोणासहि स्त्रियांचें दास्य म्हणतां येणार नाहीं.'

### मातृसेवासंघ–जबरदस्त संघटणा

स्त्रियांच्या अनेक लहानमोठ्या संस्था जर्मनींत सरकारच्या नेतृत्वाखालीं अस्तित्वांत आल्या आहेत. १९३४ सालीं 'मातृसेवा संघ' नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेमार्फत अठरा वर्षांपुढील स्त्रियांना मातेचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या यांचें शिक्षण देण्यांत येतें. या संस्थेच्या शिक्षणक्रमांत आपल्या मुलींना गोंवण्याची जबाबदारी माता–पित्यांवर टाकण्यांत आली आहे. यासंबंधीं एक नाझी वर्तमानपत्र म्हणतें,

'या संस्थेचा उपयोग आपल्या मुलीसाठीं करून घेण्याबाबत कोणा मातापित्यांनीं उदासीनता दाखविल्यास त्यांच्यावर सक्ती करण्यांत यावी. मातृत्व पवित्र आहे आणि अपत्य ही स्वर्गीय देणगी आहे. जर्मनीचा भविष्य काल सर्वस्वीं आजच्या पिढीच्या कर्तबगारीवर अवलंबून आहे. आजची पिढी सर्वस्वीं लायक होण्यास तिचें शारीरिक व मानसिक दृष्ट्या योग्य संगोपन झालेंच पाहिजे. कर्तबगार मानव या दृष्टीनें आपल्या अपत्याला तयार करण्याची पवित्र जबाबदारी मातेवर आहे, आणि आपल्या या कर्तव्यापासून जर माता च्युत होत असतील तर त्यांना सक्तीनें ताळ्यावर आणणें भाग आहे.'

### भावी मातांचा शिक्षणक्रम

भावी मातांना शिक्षण देण्याच्या हेतूनें स्थापन करण्यांत आलेल्या या शाळांची संख्या १९३६ सालीं दीडशें होती. या शाळांच्या अभ्यासक्रमांत पुढील गोष्टींचा प्रामुख्यानें समावेश करण्यांत आला आहे—( १ ) घरची व्यवस्था, स्वयंपाकपाणी, शिवणें टिपणें इ. ( २ ) आरोग्यशास्त्र सर्वसाधारण, मुलांची जोपासना व त्यांचें आरोग्य, ( ३ ) मुलांचें प्राथमिक शिक्षण; संस्कृति व लोककथा यांचें मुलांना शिक्षण कसें द्यावें, घरगुती करण्याजोग्य वस्तु इ. याशिवाय राष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीनुरूप घरगुती काटकसरीच्या योजना कशा आखाव्यात याचेंहि शिक्षण येथें देण्यांत येतें. अन्नाची नासधूस होऊं न देणें, थोडक्याच मिळणाऱ्या साधनांवर संसार शक्य तो उठावदार करणें, साधाच पण सत्वशील आहार तयार करणें, वगैरे बाबींचें शिक्षण देण्याची सर्व व्यवस्था या संस्थांमधून आहे. हिंदुस्थानांत पूर्वीं जें शिक्षण घरोघरीं आपोआप मिळे तेंच शिक्षण देण्यासाठीं, जर्मनींत या नमुन्याची गृहव्यवस्था अस्तित्वांत नसल्यानें, संस्था काढल्या आहेत हाच याचा अर्थ ! विशेष लक्षांत ठेवण्याची गोष्ट

ही कीं, या संस्थेचा अभ्यासक्रम पुरा केल्याचा दाखला भावी पत्नीनें दाखविल्या-शिवाय नाझी पक्षांतील कोणत्याहि तरुणाच्या विवाहास पक्षाची मान्यता मिळत नाहीं. मोठमोठ्या शहरांतील स्त्रियांना या शिक्षणसंस्थांचा लाभ सहजासहजीं घेतां येऊं शकतो; पण खेडोपाडीं वास्तव्य करून राहणाऱ्या स्त्रियांना ही गोष्ट शक्य नसल्यानें त्यांच्यासाठीं फिरते शिक्षक ठेवण्यांत आले आहेत. ते दरएक खेड्यांत जाऊन तेथील मजूर अगर शेतकऱ्यांच्या स्त्रियांना या शिक्षणाचा लाभ करून देत असतात. या शिक्षणाचा लाभ घेणाऱ्या स्त्रियांची संख्या १९३६ सालीं ६,७३,०७४ एवढी होती. थोड्याच कालांत हा आंकडा दहा लाखावर गेला व आतां तर जवळ जवळ सर्वच स्त्रिया या शिक्षणाचा लाभ घेत असतील. या शिक्षणक्रमांत असलेल्या सुमारें शें. ५० स्त्रियांचीं लग्नें झालेलीं आहेत, आणि अशा स्त्रियांचीं वयें २० ते ४० च्या दरम्यान आहेत.

## एका अमेरिकन स्त्रीचा अभिप्राय

बर्लिनजवळच असलेल्या अशा एका संस्थेस भेट देऊन आल्यानंतर एक अमेरिकन स्त्री त्यासंबंधीं लिहिते—

'या संस्था 'राष्ट्रीय' स्त्रीसमाजाच्या नेतृत्वाखालीं चालविण्यांत येतात. आठवड्यांतून सुमारें दोन दिवस सायंकाळीं मातांना अगर भावी मातांना या शाळांतून शिक्षण देण्यांत येतें......अगदीं प्राचीन कालापासून तो अद्यावत् शिशुसंगोपनासाठीं उपयोगांत आणलेलीं सर्व साधनें या ठिकाणीं उपलब्ध करण्यांत आलीं आहेत व त्यामुळें स्त्रियांना त्यांचा तौलनिक अभ्यास करण्यास अवसर सांपडतो. स्वयंपाकगृहामध्यें स्त्रियांना सर्वसाधारण स्वयंपाकाचें व विशेषतः मुलांचें अन्न कसें तयार करावें याचें शिक्षण दिलें जातें. दुसऱ्या एका ठिकाणीं बाहुल्या, मोजे, फ्रॉक्स इत्यादि नित्योपयोगी वस्तु तयार करण्याचें शिक्षण विशेष कसोशीनें दिलें जातें. ही सर्व संस्था पाहून, आपल्या मुलांच्या उज्वल भवितव्यासाठीं झगडणाऱ्या या जर्मन स्त्रियांचें मला कौतुक वाटल्या-शिवाय राहिलें नाहीं."

## कुटुंब हेंच स्त्रीचें राज्य !

नाझी राजवटीखालीं जर्मन स्त्रियांची करण्यांत आलेली संघटना आणि तिचें ध्येय याबद्दल, इतर युरोपियन राष्ट्रांनीं कितीहि गैरसमज पसरवून जर्मनीला

रानटी ठरविण्याचें प्रयत्न केले तरी, निःपक्षपातीपणें या संघटनेचा अभ्यास करणाऱ्यांना तींत बराचसा कौतुकास्पद भाग दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं. इतर ठिकाणीं स्त्रीला प्राप्त झालेलें यांत्रिक स्वरूप नष्ट करून कुटुंबसंस्थेच्या म्हणजे राष्ट्राच्या हृदयाचे ठिकाणीं तिची प्रस्थापना करण्यांत नाझी लोकांनीं आपलें आर्यत्व खरोखर प्रकट केलें आहे असें म्हणावें लागतें. आपला पती आणि आपलीं अपत्यें यापलिकडे स्त्रियांच्या दृष्टिकोनाची मजल फारशी जाऊं नये असें म्हणणाऱ्या जर्मन राष्ट्राच्या कर्तबगारीवर, त्याच्या या धोरणानें काय दुष्परिणाम झाला याची चिकित्सा हिंदी स्त्री–हितवादाच्या नांवाखालीं बेजबाबदार विधानें करणाऱ्या लोकांनीं जरूर करावी. मार्क्सची स्त्रीविषयक विचारसरणी जर्मन तत्त्ववेत्त्यांनीं अगदीं कुचकामी ठरविली आहे. कुटुंब हा समाजाचा आद्य घटक असून आदर्श कुटुंबें राष्ट्राच्या कीर्तिमंदिराचे आधारस्तंभ असल्याची ग्वाही जर्मन तत्त्ववेत्ते देतात. शुद्ध अनुवंशिकतेची प्रजा हीच राष्ट्राची खरी जिवंत संपत्ति आहे हें तत्त्व प्रत्येक जर्मन समाजशास्त्रज्ञानें तर्कशुद्ध व शास्त्रशुद्ध पायावर प्रस्थापित करून दाखविलें आहे. आदर्श गृहजीवनांवर त्यांची भिस्त आहे. ते म्हणतात—

'The good Nazi resents the modern inventions that have dotted the landscape with smoking factories, that pull family members in separate directions to their places of work.'

### वर्णसंकरावर म्हणजे लैंगिक स्वातंत्र्यावर मोहीम

प्रत्येक कुटुंबानें स्वतःच्या मालकीच्या जमिनीच्या तुकड्यावर नांदावें व त्यावर राबून आपला चरितार्थ चालवावा, ही मार्टीन ल्युथरची विचारसरणी आज जर्मनींत एका अर्थानें मान्यता पावली आहे. आणि यामुळें, जर्मन स्त्रियांनीं चालू धकाधकीच्या मामल्यांत मुळींच प्रवेश न करतां गृहस्वामिनीचें सन्माननीय पद स्वीकारावें व कुटुंबांना प्राप्त झालेलें विस्कळित स्वरूप नष्ट करावें याबद्दल जर्मनीची खटपट सुरू आहे. जर्मन संस्कृतीची रक्षणकर्ती माता म्हणून महत्त्वाची जबाबदारी जर्मन स्त्रीवर असल्यानें तिनें आपल्या मुलांना प्राचीन–अर्वाचीन नररत्नांच्या कथा सांगून रंजविलें पाहिजे. जर्मन रक्तांतील अनुवंशिक गुण भावी पिढ्यांच्या नसानसांतून खेळते रहावेत यासाठीं जर्मन स्त्रियांचे हातून

वर्णसंकाराचें पातक होऊं न देण्याबद्दल अत्यंत खबरदारी घेण्यांत येतें. स्त्रिया आणि मातृत्व या दोन शब्दांची फारकत होऊंच शकत नाहीं, असा जर्मन सरकारचा दृढ विश्वास आहे. संस्कृति रक्षणाची व उत्क्रांतीची भावना तेथें बलवत्तर असल्यानें, लैंगिक आचार हा व्यक्तीच्या इच्छेचा प्रश्न असून लैंगिक भूक भागविणें हें कार्य कोठेंहि जेवण्याइतकेंच स्वाभाविक आहे, त्यांत कोणत्याहि प्रकारचे निर्बंध पाळण्याची आवश्यकता नाहीं ही समाजसत्तावादी रशियन विचारसरणी जर्मनीला मुळींच मान्य नाहीं. नाझी सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी जर्मनीमध्यें वरीलसारख्या समाजसत्तावादी विचारसरणीचा फैलाव झाला होता. त्या कालांत जर्मन स्त्री-पुरुष विवाहाबाबत फारसे निर्बंध पाळीत नसत; त्यामुळें ज्यू व जर्मन रक्ताची भेसळ होऊन जर्मन वंशाचे अनुवंशिक गुणधर्म नष्ट होण्याची वेळ आली होती. नाझी सत्ताधाऱ्यांनीं प्रथम जर कोणती गोष्ट केली असेल तर ती ही कीं, अशा विवाहाविरुद्ध जोराची मोहीम सुरू केली. नाटकें, कादंबऱ्या, काव्यें या प्रत्येकामधून या समाजसत्तावादी लैंगिक स्वातंत्र्याच्या कल्पनांवर भडिमार करण्यांत आला. अनैतिक, अनिर्बंध लैंगिक व्यवहाराचा पुरस्कार करण्यासाठीं नाझी पूर्वकालांत लिहिलीं गेलेलीं सर्व पुस्तकें जप्त करण्यांत येऊन पुन्हां असें वाङ्मय निर्माण होऊं न देण्याबद्दल कांटेकोर खबरदारी घेण्यांत आली. अनीति व लैंगिक अनाचार यांचा बीमोड करण्यासाठीं अनेक कायदे करण्यांत आले. स्त्रियांच्या आरोग्याला विघातक अशा व्यसनांपासून त्यांना मुक्त करण्यासाठींहि कायदे करण्यांत आले. तमाखूच्या व्यसनाचा प्रसार युरोपियन स्त्रियांमध्यें फार मोठ्या प्रमाणांत झाला आहे; अर्थात् जर्मन स्त्रीहि त्याला अपवाद नव्हतीच. तमाखूचें व्यसन माता होणाऱ्या अगर झालेल्या स्त्रियांना असणें भावी पिढ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनें अत्यंत घातुक असल्याचा निर्वाळा अनेक तज्ञ डॉक्टर्सनीं दिला असल्यानें, जर्मनीनें आपल्या स्त्रियांना या व्यसनापासून मुक्त करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें प्रचार सुरू केला. ‘ तमाखू न ओढण्याची स्त्रियांना विनंति आहे.’ अशा पाट्या प्रथम जिकडे तिकडे फडकल्या. नंतर जर्मन नागरिकांना उद्देशून एक पत्रक काढण्यांत आलें. त्यांत म्हणण्यांत आलें, ‘ पत्नी आणि माता या पवित्र नात्यांनीं वावरूं पहाणाऱ्या प्रत्येक स्त्रीला तमाखू ओढणें घातुक असल्याचें बजावा !’

## प्रसाधन नको–ताठर तारुण्य मिळवा !

युरोपियन व कांहीं हिंदी लोकांच्या दृष्टीनें असलेला हा जर्मनीचा सनातनीपणा एवढ्यावरच थांबत नाहीं. त्यांची मजल याच्याहि पुढें किती तरी गेली आहे. आंघोळीसाठीं वगैरे वापरण्यांत येणारे तोकडे कपडे घालून समाजामध्यें वावरण्याची जर्मन स्त्रियांना बंदी आहे. १९३३ च्या आपल्या एका फर्मानांत डॉ. कुमाशर म्हणतो,

'Who shave their eye-brows, use rouge, dye their hair–and seek to attract attention in public by smoking, powdering etc, belong to an older generation whose age is past '

आधुनिक स्त्रियांच्या नेपथ्यरचनेच्या सर्व प्रकारांना हा गृहस्थ जुन्यांत ढकलतो. असल्या चोचल्यांचा काळ आतां जर्मनींत राहिला नाहीं, ही ग्वाही वाचून आजच्या नेपथ्यरचनेच्या पुरस्कारासाठीं, पानें खर्चीं पाडणाऱ्या हिंदी साहित्यसेवकांनीं खरी सुधारणा कोणची याबद्दलची जर्मनीची कल्पना जरूर अभ्यासावी. याच फर्मानांत सदर डाक्टर पुढें म्हणतो,

'The evidence that the younger generation rejects such things embarasses these same would be women. To be young means to be natural and to understand the warning and the demands of great times.'

जर्मनीची तरुण जनता खोटें तारुण्य प्राप्त करून देणाऱ्या व सौंदर्य कृत्रिमतेनें वाढविणाऱ्या या साधनांपासून सर्वस्वीं अलिप्त आहे. उसनें तारुण्य व सौंदर्य प्राप्त करूं इच्छिणाऱ्या–वाघ होऊं पाहाणाऱ्या कोल्ह्यांनीं खुशाल याचा आश्रय करावा. खरें तारुण्य नैसर्गिक तेजस्वितेमध्यें आहे; काळाच्या हांकेला निधड्या छातीनें प्रत्युत्तर देण्यांतच खरें तारुण्य व सौंदर्य आहे. ' Youth is beautiful when it has got heart that dreads not death. ' ही आजच्या जर्मन तरुण–तरुणींची विचारसरणी आहे.

नाझी–पूर्व कालांत झालेला जर्मन स्त्रीचा अधःपात पुन्हां होऊं देऊं नये म्हणून डॉ. गोबेल्स एके ठिकाणीं म्हणतो, ' लैंगिक स्वातंत्र्याच्या गोड नांवाखालीं ज्यूसारख्या परकीयांनीं आमच्या स्त्रिया चोरल्या आहेत; आजच्या तरुणांनीं या राक्षसांविरुद्ध चाल करून जर्मन स्त्रीचें पावित्र्य तिला परत प्राप्त करून दिलें पाहिजे. '

प्रेमळ पत्नी व माता या दृष्टीनें जर्मनी आपल्या स्त्रियांकडे पहातो. नैसर्गिक राहणीकडे त्यांचा ओढा असावा हीहि जर्मनीची इच्छा आहे. यामुळें त्यांच्या आयुष्यक्रमाला कृत्रिमतेची लागलेली कीड नष्ट होणार आहे. एक सरकारी पत्रक म्हणतें–'आमची खात्री आहे कीं, आमच्या स्त्रिया सिगारेट अगर ओठा-तोंडाला लावण्याचे रंग यापासून सर्वस्वीं अलिप्त राहतील.' यांच्या आहारीं गेलेल्या स्त्रियांसाठीं थोडी फार सवलत देण्याच्या बुद्धीनें सदर पत्रक पुढें विनोदानें म्हणतें, 'एखाद्या सुमातेनें व सुगृहिणीनें एखाद्या रविवारीं दुपारीं हळूच आपल्या पतीच्या सिगारेटच्या डबीमध्यें हात घातल्यास आम्ही त्याला इतक्यांत फारसा दोष देणार नाहीं.'

## विवाह हा सामाजिक यज्ञच

विवाहासंबंधींचा प्राचीन हिंदु परंपरेचा आदर्श व आजच्या जर्मनीचा आदर्श यांच्यामध्यें विलक्षण साम्य आहे. विवाह हें निव्वळ लैंगिक भूक शमविण्याचें साधन, हा अलिकडील अतर्क्य शोध जर्मनीला मान्य नाहीं. विवाह हा वैयक्तिक प्रश्न नसून समाजाशीं त्याचा निकट संबंध आहे, ही गोष्ट यापूर्वींच आम्हीं प्रस्थापित केली आहे. [ 'आदर्श स्त्रीजीवन' पहा. ] विवाह हा भावी पिढ्यांच्या भवितव्याचा पाया असल्यानें त्याबाबत झालेली कोणतीहि चूक समाजशास्त्रानें दंडनीय आहे, हा दृष्टिकोन आजच्या जर्मनीनें स्वीकारला आहे. विवाहासंबंधीं एक जर्मन समाजशास्त्रज्ञ म्हणतो, 'विवाह म्हणजे उन्नत मानव-वंशाचें अधिष्ठान पृथ्वीवर कायम राखण्यासाठीं करण्यांत आलेला करार आहे, व विवाहाचें खरें कार्य आणि उद्देश याखेरीज भिन्न कल्पणें चूक आहे.' जर्मनीनें डोळ्यांपुढें ठेविलेला हा वैवाहिक आदर्श लक्षांत घेतां, जर्मन स्त्रीच्या शिक्षणा-संबंधीं त्या राष्ट्राचें धोरण काय असावें याची तात्काळ कल्पना येते. शारीरिक, मानसिक व बौद्धिक या क्रमानें स्त्रियांना खरें शिक्षण मिळावें अशी जर्मन सरकारची योजना आहे. 'भावी सुमाता तयार करणें हें स्त्रीशिक्षणाचें ध्येय असावें' असा स्पष्ट दंडक तेथें आहे. स्त्रियांच्या दास्यमुक्तीच्या वल्गना करणाऱ्या लोकांना उद्देशून हिटलर एके ठिकाणीं आपल्या भाषणांत म्हणतो, 'स्त्रियांचें दास्य आणि त्यांचें विमोचन असले सडके शोध लावित बसणारा मेंदू ज्यूचाच असला पाहिजे. असल्या मेंदूतून बाहेर पडणाऱ्या विचारांना

मान्यता देण्याइतका आतां जर्मनी अज्ञानी नाहीं.' याच भाषणांत तो पुढें म्हणतो, 'स्त्रियांचें जग म्हणजे त्यांचा पति, त्यांचीं मुलें, त्यांचें घर-कुटुंब. या छोट्या जगाची काळजी त्यांनीं केली नाहीं तर मग मोठ्या जगाला कोण विचारणार? त्याची काय अवस्था होणार? त्याचें अस्तित्व तरी राहील कीं नाहीं याचीच मला शंका वाटते?......आपलें हें छोटें जग सोडून मोठ्या जगांत पदार्पण करणाऱ्या स्त्रिया आपल्याबरोबरच त्याचाहि नाश करतील. हीं दोन जगें आणि त्यांत कार्य करणाऱ्या व्यक्ती नेहमीं भिन्नच राहिल्या पाहिजेत, त्यांच्या व्यवहारांची सरमिसळ करून भागणार नाहीं.' या छोट्या जगांत महत्त्वाचा कार्यभाग करणाऱ्या स्त्रियांचेबद्दल हिटलर मोठ्या आदरानें म्हणतो, 'स्त्रियांनीं यशस्वीपणानें अपत्याला दिलेला जन्म म्हणजे आपल्या वंशाचें अस्तित्व पृथ्वीचे पाठीवर कायम राखण्यासाठीं जिंकलेली लढाईच होय! अपत्य जन्माला आणणें आणि त्याची योग्य मार्गानें जोपासना करणें, वाढ करणें, हें स्त्रियांचें प्रथम कर्तव्य आहे. स्त्री-वकिलापेक्षां अगर डॉक्टरपेक्षां ५-७ अपत्यें असलेल्या मातेला मी अधिक मान देतों.' हिटलरच्या या उक्तींत कदाचित् राजकीय हेतु सुप्त असतील, नाहीं असें नाहीं; पण त्याचबरोबर यांत तात्त्विक सत्य भरलेलें आहे हेंही विसरून भागणार नाहीं. मात्र हें सत्य काय आहे याचा खुलासा आमच्या मागील लेखमालेंत झाला असल्यानें त्याची चर्चा फिरून या ठिकाणीं करीत बसण्यांत फारसें स्वारस्य नाहीं. अशा स्थितींत एका दगडानें दोन पक्षी मारल्याचें श्रेय हिटलरला देणें भाग आहे. आपल्या विचारचरणीला जर्मन स्त्रियांनीं योग्य तो पाठिंबा दिला, याबद्दल कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतांना तो म्हणतो, 'आमच्या चळवळीबद्दल जगानें जरी आमची निंदा केली तरी जर्मन स्त्रियांनीं तिला पाठिंबा दिला हें त्यांच्या समयसूचकतेचें व बुद्धिमत्तेचें द्योतक आहे; त्यांच्या या प्रेमळ पाठिंब्याशिवाय आम्ही कधींहि विजयी झालों नसतों.

'राष्ट्राच्या जीवनांत स्त्रियांवर फार मोठी जबाबदारीची कामगिरी असते. गृहाची स्वामिनी या नात्यानें, माणसाच्या जन्मापासून तहत त्याच्या मृत्यूपर्यंत एका दृष्टीनें तो तिच्या राज्यामध्येंच वावरत असतो. आपल्या राज्यांत वावरणाऱ्या प्राण्याला संस्कृतिपोषणाच्या व रक्षणाच्या दृष्टीनें सदैव सज्ज ठेवण्याची जबाबदारी तिच्यावर आहे. स्त्री ही पुरुषांची पाठीराखी देवता आहे.'

## स्त्रीपुरुषांचीं विशिष्ट क्षेत्रें

स्त्रियांच्या बौद्धिक शिक्षणावर, उद्योगधंद्यांतील पदार्पणावर, आर्थिक स्वातंत्र्यावर जर्मनीचा कटाक्ष आहे. स्त्रियांच्या मूलभूत शरीरधर्माला व नैसर्गिक प्रवृत्तींना बाध न येईल असा कोणताहि व्यवसाय व असें कोणतेंहि शिक्षण स्त्रियांना देण्यास जर्मनीची हरकत नाहीं. पुरुष व स्त्री यांचें आयुष्यक्रमांतील संबंध एकसूत्री राहून परस्परांना विघातक कार्य त्यांचे हातून घडूं नये यासाठीं जर्मनीची सारी धडपड आहे. पुरुषांनीं राष्ट्राला सांवरावें व स्त्रियांनीं कुटुंबाला सांवरावें, स्त्रीपुरुषांच्या हक्कांची कल्पना या कार्यभिन्नत्वाला आड येणारी असतां कामा नये. निसर्गाचीं दोन भिन्न आंगें म्हणजे स्त्री आणि पुरुष होत. पुरुषांची गृहराज्यांतील स्वामिनी या दृष्टीनें तिला समानच काय पण थोडे फार अधिकच हक्क आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुलामाणसांच्या कुटुंबाचें नेतृत्व, संगोपन हें जर्मन स्त्रीचें खरें कार्य आहे. याखेरीज चालणारे स्त्रियांचे सर्व चाळे स्त्रीसमाजाच्या सुधारणेचें प्रतीक म्हणून मानण्यास जर्मनी कधींच तयार नाहीं. कारखान्यांत वगैरे अद्यापही कित्येक जर्मन स्त्रिया कामें करतांना दृष्टीला पडतात, पण तो अनिर्वाह पक्ष म्हणून. स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या वेडगळ कल्पना त्याच्या बुडाशीं नाहींत. कुटुंबाचा पाया घालणारा व त्यास आर्थिक: संरक्षण देणारा म्हणून सर्व जबाबदारी पुरुषावरच टाकण्यांत आली आहे. स्त्रियांना कुटुंबाखेरीज बाह्य क्षेत्रांत कांहीं कारणानें काम करण्याचा प्रसंग आलाच तर त्यांना मिळणारीं कामें शक्य तों कमी दगदगीचीं असावींत इकडे जर्मन सरकार बारकाईनें लक्ष देतें; आणि म्हणूनच पुरुषांना व स्त्रियांना योग्य असे कामाचे दोन प्रकार करण्यांत आले आहेत, [ manly and womanly ]. वैद्यकीय धंदा, दुकानांतील माल देण्याघेण्याचीं कामें अशा विशेष शारीरिक श्रम न पडणाऱ्या व्यवसायांमधून जर्मन स्त्रिया दिसतात, पण थोडक्याच कालांत तेथूनहि त्यांची उचलबांगडी करण्याचा जर्मन सरकारचा विचार आहे.

## युद्धकालीन आपद्धर्म

जर्मनीच्या स्त्रीविषयक सर्वसाधारण विचारसरणीचें दिग्दर्शन एथवर झालें, आतां यापुढें जर्मन स्त्रीच्या आयुष्यक्रमाची यथार्थ कल्पना आपणांस द्यावयाची आहे. पण तत्पूर्वी एका विशेष गोष्टीची नोंद करणें आपणांस अत्यंत

जरूर आहे, आणि ती म्हणजे चालू महायुद्ध ही होय ! महायुद्धानें समाजाच्या नेहमींच्या जीवनक्रमावर फार मोठा आघात होऊन युद्धकालामध्यें त्याचें वास्तव स्वरूप राहूं शकत नाहीं. नाझी जर्मनीनें बसविलेली जर्मन स्त्रीसमाजाची घडी आतां या कालामध्यें तशीच शाबूत असणें शक्य दिसत नाहीं. ही गोष्ट जरी खरी असली तरी, तात्विक दृष्ट्या जर्मनीची स्त्रीविषयक भूमिका ही अशा प्रकारची होती अगर आहे, असें सांगण्यामध्यें कांहींच हरकत दिसत नाहीं. देशांतील लाखों तरुण आज लढण्यामध्यें व्यग्र असल्यानें फिरून कित्येक जर्मन स्त्रिया घरांचे उंबरे ओलांडून बाहेर आल्या असतील, नाहीं असें नाहीं; परंतु त्यांचें बाहेर येणें हें कायम स्वरूपाचें नसून आपद्धर्म म्हणून आहे, एवढी भावना आपण येथें ठेविली पाहिजे. सध्यां जर्मनीमध्यें काय परिस्थिति आहे याचें विवरण करणें अशक्य असल्यानें जर्मन राष्ट्राची स्त्रीविषयक भूमिका काय आहे व त्या दृष्टीनें काय त्यांनीं खटपट केली आहे एवढ्याची चर्चा करून योग्य तो बोध घेणें, एवढीच गोष्ट करणें शक्य आहे आणि तीच आम्ही करणार आहों.

---

## डॉ. गोबेल्सची घोषणा

जर्मन स्त्रियांचें एकमेव पुढारीपण प्राप्त झालेली शोल्टझिंक जर्मन स्त्रियांसंबंधीं म्हणते, ' जर्मन स्त्रियांना आतां ऐषआरामाच्या कल्पना सोडून कष्ट करण्यास तयार झालें पाहिजे, शारीरिक व मानसिक कोणत्याहि आपत्तींना तोंड देण्याची त्यांची तयारी पाहिजे.' सार्वजनिक आयुष्यक्रमांतून स्त्रियांचें उच्चाटन झाल्यानंतर घगुरती कामधंद्यांसंबंधीं त्यांना प्रथमारंभीं कमीपणा व अनादर वाटणें स्वाभाविक होतें. 'चूलमूल' ही द्वयी तिरस्करणीय असल्याची भावना त्यांच्या मनांतहि होती. स्त्रियांच्या या चुकीच्या भावना दूर करून गृह हेंच स्त्रीजीवनाचें खरें सारसर्वस्व आहे हें त्यांना पटवून देण्यासाठीं नाझी पुढाऱ्यांना बरेच परिश्रम करावे लागले. फेब्रुआरी ११, १९३४ रोजीं झालेल्या आपल्या भाषणांत डॉ. गोबेल्स म्हणतो, ' स्त्रियांना आम्ही सार्वजनिक आयुष्यक्रमांतून व उद्योगधंद्यांतून काढलें तें एवढ्याचसाठीं, कीं त्यांच्या नैसर्गिक क्षेत्रांत त्यांना परत जातां यावें, व तेथील सन्माननीय पद त्यांना प्राप्त व्हावें.......स्त्रियांचें मुख्य ध्येय म्हणजे आदर्श पत्नी आणि माता होणें हें होय ! आणि त्यांच्या या ध्येयापासून आम्ही त्यांना च्युत करण्याचा प्रयत्न करूं तर दोषी ठरूं....... स्वभावतः कौटुंबिक सुखाची आकांक्षा बाळगणाऱ्या स्त्रियांना आम्ही संसार थाटून देऊं ! आपल्या कुटुंबांत, मुलाबाळांत वावरण्याचा अमर्याद आनंद त्यांना लुटूं द्या ! ' सौ. गोबेल्स ही जर्मनींत स्त्रियांना बंद करण्यांत आलेल्या उद्योगधंद्यांची कल्पना देतांना म्हणते, ' जगांतील इतर देशांप्रमाणेंच जर्मनींतील स्त्रीला लष्करी पेशा वर्ज्य आहे. त्याचप्रमाणें राजकारण व न्याय–मनसुबा यांतहि त्यांना बंदी आहे. स्वतंत्रपणें व्यवसाय करून पोट भरणें अगर विवाह करणें यांत

स्त्रियांच्या दृष्टीनें दुसरा मार्गच अधिक श्रेयस्कर आहे–[ Undoubtedly the best way for a women. ]

डॉ. वुइल्यम ग्रिफ् एका प्रमुख नाझी वर्तमानपत्रांत लिहितांना म्हणतो, 'पत्नी या नात्यानें पतीला व माता या नात्यानें मुलांना स्त्रियांनीं सर्वस्वीं वाहून घेतलें पाहिजे. नाइलाजानें कांहीं स्त्रियांना जर इतर व्यवसायांत राहावेंच लागलें तर निदान त्यांनीं स्त्रियांना योग्य [ womanly ] अशा व्यवसायांतच रहावें. व्यवसायांत गुंतलेल्या कुमारिकांना शक्य तों लवकर विवाह करणें भाग पाडावें व त्यांच्या नवऱ्यांना कामें द्यावींत.'

पत्नी आणि माता या नात्यानें वावरणाऱ्या अगर वावरूं पहाणाऱ्या स्त्रियांना कारखानदारीच्या हमालखान्यांत न राबविण्याचा जर्मनीचा निश्चय आहे; कारण त्याचे स्त्रीजीवनांवर अत्यंत घातुक परिणाम होतात याची तेथें पूर्ण कल्पना आहे. विशेषतः, विवाहित स्त्रियांना घराच्या उंबऱ्यापलिकडे कामास जाण्याचा प्रसंग येऊं नये असें कित्येक तज्ञांनीं नमूद करून ठेविलें आहे.

[ Married woman should not be called upon for work out-side the home ].

## बेकारीचा समंध

जर्मन सरकारनें पुरुषांनाच फक्त नोकऱ्या देण्याचें धोरण आंखल्यानें आधींपासून व्यवसायांत असलेल्या स्त्रियांना ती एक आपत्तीच वाटली. परंतु विवाहाचें साधन प्रथम उपलब्ध करून देऊन मग त्यांना नोकरींतून मुक्त करण्याचें धोरण आंखण्यांत आल्यानें स्त्रियांना वैवाहिक सौख्य व आर्थिक स्वास्थ्य या दोहोंचाहि लाभ झाला; आणि त्यांना पूर्ण सौख्य प्राप्त झालें. १९३२ सालीं, प्रसिद्ध झालेल्या सौ. सिवरच्या पुस्तकांत नाझी पुढाऱ्यांनीं स्त्रियांचा प्रश्न फारच समाधानकारक तऱ्हेनें सोडविल्याचा उल्लेख आहे. नाझी अमला-पूर्वीच्या लोकांना स्त्रियांच्या गृहविषयक व अपत्यविषयक हक्कांची जाणीव न बाळगल्याबद्दल सडकून दोष देण्यासहि तिनें कमी केलेलें नाहीं. जर्मनीच्या घटलेल्या लोकसंख्येचा तराजू समपातळींत आणण्याच्या दृष्टीनें स्त्रियांचे विवाह तात्काळ होणें अवश्य होतें, पण बेकारीमुळें पुरुष लग्नास तयार होत नसत; यामुळें स्त्रियांची संसार थाटण्याची तयारी होऊनहि अपेक्षेप्रमाणें यश पदरांत

पडण्याचें चिन्ह दिसेना, आणि थोडाफार घोटाळा निर्माण झाला. स्त्रियांनीं जर्मन संस्कृतीचें रक्षण करावें, धडधाकट मुलांना जन्म द्यावा, त्यांना जोपासावें, कुटुंबाचें संवर्धन करून आदर्श गृहसंस्था निर्माण करावी, घरगुती काटकसरीच्या योजना आंखून राष्ट्राच्या आर्थिक योजनांना हातभार लावावा, आपलें स्त्रीत्व आदर्श आहे याचा साऱ्या जगाला धडा घालून द्यावा, इत्यादि स्त्रीविषयक कल्पनांच्या मुळावरच घाव बसण्याची पाळी जर्मनींतील बेकारीमुळें येते कीं काय अशी भीति निर्माण झाली. पण तत्त्वप्रधान ध्येयाच्या पूर्तीसाठीं प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्यांना यश देण्याची जबाबदारी परमेश्वरावर असल्यानें यांतूनहि मार्ग निघाला. अपत्य आणि घर यांच्याशीं स्त्रियांची सांगड घालून टाकण्यासाठीं जर्मनीनें आंखलेल्या कार्यक्रमाची थोडीशी माहिती या ठिकाणीं घेण्यास हरकत नाहीं.

## विवाहमार्गातील अडचणी

स्त्रियांना तात्काळ वैवाहिक जीवन प्राप्त करून दिल्याशिवाय आपल्या प्रचाराला पोकळ बडबडीपेक्षां अधिक प्राधान्य नाहीं, ही गोष्ट नाझी सत्ताधाऱ्यांना पूर्णपणें कळून चुकली असल्यानें त्यांनीं सत्ता हातीं येतांच प्रथम त्या दृष्टीनें कार्याला सुरवात केली. गेल्या महायुद्धानें असंख्य तरुणांचा बळी घेतला असल्यानें युद्धोत्तर कालांत वयातीत लोकांची संख्याच विशेष दिसूं लागली, व ते बहुतेक सर्व विवाहित होते. १९३२ पर्यंत २१ वर्षांपुढील लोकांचें एकंदर लोकसंख्येशीं प्रमाण शेंकडा ६७·७ इतकें असल्याचें आढळून आलें. कित्येक उपवर स्त्रियांना युद्धोत्तर कालांत इच्छा असूनहि पति मिळण्याचें चिन्ह दिसेना. तहानंतर जे काय थोडे फार लोक शिल्लक राहिले त्यांच्यावर श्रीमान् स्त्रियांनीं हल्ला चढवून प्रथम त्यांना हस्तगत केलें. रिबेनट्रापचा विवाह हें याचें एक उत्तम उदाहरण आहे. १९२० सालीं दर हजारीं विवाहांचें प्रमाण १४.५ इतकें होतें, पण हेंच प्रमाण पुढील कालांत एकदम घसरून १९२४ सालीं ७·१ वर आलें. १९३३ च्या खानेसुमारीप्रमाणें असें दिसून आलें कीं, २४ ते २५ च्या दरम्यान वयें असलेल्या स्त्रियांपैकीं शेंकडा ५७·४ अविवाहित आहेत, ३० ते ३१ च्या दरम्यान वयें असलेल्यांत शेंकडा २७·४ एकलकोंडें आयुष्य कंठित आहेत आणि ४० ते ४१ च्या दरम्यान वयें असलेल्यांत शेंकडा १५·८ इतक्या

जन्माच्याच कुमारिका म्हणून वावरण्याच्या परिस्थितींत आहेत. सर्वसाधारणपणें मध्यम वयाच्या पुढील कुमारिकांचे विवाह होणें अशक्यप्रायच होऊन बसतें, हा अनुभव सर्व देशांना आहे; आणि यामुळें १९३३ च्या सुमारास जर्मनींत १८,३४,२९७ इतक्या प्रौढ कुमारिकांची खडी पलटण तयार होऊन बसली होती. त्यांना अनुरूप पतींची अपेक्षा असूनहि ती पुरी होणें शक्य नव्हतें ! त्यांच्या पतित्वाची जबाबदारी स्वीकारण्यास समर्थ होऊं शकले असते असे कित्येक जर्मन उमदे पुरुष युरोपच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत शाश्वत निद्रा घेत पडले होते. महायुद्धानें त्यांचा निकाल लावून टाकला असल्यानें, तत्वतः कुमारिका पण एका दृष्टीनें विधवा अशा या स्त्रियांचा मोठा बिकट प्रश्न जर्मनीपुढें उभा होता. युद्धोत्तर कालांत, पति आणि अपत्यसौख्य यासाठीं हपापलेल्या या स्त्रियांपैकीं कित्येकींचे वयानें बळी घेतले, उरलेल्यांनीं पुरुषी उद्योगधंद्यांत पदार्पण करून कृत्रिम आयुष्यक्रम कंठण्यास सुरवात केली. पण यांत त्यांना दोष देणें शक्य नव्हतें आणि म्हणूनच नाझी सरकारनें अशा स्त्रियांबद्दल शक्य तों सहानुभूतीचीच दृष्टि ठेविली. बहुपत्नीकत्वाची चाल युरोपमध्यें त्याज्य व रानटी म्हणून बराच काल समजली गेली असल्यानें त्या दृष्टीनें जर्मनीनें हालचाल केली नाहीं. या स्त्रियांकडून पतिसंशोधनार्थ निरनिराळ्या वर्तमानपत्रांत दिलेल्या जाहिराती मोठ्या मजेशीर असत, त्यांतील कांहीं नमुन्यादाखल पुढें दिल्या आहेत—

[ १ ] उच्च सामाजिक दर्जाची, स्थावर जंगम मत्ता असलेली स्त्री, वय वर्षें ४६, विवाहाच्या अपेक्षेनें पत्रव्यवहाराची अपेक्षा करते.

[ २ ] सुशिक्षित, सभ्य गृहस्थाची पत्नी होण्याची अपेक्षा आहे. शेतकरी घराण्यांतील कुमारिका, वय ३९, पूर्णपणें स्वतंत्र.

## सुशिक्षित स्त्रियांचा अहंगड

अशा स्त्रियांच्या म्हणजे प्रौढा कुमारिकांच्या बाबतींत एक विशिष्ट गोष्ट दिसून आली ती म्हणजे, विशेष उच्च शिक्षण घेतलेल्या कुमारिकांच्या विवाहाबाबत अधिकच अडचणी येत, कारण त्यांना प्राप्त झालेल्या अहंगंडानें घरगुती स्वास्थ्य नाहींसें होण्याची भीति पुरुषांचे मनांत निर्माण होई ! मध्यंतरींच्या मंदीच्या कालांत या स्त्रियांच्या लग्नांत अडचणी तर आल्याच, पण नवीन

पिढींतील वयांत आलेल्या कुमारिकांचींहि लग्नें होण्याची पंचाईत पडूं लागली. वयांत येणाऱ्या मुलामुलींच्या पुढें चरितार्थाचा प्रश्न उभा असल्यानें योग्य कालांत विवाह घडून यावेत अशी मनीषा असूनहि तिच्या मार्गांत अडथळे येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. कुटुंबसौख्य आणि आर्थिक संरक्षण या दोन्ही गोष्टी जर्मनीला प्राप्त करून देण्याच्या दृष्टीनें, १९३३ सालीं सत्ता हातीं येतांच, नाझी पक्षानें उलाढाली सुरू केल्या व बऱ्याच अंशानें त्या यशस्वीहि पण झाल्या.

## विवाहासाठीं सरकारी मदत

एक जून १९३३ रोजीं विवाहासाठीं कर्ज देण्याची एक योजना जर्मन सरकारनें जाहीर केली. आरोग्यसंपन्न अशा तरुण जोडप्यांना १००० मार्क्सचें कर्ज देण्याचें ठरविण्यांत आलें. हें कर्ज घेत असतांना, पति दरमहा १२५ मार्क्स मिळवीत असेल तर पत्नीकडून कोणतीहि नोकरी न पत्करण्याचें अभिवचन घेण्यांत येई. या कर्जावर व्याज तर आकारीत नसतच, पण कर्जफेड उत्पन्नाच्या शेंकडा १ प्रमाणांत दरमहा घेण्यांत येई. प्रत्येक अपत्यागणिक शेंकडा २५ टक्के कर्जांत सूट मिळे व शिवाय एक वर्षपर्यंत कर्जफेडीचा हप्ता न देण्याची सवलतहि देण्यांत येई. विवाहितासाठीं व विवाहेच्छूसाठीं कर्ज देण्यास लागणारा पैसा अविवाहित राहून अगर राहणें भाग पडून दरमहा ७५ अगर अधिक मार्क्स मिळविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर कर बसवून उभारण्यांत येई. हा कर शेंकडा २ ते ५ असा पगाराच्या अगर मिळकतीच्या कमीजास्त प्रमाणांत बसविला जाई. या करामुळें सुमारें १३५० लाख मार्क्स उत्पन्न येई.

या योजनेमुळें बेकारी नष्ट होऊन विवाहांची संख्या भराभर वाढूं लागली. अवघ्या ४ वर्षांत म्हणजे १९३७च्या सुमारास ८ लक्ष कुमारिकांनीं उद्योगधंद्यांतील आपलें पाऊल मागें घेऊन प्रपंच थाटले. कर्ज म्हणून देण्यांत येणारी रक्कम रोख पैशांच्या रूपानें देण्यांत न येतां प्रापंचिक वस्तूंच्या रूपानें देण्यांत येत असे. ठराविक दुकानांत नवपरिणत वधूवरांना आपणांस आवश्यक असें सामानसुमान घेण्याचा परवाना देण्यांत येई आणि यामुळें या वस्तु तयार करण्याच्या धंद्याला नवीन अवसर मिळून त्यांतहि सुमारें दोन लाख बेकारांची सोय झाली.

या कायद्यामध्यें मार्च २८, १९३४ रोजीं थोडीशी सुधारणा करण्यांत आली. आपल्या पतीला १२५ मार्क्सपेक्षां कमी पगार आहे असें निमित्त करून

पूर्वीच्या बेजबाबदार आयुष्यक्रमाला लालचावलेल्या कांहीं स्त्रिया विवाहानंतरहि फिरून उद्योगधंद्यांत पदार्पण करूं लागल्या. अशा स्त्रियांना पायबंद घालण्यासाठीं या सुधारणा-कलमान्वयें पुढील योजना केली—पतीनें आपण गरीब आहोंत सबब आपणांस धर्मादाय फंडांतून कांहीं रक्कम मिळावी अशी मागणी केल्याखेरीज स्त्रीला नोकरी करण्याची सवलत देण्यांत येऊं नये. कायद्यामध्यें अशी दुरुस्ती होतांच स्वाभाविकच, काय वाटेल तें करून काटकसरीनें प्रपंच भागवूं पण अशी याचना करून बायकोला नोकरीवर पाठविणें नको अशी विचारसरणी निर्माण होऊन उधळपट्टीला व त्याचबरोबर विवाहोत्तर उद्योगधंद्यांत शिरूं पहाणऱ्या स्त्रियांना शह बसला. १९३५ च्या जानेवारी महिन्यांत असें ठरविण्यांत आलें कीं, कर्जासाठीं करावयाचा अर्ज विवाहापूर्वी करण्यांत यावा. अविवाहितांच्या प्राप्तीवर अधिक कर बसविण्याचा कायदाहि याच सुमारास पास करण्यांत आला. या कायद्यांच्या एकंदर परिणामासंबंधीं एक गृहस्थ म्हणतात—

'This may have soothed the feelings of youngmen and women, who were perfectly willing to marry if somebody asked them, and resented being taxed for not doing what they very much wanted to do.'

### विवाहितांच्या संख्येंत वाढ

कुटुंबाच्या चरितार्थापुरता पैसा मिळविण्यास समर्थ असलेल्या लोकांच्या स्त्रियांची नोकरीमधून भराभर हकालपट्टी करण्यांत आली, व त्या ठिकाणीं तरुण जर्मन पुरुषांची भरती झाली. नोकरीवर दाखल होतांच त्यांच्यावर विवाहाची सक्ती [खुषीची] होई. २५ वर्षेपर्यंतच्या वयाच्या कित्येक कुमारिकांना, विवाहाशिवाय राहिल्यास कामावरून दूर करण्यांत येईल अशा सूचना परस्पर त्यांच्या मालकांकडून देवविण्यांत आल्या. अविवाहित राहून वर आणखी बेकारी पत्करण्यापेक्षां या कुमारिका एखादा तरुण आपल्या जागीं नोकरीस चिकटवून आपण त्याच्याशीं विवाहबद्ध होत. अशा तऱ्हेनें नाझी सत्ता स्थिर झाल्यापासून थोड्याच कालांत लग्नांची संख्या झपाट्यानें वाढून युद्धोत्तर कालांत उतू आलेल्या अनैतिक संबंधांना व गंगाजमनी प्रजेला चांगलाच पायबंद बसला. १९३३ सालीं ६,३८,५७३ विवाह झाले; ३४ सालीं हा आंकडा ७,४०,१६५ वर गेला.

२० ते ५० वर्षें वयाच्या दरम्यान असलेल्या लोकसंख्येंतील अविवाहितांचें प्रमाण १९३६ सालीं फक्त १५·५ इतकें होतें. १९१० सालीं जर्मनींत २३ वर्षांच्या आंत विवाह करणारांची संख्या १७,००० होती. मध्यंतरींच्या २५ वर्षांच्या कालांत हा सर्व तोल सुटून वैवाहिक जीवनाचा विचका झाला होता. पण इतर युरोपियन राष्ट्रांना तो विचका न वाटतां ती सुधारणा वाटली व तीं याबाबत उदासीन राहिलीं, तर कित्येकांनीं उलट त्याचा उदोउदो केला. जर्मनीला ही गोष्ट मान्य नसल्यानें त्यानें हें गाडें पूर्वपदाला नेण्याची अतोनात खटपट केली व त्यांत १९३४ सालीं विजय मिळविला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण या सालीं वर निर्दिष्ट केलेल्या वयाच्या तरुणांच्या विवाहांची संख्या २५,००० वर आली.

## वांझोट्यांपेक्षां कुमारी माता पत्करल्या !

मध्यंतरींच्या कालांत पुरुषांची संख्याच कमी असल्यानें अविवाहित मातांचा एक नवीन प्रश्न जर्मनींत निर्माण झाला होता; पण स्त्रियांना अपत्य हेंच जीविताचें सारसर्वस्व आहे याची जाणीव जर्मनींत असल्यानें अशा मातांबद्दल तेथें थोडी फार सहानुभूतीचीच दृष्टि ठेवण्यांत आली होती. एका वैद्यकीय पत्रकांत अशा मातांसंबंधीं लिहितांना म्हणण्यांत आलें आहे, 'विवाहित पण अपत्यहीन स्त्रीपेक्षां राष्ट्राला अशा माता अधिक मौल्यवान आहेत.'

[ An unmarried mother who rears a healthy and worthy child is immeasurably more valuable to the nation than a childless married woman. ]

जननशास्त्रावरील एक पंडित यासंबंधीं म्हणतो, 'कांहीं कारणानें विवाहाची शक्यता न झाल्यास अपत्यहीन मरण पत्करण्यापेक्षां स्त्रियांनीं अन्य मार्गानें व योग्य सल्ल्यानें जरूर सुदृढ प्रजेला जन्म देण्याचें भाग्य पत्करावें.' स्त्रियांची अपत्यविषयक गरज किती महत्त्वाची आहे याची स्पष्ट जाणीव जर्मनीला असल्याचेंच हें प्रत्यंतर आहे.

## वेश्याव्यवसायावर करडी नजर

विवाह लांबणीवर पडल्यानें वेश्यावृत्तीची वाढ होते, या सामान्य नियमानुसार जर्मनींतहि नाझी अमलापूर्वी ती झाली होती. वैवाहिक व कौटुंबिक सौख्यांत

व्यत्यय आणणाऱ्या या वृत्तीचा उदयहि पण वरील सौख्यांच्या अभावींच होत असतो ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. वेश्यावृत्तीचा नायनाट करण्याची धडपड प्रत्येक राष्ट्रांतच सुरू आहे, पण म्हणावें तसें यश अद्याप कोणत्याच राष्ट्राच्या पदरांत पडलें नाहीं.

१९ व्या शतकांत वेश्यांची नोंद होऊन त्यांना परवाने देण्याची पद्धति फ्रान्सप्रमाणें जर्मनीनेंहि चालू केली. पोलिसांची करडी नजरहि त्यांच्यावर रहात असे व पोलिसांच्या कायद्यांचें उल्लंघन करणाऱ्यांना कडक शासन करण्यांत येत असे. नवीन स्वरूपाचा विशेष असा कायदा याबाबत जर्मनीनें १९२७ सालीं केला. आपल्या गुप्त रोगांची जाणीव असूनाहि लैंगिक व्यवहार करणाऱ्या स्त्रीपुरुषांना शासन करण्याचें ठरविण्यांत आलें. त्याचप्रमाणें १९३३ सालीं नाझी सरकारचे हातीं सत्ता येतांच सार्वजनिक इमारतींच्या आसपास कोठेंहि वेश्याव्यवसाय करण्याची बंदी केली. अठरा वर्षांच्या आंतील मुलांचा विशेष वापर ज्या ठिकाणीं आहे अशा ठिकाणांच्या आसपासहि वेश्यांना बंदी करण्यांत आली. पावित्र्यविघातक अशी कोणतीच हालचाल, लोकांच्या नजरेंत भरेल अशा तऱ्हेनें न करण्याबद्दल सर्वांना फर्मावण्यांत आलें. प्रशियन मंत्र्यांनीं याच्याही पुढें जाऊन सर्व वेश्यागृहें सक्तीनें बंद केलीं. लहान लहान शहरांतून व खेड्यांतून विखुरलेल्या अनेक वेश्यांना पकडून एकाच मोहल्ल्यांत ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आली. तज्ञ डॉक्टरांचे देखरेखीखालीं आरोग्यसंपन्न म्हणून ठरल्या गेलेल्या स्त्रियांनाच फक्त व्यवसायाबाबत कांहीं सवलती देण्यांत आल्या. संसर्गजन्य रोगानें पीडिलेल्या लोकांची खानेसुमारी करण्यांत आली. योग्य कालांत विवाह होण्याची योजना अम्मलांत आली असल्यानें वेश्यावृत्ति हळूहळू नष्ट होऊन सांसर्गिक रोग्यांची संख्याहि पण झपाट्यानें घटून येऊं लागल्याचें दिसून आलें आहे.

## तरुण तरुणींच्या संघटणा–विवाहाची तयारी

नाझी तरुण तरुणींचे विवाह योग्य कालांत घडून यावेत व वधूवरांना परस्परांची निवड करण्यांस योग्य संधि मिळावी म्हणून जर्मन सरकारनें आंखलेली योजना विशेष लक्षांत घेण्याजोगी आहे. अविवाहित नाझी तरुणांची 'हिटलर संघटणा' आहे तशी तरुणींचीहि आहे. ( Fugend and Deutschemadel )

काळ्या लांड्या विजारी व खाकी शर्टस् घालून हे तरुण राष्ट्रगीतें गात सडकेनें कवायत करीत ठेक्यानें चालतात, तर इकडे गुलाबी गालाच्या व ब्लाऊजवर आपल्या पक्षाची निदर्शक फीत लावलेल्या तरुणी रांगारांगांनीं जात असतात. या दोन संघटणांत सामील असलेल्या तरुणतरुणींची योग्य निवड करून त्यांची जन्माची गांठ कशी मारावयाची एवढाच प्रश्न असतो.

## जोडीदार कसा निवडावा ?

या तरुणतरुणींना एखाद्या राष्ट्रीय उत्सवप्रसंगीं एकत्रित येण्याचा प्रसंग येतो. सायंकाळीं त्यांना राष्ट्रगीत म्हणण्यास सांगण्यांत येऊन खाना वगैरे देण्यांत येतो. त्यांनीं एकमेकांत मोकळेपणानें वावरावें अशी संधिहि पण त्यांना मुद्दाम देण्यांत येते. आपणांतील प्रत्येकास विवाह करून जर्मन नागरिक बनावयाचें आहे याची जाणीव प्रथम प्रचारामुळें त्यांना झालेली असल्यानें स्वाभाविकच एकमेकांकडे त्या दृष्टीनें पाहण्याची त्यांना संवय जडते. अशा प्रसंगीं एकत्रित आलेल्या कुमारकुमारिकांना आपली निवड शक्य तों शहाणपणानें व भावी सुखाच्या दृष्टीनें करण्याबद्दल अधिकृत सल्ला मिळतो, एवढेंच काय पण या कार्यांत त्यांना मदत म्हणून मार्गदर्शक पत्रकें वांटण्यांत येतात. या पत्रकांवर गुबगुबीत गालाच्या हंसऱ्या मुलाचा एक फोटो छापण्यांत आलेला असतो. पत्रकांत पुढील प्रमाणें सूचना छापलेल्या असतात—

(१) तुम्ही जर्मन आहांत हें पूर्णपणें लक्षांत ठेवा.

(२) आरोग्यसंपन्न असलेल्या तुमच्यासारख्यांनीं अविवाहित राहणें बरें नाहीं.

[३] आपलें शरीर शुद्ध ठेवा.

[४] आपलें मन व आत्मा कलंकित होऊं देऊं नका.

[५] आपला जोडीदार जर्मन अगर आर्यवंशीच राहील याबद्दल खबरदारी घ्या.

[६] जोडीदार निवडतांना त्याच्या अनुवंशिक परंपरेचा विचार करा.

[७] आरोग्य हें बाह्य सौंदर्याचें प्रमुख अंग आहे हें विसरूं नका.

[८] प्रेमानें विवाहबद्ध व्हा.

[ ९ ] विवाहानें मिळणाऱ्या जोडीदाराखेरीज इतर संवगड्याची अपेक्षा करूं नका.

[ १० ] शक्य तितक्या अधिक अपत्यांची अपेक्षा करा.

विवाहाच्या उद्देशानें एकत्रित आणलेल्या या तरुणतरुणींना मार्गदर्शक म्हणून सूचना देण्यांत आल्यानंतर त्यांच्याकडून झालेल्या निवडीनुरूप त्यांचे विवाह लावून टाकण्याची दक्षता जर्मन सरकार घेतें; त्यांत फारशी ढवळाढवळ अगर चिकित्सा करण्यांत येत नाहीं.

## जर्मन स्त्रियांचीं त्रिविध तत्त्वप्रणाली

तीन ठळक तत्त्वें प्रामुख्यानें जर्मन स्त्रियांचे पुढें ठेवण्यांत आलेलीं असतात. आपल्या राष्ट्रासाठीं धिप्पाड, तेजस्वी, जर्मन आचार-विचारांचे आणि परंपरेचे सुपुत्र निर्माण करणें हें प्रथम तत्त्व होय; दुसरें म्हणजे, आपलें श्रेष्ठत्व व पावित्र्य कलंकित होऊं न देणें, आणि तिसरें स्वतःचा भविष्यकाळ उज्ज्वल व्हावा यासाठीं कोणत्याहि कार्याला माघार न घेणें. ही त्रयी डोळ्यांपुढें ठेवून आजची जर्मन स्त्री मार्ग आक्रमित आहे व तिला नाझी सरकारचा पूर्ण पाठिंबा आहे. वंशशुद्धीच्या कल्पनेमुळें जर्मनींतील ज्यू लोकांवर मोठीच आपत्ति ओढवली आहे यांत शंका नाहीं. अनार्य वर्गांत त्यांची गणना करण्यांत आली असल्यानें जर्मनींतून त्यांची हकालपट्टी होऊन त्यांना निराश्रित होण्याचा प्रसंग आला आहे. मानव्याचे कांहीं आधारस्तंभ [ ? ] जर्मनीच्या या कृत्याबद्दल त्याला दोष देत आहेत, पण वंशशुद्धीसाठीं चाललेली जर्मनीची ही धडपड एका विशिष्ट शास्त्रीय कसोटीवर घांसून पाहिल्यास त्यांत प्राणिशास्त्रदृष्ट्या बरेंच सत्य सांपडल्यावांचून राहणार नाहीं. जर्मन रक्ताची भेसळ होऊं न देण्याबद्दल जर्मनीनें किती काळजी घेतली आहे याचें स्पष्टीकरण पुढील हकीकत वाचल्यानें होणार आहे.

एकोणीस वर्षें वयाच्या एका ज्यू मुलाला आक्टोबर ता. ९, १९३६ रोजीं अनुवंशिक पावित्र्याला धक्का लावण्याचा प्रयत्न केल्याबद्दल फौजदारी कोर्टांत खेंचण्यांत आलें. मे महिन्यामध्यें घरगुती कामें करणाऱ्या एका जर्मन मुलीशीं त्याचा परिचय झाला. हा परिचय वाढत जाऊन जुलैपर्यंत त्यांचें प्रेमांत रूपान्तर झालें, व शेवटीं प्रकरण गुप्त पोलिसांच्या नजरेला येऊन त्याला

कोर्टांत आणण्यांत झालें. आपली जबानी देतांना सदर मुलीनें सांगितलें कीं, हा ज्यू आहे याची मला कल्पना नव्हती; कारण त्याच्या परिचय–पत्रिकेवर 'प्रॉटेस्टंट' एवढाच उल्लेख होता. सदर तरुणाला न्यायमूर्तींनीं दीड वर्षांची शिक्षा ठोठावली व सवलत म्हणून मध्यंतरीं चौकशींत गेलेला काळ या शिक्षेच्या मुदतींतून वजा केल्याचें सांगितलें.

## रोगग्रस्त व संकरप्रजेला जननाक्षम केलें !

मध्यंतरीच्या कालांत निर्माण झालेल्या गंगाजमनी प्रजेवर शस्त्रक्रिया करून त्यांची संतति पुढें वाढूं न देण्यापर्यंतहि जर्मन सरकाराची मजल गेली. अर्थात् कोणतीहि चांगली गोष्ट अतिरेकाला गेली तर ती वाईटच दिसते; या दृष्टीनें याबाबत जर्मनीनें फारच ओढून धरलें असें म्हणावें लागतें. वंशपावित्र्य ही चीज मानवांना त्यांच्या प्रगतीच्या व उत्क्रांतीच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे, एवढा बोध या सर्वांतून घेण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. पितृसावर्ण्य ग्राह्य धरून जर्मनीनें ज्यू बापापासून व जर्मन मातेपासून निर्माण झालेलीं सर्व अल्पवयी बालकें ताब्यांत घेऊन त्यांची सरकारी अनाथालयांत रवानगी केली. पुढें दिलेल्या रोगांनीं व्यापलेल्या लोकांनाहि सक्तीनें प्रजोत्पादनास असमर्थ करण्यांत आलें:—[ १ ] अनुवंशिक मानसिक दुर्बलता, [ २ ] जन्मतः अंधत्व अगर बहिरत्व, [ ३ ] अनुवंशिक शारीरिक व्यंग, [ ४ ] अपस्मार, बालग्रह इत्यादिकांनीं जडलेलें दुर्बलत्व, [ ५ ] आत्यंतिक मादक पदार्थ सेवनानें आलेलें दुर्बलत्व. वरील प्रकारांत मोडणाऱ्या लोकांना प्रजोत्पादनास असमर्थ करण्याच्या कायद्याचा प्रमुख उद्देश असा आहे कीं, जननशास्त्राप्रमाणें अशा लोकांच्या संततींत शारीरिक व मानसिक व्यंगें हटकून उतरतात, व मानव वंशाला कीड लागून रोगी लोकांची संख्या फैलावत जाते; व शेवटीं अव्यंग, तेजस्वी मानव वंशाचा लोप होतो. या लोकांना प्रजोत्पादनास असमर्थ करण्यासाठीं खुद्द त्यांच्या-कडून, त्यांच्या पालकांकडून अगर वैद्यकीय सल्लागारांकडून त्या प्रकारचा अर्ज घेण्यांत येतो, व योग्य अधिकाऱ्यांनीं चौकशी अंतीं त्याला मान्यता दिल्यावर मगच त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यांत येते. १९३५ मध्यें अशा शस्त्रक्रियांची संख्या पाऊण लाखावर गेल्याचें आढळतें. हा कायदा होण्यापूर्वीं अशा लोकांच्याकडून निर्माण झालेल्या प्रजेवरहि हा कायदा बंधनकारक होऊन तिच्या-

वरहि शस्त्रक्रिया करण्याचें ठरलें. पण अपत्यजन्मानंतर पित्याला विकार जडला होता असें आढळून आलें तर मात्र सदर मुलाला अगर मुलीला तसेंच राहूं देण्यांत येई.

## पंडितहि अगतिक झाले !

स्त्रियांचा समाजांतील दर्जा आणि जर्मनवंशाची अभिवृद्धि व पावित्र्य याबाबत जर्मनीनें केलेला हा सारा खटाटोप पाहून सुधारणेचा डांगोरा पिटणारीं प्रतिष्ठित राष्ट्रें कांहीं काळ चांगलींच हादरलीं. स्त्रिया आणि घर यांची सांगड जर्मनी–आणि युरोपखंडांत राहून घालतो, याचा अर्थ काय ? अशा हिरीरीनें कित्येक तज्ञ थेट अमेरिकेपासून धांवत आले; व नाझी सरकारनें एकंदर तयार केलेली रचना पाहून विस्मित झाले. जननशास्त्रांतील संपूर्ण संशोधन तेथें तयार असल्यानें, हिंदी लोकांचें पुढें मारण्यांत येणाऱ्या बाता तेथें सपशेल थंडावल्या व 'आहे तें ठीक आहे, बरोबर आहे' म्हणत आपल्या ज्ञानाची पोतडी न उलगडतांच परत जावें लागलें. अणुपरमाणूंपासून जड सृष्टीचा छडा लावून बसलेल्या जर्मन शास्त्रज्ञाला मानवदेहाचें शास्त्र शिकविण्याचें धाडस कोण करणार ?

## घटस्फोटाची कथा

योग्य कालांत विवाहसुख व अपत्यें यांचा लाभ झाल्यानें जर्मनींतील घटस्फोटांचे संख्येंत खूपच बदल झाला असल्याचें आढळून आलें आहे. नाझी अम्मलापूर्वीं असलेली घटस्फोटांची संख्या आणि आजची संख्या यांत जमीन-अस्मानाचें अंतर पडलें आहे. आमच्या मागील लेखमालेंत संतति नसणें हें घटस्फोटें मुख्य कारण असल्याचें आम्हीं दर्शविलें आहेच. बरोबर तोच अनुभव जर्मनींतहि आलेला आहे. विवाहानंतर साधारणपणें चार वर्षांत मूल न झाल्यानें घटस्फोट मागितल्याचीं अनेक उदाहरणें तेथें सांपडतात—

'Divorces are particularly common in 4 th or 5 th year of marriage and, in almost all the cases, are obtained by couples without children.'

प्रथम प्रथम घटस्फोटांची संख्या खूप मोठी होती, पण त्याचें कारण निराळें होतें. जर्मन आणि ज्यू स्त्रीपुरुषांमध्यें झालेले सर्व विवाह मोडून टाकण्याचा

सपाटा जर्मन सरकारनें उठविल्यामुळें प्रथम घटस्फोटांची संख्या वाढली. विवाहाचें स्वरूप शक्य तों स्थिर रहावें, घटस्फोट सहजासहजीं घेतां येऊं नये, एवढी व्यवस्था जर्मनीनें केली आहे. घटस्फोटासंबंधीं कांहीं प्रमुख कलमांचा एक कायदा करण्यांत आला आहे व तो डोळ्यापुढें ठेवून घटस्फोटांच्या प्रश्नाचा विचार केला जातो. हीं कलमें पुढीलप्रमाणें आहेत: [ १ ] विवाह हा तत्त्वतः कायम स्वरूपाचा बंधनकारक आहे, पण पुष्कळांच्या सुखाआड तो येत असेल तरच त्याचा विच्छेद केला जाईल, वैयक्तिक मत या कामीं विचारांत घेतलें जाणार नाहीं; [ २ ] जोडीदारानें दुसऱ्याशीं अनैतिक संबंध ठेविल्यास अगर फौजदारी कायद्यानें गुन्हा ठरणारें अनैतिक कृत्य केल्यास घटस्फोट घेतां येऊं शकतो; [ ३ ] वारस संतति निर्माण करण्यास अकारण नाखुषी दाखविल्यास; [ ४ ] ज्या तत्त्वावर विवाह घडून आला, त्या तत्त्वांचा जोडीदारांकडून नाश झाल्यास, [ तो नाश तसा झाला नाहीं हें प्रतिपक्षानें सिद्ध केल्यास घटस्फोट मिळूं शकत नाहीं ]. प्रजोत्पादनाची असमर्थता घटस्फोटास पुरेशी कारणीभूत होऊं शकते, किंवा जोडीदाराच्या विशेष कांहीं व्यंगाचें अगर रोगांचें पुढें ज्ञान झाल्यासहि तो मिळूं शकतो. घटस्फोटासाठीं आवश्यक असणारी भूमिका म्हणून वरील गोष्टींचा विचार केल्यास, नवरा मोठ्यानें बोलला म्हणून घटस्फोट घ्यावयास जाणाऱ्या इतर पाश्चात्य राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांच्या विवाहविषयक कल्पना व जर्मनीच्या कल्पना यांमधील फरक तात्काळ दिसून येणारा आहे.

## कुटुंबाचा मालक–कर्ता पुरुष !

अशा प्रकारें विवाहसंस्थेच्या स्थैर्याला शक्य तो धक्का लागूं न देतां व्यक्तींचे हितसंबंध शाबूत राखण्याची कला यामध्यें जर्मन शास्त्रज्ञांनीं चांगलीच प्रकट केली आहे यांत काडीमात्र शंका नाहीं. पति अगर पिता कुटुंबांतील मुख्य कर्ता पुरुष मानून त्याच्या धोरणानें कुटुंबसंस्था चालविण्याची आपली कल्पना नाझी जर्मनीनें पूर्ण अमलांत आणली आहे. कर्त्या पुरुषाला आपल्या कुटुंबांतील माणसांचें संपूर्ण नियंत्रण करण्याचा कायदेशीर हक्क आहे, एवढेंच नव्हे तर घरच्या स्त्रीला घरचें कार्यक्षेत्र सोडून बाहेर उद्योग-धंद्यांत पदार्पण करण्याची इच्छा झाल्यास तिला बंदी करण्याचा अधिकारहि

त्याला आहे. कित्येक वेळां पत्नी पतीच्यापेक्षां जास्त पैसे मिळवीत असेल व तिला त्याच्यापेक्षां महत्त्वाचा दर्जाहि प्राप्त झाला असेल, पण इतकें असूनहि तिला आपला हा व्यवसाय सोडून देण्यास सांगण्याचाहि अधिकार पतीला आहे. घरच्या सर्व उत्पन्नावर त्याची सत्ता चालतेच, पण त्याच्या मृत्यूनंतर ती आपणांकडे येईल याची हमीहि पत्नीला देतां येऊं शकत नाहीं. जर्मन स्त्रीला कायद्यानें निश्चित असे दोन अधिकार प्राप्त झाले आहेत. एक म्हणजे विवाहोत्तर पतीकडून सर्वस्वीं आर्थिक संरक्षण घेण्याचा, व दुसरा पत्नी आणि माता या दृष्टीनें घरची ती पूर्ण मुखत्यार असल्यानें प्रापंचिक गरजा इच्छेनुरूप पुरवून घेण्याचा. वारसा हक्का-संबंधींचा कायदाहि इकडीलप्रमाणेंच आहे. घरांतील कर्ता पुरुष मृत्युपत्र न करतां वारला तर त्याची संपत्ती त्याच्या विधवेकडे न जातां योग्य पुरुष वारसा-कडे येते. प्रत्यक्ष मुलीपेक्षांहि दूरच्या पुरुष—वारसाला अधिक प्राधान्य देण्यांत येतें.

## स्त्रियांचें अर्थोत्पादन

स्त्री स्वतंत्रपणें पैसा मिळवीत असली तरी घरीं आल्यानंतर त्याचें निराळें अस्तित्व समजण्यांत येत नाहीं, यामुळें जर्मन स्त्रिया घरीं कष्ट करण्याबाबत जितकी तत्परता दाखवितात तितकी बाहेर कष्ट करण्याची दाखवीत नाहींत. प्रथम प्रथम जर्मन कामकरी वर्गांमध्यें ⅓ स्त्रिया होत्या, पण पुढें हें प्रमाण कमी कमी होत जाऊन आतां ही संख्या लक्षांतहि न येण्याइतकी लहान झाली असावी असा समज आहे. पाश्चात्य राष्ट्रांत स्त्रिया उद्योगधंद्यांत भराभर पदार्पण करतांना दिसतात ते निव्वळ पैसा मिळविण्याची, पुरुषी बनण्याची, स्वतंत्र राहण्याची आवड असते म्हणूनच नाहीं. जर्मनीनें याची खरी कारणपरंपरा देतांना स्पष्ट केलें कीं, हा यांत्रिक युगाचा परिणाम आहे. यांत्रिक निर्मितीमुळें घरगुती उत्पादन बंद पडलें. आधुनिक आर्थिक जगाचा असा एक न्याय आहे कीं वस्तूंच्या उत्पादनाखेरीज त्यांचा उपभोग घेण्याचा अधिकार नाहीं. घराच्या चार भिंतींत सामावणारीं चरखा टकळीसारखीं स्त्रियांना उपयुक्त अशीं उत्पादनाचीं साधनें यांत्रिक युगानें नष्ट केल्यामुळें स्त्रियांनीं गृहराज्याचा स्वीकार करणें म्हणजे दोन वेळां जेवणें व बाजारांतून आयत्या आणलेल्या कपड्यावर कशीदा काढणें एवढाच अर्थ होऊं लागला. अर्थात् पाश्चात्य पुरुषाला व स्त्रीलाहि ही एक अडचण वाटूं लागली. आर्थिक

दृष्टया उपयुक्त होऊं शकेल असें घरगुती उत्पादन स्त्रीला करणें शक्य झाल्यास प्रपंचास हातभार लागतो, पण यांत्रिक युगानें ती शक्यता नष्ट झाल्यानें बाहेरच्या उद्योगांत जाऊन अर्थनिष्पत्ति करण्याची जरूर त्यांना भासूं लागली. तशांत कारखानदारांना नफेबाजीच्या दृष्टीनें स्त्रियांच्या मजुरीची आवश्यकता अधिक भासूं लागली, व या सर्वांचा मिलाफ होऊन तेथील पुरुषांनींच स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याची घोषणा केली आणि पाश्चात्य स्त्री ह्या मोहानें एकदां घराबाहेर पडली ती पडली. जर्मनीनें स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या बुडाशीं असलेली ही भूमिका लक्षांत घेतल्यानें स्त्रियांना परत घरांत आणतांना त्यांना प्रपंचोपयोगी वस्तु निर्माण करण्याचें शिक्षण देण्याचीहि दक्षता घेतली. स्त्रियांना घरगुती जीवनाची आवड मूलतः किती असते याचा अंदाज घेण्यासाठीं म्हणून सुमारें ४००० कामकरी स्त्रियांना 'तुमचे विवाह होऊन तुमच्या पतींना पुरेसें वेतन मिळाल्यास तुम्हीं घरीं राहण्यास तयार आहांत काय?' असा प्रश्न विचारण्यांत आला, आणि शेंकडा ९५·५ इतक्या स्त्रियांनीं त्याला 'होय' म्हणून उत्तर दिलें.

## कारखानदारांचा स्वार्थ उघड केला !

पाश्चात्य कारखानदारीचा स्त्रीकामगारांवर विशेष डोळा असतो हें आम्हीं एकदां मागें सांगितलेंच आहे. जर्मनीनें आपलाहि तोच अभिप्राय नमूद केला आहे. स्त्रियांच्या अंतःकरणांत पति आणि अपत्यें याबद्दल जो निसर्गसिद्ध जिव्हाळा असतो त्यामुळें त्यांना सुरक्षित राखण्यासाठीं त्या हाडाचीं काडें करून थोडक्या पैशांतहि राबावयास तयार असतात. पुरुष कामगारापेक्षां त्याच्या स्त्रीला कामावर घेण्याची प्रवृत्ति कारखानदारांत विशेष दिसून येते. याबद्दल एक गृहस्थ म्हणतात,

> 'The factory-owners have every incentive to fire a workman and hire the workman's wife at a lower rate of pay. She would work more readily than ever, at a lower rate of pay; because her husband had no job, and her family need the money. So it goes in a vicious circle resulting in a tragic picture of a family life.'

कारखानदार लोकांच्या या मनोवृत्तीवर स्पष्ट प्रकाश पडतांच तरुण बेकारांनीं कारखान्यांत कामें करणाऱ्या स्त्रियांच्या विरुद्ध जोराची मोहीम केली

व त्या जागांचा आपणांसाठीं कबजा घेऊन स्त्रियांना घरचा रस्ता दाखविला. स्त्रियांनींहि पण या कामीं मुळींच अडथळा आणला नाहीं; कारण मातृत्व व घरगुती आयुष्यक्रम यांची लालसा स्वभावतःच त्यांना असल्यानें त्यांना हा शुभाशिर्वाद वाटला.

## वैयक्तिक स्वार्थाचें एक उदाहरण

वैयक्तिक स्वार्थाचा दृष्टिकोन ठेवून अनेक व्यक्ती वागल्यानें कित्येक वेळां सामाजिक पेंच प्रसंग निर्माण होत असतात व त्यामुळें समाजाचें फार नुकसान होतें. स्त्रियांच्या इतर व्यवसायाबद्दलच्या वरील प्रश्नासंबंधीं असेंच होई. याचें एक उत्तम उदाहरण एका नाझी वर्तमानपत्रानें दिलें आहे—

एका अधिकाऱ्याच्या तीन मुली कांहीं तरी स्वतंत्र व्यवसायांत पडण्याच्या दृष्टीनें तयारी करीत होत्या. याबद्दल त्याच्या एका मित्रानें खुलासा विचारला असतां तो म्हणाला, ‘सध्यां बरेच पुरुष बेकार आहेत, त्यामुळें माझ्या मुलींना त्यांच्या लायकीप्रमाणें नवरे मिळून संसार थाटतां येतीलच याची मला निश्चिति वाटत नाहीं. त्यांना एकटे राहण्याचा प्रसंग आलाच तर ही तयारी आहे. माझे बरेच वशिले आहेत, कोठेंहि देईन जोडून.’ यावर त्याचा मित्र म्हणाला, ‘तुझ्या म्हणण्याप्रमाणेंच जर प्रत्येकानें आपल्या मुलींच्या बाबत हाच विचार केला तर स्त्रियांना अधिकाधिक प्रमाणांत कामावर येण्याची हौस निर्माण होईल व पुरुषांची बेकारी वाढण्यास मदत होईल; आणि फिरून नवरे मिळणें व कुटुंबें उभारलीं जाणें पूर्वीप्रमाणें अशक्यप्राय होऊन बसेल, याचा विचार तूं केला आहेस का?’ यावर सदर गृहस्थ म्हणतो, ‘मीं माझ्यापुरता विचार केला आहे, प्रत्येकाची चौकशी मी कशाला करूं?’ वैयक्तिक दूषित विचारसरणीनें समाजविघातक कार्य कसें बिघडतें याचें हें उत्तम उदाहरण लक्षांत ठेवण्याजोगें आहे. अधिकाधिक जर्मन तरुणांना कामधंदा मिळावा, अधिकाधिक जर्मन स्त्रियांना त्यामुळें पतिसौख्य, कुटुंबसौख्य मिळावें, घरकर्त्या स्त्रिया व माता हें त्यांचें जीवनध्येय त्यांना साध्य व्हावें, त्यांच्या स्त्री जन्माचें सार्थक व्हावें हा जर्मनीचा दृष्टिकोन आहे; आणि या ध्येयपूर्तीसाठीं जर्मन सरकारची अंतःकरणपूर्वक खटपट सुरू आहे.

---

## टीकाकारांना स्त्रियांचें उत्तर

जर्मन स्त्रियांनीं स्वतंत्रपणें अर्थनिष्पत्तीसाठीं उद्योगधंद्यांत राबण्याचें सोडून घरीं राहावें यासाठीं जर्मन सरकारकडून जे प्रयत्न करण्यांत आले त्यांची सर्वसाधारण चर्चा मागील लेखांकांत झालीच आहे. जर्मन सरकारचा हा कार्यक्रम म्हणजे निव्वळ पुरुषांची दंडेली, त्याला स्त्रियांची सहानुभूति नव्हती असें जर्मनद्वेष्ट्या राष्ट्रांतील कित्येक टीकाकारांचें म्हणणें होतें, पण त्यांत फारसें सत्य नाहीं. १९३४ च्या आपल्या भाषणांत मारी डायर्स नांवाची स्त्री म्हणते, 'नोकरींत असलेल्या स्त्रियांना नोकऱ्या सोडून आर्थिक दृष्ट्या कराव्या लागणाऱ्या स्वार्थत्यागाचा बाऊ टीकाकारांनीं करण्यांत मुळींच हंशील नाहीं. कारण आपल्या या कृतीनें केवढें मोठें राष्ट्रीय कार्य होऊन शिवाय त्यांतच आपलें हित होणार आहे याची स्त्रियांना स्पष्ट जाणीव झाल्यानें त्यांचा या कार्यक्रमास पूर्ण पाठिंबाच आहे.' नाझी स्त्रियांच्या संघटनेचें नेतृत्व असलेली एक स्त्री म्हणते, 'जर्मन स्त्रियांना आपली नोकरी सोडणें, वैयक्तिक स्वातंत्र्य सोडणें हा स्त्रियांवर कांहीं मोठा जुलूम नाहीं हें आपण समजावून दिलें पाहिजे. लोक निष्कारण त्यांचा गैरसमज करून देतात. आपणांस पत्नी आणि माता यांसारख्या राष्ट्रोपयोगी जबाबदाऱ्या अंगावर घ्यावयाच्या आहेत.' बर्लिनमधून हिंडतांना स्त्रीप्रचारकांनीं जिकडे तिकडे खालील वाक्यांनीं इमारतींच्या भिंती चितफाड केलेल्या आढळून येतील—

**जर्मन मुलींनो,**
**भांडींकुंडीं, झाडणी यांचा स्वीकार करा,**
**म्हणजे**
**लवकरच तुम्हांला पती मिळूं शकेल!**

*" Grab pot, broom and pan,*
*So all the sooner get a man."*

'आपल्या नैसर्गिक कर्तव्याची जाणीव ठेवा, घरगुती कामापुढें कचेऱ्या कारखान्यांतील कामांचा काय पाड ? घरगुती वातावरणांतच तुम्ही अधिक आरोग्यसंपन्न, ताज्यातवान्या व सुखी राहाल.'

'नोकरीवर असलेल्या जर्मनींतील स्त्रियांनो, तुम्हांला तुमची नौकरी सौख्य जवळ आणून देणार नाहीं. घर हेंच तुमचें खरें कार्यक्षेत्र पुरुषाला बेकार ठेवूं नका ! घरगुती कामाचा स्वीकार करून आपल्या जागा योग्य पुरुषांसाठीं खालीं करा.'

'संसारी स्त्रियांनो ! तुमच्या कुटुंबांना तुमची जरूरी आहे.'

## स्त्री-शक्तीचा व्यय करूं नका !

स्त्रियांच्या जीवनाला एक विशिष्ट दिशा लावण्याचें निश्चित झाल्यानंतर कामावर असलेल्या कुमारिकांचे विवाह करून देऊन त्यांच्या जागा भराभरा पुरुषांना देण्यांत आल्या; त्याचप्रमाणें निव्वळ पुरुषांच्या बरोबरीनें मिळणाऱ्या बौद्धिक व औद्योगिक शिक्षणाचीहि जरूर न राहिल्यानें त्यांतहि बदल करण्यांत आला, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. जर्मनीची लोकसंख्या घटण्यास महायुद्ध जसें कारणीभूत झालें तसें स्त्रियांचे पुरुषी चाळेहि झाले, अशी नाझी सरकारची समजूत झाली व ती बऱ्याच अंशांनीं खरीहि होती. कारण १९०० च्या सुमारास, ज्या वेळीं स्त्रियां औद्योगिक क्षेत्रांत अत्यंत कमी प्रमाणांत होत्या त्या वेळीं दर प्रौढ स्त्रीगणिक अपत्य संख्येचें प्रमाण २·५ होतें, पण आतां तें फक्त ·३ राहिलें होतें. आर्थिक स्वातंत्र्याच्या मागें लागलेल्या स्त्रियांमध्यें विवाह व कुटुंब संस्थेसंबंधीं निर्माण झालेल्या उदासीनतेचा कदाचित् हा दृश्य परिणाम असावा. कांहींहि असो, जर्मन सरकारच्या निदर्शनास ही गोष्ट येतांच, राष्ट्राला आवश्यक व स्त्रीजीवनाला पोषक असें कार्य करावयाचें सोडून भलत्याच मार्गांत आपल्या शक्तीचा व्यय केल्याबद्दल सुशिक्षित स्त्रियांच्यावर निर्बंध घालण्यांत येऊन त्यांना सडकून दोष देण्यांत आला. विश्वविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांच्यावर निर्बंध घालण्यांत येऊन त्यांना तो मार्ग आतां जवळजवळ बंदच करण्यांत आला आहे.

सुशिक्षित स्त्रियांचा एक विशिष्ट धंदा म्हणजे ज्ञानदान! हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें आज शिक्षिकांची गर्दी दिसत आहे त्याप्रमाणें एके काळीं ती जर्मनींतहि होती. स्त्रियांना योग्य [ Womanly ] म्हणून निवडलेल्या व्यवसायामध्येंच वस्तुतः या व्यवसायाची गणना होत होती. पण पुढें नाझी सरकारला स्त्रियांचे हातांत प्रौढ विद्यार्थ्यांचें शिक्षण जाणें धोक्याचें वाटल्यानें तेथूनहि त्यांची उचल बांगडी करण्यांत आली. १९३४ मध्यें मुलांच्या शाळांमधून तर त्यांची हकालपट्टी करण्यांत आलीच, पण त्याच सालीं मुलींच्या शाळासंबंधींहि प्रशियन मंत्रिमंडळानें पुढीलप्रमाणें फर्मान काढलें—' मुलींच्या शाळांमधून असलेल्या शिक्षिका कमी करून त्या जागा पुरुष शिक्षकांना देण्यांत येतील. महायुद्धांत जखमी झाल्यानें शारीरिक श्रमाला नालायक झालेल्या लोकांच्या नेमणुका होतील. मुलींच्या दुय्यम व प्राथमिक शाळांमधून शिक्षिका व शिक्षक यांचें ५:३ असलेलें प्रमाण बदलून तें २:३ असें ठेवण्यांत येईल.' यानंतर थोड्याच दिवसांत हेंही प्रमाण बदलून तें एकास तीन करण्यांत आलें.

## संस्कृति-मंत्र्याचें ठणठणीत उत्तर

नाझी राजवटींत झालेल्या या स्त्रीविषयक हालचालींवर पुष्कळ अनुकूल प्रतिकूल टीका झाल्या. यांतील, विशेषतः प्रतिकूल टीकांना उद्देशून प्रशियन ' संस्कृति ' मंत्र्यांनीं उत्तरवजा जाब दिला—

' शिक्षणाच्या क्षेत्रांतून शिक्षिकांची हकालपट्टी केल्याबद्दल निषेध प्रदर्शित करणारीं बरीचशीं पत्रें मजकडे आलीं आहेत. त्याचप्रमाणें वर्तमानपत्रांतहि कांहीं ठिकाणीं या धोरणावर टीका होत आहे. सरकारचें धोरण वारंवार स्पष्ट होत असूनहि अशी टीका कां व्हावी कळत नाहीं. विशेषतः दुःखाची गोष्ट म्हणजे, कांहीं शिक्षिकाहि यांत सामील व्हाव्यात ही होय. नाना सबबी पुढें काढून त्या आपल्या जागा टिकवूं पहात आहेत. पण त्यांना त्यांचा खरा स्वार्थ कळेनासा झाला आहे. वैयक्तिक स्वार्थाच्या मूर्ख कल्पनांसाठीं राष्ट्रीय हिताचा घात करावयास तयार झालेल्या या स्त्रियांनीं आपल्या इतर भगिनींकडे पहावें, त्यांनीं आपल्या नोकऱ्या सोडून कसे भरभरा प्रपंच थाटले आहेत. जर्मन सरकारतर्फे निघालेल्या फर्मानांत काडीमात्र बदल होणार नाहीं, आणि सवलतहि

मिळणार नाहीं. यापुढें निषेधार्थ आलेलीं पत्रें व नोकरी टिकविण्यासाठीं स्त्रियांचेकडून आलेले विनंति-अर्ज यांना केराच्या टोपलींतच स्थान मिळेल.' शिक्षिकाप्रमाणें वैद्यकीय धंद्यांतील स्त्रियांनाहीं बेताबेतानें घर दाखविण्यांत आलें. परंतु अलिकडे मात्र वैद्यकीय धंद्यांतील कांहीं विशिष्ट विभागांमध्यें स्त्रियांचें अस्तित्व टिकूं द्यावें असें म्हणण्यांत येऊं लागलें आहे, व त्याला नाझी सरकारनेंहि पण दुजोरा दिला आहे.

## यत्र नार्यस्तु पूज्यन्ते

नाझी सरकारनें जर्मनींत कुटुंबसंस्थेची स्थापना केल्यापासून कोणत्याहि युरोपियन राष्ट्रांत सांपडणार नाहींत एवढीं सुखीं कुटुंबें आज जर्मनींत दृष्टीला पडतात. पतीपत्नींना प्रेमाच्या बंधनांनीं एकत्रित जखडून टाकण्याची कामगिरी विवाहद्वारां जर्मनीनें पार पाडल्या कारणानें गृहकृत्यांत मग्न, अपत्यसंगोपनांत दक्ष, पतिसेवेंत चूर अशा गृहिणी व आपल्या घराच्या स्वास्थ्यासाठीं झगडणारे गृहस्थ आज जर्मनींत घरोघरीं दृष्टीला पडूं लागले आहेत. जर्मन स्त्रियांची या कामांतील कार्यतत्परता कोणत्याहि युरोपियन अगर अमेरिकन स्त्रीपेक्षां अधिक असल्याची कबुली अनेक परकीय तज्ञांनीं दिली आहे, हें खरोखरच जर्मन स्त्रियांना भूषणावह आहे. संकटकाळीं पतीच्या बाजूला एखाद्या संरक्षक देवते-प्रमाणें राहून संकटाचे तडाखे त्याच्या बरोबरीनें सहन करणारी, सहचरी, सहधर्मचारिणी या दृष्टीनें जर्मन स्त्रियांनीं संसारांत संपादन केलेलें स्थान जागतिक स्त्रियांना आदर्श असेंच आहे; आणि यामुळें अशा स्त्रियांना जास्तींत जास्त संरक्षण देणें नाझी सरकारचें प्रथम कर्तव्य होऊन बसलें आहे. नवीन झालेल्या फौजदारी कायद्यान्वयें, स्वतःच्या पत्नीशीं बेइमान होणाऱ्या पतीला कडक शासन करण्याची तयारी जर्मन सरकारनें दर्शविली आहे. गरोदर स्त्रियांनीं अवघड कामें करूं नयेत म्हणून निर्बंध घालण्यांत आले आहेत. उधळपट्टी करून संसाराच्या सुरळितपणांत व्यत्यय आणणाऱ्यांनाहि कडक शासन करण्यांत येतें. गरोदर स्त्रियांना अडचणीच्या प्रसंगीं कोणीहि कोणतीहि मदत, शक्य असून करण्याचें नाकारल्यास त्याला शिक्षा झालीच म्हणून समजावें. पत्नी, माता, मुलगी, बहीण, यांना अवमानित करण्याचें धाडस कोणी केल्यास त्याला सरकार-कडून जाब विचारण्यांत येतो. त्याचप्रमाणें वैवाहिक जीवन व कुटुंब-संस्था

यांची कुचेष्टा करून व्यक्तिस्वातंत्र्याची महति वाढवूं पाहणाऱ्यांना ताळ्यावर आणण्यासाठींही जर्मनीनें कायदा केला आहे. मातृत्वाची थोरवी कोणी नाकारल्यास अगर त्याची अवहेलना केल्यास त्याला मात्रेचा एखादा वळसा देण्यास जर्मन सरकार सज्ज असतें.

## आबालवृद्ध राष्ट्रकार्यांत मग्न !

जर्मन स्त्रियांनीं जन्म दिलेल्या असंख्य बालकांना राष्ट्रप्रेमाचे धडे देऊन त्यांना, भावी आयुष्यक्रमांत कोणत्याहि धकाधकीला टिकतां यावें या दृष्टीनें तयार करण्याची कामगिरी खुद्द जर्मन सरकारनें आपल्या शिरावर घेतली आहे, व त्यासाठीं शेंकडों शिक्षण-संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. या संस्थांमधून मुलांच्या राहण्याजेवण्याचीहि सोय करण्यांत येते. सुटीच्या कालांत या विद्यार्थ्यांना सर्व देशभर फिरविण्यांत येऊन त्यांना त्यांच्या मातृभूमीचें संपूर्ण ज्ञान देण्यांत येतें. आई-बाप-मुलें-कुटुंबांतील प्रत्येक माणूस राष्ट्रीय म्हणून समजल्या जाणाऱ्या कांहीं ना कांहीं कार्यक्रमामध्यें दिवसाचा थोडा काळ कां होईना पण खर्च केल्याशिवाय राहात नाहींत; यामुळें कौटुंबिक कर्तव्यें व राष्ट्रकार्य यांची फारशी फारकत होत नाहीं. या योजनेवर विनोदी टीका करतांना पुढील गोष्ट देण्यांत आली होती. अर्थात् विनोदापलिकडे या गोष्टीला प्राधान्य नाहीं हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं—

सायंकाळची वेळ. घरांतील सर्व मुलें, मुलामुलींच्या हिटलर संघटनांच्या सभेला गेली होती. आई मातांच्यासाठीं गृहकृत्यांचा काढलेला शिक्षणवर्ग पाहण्यासाठीं गेली होती. बाप एस्. ए. या नाझी लष्करी संघटनेंतील आपल्या कामावर गेला होता; अशा वेळीं या रिकाम्या घरांत चोर शिरले, त्यांनीं हिटलरच्या फोटोखेरीज सर्व महत्त्वाच्या वस्तू लांबविल्या व जातांना आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं त्यांनीं टेबलावर चिठ्ठी लिहून ठेविली, 'हिटलरनें आम्हांलाहि उद्योगधंदा मिळवून दिला याबद्दल आभारी आहोंत.'

या गोष्टींतील विनोदाचा भाग सोडून दिल्यास कुटुंब-संस्था आणि राष्ट्र यांच्या अन्योन्य संबंधांत कुटुंबें आपलीं राष्ट्रीय कर्तव्यें किती तत्परतेनें बजावीत आहेत याची साक्ष पटते.

## मातृदेवो भव !

जर्मनींत कुटुंबें आणि माता यांना योग्य संरक्षण मिळत असल्याबद्दल एका गृहस्थानें म्हटलें आहे,

'There is a genuine effort in Nazi Germany to protect mothers and their families.'

जर्मन मातांचे भोंवती आतां इतकें आदरणीय वातावरण निर्माण झालें आहे कीं, त्यांना आपल्या मातृत्वाचा सादर अभिमान वाटूं लागला आहे. त्यांना प्राप्त झालेला मानसिक आनंद इतक्या उच्च दर्जाचा आहे कीं, मिळणाऱ्या जाड्याभरड्या अन्नाचा व कराव्या लागणाऱ्या कष्टांचाहि त्यापुढें त्यांना विसर पडतो. कुटुंबांच्या घरगुती अडचणींतसुद्धां लक्ष घालून सरकार मदत करतें. सामानसुमान, राहण्याची सोय, घरदुरुस्ती यांसाठीं, प्रपंचखर्च भागवून खर्च करण्यास पैसा न उरल्यास सरकारकडून हीं कामें उरकण्यांत येतात; एवढेंच काय पण जमीनदार, कारखानदार वर्गाकडून आपल्या कामगारांची लुबाडणूक केली जाऊं नये म्हणून दक्षता घेण्यांत येते. प्रापंचिक कार्याचा गरोदर स्त्रियांवर अधिक बोजा पडूं न देण्याबद्दल सूचना देण्यांत येऊन त्यांना अपत्यसंगोपनाच्या काळांत अधिक मदत देण्यांत येते व वैद्यकीय सल्लाही पुरविण्यांत येतो. गरोदर स्त्रियांना विश्रांतीसाठीं इतरत्र नेण्याची व्यवस्था जर्मन सरकार करतें. दोहोंपेक्षां अधिक अपत्यें असलेल्या स्त्रियांचे बाबतींत तर याहूनहि अधिक काळजी घेण्यांत येते. सामाजिक व राजकीय हेतूंचा सुंदर मिलाफ आपल्या या सर्व कार्यक्रमांत जर्मन सरकारनें घडवून आणला आहे. शहरें आणि खेडीं यांचे दुरावलेले संबंध पुनः जोडून त्यांना एकत्रित करण्यासाठीं जर्मन सरकार देशांतील मुलांच्या व मातांच्या निरनिराळ्या संघटणांना देशाच्या प्रत्येक विभागांतून कांहीं काळ फिरतीस नेते, ठिकठिकाणीं त्यांची उतरण्याची सोय करण्यांत येऊन आचार-विचारांची देवघेव करण्यांत येते व यामुळें आत्मीयतेची एक विलक्षण भावना सर्व देशामध्यें दृष्टीला पडते. सुगीच्या दिवसांत खेडोपाडीं रानांत थोडेंफार काम करण्यासाठीं जाणाऱ्या स्त्रियांचेवर अपत्यसंगोपनाची जबाबदारी, त्या कालांत, पडूं नये म्हणून शिशुसंगोपनगृहें जर्मनींत सर्व देशभर उघडण्यांत आलीं आहेत. १९३५ सालीं अशा गृहांची संख्या ७५० होती.

## सूतिकागृहें, दुग्धालयें

जर्मन मातांच्या दृष्टीनें सर्वांत अधिक उपयुक्त असा जर्मन सरकारचा कार्यक्रम म्हणजे वैद्यकीय कार्यक्रम होय. युरोपांतील कोणत्याहि राष्ट्रांपेक्षां जर्मनीनें हा कार्यक्रम यशस्वी करून दाखविला आहे. विवाहित स्त्रियांच्या उपयोगासाठीं सूतिकागृहांची सोय फार उत्कृष्ट करण्यांत आली आहे. अशा गृहांची संख्या जर्मनींत २९,००० आहे. अमेरिकेंत दर हजारीं बाळंतपणांतील स्त्रीमृत्यूचें प्रमाण ६ आहे, पण जर्मनींत फक्त दोन आहे. त्याचप्रमाणें बालमृत्यूचें प्रमाणहि जर्मनीइतकें कमी दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीं. अपत्यांच्या संगोपनासाठीं जर्मन माता एकजुटीनें झटत असतात याचें उत्तम उदाहरण म्हणजे 'मध्यवर्ती दुग्धालयें' होय. अंगावर अधिक दूध असलेल्या स्त्रिया या मध्यवर्ती ठिकाणांवर येऊन आपलें दूध देत असतात व त्याचा उपयोग ज्या आयांचे अंगावर पिणें मुलांना कांहीं कारणानें अशक्य असतें अशांचेसाठीं करण्यांत येतो. वैद्यकीय दृष्ट्या हा कार्यक्रम यशस्वी होत असल्याची ग्वाही देण्यांत आली आहे.

## कुटुंबसंस्थेची थोरवी

कुटुंब-संस्था आणि जर्मन सरकार यांच्या आलेल्या या निकट संबंधानें कुटुंबांतील कांहीं कर्त्या पुरुषांनीं 'सरकार पहातें आहे कीं!' या सबबीवर थोडा फार अंगचुकारपणा करण्यास कमी केलें नाहीं, पण त्यांना तात्काळ समज देण्यांत आली. कुटुंबसंस्थेचीं प्रमुख कार्यें म्हणून एका अमेरिकन समाजशास्त्रज्ञानें पुढील गोष्टींचा उल्लेख केला आहे—[१] संरक्षक, [२] आर्थिक, [३] शैक्षणिक, [४] धार्मिक, [५] उत्पादक, [६] व प्रेमसंवर्धक. इतक्या कार्यांची जबाबदारी कुटुंबसंस्थेवर आहे. जर्मन कुटुंबसंस्था हीं कार्यें पार पाडण्यांत दक्ष आहेच, पण सरकारहि ती तशी राहावी याबद्दल खटपट करीत आहे. या साऱ्या उलाढालींतून निर्माण झालेल्या जर्मन राष्ट्राचें वर्णन आलेंपिक सामने पहावयास गेलेल्या एका परकीयानें पुढीलप्रमाणें केलें आहे—

'हजारों तरुण-वृद्ध स्त्रीपुरुष हिरवळीवर ग्रामगीतें गात नाचत होते. एक लक्ष तीस हजार खाकी गणवेशांतील उमदे तरुण नाझी पद्धतीची सलामी देत लष्करी थाटानें मैदानावरून चालले होते. नाझी तत्त्वज्ञानाची थोरवी सांगणारीं भाषणें ध्वनिनिक्षेपकामधून मेघगर्जनेप्रमाणें तेथें लोटलेल्या अमर्याद जनसमर्दाचें

कानावर आदळत होतीं. तेजस्विता, धडाडी, आनंद ह्यांखेरीज तेथें दुसरें कांहींच दिसत नव्हतें.'

नाझी सरकारनें जर्मन स्त्रियांच्या जीवनावर घडवून आणलेला परिणाम जर्मन इतिहासांत संस्मरणीय आहे यांत शंका नाहीं. स्त्री आणि पुरुष यांच्या कार्यक्षेत्रामध्यें निःसंशय तफावत आहे, याचें ज्ञान झाल्यानंतर स्त्रियांचें समाजांतील स्थान ठरविण्याच्या दृष्टीनें शास्त्रशुद्ध चिकित्सा करून जर्मनीनें या बाबत पाऊल उचललें, पुढें टाकलें–तें फिरून कोणत्याहि सबबीवर मागें घेतलें नाहीं. मानव वंशाच्या जन्मदात्या म्हणून स्त्रियांना आवश्यक अशा सर्व गोष्टी उपलब्ध करून घेण्याची दक्षता जर्मनीनें घेतली. समाजसत्तावाद काय किंवा लोकशाही काय अगर 'राष्ट्रीय समाजवाद काय' या तिघांनींहि स्त्रियांचे प्रश्नाबाबत आपापल्या परीनें विचार करूनच राष्ट्रीय धोरण आंखलें आहे; पण या तिघांपैकीं स्त्रियांच्या मनोभूमिकेचें व गरजांचें खरें ज्ञान अधिक कोणास झालें आहे, याचा निश्चित निवाडा आम्ही करीत नाहीं, तें काम आम्ही वाचकांवरच सोपवितों. वस्तुस्थितीचें दिग्दर्शन करण्याची कामगिरी मात्र शक्य तों कसोशीनें आम्ही पार पाडणार आहोंत. नाझी कार्यक्रमाबद्दल जर्मन स्त्रियांनीं दाखविलेली आत्मीयता लक्षांत घेतां, स्त्रियांच्या भावनांना बरोबर हात घालण्याचें काम नाझी सरकारनें केलें असावेसें वाटतें. 'औद्योगिक क्रांतीनें व भांडवलशाही प्रचारानें स्त्रियांना ज्या एका विशिष्ट सांच्यांत दडपून ठेवण्याचा प्रयत्न चालला होता, तो सांचाच उखडून टाकून जर्मनीनें स्त्रियांना दुसऱ्याच एका सांच्यात आणून बसविलें ना!' अशी टीका कित्येक लोकांनीं केली, पण तींत फारसा राम नाहीं. कारण कोणत्या ना कोणत्या तरी एका विशिष्ट सांच्यांत राहिल्याशिवाय जगांत मानवाला आपलें आयुष्य कंठणेंच अशक्य आहे. ज्या सांच्यांत बसलें असतां आपलें शारीरिक व मानसिक स्वास्थ्य नष्ट होतें तो काढून त्या जागीं जीवनाला संरक्षक व पोषक अशा सांच्याची योजना करणें हें मानव बुद्धिमत्तेचें लक्षण आहे; आणि या दृष्टीनें विचार केल्यास जर्मनीनें स्त्रियांसाठीं निवडलेला हा सांचा त्यांना अधिक मानवण्याजोगा आहे असें दिसतें. आमचें मत म्हणून आम्हीं हें सांगत नसून जर्मन स्त्रियांचा अनुभव सांगत आहोंत. स्त्रियांचें पुंसीकरण करण्याचा प्रयत्न करून वैयक्तिक व राष्ट्रीय हानि करून घेण्याचा प्रसंग ओढवून घेण्याचा खुळेपणा जर्मन सरकारनें केला नाहीं, म्हणूनच अवघ्या त्यांना वीस

वर्षांत आपला तोल सांवरतां आला. व्हर्साय तहानंतर झालेल्या जर्मनीच्या हालअपेष्टांचें व विपत्तींचें वर्णन ज्यांनीं वाचलें असेल त्यांना या म्हणण्यांतील सत्यता पटण्याजोगी आहे. समाजसत्तावादानें स्त्रीपुरुष समतेचें निर्माण केलेलें भूत गाडून टाकण्यास जर्मनीला बरेच प्रयत्न करावे लागले. पत्नीत्व आणि मातृत्व हा स्त्रीजीवनाचा पाया मध्यंतरींच्या काळांत उखडून गेला होता, पण फिरून तो दुरुस्त करून जर्मन स्त्रीजीवनाचें अधिष्ठान त्यावर फिरून करण्यांत आलें आहे—

'Wife and mother role is a traditional one for married women.'

ही जर्मन विचारसरणी इतर पाश्चात्य राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांना मान्य होणें शक्य नाहीं ही गोष्ट उघडच आहे, आणि म्हणूनच या राष्ट्रांकडून नाझी अमलांतील स्त्रीदास्यत्वाचीं भडक वर्णनें करून जर्मनीबद्दल जगाचें मत कलुषित करण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

## परिस्थितीचा कोलदांडा

स्त्रियांचें बाबत जर्मनीनें केलेला हा प्रयोग अगदीं शंभर टक्के यशस्वी झाला आहे, असें मात्र नाहीं. युद्धोत्तर कालांत राहिलेल्या जादा स्त्रिया अद्यापहि अविवाहित आहेत व त्यांना कारखानदारीसारख्या व्यवसायांत राबावें लागत आहे. आपल्या उद्योगधंद्यावरून रात्रींच्या वेळीं आपल्या शून्य उदासवाण्या खोलीकडे परततांना त्यांच्या स्त्री–हृदयाला होणाऱ्या वेदनांची कल्पना नाझी सरकारला येत नाहीं असें नाहीं, पण तो प्रश्न न सुटण्याजोगा असाच होऊन बसला असल्यानें त्याबाबत मुग्धता स्वीकारणें भाग पडत आहे. या अतृप्त आत्म्यांना विवाहाशिवायही संतति प्राप्त झाल्यास त्यांचा निषेध न करणें यापलिकडे त्यांत अधिक तें जर्मन सरकार काय करूं शकणार ?

जर्मनींतील अविवाहित माता व त्यांची संतति यासंबंधीं मागील एका लेखांकामध्यें ओझरता उल्लेख करण्यांत आलाच आहे. युरोपमध्यें गेल्या महायुद्धानंतर प्रत्येक राष्ट्रांमध्यें अशा संततीची वाढ झाल्याचें आढळून आलें. रशियानें वारस व बेवारस संतति सारख्याच दर्जाची ठरवून टाकल्यानें व विवाह संस्थाहि अनवश्यक म्हणून ठरविल्यानें तेथें अशा संततीचा स्वतंत्र असा प्रश्नच राहू

शकला नाहीं, पण इतर राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांनीं समाजसुधारणेचा हा पल्ला विशेष गांठला नसल्यानें त्यांना स्वाभाविकच अशा संततीचा एक स्वतंत्र प्रश्न या दृष्टीनें विचार करावा लागला. जर्मनीनें अशा संततीला व तिला जन्म देणाऱ्या मातांना संरक्षण दिलें व सहानुभूति दाखविली; त्याचबरोबर अशी प्रजा वाढूं नये इकडेहि लक्ष दिलें. अविवाहितांना झालेल्या संततीस आपण सहानुभूति दाखवीत आहोंत याबद्दल कोणी गैरसमज करून घेऊं नये म्हणून मुद्दाम खुलासा करण्यांत आला—

'Motherhood of an unmarried girl is immoral ond blameworthy.'

अशा संततीचें प्रमाण वाढूं नये म्हणून खटपट करण्यांत आली व तिला थोडेंफार यशहि आलें. १९३२ सालीं बेवारस संततीचें प्रमाण शेंकडा ११·६ होतें तें ३३ सालीं १०·७ झाल्याचें दिसतें. १९३४ सालीं तें ८·६ वर आलें तर ३५ सालीं तें फक्त ८ इतकेंच होतें. कित्येक वेळां असेंहि होई कीं गरोदर कुमारिकांच्या भावी संततीच्या पित्याचा तलास घेण्यांत येऊन जर्मन सरकार त्याला सदर कुमारिकेशीं शक्य असल्यास विवाह करणें भाग पाडी व त्यामुळें बेवारस संततीचें औरस संततींत रूपांतर होई. विवाह व त्यासंबंधीं जर्मन सरकारनें स्वीकारलेल्या धोरणांमुळें बेवारस संततीचें प्रमाण तात्काळ आटोक्यांत आलें हीच गोष्ट खरी! १९ ते २० वर्षांच्या पुढील कुमारिकांचे हातून बेवारस संतति निर्माण होण्याचा फार संभव असतो, असा डॉ. लेंझ यांचा अभिप्राय आहे. पण जर्मनीनें या वयांतील स्त्रिया दरसाल लाखांनीं विवाहबद्ध करून टाकल्यानें स्वाभाविकच औरस संतति वाढली व अनौरस संततीला आळा बसला. कौटुंबिक पावित्र्याच्या कल्पनांना अशा संततीमुळें बसणारा धक्काहि कमी झाला. लोकसंख्या वाढविण्याची आत्यंतिक मनीषा जर्मनींत असूनहि, बेवारस संततीबद्दल जर्मनीनें स्वीकारलेलें धोरण लक्षांत घेतलें तर आपणांस जर्मनीच्या या सर्व चळवळींचे मुळाशीं निव्वळ राजकीय धोरणच होतें असें म्हणतां येणार नाहीं. अनौरस संततीचे सर्व लागेबांधे कायदेशीर रीतीनें आईकडे येतात, बापावर जबाबदारी नसते; तरीहि निव्वळ आईच्यावर मुलाचें पालनपोषण सर्वस्वीं अवलंबून असेल तर मात्र त्या बापाला १६ व्या वर्षापर्यंत आर्थिक संरक्षण द्यावें लागतें. मुलाच्या पालकाचे सर्व अधिकार एका संस्थेच्या हातीं राहतात. बापाला

मुलाच्या चरितार्थासाठीं द्याव्या लागणाऱ्या खर्चांतून सुटका करून घ्यावयाची असेल तर मात्र त्याला सदर स्त्रीचा आणखी कांहीं इतर लोकांशीं संबंध असल्याचें सिद्ध करून द्यावें लागतें. यासंबंधीं नवीन झालेल्या कायद्यानें पुरुषाला आपल्या औरस संततीप्रमाणें औरस संततीलाहि प्राधान्य देण्याची मुभा देण्यांत आली आहे. पित्याच्या संपत्तींत वारस संततीइतकाच त्यांचा हक्क राहूं शकतो, पण पित्याच्या संमतीशिवाय मात्र ही गोष्ट होऊं शकत नाहीं.

## जगाच्या उठाठेवी कशाला ?

नाझी अम्मलाखालील स्त्रियांचे जागतिक स्त्रीशीं संबंध मात्र दुरावले, कारण राष्ट्राच्या उत्कर्षाला त्यांनीं सर्वस्वीं वाहून घेतल्यानें जगाची उठाठेव करण्यास त्यांना फुरसत कोठून होणार ! जागतिक स्त्रीसंघटणेमधून जर्मन स्त्रीनें आपलें अंग काढून घेतलें, व त्यामुळें तिच्याबद्दल बराचसा गैरसमज पसरविण्यांत आला. शांतता आणि स्वातंत्र्य यांचा पुरस्कार करण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेल्या जागतिक स्त्रीसंघाचे संबंध जर्मन स्त्रीनें सोडतांच तिच्याविरुद्ध टीकेचे काहूर उठविणाऱ्या स्त्रियांना त्यांनीं ‘आपले उद्योगधंदे संभाळा, उगाच दुसऱ्याची उठाठेव करूं नका’ असा रोकडा जाब दिला. रशियन प्रचारकांनीं जर्मन स्त्रीचें रंगविलेलें काळेंकुट्ट चित्र पाहूनहि कित्येकांचा तिच्याबद्दल गैरसमज झाला. लोकशाही राष्ट्रांकडून जर्मन स्त्रीचें काढण्यांत आलेलें चित्रहि, बऱ्यावाईटाचें मिश्रण करून शक्य तों दूषित ग्रहानेंच काढण्यांत आलेलें असल्यानें, सर्वस्वीं नाहीं तरी थोडीफार कां होईना पण जर्मन स्त्रीच्या जीवनक्रमाची साधारण माहिती होण्यास मदत होते. तरी एकंदरींत पहातां रशियन स्त्रीसंबंधीं जें कुतूहलाचें व चिकित्सेचें वातावरण जगभर पसरलेलें दिसतें तितकें मात्र जर्मन स्त्रीबद्दल दिसत नाहीं. याचें कारण जर्मन स्त्री जुन्याकडे वळली आहे, तर रशियन स्त्रीनें एका नव्या जगांत पाऊल टाकलें आहे हेंच होय.

## हेतु राजकीय असले तरी—

जर्मन स्त्रीच्या आयुष्याचें निरीक्षण करतांना आपणांस एक गोष्ट मात्र स्पष्ट दिसते ती ही कीं, नाझी पक्षानें आपले राजकीय हेतु साध्य करण्यासाठीं जर्मन स्त्रीला, युरोपच्या व कांहीं अंशीं जगाच्या दृष्टीनें जुनें असलेलें वळण लावलें. पण ही गोष्ट कोणत्या देशांत नाहीं ? कित्येक ठिकाणीं समाजाचें राजकीय

व सामाजिक जीवन इतकें निकट झालेलें असतें कीं त्यामुळें कित्येक सामाजिक सुधारणांना राजकीय महत्त्व प्राप्त होऊन बसतें; हें रशिया व जर्मनी यांच्या स्त्रीविषयक धोरणाचें परीक्षण करतांना स्पष्ट दिसून येतें. झालेल्या अपमानाच्या परिमार्जनार्थ म्हणा अगर इतर कांहीं राजकीय उद्दिष्टासाठीं म्हणा, आपणांस फिरून एक भयंकर रणकंदन करावयाचें आहे ही जाणीव बाळगून नाझी सरकारनें लोकसंख्येच्या संवर्धनासाठीं हा कार्यक्रम आंखला हें स्पष्ट दिसत आहे. पण निव्वळ लोकसंख्येची वाढ एवढाच उद्देश असता तर रशियाचें स्त्रीविषयक धोरण चालू ठेवूनहि ही गोष्ट साध्य करतां आली असती, नव्हे त्या मार्गानेंच ती अधिक सुलभ झाली असती. लोकसंख्येच्या वृद्धीबरोबरच गुणोत्कर्षाची गरज जर्मनीला अधिक वाटत असल्यानें त्यानें हा मार्ग स्वीकारला! स्त्रियांना त्यांच्या नैसर्गिक क्षेत्रांत वावरूं देण्यानें जर आपले राजकीय हेतु साध्य होत असतील तर त्यांत मोठें बिघडलें असें मुळींच नाहीं. उलट यांतच खरें कौशल्य आहे. आपल्या राजकीय हेतूसाठीं १०० टक्के स्त्रीजनतेवर अनैसर्गिक संस्कार करून तिला हैराण करण्यापेक्षां जर्मन सरकारनें स्वीकारलेला मार्ग खरोखरच अभिनंदनीय आहे असें म्हणण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. मुसोलिनीचे स्त्रीविषयक विचारहि बरोबर याच नमुन्याचे आहेत. तो म्हणतो, 'स्त्रियांनीं आपली मुख्य कामगिरी आधीं बरोबर पार पाडली पाहिजे. ती म्हणजे, सुमाता बनून राष्ट्राला सुदृढ व सत्शील संतति निर्माण करून देणें ही होय! त्यांचीं बाल अंतःकरणें देश प्रेमानें भरून टाका, नीतिमत्ता आणि शिस्त याखालीं त्यांची चांगली वाढ करा. आपला मुलगा वयाच्या १९ व्या वर्षापर्यंतच्या महत्त्वाच्या कालांत आपला विद्यार्थी असतो ही गोष्ट प्रत्येक मातेनें लक्षांत ठेविली पाहिजे. तिच्या मुली, याही पण तिच्या विवाहकालापर्यंत विद्यार्थिनीच आहेत. आपणांप्रमाणेंच त्या सुमाता व सुगृहिणी होतील असें शिक्षण त्यांना देण्याची कामगिरी मातांनीं केली पाहिजे. मुलींना पदार्थविज्ञानशास्त्र, इतिहास, भूगोल यांचें शिक्षण काय उपयोगी पडणार? गृहशास्त्राची, शिशुसंगोपनशास्त्राची शिकवण त्यांना अवश्य आहे. स्त्रियांनीं आपल्या स्त्रीत्वाचें सौंदर्य वाढविण्याची खटपट करावी, पतीच्या सर्व काळज्या आपल्या नुसत्या दर्शनानेंच दूर पळतील इतकी गोडी व मार्दव त्यांच्या ठिकाणीं उतरलें पाहिजे. या ठिकाणीं सौंदर्यापेक्षां गोड वागणूक अधिक महत्त्वाची आहे. पुरुषी थाटाच्या मार्दव व रमणीयत्वहीन स्त्रिया, काय स्त्रिया झाल्या?'

स्त्रियासंबंधींची मुसोलिनीची ही विचारसरणी डोळ्यापुढें ठेवूनच हिटलरनें आपला कार्यक्रम आंखला असावासें दिसतें. स्त्रीविषयक धोरणांची या दोन राष्ट्रांची एकवाक्यता लक्षांत घेतां आपणांस इटलीचा स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता दिसत नाहीं आणि म्हणूनच आम्ही तो देश आमच्या कक्षेबाहेर ठेवीत आहोंत. उद्देश हाच, कीं पुनरावृत्तीचा दोष टळावा !

अमेरिकन टीकाकारांनीं 'प्रजोत्पादनाचीं यंत्रें' म्हणून अत्यंत कुचेष्टापूर्वक जर्मनस्त्रीचा उल्लेख करून जर्मन सरकारवर टीका केली आहे. सुप्रजोत्पादन व स्त्रीहितसंवर्धन यासाठीं जर्मन सरकारची सारी घडपड चालू आहे याची स्पष्ट कल्पना आलेल्यांनीं अर्थात् या कुत्सित टीकांकडे पूर्ण दुर्लक्षच केलें. जननशास्त्रानें जर्मन स्त्रियांना दिलेला संदेश पुढीलप्रमाणें आहे; आणि तो प्रत्येक स्त्रीला खास मार्गदर्शक होईल—

'Take your destiny in your own hands...Let us take the knowledge of biology gathered by the highest products of human evolution and thus maintain and increase our superiority over the lower animals in health, intelligence, and conquest of nature. We know how to breed better animals.'

स्पार्टन मातानंतर आजच्या जर्मन माताच खऱ्या माता या दृष्टीनें जगांत आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. जर्मनीनें वंशशुद्धीचें माजविलेलें अवडंबर लक्षांत घेऊन, इतरांना तुच्छ लेखण्याचा जर्मनीचा उद्देश आहे अशीहि टीका कांहीं लोकांनीं केली. त्याला अधिकृत रीत्या पुढीलप्रमाणें उत्तर देण्यांत आलें आहे—

'The concern for one's own type and its cultivation does not need to mean in any instance lower evaluation of foreign people and races.'

## उद्यांचें कोणी सांगावें ?

या तीन प्रकरणांत जर्मन स्त्रियांचें यथातथ्य दर्शन घडवून आणण्याचा प्रयत्न आम्हीं केला आहे. या लेखांच्या प्रसिद्धीपर्यंत जर्मन स्त्रिया याच स्थितींत असूं शकतील अशी हमी मात्र आजच्या राजकीय परिस्थितीमुळें देतां येऊं शकत नाहीं. हिंदुस्थानांतील आम्ही लोक आर्यवंशाचे आहोंत, जर्मन लोकही मोठ्या अभिमानानें आज आपणास आर्य म्हणवीत आहेत. अशा स्थितींत दोनहि

देशांमध्यें समाजरचनेचें साधर्म्य दिसून आल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. प्राचीन हिंदी आर्यांच्या समाजरचनाशास्त्राला–आज जर्मनीनें पूर्ण शास्त्रीय चिकित्सा करून व त्याचा अवलंब करून आर्य ऋषिवर्यांना एक मोठेंच प्रशस्तिपत्र दिलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदी स्त्रियांबद्दल वारंवार सहानुभूतीचे सुस्कारे सोडणाऱ्या इंग्लिश व तत्सम निंदकांचीं तोंडें परस्पर बंद करण्याचें काम इटली–जर्मनीनें केलें आहे. जर्मन स्त्रीसमाजाची रजा घेऊन आतां आपणांस इंग्लिश स्त्रीसमाजाची भेट पुढील प्रकरणापासून घ्यावयाची आहे. आपला त्यांचा ऋणानुबंध जुना असल्यानें अर्थात् ही भेट अधिक जिव्हाळ्याची व बराच वेळ टिकणारी होणार एवढेंच या ठिकाणीं सांगावेसें वाटतें.

---

प्रकरण ८ वें

# इंग्लंड

इंग्लंडचा आणि आपला निकट परिचय होऊन आज दीडशें वर्षें होऊन गेलीं. एवढ्या दीर्घ कालांत किती तरी ज्ञान इंग्लिश राज्यकर्त्यांकडून व त्यांच्या देशी विदेशी पित्त्यांकडून आपल्याला मिळालें. हिंदी समाजरचना, धर्मकल्पना, संस्कृति या किती हीन आहेत, तुच्छ आहेत, तिरस्करणीय आहेत याची जाणीव प्रथम त्यांनींच आम्हाला करून दिली; विशेषतः, हिंदी स्त्रीचा शंभर पिढ्यांचा इतिहास उकरून काढून, त्यांचें दास्य, त्यांचे अल्प वयांत होणारे विवाह, त्यांना वयाच्या बाराव्या वर्षी होणारी संतति, घरांत तुरुंगांतील कैद्या-प्रमाणें त्यांना मिळणारी वागवणूक, बनारसच्या घाटावर त्यांना जुलमानें जिवंत जाळण्यांत येण्यासारखे अद्‌भुत प्रसंग, यांचीं किती तरी खुमासदार वर्णनें उपलब्ध करून इंग्लिश स्त्रीपुरुषांनीं हिंदी स्त्रीची जगाला ओळख करून दिली आहे. इंग्लिश रिवाजाप्रमाणें हिंदी समाजाच्या वतीनें आम्ही प्रथम तर त्यांचें आभार मानतोंच, पण त्याचबरोबर त्यांच्या समाजाचा, विशेषतः स्त्री–समाजाचा अल्पसा का होईना पण परिचय मराठी वाचकांना करून देण्याची इच्छाहि प्रगट करतों. मिस् मेयोसारख्या सुविद्य स्त्रीनें [ सदर बाई अमेरिकन होत्या, पण आल्या होत्या इंग्लिश कामगिरीवर!] हिंदी स्त्रीचा परिचय जितक्या चिकित्सकतेनें व विद्वत्तापूर्ण तऱ्हेनें करून दिला तितक्या तऱ्हेनें इंग्लिश स्त्रीचा परिचय करून देणें आमच्यासारख्या अल्पमतीच्या लोकांना शक्य होणार नाहीं. परंतु साधारण कल्पना येण्याच्या दृष्टीनें एकदोन पिढ्यांतील इंग्लिश स्त्रीचा परिचय करून देण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोंत.

## इंग्लिश स्त्रीचा स्वातंत्र्य–पुढाकार

इंग्लिश स्त्री युरोपखंडांतील सुंदर व पुढारलेली स्त्री म्हणून पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. युरोपांतील इतर देशांतील स्त्रिया ज्या वेळीं घराचा उंबरठाहि ओलांडून

बाहेर पडत नव्हत्या त्या वेळीं इंग्लिश स्त्रिया मद्यपानगृहें, उपाहारगृहें, पथिकाश्रम व इतर दुकानें यांमधून नोकऱ्या करतांना दृष्टीला पडत, व त्यामुळें परप्रांतांतून येऊन इंग्लंडमध्यें प्रवासाला येणाऱ्या युरोपियन लोकांना इंग्लंडचा हा एक मोठा विशेष वाटे. मध्ययुगांतील इंग्लिश स्त्रिया स्वयंपाकपाणी, गाणें, नाचणें, चित्रकला इत्यादि कलांत पारंगत असत, व हें शिक्षण देणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं चालविलेल्या अनेक संस्थाही पण तत्कालिन इंग्लंडमध्यें होत्या. त्यांना 'क्लाइस्टरर्स' असें म्हणत असत. या कालांत प्रपंचाखेरीज दुसरें कांहीं ध्येय इंग्लिश स्त्रीपुढें असल्याचें आढळून येत नाहीं.

## व्यापारांतहि पुढें पाऊल

पुढें पंधराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं इंग्लंडमध्यें व्यापारी युगाचा उदय होऊं लागला व त्याबरोबरच स्वतंत्रपणें व्यवसायांत शिरण्याची भावना इंग्लिश स्त्रियांमध्यें वाढूं लागली आणि स्वैराचाराला याचा उपयोग होण्याजोगा असल्यानें इंग्लिश पुरुषांनींहि पण त्याला विरोध केला नाहीं, उलट उत्तेजन दिलें. याबाबत तिसऱ्या एडवर्डनें काढलेल्या जाहीरनाम्याचा कांहीं भाग पुढीलप्रमाणें आहे—

> 'But the intent of the King and the Council is that women, that is to say brewers, bakers, carders, workers... may freely use and work... without any impeachment or being restrained by any ordinance.'

गुत्यावर दारूविक्रीच्या कामीं विशेषें करून स्त्रियांची योजना करण्यांत येई. पुढें धर्मसुधारणेच्या कालांत स्त्रियांचा दर्जा याहूनहि थोडा अधिक वाढविण्यांत आला. त्या कालांत इंग्लंडमध्यें प्रवास करणाऱ्या एका प्रवाशानें लिहिलें, 'कोणत्याहि देशापेक्षां इंग्लंडमध्यें स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य आहे. पुरुषापेक्षांहि त्या पाऊलभर पुढेंच आहेत.' त्याच काळच्या एका डच प्रवाशानें लिहिलें, 'इंग्लंड हा स्त्रियांचा स्वर्ग आहे.' १५९२ मध्यें वरटेनबर्गचा ड्यूक इंग्लंडमध्यें आला असतां इंग्लंडमधील स्त्रियांना असलेलें स्वातंत्र्य पाहून विस्मित झाला.

## स्त्रीशिक्षणाचा प्रसार आणि संघ

यानंतरच्या कालांत वाङ्मयीन अभ्यासाकडे स्त्रियांचें लक्ष वळलेलें दिसतें. पुस्तकीय ज्ञान म्हणजे इंग्लिश स्त्रीच्या प्रतिष्ठेचें एक मोठें साधन होऊन

बसलें होतें. ग्रीक आणि लॅटिन येणें म्हणजे ज्ञानाचा व प्रतिष्ठेचा उच्च बिंदू संपादन करणें अशी त्यांची प्रामाणिक समजूत होऊन बसली होती. १५०० ते १६०० च्या दरम्यान स्त्रीशिक्षणाचा इतका प्रसार इंग्लंडमध्यें झाला होता कीं, बौद्धिक दृष्ट्या या कालांत त्या पुरुषांच्याहि पुढें गेल्या आहेत असें कित्येकांनीं त्यांचें वर्णन केलें. आठव्या हेनरीची मुलगी राजकन्या मेरी हिच्या विद्वत्तेची तर ख्यातीच होती. इरॅसमसनें देखील तिच्या लॅटिनवरील प्रभुत्वाची मुक्तकंठानें स्तुति केली आहे. लेडी जेन ग्रे हीसुद्धां मोठी सुशिक्षित स्त्री होती. तिला हिब्रू, अरबी, इटालियन इत्यादि भाषा उत्तम येत असत. १६ व्या शतकांत झालेल्या या स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीला १७ व्या शतकांतील क्रांतीनें, 'प्युरिटीन' पंथाच्या उदयानें थोडासा धक्का बसला. यानंतर फिरून राजाच्या पुनरागमनानें तर इंग्लिश स्त्रियांचे विशेषच हाल झाले. एक पक्ष अगदीं संन्यस्त वृत्तीचा तर दुसरा अत्यंत विलासी. त्यामुळें इकडे आड व तिकडे विहीर अशी त्यांची स्थिति झाली. १८ व्या शतकांत इंग्लिश समाजाला थोडें निराळें वळण लागून फिरून इंग्लंडमध्यें स्त्रीस्वातंत्र्याची महती गाण्यांत येऊं लागली. याच कालांत इंग्लंडमध्यें औद्योगिक क्रांति झाली होती हीहि गोष्ट याबरोबरच लक्षांत ठेवण्याजोगी आहे. स्त्रियांच्या बुद्धिमत्तेचें व कर्तबगारीचें वर्णन करतांना तत्कालीन एक कवि म्हणतो—

'Women are full of worth... Let them all praised be...
They are ampler wise than we......

स्त्रियांना पुढें येण्यास अधिक वाव देऊन त्यांची घरच्या बंदीखान्यांतून सुटका करण्याच्या स्तुत्य उद्देशानें आणखी एक कवि म्हणतात—

Let us not force them back with brow severe,
Within the place of ignorance and fear!
Confined entirely to domestic arts,
Producing only children, pies and tarts

स्त्रियांना घरच्या अज्ञानांधःकारानें भरलेल्या क्षेत्रांत कोंवू नका, असें कवीचें कळकळीचें सांगणें आहे. बॉस्वेलनें लिहिलेल्या जॉन्सनच्या चरित्रांत स्त्रियांनीं चालविलेल्या कांहीं सार्वजनिक संस्थांचें वर्णन आढळतें. १७८१ च्या सुमारास इंग्लंडमध्यें स्त्रियांचे क्लबस् स्थापन झाले होते. त्या ठिकाणीं सायंकाळीं त्या

जमत व निरानिराळ्या विषयांची चर्चा करीत. इंग्लिश स्त्रीच्या सार्वजनिक आयुष्यक्रमाचा खरा आरंभ याच काळांत आहे असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. यापूर्वी स्त्रिया समाजामध्यें विशेष प्रामुख्यानें वावरतांना फारशा दृष्टीला पडत नाहींत. १७९२ च्या सुमारास स्त्रियांच्या हक्कांचें समर्थन करणारें एक पुस्तक मेरी ॲस्टेल नांवाच्या स्त्रीनें लिहून प्रसिद्ध केलें होतें. मेरी वुलस्टोन क्रॅफ्ट नांवाची स्त्री याच सुमारास लिहिलेल्या आपल्या एका पुस्तकामध्यें म्हणते, ' स्त्रियांना पुरुषांच्या इतकें बंधमुक्त कधींच होतां येणार नाहीं. कांहीं बाबतींत पुरुष त्यांना निःसंशय मागें टाकतील.' यावरून श्रेष्ठ कनिष्ठ वाद त्या वेळीं जोरांत असावासें दिसतें. एकंदरींत स्त्रियांच्यासंबंधीं परस्पर विरोधी विचारसरणी जरी त्या वेळीं इंग्लंडमध्यें आस्तित्वांत असल्या तरी इंग्लिश स्त्रीनें बरेंच स्वातंत्र्य संपादन केलें होतें एवढी गोष्ट मात्र निश्चित दिसतें. वाङ्मय क्षेत्रामध्यें कुठल्याहि स्त्रीपेक्षां त्या काळामध्यें इंग्लिश स्त्रीनें आघाडी मारली होती. आफ्राबेन, हॅरॅट बीचर, फॅनी बरनी इत्यादि लेखिकांनीं १८ व्या शतकांत बरींच कीर्ति संपादन केली होती. १९ व्या शतकांत फेलीसिया हेमन्स व जिओरजी इलीयट यांनीं संपादन केलेलें यशहि अभिनंदनीय असेंच आहे.

**राजकारणाचे धडे—मिलचा पुरस्कार**

१८ व्यां शतकांत इंग्लिश स्त्रिया राजकारणांतहि भाग घेऊं लागल्याचें दिसून येतें. या कालांत मार्लबरोची डचेस राजकारणांत प्रामुख्यानें वावरतांना दृष्टीला पडते. १७३८ मध्यें उमरावांची एक खासगी सभा चालली असतां तींत स्त्रियांना प्रवेश देण्याचें नाकारण्यांत आलें. त्यामुळें तेथें जमलेल्या स्त्रियांना व क्वीन्सबरोच्या डचेसनां मोठा राग आला व त्यांनीं हट्टानें सभास्थानीं प्रवेश करून घेण्याचें ठरविलें. दारें बंद करून चाललेल्या या सभेवर क्विन्सबरोच्या डचेसचे नेतृत्वाखालीं स्त्रियांनीं हल्ला चढविला. सकाळपासून सायंकाळपर्यंत दारावर धडक्या देत त्या तेथें उपाशी उभ्या होत्या. या साऱ्या दंग्यामुळें कित्येक वेळां सभेचें काम चालणेंहि अशक्य होई. मध्येंच या स्त्रियांनीं गनिमी कावा लढविण्याचें ठरविलें व अर्धा तासपर्यंत पूर्ण शांतता पाळली. आंतील लोकांची कल्पना झाली कीं बाया कंटाळून निघून गेल्या. तात्काळ दरवाजे उघडून बाहेर राहिलेल्या कांहीं सभासदांना आंत घेण्याचा हुकूम झाला. पण दरवाजें उघडतात तों काय ! बाहेर ताटकळत गुपचुप उभ्या असलेल्या स्त्रियांनीं

तात्काळ आंत घुसून पहिल्या रांगेंतील खुर्च्या पटकावण्यास कमी केलें नाहीं. राजकारणासंबंधींचा त्या काळच्या इंग्लिश स्त्रीचा उत्साह पाहून त्या वेळींही इंग्लिश स्त्री किती पुढारली होती याची कल्पना येते. चार्लस् फॉक्स निवडून यावा म्हणून डेव्हनशायरच्या डचेसनें अतिशय खटपट केली व त्याला निवडून आणलें. स्त्रिया प्रत्यक्ष निवडणुकीस जरी उभ्या राहिल्या नाहींत तरी निवडणुकींत आपल्या पक्षासाठीं अगर व्यक्तीसाठीं हौसेनें भाग घेऊन मदत करीत; लागेल ती खटपट करीत. इंग्लिश स्त्रियांनीं आपणांस राजकीय अधिकार प्राप्त व्हावेत म्हणून १८६६ मध्यें १४९९ सह्यांचा एक अर्ज पार्लमेंटला सादर केला होता. मिलचा स्त्रियांच्या प्रत्येक चळवळीला पूर्ण पाठिंबा असे. स्त्री-स्वातंत्र्याचा कट्टा पुरस्कर्ता म्हणून मिलचा उल्लेख करावयास हरकत नाहीं. त्यानें आपला 'स्त्रियांचें दास्य' हा ग्रंथ १८६९ सालीं प्रसिद्ध केला, आणि त्यामुळें खूप खळबळ उडाली. या पुस्तकाच्या दुसऱ्या विभागामध्यें विवाहामुळें निर्माण होणाऱ्या स्त्रीदास्याची चर्चा केली आहे. विवाहामुळें स्त्रियांना आत्यंतिक कष्ट सहन करावे लागतात व त्यामुळें त्या पुरुषांच्या पूर्ण गुलाम बनतात असें मत मिलनें या ठिकाणीं प्रदर्शित केलें आहे. तिसऱ्या विभागांत स्त्रियांना बंद असलेले सर्व उद्योगधंदे त्यांना खुले करण्याची शिफारस त्यानें केली आहे. मानवाला खुलें असलेलें प्रत्येक शास्त्र व धंदा यांमध्यें स्त्रिया पुरुषांच्या इतकीच प्रगति करूं शकतील असा सिद्धान्त त्यानें येथें प्रस्थापित केला आहे. शेवटच्या म्हणजे चौथ्या विभागामध्यें त्यानें स्त्रियांच्या दास्य-विमोचनामुळें एकंदर मानवजात कशी उत्क्रान्त होणार आहे याचें वर्णन केलें आहे. मिलच्या एकंदर विचारसरणीचें सारच काढावयाचें झाल्यास तें एकाच वाक्यांत पुढील प्रमाणें काढतां येईल—

'Woman is not 'less' or 'more' than man. She is merely 'different.''

## रस्किनचा दृष्टिकोन

या 'डिफरंट' शब्दामध्यें केवढें मोठें विश्व समावलें आहे याची कल्पना सर्व-साधारण माणसाला येणें कठीण आहे; पण मिलसारख्या तत्त्ववेत्याला ती येऊं नये हें आश्चर्य आहे. 'स्त्री-स्वातंत्र्याची महती गाणाऱ्यांनीं हेंहि लक्षांत घ्यावें कीं

स्त्रियांना अपत्यजन्माच्या यातना भोगावयाच्या असतात, पुरुषांना नाहीं.' अशी टीका मिलवर कांहीं लोकांनीं त्या वेळीं केली व यावरहि कांहीं तोडगा सुचल्यास पहावें अशी विनंति केली. स्त्रियांच्या या सुधारणेबरोबरच स्त्रियांच्या नैसर्गिक धर्मांमध्येंहि सुधारणा घडून येण्याची कांहीं योजना झाल्याशिवाय स्त्रीसुधारणेचें हें सारें शास्त्र कागदोपत्रींच राहणार ! जॉन रस्किननें स्त्रियांबद्दल आपले विचार प्रगट करतांना स्त्रियांनीं आपलीं पांच कर्तव्यें प्रथम पार पाडावींत असा सल्ला दिला आहे. हीं पांच कर्तव्यें पुढीलप्रमाणें आहेत:—१. स्वतःच्या माणसांना खुष राखणें; २. त्यांना चांगलें जेऊं खाऊं घालणें; ३. कपडे करणें; ४. त्यांना स्वच्छ व टापटीपीनें ठेवणें; ५. त्यांना बालपणीं शिकविणें. सौ. हॅथॉर्नच्या मतानें स्त्रियांचें घर हेंच त्यांचें खरें कार्यक्षेत्र आहे व सदैव तिनें तेथेंच रहावें अशी तिची अपेक्षा आहे. ती म्हणते,

> 'I should like to cry aloud to modern women—educate yourself, dedicate yourself to sciences, take part in thoughts and occupations of man but do not seek to do as he does. For, you will never be his equal, even as he will not be your equal.'

[ आधुनिक स्त्रीला मला असें ओरडून सांगावेसें वाटतें कीं, तुम्हीं कितीहि पुरुषी चाळे केलेंत तरी तुम्हांला त्यांची बरोबरी करतां येणार नाहीं. ] इंग्लिश स्त्रियांमध्यें स्त्रीत्व व पुरुषांमध्यें पुरुषत्व यांचा चांगला विकास झालेला आढळतो, असें एका ग्रंथकर्त्याचें म्हणणें असून तो पुढें लिहितो, ' इंग्लिश स्त्री विनयशील, सभ्य, त्यागी, सोशिक अशी स्त्रियांना आवश्यक असणाऱ्या सर्व गुणांनीं युक्त असते व यामुळें इंग्लंडमधील पुरुषांचें वैवाहिक जीवन सुखी व स्थिर असतें. उदारपणा व कर्तव्यदक्षता यांतच इंग्लिश स्त्री सौख्य मानते. आपल्या पतीशीं एकरूप होऊन संसार करीत राहणें ही एकच इच्छा तिला असते.' पूर्वीच्या सर्वसाधारण इंग्लिश स्त्रीचें हें वर्णन, तें मिलच्या स्त्रीस्वातंत्र्याच्या कल्पना निघाल्यानंतरच्या काळांतील इंग्लिश स्त्रीला मुळींच लागू पडत नाहीं. मिलइतकाच इंग्लिश स्त्रीजीवनावर शेक्सपीअरनें परिणाम केला आहे. त्याच्या नाटकांच्या उदयामुळें इंग्लिश स्त्रीवर प्रेमकल्पनांची छाप इतकी विलक्षण बसली कीं, घरोघरीं ज्युलियट, पोर्शिया, रोझालिन दिसूं लागल्या. या प्रेमाच्या

बंडाव्यानें लग्नसंस्थेवरहि थोडाफार परिणाम झाला. शेवटीं बर्कला इंग्लिश गृहसंस्थेवर व तिच्या पावित्र्यावर लिहावें लागून या प्रेमी जीवांना कानपिचक्या द्याव्या लागल्या. गोल्डस्मिथसारख्यांनीं आपल्या कादंबऱ्यांमधून आदर्श गृहजीवनाचीं चित्रें काढून लोकमताला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न केला. साधारण सुधारलेल्या समाजामध्यें विचारांच्या या लाटा उठत असतां बहुजन इंग्लिश स्त्रीसमाज कोणत्या अवस्थेंत होता याचें थोडेसें परीक्षण करावयास हरकत नाहीं.

## बायकांची खरेदी-विक्री

या कालामध्यें स्त्रियां विकत घेऊन त्यांच्याशीं विवाह करण्यासारख्या रानटी चाली इंग्लंडमध्यें प्रचलीत होत्या असें दिसून येतें. मुलीची किंमत तिच्या एकंदर परिस्थितीवरून ठरविण्यांत येई. विधवेची किंमत कुमारिकेच्या निम्यानें होई. पती निधनानंतर कमींत कमी एक वर्षपर्यंत तरी तिनें अविवाहित राहावें असा नियम होता, तो तिनें न पाळल्यास तिच्या पहिल्या पतीची सर्व मत्ता तिजकडून काढून घेण्यांत येऊन योग्य पुरुष-वारसाला देऊन टाकण्यांत येई. मुलीच्या पित्याला पैसे देऊन विकत घेतलेली मुलगी त्याला परत देऊन तिच्या किंमतीचे पैसे परत मागण्याचा अधिकार नवऱ्याला असे. पण या कामीं विकत घेतलेली मुलगी विक्रीच्या अटीप्रमाणें नाहीं हें त्याला सिद्ध करावें लागे. ‘वाण विटका लागल्यास परत करूं’ अशा व्यवहारापैकींच लग्न हा व्यवहार इंग्लंडमध्यें कित्येक दिवस सुरू होता. यामुळें कित्येक वस्ताद बापांनीं आपली एकच मुलगी अनेक लोकांना विकून पैसे काढल्याचें आढळून येई. एकच घर दहापांच सावकारांना गहाण टाकणारी वस्ताद मंडळी अलीकडे दृष्टीला पडत नाहींत का-त्यांतलाच हा प्रकार ! १९ व्या शतकापर्यंत विवाहाची ही रूढी इंग्लंडमध्यें चालू होती. १८८४ पर्यंत अशा तऱ्हेनें लग्नें होत असल्याचे दाखले मिळतात. आपल्या बायका विकण्याचीही पद्धत इंग्लंडमध्यें सुरू होती. १९ व्या शतकांतील एक ग्रंथकार लिहितो,

> ‘Most often husbands sold their wives; fathers sold their daughters.’

पिते आपल्या मुली व नवरे आपल्या बायका विकतांना नेहमीं दृष्टीला पडत. या विक्रीच्या पद्धति ही मोठ्या लज्जास्पद आणि हीन असत. बाजाराच्या दिवशीं

नवरा आपल्या बायकोच्या गळ्याला दावे लावून तिला बाजारांत घेऊन जाई. तेथें तिला एका खांबाला बांधून ठेवण्यांत येई, आणि चार साक्षीदारांच्या देखत जास्तींत जास्त किंमत देणाराला विकून टाकण्यांत येई. आपल्या इकडील म्हशींच्या बाजाराची ज्यांना कल्पना असेल त्यानां याची बरोबर कल्पना येईल. अशा बाजारांत विधुर व ब्रह्मचारी यांचे गिऱ्हाइक बरेच असे. एकदां विक्री झाल्यानंतर सदर स्त्रीवर तिला विकत घेणाराची संपूर्ण मालकी राही. स्त्रियांच्या विक्रीच्या जाहिराती वर्तमानपत्रांत येत व भावांच्या चढउतारावरही पण चर्चा होई. टाईम्सच्या जुलै २२, १७९७ च्या अंकांतील पुढील मजकूर वाचून याची कल्पना येणार आहे—

'By an oversight in the report on Smithfold market we are not in a position to quote this week the price of women. The incresaing value of the fair sex is considered by various celebrated writers to be a sure sign of civilisation...... The woman has lastly risen from half a guinea to three guineas and a half.'

## गुरांच्या बाजारांत 'स्त्रियांची' दावण

१२ एप्रिल १८१७ रोजीं गुरांच्या बाजारांत पाहिलेली एक गोष्ट एका प्रवाशानें पुढीलप्रमाणें दिली आहे—'एका घोळक्यामध्यें एक मनुष्य एका तरुण व सुस्वरूप स्त्रीच्या गळ्याला दावें लावण्यासाठीं धडपडत होता व ती स्त्री त्याचा प्रतिकार करीत होती. हा गलका शेजारच्या शिपायाच्या कानावर जातांच त्यानें तेथें येऊन दोघांनाही पकडून न्यायाधीशापुढें नेऊन उभे केलें. न्यायमूर्तींनीं पुन्हां असा दंगा सार्वजनिक जागेंत न करण्याबद्दल दोघांनाही बजावून सोडून दिलें.' यासारखीं आणखी कित्येक उदाहरणें ठिकठिकाणीं घडून येत असत, पण तीं सर्व सांगत बसून वाचकांच्या बहुमोल वेळ आम्ही घेऊं इच्छित नाहीं. अगदीं बरोबर याच्या उलटही कांहीं उदाहरणें सांपडतात. 'मार्गारेट कॉलीन्स' नांवाच्या स्त्रीनें आपल्या मेषपात्र नवऱ्याला यथास्थित झोडपून नालायख म्हणून त्याला दुसऱ्या एका त्राटिकेला दोन पेन्सला विकून टाकलें. लग्न–संस्थेला इंग्लंडमध्यें या कालांत इतकें अस्थिर स्वरूप प्राप्त झालें होतें कीं, सांगतां सोय नाहीं. कित्येक वेळां 'काय हो, लग्न करतां का?'

म्हणून सडकेंतच येणाऱ्या-जाणाऱ्यांना विचारीत कांहीं शिष्ट उभे असत. मधल्यामध्यें कांहीं पेन्सांची दलाली घेऊन पुरुष स्त्रियांना एकत्रित आणलें कीं झालें लग्न! चार महिन्यांत अशीं ३००० लग्नें घडवून आणल्याची बढाई एका दलालानें मारली आहे. अर्थात् हीं सारीं लग्नें कांहीं घटकाच टिकणारीं असत हें निराळें सांगण्याची गरज नाहींच. लग्नाचें बाजारी स्वरूप इंग्लंडइतकें दुसऱ्या कोणत्याहि देशांत नसेल. विवाहाच्या जाहिराती आपण अगदीं अलिकडे पाहतो. इंग्लंडमध्यें ही पद्धत १६९५ पासून सुरू आहे. विवाहाच्या सर्व जाहिरातींवर कडी मारणारी एक जाहिरात १७८८ मध्यें लंडनच्या वर्तमान-पत्रांतून आली होती. इंग्लिश निर्लज्जपणाचा नमुना म्हणून ती पुढें दिली आहे—

## निर्लज्जपणाचे अजब नमुने

बायकोसाठीं जाहिरात, 'सर जॉन डिमलीबार्ट, एका तरुण मुलीबरोबर विवाहाचा सौदा करूं इच्छितो. ती कुमारिका, विधवा अगर प्रथम पतीपासून गरोदर असलेली स्त्रीहि चालेल.' हॅम्पशायर क्रॉनिकलमध्यें १७९१ च्या जून-मध्यें पुढील जाहिरात आढळते—'सुंदर, शुभ्र दातांची, नाजूक ओठांची, तरतरीत डोळ्यांची तरुणी पाहिजे. वराचें वय ५६, पण सशक्त आणि तडफदार!' पुढील जाहिरातींतील विद्वत्ता आणि काव्य पहा! 'वैवाहिक जीवनाचा प्रवास करण्यासाठीं जोडीदार पाहिजे. नेहमींचा सरळ धोपट मार्ग सोडून प्रेमाच्या जंगलांत भटकण्याची त्याची तयारी असावी. सोबती सशक्त असावा, पण लठ्ठंभारती नसावा, कारण अशा संवगड्यासह प्रवास करणें त्रासाचें असतें.' मनुष्याचा निर्लज्जपणा या पलिकडे मजल मारूं शकेल असें आम्हाला वाटत नाहीं. आपण 'लग्नाचा बाजार' असें कधीं कधीं त्राग्यानें तर कधीं कधीं विनोदानें म्हणतों, पण इंग्लंडमध्यें खरोखर लग्नाचा बाजार होता. लंडनमध्यें डोव्हर रस्ता आणि सेंट जेम्स रस्ता अशीं या बाजाराचीं दोन प्रमुख ठिकाणें होतीं.

## घटस्फोटाचे नमुने

इंग्लंडमध्यें विवाहाचें हें असें स्वरूप असल्यानें घटस्फोटाची निराळी योजना करण्याचें वस्तुतः कारण नव्हतें; परंतु प्रतिष्ठित म्हणून समजल्या जाणाऱ्या वर्गाला आपले अनैतिक व्यवहार चालविण्यासाठीं म्हणून

साधनेंहि जरा प्रतिष्ठितच असावीं लागतात. या दृष्टीनें घटस्फोटाची सोय व चौकशीचे फार्स करण्यांत येत असत. समजा, एखाद्याचें एखाद्याच्या पत्नीवरच प्रेम बसलें व तो आपली पत्नी त्याला विकावयास तयार नसला तर, अशा प्रसंगीं घटस्फोटाचा अवलंब त्याच्या पत्नीस करावयास लावून मग तिला आपल्या ताब्यांत घेण्याची व्यवस्था करावी लागे. घटस्फोट देतांना चौकशी होई, पुढें करण्यांत आलेल्या कारणासंबंधीं पुरावा गोळा करण्यांत येई. अशा कामीं सहाय्य देणारी तज्ञ मंडळीहि तयार असत. कोर्टापुढें आलेल्या खटल्यांपैकीं कांहीं वाचून पाहिलें असतां इंग्लिश स्त्रीचारित्र्यावर चांगलाच प्रकाश पडतो. एका पाद्रीबुवांनीं कोर्टांत येऊन सांगितलें, 'माझ्या बायकोनें मुलीसाठीं वर म्हणून एका इसमास घरीं आणलें व शेवटीं आपणच त्याचा उपयोग केला.' मुलीनें या खटल्यांत बापाच्या वतीनें साक्ष दिली. एका कप्तान साहेबांनीं कोर्टाकडे न जातां परस्परच आपल्या बायकोला शिक्षा देण्याचें काम उरकून घेतलें. आपल्या पत्नीचा एका खलाशाशीं संबंध आहे हें लक्षांत येतांच त्यानें अकस्मात त्या दोघांना एक दिवस गाठलें व नग्नावस्थेंतच त्यांना एका मोठ्या सोटाला जखडून तो इतर खलाशांच्या खांद्यावर दिला व मिरवणूक काढली. दुसऱ्या एका गृहस्थानें आपल्या जारिणी पत्नीला तिच्या प्रियकरासह वरीलप्रमाणेंच पलंगाला जखडून बाहेर कुंजावर, सर्वांनीं पहावें म्हणून, आणून ठेवलें, आणि हे लोकांनीं मोठ्या आवडीनें पाहून त्यांचें कौतुक केलें !

## यापेक्षां पशू बरे !

इंग्लिश स्वभावांत मुरलेला आर्षपणा दाखविण्यासाठीं म्हणून नाइलाजानें आम्हाला या वरील प्रकारांचा उल्लेख करावा लागला. स्वतःच्या पत्नीच्या दुर्वर्तनाचा डांगोरा पिटण्यांत इंग्लिश पुरुषाला काडीमात्र लज्जा वाटत नसे व तोच प्रकार इंग्लिश स्त्रियांच्या बाबतही होई. आपल्या स्त्रिया आपल्या गुलाम आहेत व त्यांना वाटेल तसें वागविण्याची आपणांस पूर्ण मुभा आहे अशी सर्व इंग्लिश पुरुषांची कल्पना असल्यानें कित्येक वेळां अत्यंत कठोर व किळसवाणे प्रसंग इंग्लिश स्त्रियांवर ओढवत कीं ज्यांचीं, वर्णनें वाचून आपल्यासारख्या रानटी लोकांचे अंगावरहि कांटा उभा रहावा. या ठिकाणीं एका सरदारीणबाईची हकीकत नमुन्यादाखल देण्यास हरकत नाहीं. मात्र ही अपवादात्मक उदाहरणें नाहींत, एवढी गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. या सरदारीणबाई लॉर्ड अॅडले

यांच्या पत्नी होत. हे पतिराज नेहमीं आपल्या पत्नीला बजावीत, 'तुझा देह माझ्या मालकीचा आहे व त्याचें कांहींहि करण्याचा अधिकार मला आहे.' या सरदार-साहेबांनीं एकदां अॅपटिल नांवाच्या हुजऱ्याकडून आपल्या डोळ्यादेखत तिच्या-वर जबरी करविली. दुसऱ्या एका अशाच प्रसंगीं त्यांनीं विरोध करणाऱ्या आपल्या पत्नीचे हातपाय दाबून ठेवण्याचें काम स्वतः पत्करलें. पुढें या सर्व गोष्टी कोर्टापुढें पुराव्यानिशी शाबीत झाल्या.

कोर्टांत आलेल्या हजारों तक्रारींचें व पुराव्यांचें पृथःकरण करून पाहिल्यास अशा अंगावर शहारे आणणाऱ्या कित्येक गोष्टी आढळून येतील. मिसेस ड्रेपर या स्त्रीच्या चारित्र्यानें इंग्लिश जनतेला सुद्धां धक्का बसला होता, मग इतरांचा काय पाड ? पितृगृहीं असतांना एका निग्रो मुलापासून तिनें आपल्या चारित्र्याला सुरवात केली व विवाहोत्तर गडी माणसांपासून तो तहत घरीं येणाऱ्या पाहुण्या-पर्यंत सर्वांवर तिची कृपादृष्टि असे. भर नाटक गृहांत तिनें शेजारीं बसलेल्या एका इसमावर हल्ला चढविला. घरांतून तिच्या तावडींतून निसटून पळालेल्या एका तरुणाचा पाठलाग तिनें भर सडकेमधून केला. नवऱ्यानें या त्रासाला कंटाळून शेवटीं घटस्फोट घेतला.

## याला तोड सांपडेल का ?

चौथा जॉर्ज व राणी कॅरोलिन यांच्यामधील घटस्फोटाच्या खटल्यानें तर या सर्वांवर कळसच चढविला. विवाहाच्या प्रथम दिवसापासून राजाचें वर्तन राणीशीं जरा तुसडेपणाचेंच होतें, व त्याला नेहमीं आपल्या पत्नीचा संशय येई. शेवटीं कंटाळून राणीनें सर्व युरोपभर प्रवास करण्याचें ठरविलें व ती बाहेर पडली. तिच्या बरोबर असलेल्या अनेक नोकर चाकरांत 'बरगामी' नांवाचा एक इटालियन नोकर होता. १८२० मध्यें जॉर्ज गादीवर आल्यानंतर ती परत इंग्लंडमध्यें आली. पण तिला तेथें उमरावांच्या सभेपुढें चौकशीसाठीं उभें रहावें लागलें. आपणाशीं बेमानी केल्याचा आरोप पतीकडून तिच्यावर ठेवण्यांत आला होता. राजानें आपल्यातर्फे पुरावा म्हणून सर्व युरोपखंडांतील उपहार-गृहांमधून परिचारक गोळा करून आणले होते. या खटल्यासंबंधीं ब्रॅंडेस नांवाचा ग्रंथकार म्हणतो, 'इतका निर्लज्ज खटला मीं माझ्या जन्मांत कधीं ऐकला नव्हता व यापुढें कोणास ऐकावयासहि मिळणार नाहीं.' या खटल्यांत पुढें आलेल्या पुराव्यांचे कांहीं मासले पुढीलप्रमाणें आहेत.

## लुइसाद् मॉंतचा पुरावा

प्र०—राणीसाहेब जहाजावर असतांना स्नान करीत काय ?

उ०—होय !

प्र०—एकापेक्षां अधिक वेळां त्या स्नान करीत काय ?

उ०—मला वाटतें, दोनदां.

प्र०—त्या वेळीं त्यांच्याबरोबर कोण जाई ?

उ०—मि. बरगामी.

प्र०—स्नानगृहांतून ते दोघे एकदम बाहेर पडत का ?

उ०—नाहीं, बरगामी प्रथम बाहेर येई व मला आंत जाऊन राणीसाहेबांना कपडे करण्यास मदत करण्याबद्दल सांगे.

प्र०—किती वेळपर्यंत ते दोघे आंत असत ?

उ०—सुमारें अर्धा ते पाऊण तास !

## व्हिन्सेंझो गार्गिशोचा पुरावा

प्र०—जहाजाच्या धक्क्यावरील छोट्या तंबूंत राणीसाहेब आणि बरगामी असतांना तंबूचे दरवाजे लावून घेण्यास तुला कधीं सांगण्यांत आलें काय ?

उ०—होय.

प्र०—दरवाजे लावून घेतांना तुला काय दिसलें ?

उ०—बरगामी बिछान्यावर पडला होता व जवळच राणीसाहेब उभ्या होत्या.

प्र०—बरगामी तंबूंतून केव्हां बाहेर पडे ?

उ०—सुमारें अर्ध्या पाऊण तासानें.

आणखी अशा तऱ्हेचा किती तरी पुरावा भर सभेंत आणून इंग्लिश राणीची विटंबना करण्याचें काम जाहीरपणें चारसहा महिने सुरू होतें. शेवटीं राणीला निर्दोषी म्हणून सोडण्यांत आलें, पण या कामीं तिला जो मनस्ताप झाला त्यामुळें पुढें ती लौकरच मरण पावली. राजघराण्याची ही अवस्था, मग सामान्य जनतेची नीतिमत्ता काय दर्जाची असेल याचें निराळें विवरण करण्याची जरूरच नाहीं. इंग्लिश जनतेचा अर्वाच्यपणा त्या कालापासून इतक्या थराला गेलेला आहे.

## घटस्फोटांचे खटल्यांतील नरक

अगदीं अलिकडे व्हिक्टोरियाच्या कारकीर्दीतहि या नमुन्याचे खटले घडून आले. लॉर्ड कोलीन कँबेल यानें आपल्यास घटस्फोट मिळावा म्हणून फिर्याद दाखल केली. ड्यूक ऑफ मार्लबरो, कर्नल बटलर, कॅप्टन शॉ, मिस मेरी वॅटसन्, वगैरे बडीं धेंडें यांत सामील होतीं. व्हिक्टोरियाचे जावई मारक्विस ऑफ लॉरेन्स हेही पण खटला ऐकण्यास मोठ्या उत्सुकतेनें येऊन बसत. पति घटस्फोट मागून कोर्टांत आपली बेअब्रू करणार, याची पत्नीला कल्पना येतांच तिनें तात्काळ पतीविरुद्ध दावा दाखल करून घटस्फोट मागितला. पतीनें पत्नीवर व्यभिचाराचा आरोप करतांच, पत्नीनें पतीचा घरच्या मोलकरणीशीं संबंध असल्याची घोषणा केली. दोघांनींहि आपापल्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ पुरावे पुढें आणले. त्यांत प्रि. अत्रे यांच्या मनाच्या श्लोकांतील सर्व साधनांचा उपयोग करण्यांत आल्याचें आढळून आलें. ‘फटी अन् गवाक्षें’ या साधनांचे जोरावर नोकरांनीं आपण पाहिलेल्या प्रकारांचीं रसभरित वर्णनें कोर्टापुढें करून दाखविलीं. अखेर कोर्टानें खटला काढून टाकला. इंग्लंडमधील घटस्फोटाचे खटले कोणत्या नमुन्याचे असतात व ते किती निर्लज्जपणानें चालविले जातात याची साधारण कल्पना येण्यासाठीं म्हणून आम्हांला हें कार्य नाइलाजानें करावें लागलें. कित्येक खटले इतके घाणेरडे असत कीं, असे खटले चालविणें आपल्या धंद्याला काळिमा आणणारें आहे असें कित्येक वकिलांनीं बोलून दाखविलें. युरोपमधील बहुतेक देशांतील लोकांनीं इंग्लिश जनतेच्या निर्लज्जतेचा अत्यंत कडक शब्दांत निषेध केला असून इंग्लिश स्त्री-पुरुषांना रानटी पशूंत जमा केलें आहे. अशा खटल्यासंबंधीं पुढील अभिप्राय एका पुस्तकांत व्यक्त करण्यांत आला आहे—

> For instance the evidence of tenants, servants, young ladies, maids, which they give in details before the public in open court—What they saw, heard or guessed–is no less than a kind of prostitution even lower than the common form.

थोडक्यांत म्हणजे इंग्लिश कुटुंबसंस्था आणि कुंटणखाने यांत फारसा फरक होता असें म्हणतां येऊं नये इतके भयंकर प्रकार इंग्लिश समाजांत सर्रास

चालत असावेंतसें दिसतें. यावरून स्वतंत्र वेश्याव्यवसाय म्हणजे काय प्रकरण असेल याची नुसती कल्पनाच केलेली बरी !

## वेश्यावृत्तीचा नागवेपणा !

वेश्याव्यवसायाबद्दलची लंडनची प्रसिद्धी सर्व युरोपखंडभर फार पूर्वीपासूनची आहे. खुद्द लंडनमधील एक रहिवासी आपल्या या शहराबद्दल किती आदरानें बोलतो हें त्याच्याच शब्दांत सांगितलेलें बरें—

'In no continental capital is it possible to see society so shockingly in the grip of vice and debauchery as in our own metropolis......Scenes have been witnessed which one has never experienced in the most vicious of continental towns.'

व्यभिचार व स्वैराचार यांत नाणावलेल्या फ्रेंच लोकांनींसुद्धां लडंनपुढें आपला सपशेल पराभव कबूल केला आहे. रशियानेंहि पण तीच गोष्ट कबूल केली आहे. ह्यूजेल नांवाचा ग्रंथकार इग्लंडसंबंधीं म्हणतो,

'In no other country prostitution was carried on so generally and in so disgraceful and so bestial manner.'

फक्त एका लंडनमध्यें वेश्यांची किती संख्या असावी याबद्दल अनेकांनीं अनेक आंकडे प्रसिद्ध केले आहेत. पण त्यामधील कोणताच खरा धरणें शक्य नाहीं, कारण निव्वळ वेश्या म्हणून उजळ माथ्यानें [!] वावरणाऱ्या स्त्रियांखेरीज त्या वृत्तीचा प्रच्छन्नपणें स्वीकार केलेल्या किती तरी स्त्रिया तेथें असल्यानें याबद्दल कांहींच निश्चित अनुमान करणें शक्य नाहीं. हलकेसलके कामधंदे करणाऱ्या स्त्रिया जोड धंदा म्हणून वैश्याव्यवसाय करीत. रीयन म्हणतो,

'Milliners, dress-makers, straw bonnet makers, furriers......those in pastry cook, fancy and cigar shops, bazzars,......it is impossible to estimate the number of those addicted to secret prostitution in the different ranks of society.'

याखेरीज खेड्यापाड्यांतून लंडनकडे येणाऱ्या गरीब बिचाऱ्या कित्येक मुली या धंद्याचे कचाट्यांत सांपडून आपल्या घरादाराला मुकत व

मरेपर्यंत त्यांत पिचत ! कुंटिणीचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया अशा मुलींवर अगदीं बारीक नजर ठेवून असत, कारण अल्पवयी कुमारिकांचा सत्यानाश करण्याची पशुवृत्ति लंडनमध्यें फार असल्यानें [या वृत्तीवर आम्ही पुढें थोडाफार प्रकाश टाकणारच आहोंत] अशा मुलींमुळें त्यांना चांगली प्राप्ति होई. खेडोपाड्यांतून लंडनकडे येणाऱ्या गाड्या थांबविण्याच्या नाक्यावर या कुंटिणी टेहळणी करीत व बाहेरून कामधंद्याच्या निमित्तानें लंडनमध्यें आलेल्या नवतरुणींना गांठून मोठ्या कौशल्यानें त्यांना अधःपाताच्या मार्गाला लावीत. एकदां पतित झालेली स्त्री मग या नरकांतून बाहेर पडूं शकत नसे. अठराव्या शतकांतील कारखानदारीचा उदय हा सुद्धां इंग्लिश स्त्रियांमध्यें वेश्यावृत्तीची वृद्धी करण्यास कारणीभूत झाला. मुलें, स्त्री, पुरुष या सर्वांना भरमसाट कारखान्यामध्यें कामावर लावण्यांत येत असे. कामाच्या निमित्तानें तरुण स्त्री-पुरुष कारखान्यांत रात्रंदिवस कोंडले जात व त्यामुळें वेश्यावृत्तीची वाढ होई. १७९३ मध्यें लंडनमधील सुमारें ५० हजार वेश्यांपैकीं २० हजार कारखान्यांत काम करणाऱ्या स्त्रिया होत्या. या वेश्यांमध्यें १५ वर्षें वयापासून तो तहत ५० वर्षें वयापर्यंतच्या स्त्रियांचा समावेश झाल्याचें आढळून येई. अल्पवयी स्त्रियांचें प्रमाण यांत अतोनात असे. टॉलबार नांवाचा ग्रंथकार म्हणतो,

And in no town child prostitution developed to such a shocking extent as in London

## एक मासलेवाईक वर्णन

या वेश्यांच्या हालचालीचें वर्णन अर्केन होल्टनें मोठें खुमासदार केलें आहे. ' वेश्याव्यवसायांत हजारांनीं असलेल्या या पोरी लंडनचे प्रमुख पथ सायंकाळ होतांच गांठतात. कोठून तरी भाड्यानें आणलेले झकपक पोशाख त्यांनीं परिधान केलेले असतात. कोणी तरी नवीन सावज गांठून त्याला कसें गंडवावें या विचारांनीं त्यांची नजर घारीसारखी फिरत असते. अशा स्थितींत खिशांत चार पैसे असलेलीं अल्पवयी पोरें जरी त्यांच्या हाताला लागलीं तरी त्या खूष असतात.

The curruption is so great that even in children they can find lovers to flirt with them

सडकेंत दिवे लागले कीं त्यांची रहदारी सुरू झालीच म्हणून समजावें. शिकार साधण्यासाठीं नाना साधनांचा उपयोग करण्यास त्या कमी करीत नसत. हात

पुढें करणें, मला आपल्याबरोबर लग्न करावेसें वाटतें, तुमचें प्रेम मला कितीं सुखी करील म्हणून सांगू!— यासारखीं वेंचक अस्त्रें पथिकावर फेंकण्याचें काम सुरू असतें. खंबीरपणें दटावून त्यांना पिटाळलें तर ठीक, नाहीं तर मुक्कामाला जाण्याच्या आंत अवतार संपलाच म्हणून समजावें.' एक ग्रंथकार तर यांना 'स्ट्रीट लेडीज' म्हणूनच संबोधतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अनीतीच्या बाबतींत कोणत्याहि देशापेक्षां पूर्वीपासूनच इंग्लंड चार पावलें पुढें आहे. व्यभिचार, अनीति यासंबंधींच्या इंग्लिश स्त्रीपुरुषांच्या लीला विश्वासहि न बसण्याइतक्या गलिच्छ आहेत. 'रविवार हा पवित्र दिवस, पण लंडन मधील स्त्रियांना मोठा धांदलीचा दिवस. कारण, मोकळ्या असलेल्या पुरुषांशीं लागेल तो स्वैराचार करण्यास त्यांना या दिवशीं फावतें.' अशी टीका एका गृहस्थानें इंग्लिश स्त्रीवर केली आहे.

आतांपर्यन्त इंग्लिश स्त्रीजीवनाचा झालेला परिचय ही नुसती तोंडओळख आहे. आपणांस याच्याहि बरेंच पुढें जाऊन अधिक परिचय करून घ्यावयाचा आहे.

## अल्पवयी मुलींची विटंबना

शतक अर्ध शतकापूर्वी इंग्लिश स्त्रियांना कंठाव्या लागणाऱ्या आयुष्यक्रमाची साधारण कल्पना गेल्या प्रकरणानें आली असेल. इंग्लंडमध्यें, व विशेषतः लंडनमध्यें बोकाळलेल्या अनीतीचीं भयानक वर्णनें अनेक ग्रंथकर्त्यांनीं केलीं आहेत. लहानलहान कुमारिकांच्यावर ओढवलेल्या दारुण प्रसंगांचीं चित्रें हृदयद्रावक आहेत. निराश्रित अशा या पोरींचे घोळके लंडनमध्यें दृष्टीला पडत. त्यांना उद्देशून एक ग्रंथकार म्हणतो—

> ' What a pitiful sight it is to see a crowd of little creatures lying in heaps close to one another, how even in severest weather they sleep in the streets, and how some of them, hardly being enough to reach man's hip, are pregnant and burden on the parish whose dung heap serves them a refuge ! '

लहानलहान गरोदर कुमारिका आश्रयाभावीं सडकेवर पडून रात्रीच्या रात्री घालवीत. सार्वजनिक स्नानगृहांची एक सांथच १९ व्या शतकांत इंग्लंडमध्यें आली होती. या सांथीमधून असल्या अनीतीचा फैलाव होई. या स्नानगृहांमधून नग्न स्नान घेण्याची मुभा असे, पण तेथें आल्यावरच कपडे काढले पाहिजेत असा निर्बंध नसे; त्यामुळें घरांत कपडे काढून ठेवून नग्नावस्थेत स्नानगृहाकडे धांव घेणाऱ्या लोकांचे घोळके सडकांतून दृष्टीला पडत. अशाच एका स्नानगृहाकडे धांव घेणाऱ्या कुटुंबाचें पुढील शब्दचित्र पहा—

> ' How often indeed does the father run naked from the house through the streets to the baths with his naked wife and children. '

### नग्न स्नानाचे दुष्परिणाम

दहा ते बारा वर्षांपासूनची उडाणटप्पू मुलें व मुलीं या स्नानगृहांतून स्नानाच्या निमित्तानें जमत. दोन दोन माणसांना बसण्याजोगीं स्नानपात्रें तेथें असत; आणि अशा पात्रांतून स्त्रीपुरुष मिळून स्नानास बसत. अशा या गोष्टींचा शेवटीं परिणाम काय होत असेल हें निराळें सांगण्याची जरूरच नाहीं. तरुण कुमारिकांना वाममार्गाला लावण्यासाठीं वरीलसारखीं अनेक राजरोस साधनें इंग्लंडमध्यें प्रचारांत होतीं. परंतु त्यांच्या विरुद्ध इलाज करण्याची खटपट विशेष कसोशीनें कोणी केल्याचें दिसत नाहीं. मागें कुमारिकांना भ्रष्ट करण्यासंबंधींचा थोडासा उल्लेख करण्यांत आलाच आहे. त्याची थोडीफार अधिक माहिती या ठिकाणीं घेण्यास हरकत नाहीं. इंग्लंडमध्यें पशुवृत्ति कोणत्या थराला गेली होती याची साधारण कल्पना येण्यास याची आवश्यकता आहे. कुमारिकांचें वर्णन व दर देणाऱ्या अनेक जाहिराती त्या वेळीं प्रसिद्ध होत. एका रविवारीं सकाळीं प्रसिद्ध झालेल्या हस्तपत्रिकेंतील पुढील माहिती पहा !– 'नेली ब्लासम, कुमारी वय वर्षें १९, दिसावयास सुरेख, दर २० गिनी.' 'एक खुबसुरत मुलगी फक्त ५ गिनीस देऊं.'

### दुर्गुणांची खाण

वेश्यागृहामध्यें कित्येक वेळां अशी गंमत होई कीं, पति–पत्नींची एकाच ठिकाणीं गांठ पडे. कारण दोघेहि आपापल्या परीनें सोय पहाण्यास आलेलीं असत ! शेरिडन, लॉर्ड हॅमिल्टन, बोलिंगब्रोकसारखीं बडीं धेंडें प्रसिद्धपणें या घाणींतून वावरत. खुद्द लंडनमध्यें ५००० वेश्यागृहें असावींत असा अंदाज आहे; आणि यामुळें या शहराचें 'Breeding ground of vice and evil' असें वर्णन एका ग्रंथकर्त्याकडून करण्यांत आलें आहे. अनीतीचें हें वातावरण नुसत्या वेश्यागृहापुरतें मर्यादित राहिलें असतें तरी फारशी हरकत नव्हती. पण त्यांचा फैलाव मुलींच्या शाळा व वसतिगृहें यांमधूनहि झाला होता. या पोरी खिडक्यांत उभ्या राहून खुशाल येणाऱ्या जाणाऱ्यांचें लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करीत:

'Young girls in these Girls' Schools standing at the windows attracting the passer-by with unambiguious gestures.'

## तरुणींचा व्यापार

तरुण मुलींच्या व्यापाराची मध्यवर्ति पेठ म्हणून लंडनची फार दिवसापासूनची ख्याति आहे. या व्यापारावर प्रकाश पाडणारा मजकूर मधून मधून 'पाल-माल गॅझेट' हें पत्र प्रसिद्ध करी, व त्यामुळें थोडी फार खळबळ उडे. 'पालमाल गॅझेट'च्या या प्रसिद्धिकरणानें उमरावांच्या सभेला 'तरुण मुलींच्या संरक्षणासाठीं' म्हणून एक स्वतंत्र कायदा पास करून घ्यावा लागला. वरील पत्रानें 'शुभ्र गुलामांचा व्यापार' अशी संज्ञा या व्यापाराला दिली होती. इंग्लंडमधील कुमारिका बेल्जम, फ्रान्स, इत्यादि देशांतहि 'इंग्रजी माल' या सदरांत रवाना केला जात असे. हें पुढील पत्र पहा—

ग्रीक स्ट्रीट, सोहो स्क्वेअर,
लंडन, एप्रिल ३, १८७८

बाईसाहेब,

मला, आपणांस, माझ्यापाशीं दोन सुरेख मुली आहेत हें त्वरेनें कळवि-ण्याची जरूर वाटते. त्यांचीं वयें वगैरे सर्व माहिती सोबत असलेल्या त्यांच्या कागदपत्रांवरून होईलच. माझ्या मतें प्रत्येकीची किंमत ३०० फ्रँक्स आहे. दोनहि पाहिजे असल्यास ५०० फ्रँक्स पडतील.

राफेल

बारा ते चौदा वर्षे वयाच्या कुमारिका इंग्लंडमधून विकत आणून त्यांना ब्रुसेल्स येथें ठेवण्यांत येई, व मग सवडीप्रमाणें व जरूरीप्रमाणें युरोपांतील इतर राष्ट्रांमध्यें त्यांची विक्री करण्यांत येई. १८८० पर्यंत हा व्यापार अगदीं जोरांत चालला होता.

## पालमाल गॅझेटचा मोर्चा

खुद्द इंग्लंडमध्येंहि कुमारिकांना भ्रष्ट करण्याचें व्यसन अगदीं कळसास पोहोंचलें होतें. एका गृहस्थानें एका वर्षांत ७०, दुसऱ्यानें १०० व एका डॉक्टरनें पंधरवड्यांत ३ कुमारिकांना शीलभ्रष्ट केल्याची बढाई मारली. यामध्यें मानसिक व शारीरिक सौख्याची परमावधी असल्याची निर्लज्ज कबुलीहि कित्येक कोडग्यांनीं दिली आहे. भ्रष्ट केल्या गेलेल्या कुमारिकांच्या आयुष्याचें मातेरें होऊन स्वाभा-विकच त्यांना वेश्यावृत्ति अंगिकारावी लागे. चौदा वर्षांच्या आंतील कुमारिका

मिळवून देण्याचा व्यवसाय करणारे कित्येक कुंटणखाने लंडनमध्यें होते. जॉन जॅकब आणि त्याच्या पत्नीनें चालविलेला कुंटणखाना अगदीं प्रसिद्ध म्हणून समजला जाई. पुढें पोलिसाकरवीं अल्पवयी मुलींचा व्यापार करणाऱ्या या 'संस्था' बंद करण्यांत आल्या. स्त्रियांच्या बाबत घडणाऱ्या या गुन्ह्यांचें वर्गीकरण करतांना पालमाल गॅझेटनें त्यांचे पुढीलप्रमाणें चार भेद केले होते—१. तरुण मुलींची खरेदी विक्री; २. कुमारिका मिळवून देण्यासाठीं नुसती दलाली; ३. स्त्रियांचा नैतिक अधःपात; ४. स्त्री गुलामांचा व्यापार करणें. स्टीडनें तर एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, ज्यांच्यावर अत्याचार करण्यांत येई त्या मुली इतक्या लहान असत कीं, त्यांना आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराचें स्वरूपही समजून येत नसे. रोज ताज्या कुमारिकांचा पुरवठा करण्याची चढाओढ कित्येक स्त्रिया करीत. आपल्या कुंटणखान्याची याबाबतची कीर्ति कमी होऊं नये म्हणून हरप्रयत्नानें त्या रोज नव्या कुमारिका पैदा करीत. यासाठीं त्या एखाद्या खेड्यामध्यें जाऊन राहात, तेथील मुलींची ओळख करून घेत, व लंडन दाखविण्याच्या निमित्तानें त्यांना एक दिवस तेथून हलवून आपल्या कोंडवाड्यांत घेऊन येत, आणि त्या ठिकाणीं त्यांचा सौदा करून मोकळ्या होत. १८८५ मध्यें अशा तऱ्हेनें मुलींचा पद्धतशीर व्यापार करणाऱ्या दोन संस्था प्रामुख्यानें आढळून आल्या. स्टीडनें या कुंटणखाना चालविणाऱ्या स्त्रियांची गांठ घेतली. त्यांनीं त्याला आपल्या धंद्याचें स्वरूप समजावून देतांना सांगितलें,

'We deal in virginity. Our customers desire virgins, not damaged goods.'

### हा 'माल' कसा मिळे?

या कुमारिकांचा पुरवठा आपणांस परिचारिका, दाया, दुकानांतून काम करणाऱ्या मुली, यांच्यामधून फार होतो हें सांगण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. त्या पुढें म्हणाल्या, 'आम्ही रस्त्यानें जात असतांना जर एखादी चांगली मुलगी दृष्टीला पडली तर आम्हीं तिचा पाठलाग करतों, पत्ता काढतो व ४–८ दिवसांत तिला कोणा तरी गिऱ्हाइकाच्या गळ्यांत बांधतों. आपल्यावर ओढवूं पाहणाऱ्या प्रसंगाची जाणीव होऊन जर कोणी विरोधाचा प्रयत्न केलाच तर खाण्यापिण्यांतून त्यांना मादक पदार्थ देण्यांत येऊन गुंगी आणण्यांत येते, व

मग पुढील कार्यभाग उरकण्यांत येतो. अवघ्या ५०।६० वर्षांपूर्वीच्या बहुजन इंग्लिश स्त्री–समाजाचें हें जीवन पाहून कोणत्या स्त्रीला खंत वाटणार नाहीं?

**'माला'बद्दल डॉक्टरी प्रशस्तिपत्रक**

मालाच्या खात्रीबद्दल ज्याप्रमाणें प्रशस्तिपत्र लागतें त्याप्रमाणें मुलींचें कौमार्य शाबूत असल्याबद्दल वैद्यकीय दाखला गिऱ्हाइकाला दाखविण्यांत येई. हे दाखले देण्याचें काम चांगले प्रतिष्ठित डॉक्टर पैसे घेऊन करीत. ह्या दाखल्याचा एक नमुना पहा—

...स्ट्रीट, लंडन, डब्ल्यु.
१७ जून १८८५

मी येथें नमूद करतों कीं, सदर सोळा वर्षांची मुलगी XXXX हिची मी वैद्यकीय तपासणी केली असून आजतागायत तिचें कौमार्य शाबूत आहे.

सही—डॉ. XXXX

कुमारिकांच्या व्यापारांत अशा दाखल्यांना बरेंच महत्त्व दिलें जाई. या व्यापाराचीं व व्यापाऱ्यांचीं रहस्यें समजून घेण्यासाठीं स्टीडनें स्वतःहि एक मोठें धाडस करून पाहिलें, पण तें त्याच्या अंगाशीं आलें. त्याची हकीकत अशी—

**स्टीडचें धाडस**

'लॉइड न्यूज' नांवाच्या एका पत्रामध्यें 'आईचा मुलीसाठीं शोध' या शीर्षकाखालीं एका बेपत्ता मुलीची हकीकत छापण्यांत आली. सदर मुलीचें नांव 'एलीजा आर्मस्ट्रांग' असून तिचें वय फक्त १३ वर्षांचें होतें. या मुलीला पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप स्टीडवर व त्याच्या मित्र-मंडळीवर ठेवण्यांत आला होता. 'पालमाल गॅझेट'मध्यें स्टीडनें आपली कैफियत प्रसिद्ध केली व तो स्वतः स्वित्झरलंडहून इंग्लंडमध्यें या अरिष्टाचे निराकरणार्थ परत आला. त्यानें लिहिलें, 'सदर मुलगी मी एका वेश्येपाशीं तिच्यातर्फें खरेदी केली, त्या वेळीं तिच्या कौमार्याची प्रशस्तिहि पण तिनें मजपाशीं केली. नंतर तिला क्लोरोफार्म देऊन माझ्या स्वाधीन करण्यांत आलें. पण तिच्यावर कोणताही अत्याचार करण्याइतका पशु मी नसल्यानें त्या नरकांतून तिला सोडवून मीं फ्रान्समध्यें नेलें व 'मुक्तिफौजेंत' दाखल केलें.' या प्रकरणांत पुढें बरेंच वादळ माजून स्टीडवर व त्याच्या मित्रमंडळीवर खटले भरण्यांत

आले. मुक्तिफौजेचे प्रमुख मि. बूथ यांनाहि या प्रकरणांत गोंवण्यांत आलें होतें. कांहीं दिवसांनीं खटल्याचा निकाल लागून बूथखेरीज बहुतेक सर्व लोकांना थोड्याफार महिन्यांची सजा झाली व हें प्रकरण आटोपलें. स्टीडनें या हीन व्यापारावर कोरडे ओढल्यानें दावा साधण्यासाठीं त्याच्यावर हें प्रकरण उपस्थित करण्यांत आलें असावें, याची कल्पना जनतेला असल्यानें, स्टीड सुटून येतांच लोकांनीं त्याचें प्रचंड स्वागत करून बहुमान केला.

## वैवाहिक जीवनाचे धिंडवडे

इंग्लिश स्त्रियांचें वैवाहिक जीवन या कालांत इतकें अस्थिर झालें होतें कीं, आपली आजची पत्नी उद्यां आपलीच राहील अशी हमी पतीला कधींच देतां येत नसे. विवाहित स्त्रियांनीं इतरांवर अनुरक्त होणें अगर इतरांनीं विवाहित स्त्रियांवर अनुरक्त होणें यामध्यें अस्वाभाविक व अनैतिक कांहीं आहे अशी शंकाहि इंग्लिश स्त्री–पुरुषांना कधीं येत नसे. मनुष्याचें जीवन म्हणजे फुलपांखराचें जीवन अशीच वृत्ति त्या वेळीं तेथें होती. या समाजाची प्रतिनिधी या दृष्टीनें ‘ इमा हॅमिल्टन ’ हिचें चरित्र थोडक्यांत पहाण्यास हरकत नाहीं. एका कुलीन [ ? ] घराण्यांत जन्मलेल्या या स्त्रीनें एका मागून एक असे पति करतां करतां शेवटीं नेल्सन या प्रसिद्ध इंग्लिश वीराला गांठलें. नेल्सनपासून तिला एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्येंहि झालीं. अप्रतीम सौंदर्याची देणगी तिजपाशीं असल्यानें अनेक पुरुष तिची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न करीत व त्यांच्या आहारीं जाण्यांत तिला मुळींच दिक्कत वाटत नसे. व्हेनिस येथें नेल्सननें तिला प्रथम पाहिलें व तिच्या नवऱ्याजवळून काढून तिला इंग्लंडमध्यें आणून आपल्यापाशीं ठेविलें. तिच्यावर त्याचें अमर्याद प्रेम बसलें होतें. ट्राफलगारच्या लढाईत तो गोळी लागून पडला असतां आपल्या डॉक्टरला म्हणाला, ‘ माझी सर्व मत्ता माझ्या प्रिय हॅमिल्टनला द्या.’ अगदीं प्राण जातां जातां तो फिरून म्हणाला,

‘ Hardy, take care of my beloved Lady Hamilton ! Take care of my poor Lady Hamilton ! ’

नेल्सनच्या मृत्यूनंतर सदर बाईनें फिरून आपल्या हीन आयुष्यक्रमाला सुरुवात केली व शेवटीं तुरुंगांतहि पदार्पण केलें !

## गर्भपातांची वाढ आणि सोय

व्यभिचारप्रवृत्तीच्या वाढीबरोबरच गर्भपाताची प्रवृत्ति वाढत असते. कारण व्यभिचारांतून निर्माण होणाऱ्या संततीच्या पालकत्वाची जबाबदारी पत्करण्यास कोणी सहसा तयार नसल्यानें त्या संततीचा निकाल लावून आपलें स्वातंत्र्य कायम राखण्याची वृत्ति स्त्री-पुरुषांमध्यें दिसून येते. १९ व्या शतकाच्या शेवटीं व २० व्या शतकाच्या आरंभीं ' गर्भपात करून देऊं, गरजूंनीं फायदा घ्यावा ' अशा अर्थाच्या जाहिराती वर्तमानपत्रांत येत असत. गर्भपाताचा फैलाव इंग्लिश स्त्रियांत किती झाला होता याचें वर्णन करतांना एक गृहस्थ म्हणतो, ' एका डॉक्टरला मी भेटावयास गेलों असतां सुमारें दहा-बारा मुली बाहेरच्या खोलींत डॉक्टरची वाट पहात बसलेल्या मला दिसल्या. त्या सर्व गर्भपात करून घेण्यासाठीं आल्या होत्या. पोटांत घेण्याच्या अनेक औषधांचा उपयोगहि इंग्लिश स्त्रिया खाजगी रीतीनें करीत. आयर्न सल्फेट, आयर्न क्लोराइट, इत्यादिकांचा सर्रास उपयोग करण्यांत येई. चोरून मारून याबाबत स्त्रियांना मदत करणाऱ्या अनेक संस्था त्या वेळीं इंग्लंडमध्यें अस्तित्वांत होत्या. लैंगिक आचाराच्या अनिर्बंध स्वातंत्र्यामुळें इंग्लंडमध्यें बेवारस संततीची वाढ तर झालीच; पण स्पर्शजन्य रोगांचें प्रमाणहि अतोनात वाढलें. मुला-बाळांनाही त्याची झळ लागली होती. रेयन म्हणतो, ' दरसाल सुमारें दहा हजार मुलें वेश्यागृहाची पायरी चढत व ११ ते १६ वर्षांच्या मुलामध्यें दरसाल सरासरीं २७०० मुलें स्पर्शजन्य रोगानें पछाडलेलीं दिसतात.' लोगन म्हणतो, ' आठ वर्षांपासून १३ वर्षांपर्यंतच्या मुलामध्येंही या रोगाचा फैलाव झाल्याचें मला आढळून आलें आहे.'—अर्थात् या मुलांना झालेला रोग त्यांच्या आई-बापांच्या पापाचें प्रायश्चित्त म्हणून असणार ही गोष्ट निर्विवाद आहे. याच वयाच्या मुलींमधूनहि या रोगाचा प्रसार झाला होता. हॅरो रस्त्यावर ' लॉक हॉस्पिटल ' नांवाची संस्था या अल्पवयी बाबा लोकांवर उपचार करण्यासाठीं उघडण्यांत आली.

## रंगभूमि आणि स्त्रियांची नीतिमत्ता

इंग्लिश स्त्री-जीवनांत नाट्य, नृत्य आणि संगीत यांनाही महत्त्वाचें स्थान आहे. या तीन व्यवसायांमध्यें स्त्रियांचा फार मोठा भरणा होता व अजूनहि

आहे. या धंद्यांतील स्त्रियांबद्दल सर्वसाधारण समज असा आहे कीं, त्या अनीतिमान असतात व बऱ्याच अंशांनीं तो खराहि आहे. नाट्यव्यवसायाचें वर्णन करतांना ' The arsenal of prostitution ' असें करण्यांत आलें आहे. स्त्रियांनीं इंग्लंडमध्यें रंगभूमीवर पदार्पण करून बराच काळ लोटला आहे. १७ व्या शतकापासूनच तेथें स्त्रिया रंगभूमीवर काम करीत आहेत. रंगभूमि हें स्वतःच्या सौंदर्याचें उत्तान प्रदर्शन करण्याचें उत्तम साधन आहे, अशी सर्व-सामान्य स्त्रियांची समजूत असल्यानें नाट्यसृष्टींत पदार्पण करतांना, कलेपेक्षां आपल्या हातीं चार गबर कुळें कशीं लागतील इकडे त्यांचें अधिक लक्ष असे. इंग्लिश स्त्रियांनीं रंगभूमीवर १६६० मध्यें प्रथम पदार्पण केलें. पुरुष नटवर्ग व रंगेल प्रेक्षक यांच्याशीं येणाऱ्या त्यांच्या संबंधामुळें त्यांचें वर्तन इतकें निर्लज्ज असे कीं, नटी म्हणजे वेश्यांची सुधारून वाढविलेली आवृत्ति असाच त्याचा अर्थ होई; आणि त्यामुळें वेश्यागृहांतून नटींचा भरणा होई तर नटीमधून वेश्यागृहांची भरती होई. हे धंदे एकमेकांस पूर्णपणें पूरक होऊन बसले होते ! रंगेल राजपुत्रांच्या जनानखान्यांमध्येंहि नटींना प्रवेश मिळे. रंगभूमीवरील 'हिरव्या खोलींत' शिरून नटींचा परिचय करून घेण्यासाठीं मोठमोठ्या सरदारदरकदारांमध्यें चढाओढ लागे व कित्येक वेळां त्याचें पर्यवसान द्वंद्वामध्यें अगर एकमेकांवर गोळ्या झाडण्यामध्यें होई. या 'हिरव्या खोली' चे अनाचार शेवटीं इतके वाढले कीं, ॲन राणीला पुढील जाहिरनामा काढावा लागला—

'That no person of whatever quality so ever presume to go behind the scenes or come upon the stage either before or during the acting of any play.'

## नाटकगृहें-नव्हे गिऱ्हाइकी शोधण्याचे अड्डे

गिऱ्हाईक संपादन करण्याच्या दृष्टीनें अनेक स्त्रिया नाटकगृहांतून झिम्मड उठवीत. नाटक पहाण्यापेक्षां गिऱ्हाईक पहाण्याचा त्यांचा अधिक उद्देश असल्यामुळें रंगभूमीवर काय चाललें आहे इकडे त्यांचें लक्षहि नसे. तत्कालीन नाटकांत अश्लीलता व कामोत्तेजकता भरपूर असल्यानें अशा स्त्रियांना एकप्रकारें मदतच होई. या कालांतील इंग्लिश जनतेची नाट्यविषयक अभिरुचि किती हीन होती याची कल्पना येण्यास 'लाइफ्स रीव्हेंज' या तत्कालीन अत्यंत लोकप्रिय नाटकावरील पुढील अभिप्राय पहाणें अत्यंत आवश्यक आहे—

'In one part of the play two women faught a duel with swords, and when one of them fell wounded to the ground her opponent fell upon her and throttled her before stabbing her to death, amid the vociferous applause of the audience. The audience consisted of men, women and children–and they always accompanied the proceedings on the stage with applause for the sympathetic–characters and boos and hissing for the villain; as children do in modern Cinema. The love making was to say the least unmistakable, the kisses with which the heroine rewarded the hero sounded like revolver shots, while her caresses might better be described as mauling.'

नटींचा पोशाख इतका तोकडा असे कीं, त्यावर टीका करतांना एकानें म्हटलें,

'Their clothes revealed more than they concealed.'

रोझेनबर्ग नांवाच्या जर्मन ग्रंथकारानें इंग्लिश नाटकगृहांमधून चाललेल्या इंग्लिश स्त्रियांच्या चाळ्यांचें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. तो म्हणतो, 'इंग्लिश नाटकगृहामध्यें जमलेल्या वेश्या व कुलीन स्त्रिया यांमध्यें भेदभाव करणेंच अशक्य आहे. कारण एखादी सरदार पत्नी वेश्यांच्या घोळक्यांत बसलेली दिसते, तर कित्येक कुलीन घराण्यांतील समजले जाणारे तरुण वेश्यांशीं प्रेमचेष्टा करीत बसलेले दिसतात; आणि याबद्दल कोणास खंत वाटत असल्याचेंहि दिसून येत नाहीं. पाचकळ व अश्लील विनोद आणि कोट्या इतक्या मोकळेपणानें चालू असतात कीं, इंग्लिश स्त्री–पुरुषांखेरीज इतरांनीं लाजेनें मानाच खालीं घालाव्यात.' नाटकगृहांतून चाललेल्या या उत्तान शृंगारामधून नुसतीं बडींबडीं धेंडेंच भाग घेत असें नाहीं, तर खुद्द राजघराण्यांपर्यंतहि कित्येक वेळां त्याचे धागेदोरे जात. चौथ्या एडवर्डनें मॅथ्यू शोअर नांवाच्या एका इसमाची नटी बायको आणून आपणापाशीं ठेविल्याची हकिकत प्रसिद्ध आहे. या प्रकारावरील कित्येक काव्येंहि पण प्रसिद्ध आहेत.

## कामुकतेचा नंगा नाच

१८ व्या आणि १९ व्या शतकांमध्यें नृत्यांगनांचा एक विशिष्ट वर्ग इंग्लंडमध्यें होता. रस्त्यांतून जाणाऱ्या येणाऱ्यांना आपल्या सौंदर्याचें प्रदर्शन दाखवून

त्या सडकांमधूनच नृत्य करीत, व कोणी पाशांत सांपडतो का पहात. अवरडीननें आपल्या 'इंग्लिश स्केचिस' या पुस्तकांत अशा स्त्रियांचीं वर्णनें दिलीं आहेत. सडकेंत त्यांचें नाचगायन सुरू होतांच स्वाभाविकच तेथें दहावीस तमासगीर गोळा होत. त्यांतील एखाद्याच्या गळयांत पडण्यासहि सदर स्त्रिया कमी करीत नसत. त्यामुळें अशा ठिकाणीं उभें राहणेंहि मोठें धोक्याचें असे. इंग्लंडमध्यें जत्रांचा प्रघात फार जुना आहे. या जत्रांमधूनसुद्धां अशा इंग्लिश स्त्रिया आपला धंदा इतर धंद्यांच्या बरोबरीनें चालवीत असत. या जत्रांमधून चालणाऱ्या प्रकाराचें वर्णन एका गृहस्थानें पुढीलप्रमाणें केलें आहे.–'या जत्रांमधून कशालाच बंदी नसे. वेश्यावृत्तीच्या स्त्रियांचे थवेच्या थवे या ठिकाणीं जमत व आपला व्यापार धडाक्यानें चालवीत. कित्येक अज्ञान कुमारिकांचेहि बळी यांत पडत. नव्या नव्या मालाची उठावणी करण्यासाठीं कित्येक बडे बापके बेटेहि त्यांत शिरत.

'It also happened that noted courtesans visited the fair in search of new physical sensations.'

तरुण मुली पुरविणारी बाजारपेठ म्हणून इंग्लंडची फार मोठी ख्याति या कालांत होती. सर्व युरोपला वेश्या पुरविण्याचा जणूं कांहीं मक्ताच इंग्लंडनें घेतला होता. क्लेबर्गनें आपल्या एका फ्रेंच मित्रास पाठविलेल्या पत्राचा पुढील सारांश पहा—'येत्या मंगळवारीं जेव्हां तूं आपला माल न्यावयास येशील त्या वेळीं मी तुला लंडनमध्यें भेटेन. या खेपेस सुंदर व खुमासदार माल तुला न्यावयास मिळणार आहे. शुभ्र दंतपंक्ति, लालचुटक ओंठ, उन्मत्त वक्षस्थलें–सौंदर्याचे उत्कृष्ट नमुने पैदा करून ठेविले आहेत मी तुझ्यासाठीं ! यांतील कांहीं हॉलंडलाहि पण पाठवावयाचे आहेत...इ. इ....'

**उडदामाजी काळे गोरे—**

इंग्लिश स्त्रियांच्या हिडिस जीवनक्रमाचें यथातथ्य चित्र रेखाटणें शब्दसृष्टीच्या अतीत होऊन बसतें कित्येक वेळां ! नृत्यकलेच्या नांवाखालीं इंग्लिश स्त्रिया सर्रास वेश्याव्यवसाय चालवीत असल्याचा किती तरी पुरावा उपलब्ध आहे. त्याचप्रमाणें 'ड्रायर्स बॅलेट' 'स्टॅटीर डान्स' यासारखे नृत्य प्रकार इतके किळसवाणें असत कीं, पहाणारांनासुद्धां लज्जेनें माना खालीं घालण्याचा प्रसंग

येई. इंग्लिश ललित कलेच्या प्रत्येक विभागांत स्त्रियांचा भाग असे आणि त्याच बरोबर अनैतिक संबंधहि असे. यामुळें कलेला कांहीं पावित्र्य असतें याची जाणीवच तेथें नसल्याचें स्पष्ट दिसून येई. छायाचित्रें घेण्याची कला निर्माण झाली मात्र, अश्लील चित्रांचा प्रचार इंग्लंडमध्यें इतक्या मोठ्या प्रमाणांत झाला कीं, पोलिसांना कित्येक स्टुडिओवर छापे घालून हजारों फोटोग्राफ जप्त करावे लागले. अनैतिक संबंधांच्या व अत्याचारांच्या ठराविक जागाच ठरविणें अशक्य झाल्यानें यासंबंधीं एक सर्वसाधारण नियम म्हणून पुढील कायदा इंग्लंडमध्यें पास करून घेण्यांत आला—'लंडन व वेस्ट मिनिस्टर या सभोंवतालच्या सुमारें वीस मैलांच्या टापूंत कोणत्याहि घरांत, बागेंत अगर सार्वजनिक जागेंत सरकारी परवान्याशिवाय नृत्य, संगीत वा इतर सामुदायिक करमणुकीचे कार्यक्रम करण्यांत आल्यास त्या ठिकाणीं अनैतिक प्रकार घडून आले असें गृहित धरण्यांत येऊन त्यामध्यें भाग घेणाऱ्यांना कमींत कमी १०० पौंड दंड करण्यांत येईल.' या कायद्यान्वयें १८ व्या शतकाच्या शेवटीं शेवटीं, पानगृहें, क्लब इत्यादि कित्येक रंगेल अड्ड्यांचे बळी घेण्यांत आले. अशा ठिकाणीं अज्ञान मुलींवर होणाऱ्या अत्याचारांची संख्या अतोनात होती व हे अत्याचारहि पण मोठ्या क्रूरपणानें करण्यांत येत असत. अशा अत्याचारासाठीं मुद्दाम तळघरें बांधलेलीं असत. त्यामुळें या रानटी पशूंच्या तावडींत सांपडलेल्या गाईंचे हंबरडे सहसा बाहेर ऐकूं येत नसत. लंडनच्या पश्चिम भागांत बंगला असलेली या धंद्यांतील एक बाई यासंबंधीं लिहिते—'बिचारीनें खुशाल टाहो फोडावा. तिचा आक्रोश तुमच्याखेरीज दुसऱ्या कोणाच्याहि कानावर जाणार नाहीं असा बंदोबस्त येथें आहे.' लिव्हरपूल येथील एक हकिकत या ठिकाणीं उदाहरणादाखल नमूद करावीशी वाटते. आपल्या श्रीमान गिऱ्हाइकाला खुष करण्यासाठीं एका चांगल्या प्रतिष्ठित स्त्रीनें १४।१५ वर्षांची एक मुलगी फूस लावून घरीं आणली, तिला पलंगावर बांधून घातलें व सदर गृहस्थाकडून तिच्यावर अत्याचार करविला. बिचारीला ओरडण्याखेरीज प्रतिकाराचें दुसरें साधनच शिल्लक राहिलें नाहीं. पण तिच्या ओरडण्यानेंसुद्धां आपणांस एक प्रकारचें सौख्यच वाटलें अशी निर्लज्ज कबुली सदर गृहस्थानें दिली.

इंग्लिश समाजामध्यें अवघ्या पन्नास वर्षांपूर्वी स्त्रियांना कोणती वागणूक मिळे व त्यांच्या जीवनक्रमाची एकंदर दिशा काय होती याचें स्पष्टीकरण करण्यासाठीं

आम्हाला ही सारी उसाभर करावी लागली. पण ही गोष्ट अपरिहार्य असल्यानें त्याबद्दल आम्हांस कांहींच खंत मात्र वाटत नाहीं. इंग्लंडमधील प्रत्येक घर म्हणजे लैंगिक अनीतीचें प्रतीक होऊं पहात होतें. त्यामुळें लैंगिक अनाचारावर नियंत्रण करण्यासाठीं पोलिसांना जादा अधिकार देऊनहि त्याचा उपयोग होण्याचें काडीमात्र चिन्ह दिसेना, कारण खुद्द पोलिसच अशा गुन्ह्यांत सहभागी होण्यास कमी करीत नसत. स्टीड तर म्हणे, पोलीस हे तर कुंटणखान्याचे खरे संरक्षणकर्ते! कित्येक वेळां तर पोलिसांचे हातून गरीब स्त्रियांची सुटका करण्याचा प्रसंग इतरावर येईल. या कालांतील पोलीस बुद्ध्याच अविवाहित रहात आणि मग परस्पर गरीब स्त्रियांवर अत्याचार करून आपली गरज भागवीत.

## आजच्या बाह्य देखाव्याला भुलूं नका!

इंग्लिश स्त्री–जीवनाचें हें बीभत्स चित्र कोणी अपवादात्मक उदाहरणावरून तयार केलें आहे असें म्हणतील; पण तसें नसून स्त्री–समाजाचें हें यथातथ्य चित्रण आहे. लैंगिक आचारविचाराबाबत माजलेला स्वैराचार व निर्लज्जता इतकी पराकोटीला पोहोंचली होती कीं, सर्व युरोपमध्यें इंग्लंडचें बदनाम झालें होतें. हिंदी स्त्रीवर पुरुषवर्गाकडून होणाऱ्या अत्याचारांचीं भडक काल्पनिक वर्णनें करून हळहळणाऱ्या इंग्लिश स्त्री–पुरुषांना, विशेषतः स्त्रियांना असा सवाल विचारावासा वाटतो कीं, अवघ्या अर्ध शतकापूर्वी अल्पवयी कुमारिका सरास भ्रष्ट करण्याचा प्रघात कोणत्या देशांत होतात? चोर, खिसेकापू, गळेकापू, भ्रूणहत्त्या करणारे नरराक्षस यांच्या तावडींत सांपडलेला बहुजन स्त्रीसमाज कोणत्या देशांत वावरत होता? स्त्रियांची खरेदीविक्री, त्यांना मारहाण, अपत्यवध अशा अनेक हीन कृत्यांनीं बरबटलेला आयुष्यक्रम व्यतीत करणारी इंग्लिश स्त्री कोणत्या तोंडानें आम्हांला नांवें ठेवते हेंच कळत नाहीं. 'ढोंग हा इंग्लिशांचा राष्ट्रीय गुण आहे.' असें एका गृहस्थानें म्हटलें आहे तें कांहीं खोटें नाहीं. हिंदी स्त्रीच्या अज्ञानाला हंसणाऱ्या इंग्लिश स्त्रिया मध्य युगापासून शिक्षण संस्थांत शिक्षण घेत आहेत; पण त्यांच्या शिक्षणाची सोय करणाऱ्या संस्था, संस्थेंत येणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या बेवारस प्रजेची निगा राखतां राखतां टेकीस येत. कित्येक अर्भकांची गुप्तपणें वासलात लावण्यांत येई. या संस्थांच्या मागील अंगणांत पुढें पोलिसांना लहान मुलांचे असंख्य सांगाडे सांपडले! इंग्लिश स्त्री–वर्गाच्या दुर्दशेमधूनच स्त्री–दास्य–विमोचनाच्या चळवळीचा जन्म झाला व तिनें

आजचें रूप धारण केलें. रूसोच्या लिखाणाचीहि अप्रत्यक्ष मदत या कामीं झाली. स्त्री-दास्य [?] विमोचनाचे विरुद्ध त्याची विचारसरणी असूनहि त्याच्या व्यक्तिविकासाच्या कल्पनांनीं इंग्लिश 'स्त्री-हितवाद्यांच्या' चळवळीला हातभार लावला. आजची इंग्लिश स्त्री पाहून अर्ध शतकापूर्वीच्या इंग्लिश स्त्रीची कल्पना करूं असें कोणी म्हटल्यास तें अशक्य आहे. या दोन स्त्रियांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर जरूर आहे. याचा अर्थ इंग्लिश स्त्रीचा स्वभाव बदलला आहे असें नाहीं. तिच्या एकंदर बाह्यदेखाव्यांत फरक पडला आहे एवढेंच! रस्तोरस्तीं चाललेले त्यांचे उत्तान शृंगाराचे चाळे आतां शिष्टाचाराचे पडद्याआड चालतात, बाजारांत चाललेली त्यांची खरेदी विक्री आतां न्यायालयाचे शिष्टसंमत दालनांत चालते, एवढेंच! असो. आतां पुढील प्रकरणांत आधुनिक इंग्लिश स्त्रीचें जीवनचित्र आपणांस रेखाटावयाचें आहे. तत्पूर्वी या दोन प्रकरणांमध्यें आम्हाला आमच्या आंग्लभगिनींचें जें चित्र रेखाटावें लागलें तें कितीहि हिडीस असलें तरी सत्यान्वेषणाच्या बुद्धीनें तें रेखाटलें गेलें आहे. त्यांत कोणताहि कुत्सित भाव नव्हता व नाहीं एवढेंच नम्रपणें सुचवावेंसें वाटतें.

---

## आजच्या चळवळींचें बीज

इंग्लीश स्त्रियांच्या चालू स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा विचार करतांना १९ व्या शतकांतील शेवटच्या २५ वर्षांचा इतिहास सूक्ष्मपणें अभ्यासावा लागतो. या कालांतील इंग्लिश स्त्रीची दुर्दशाच कांहीं अंशीं त्यांच्या आजच्या स्थितीस कारणीभूत झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. गेल्या दोन प्रकरणांमधून रेखाटण्यांत आलेल्या इंग्लिश स्त्री–जीवनाच्या चित्राची पूर्तता एकोणिसाव्या शतकांतील शेवटच्या २५ वर्षांचें परीक्षण केल्यावांचून होऊं शकत नाहीं. याच कालांत विसाव्या शतकांतील स्त्रीहितवर्धक कायद्यांचें व चळवळींचें बीज आहे आणि म्हणून या कालाचें थोडेंसें विस्तारपूर्वक परीक्षण करणें अवश्य आहे. स्त्री-पुरुषांच्या लैंगिक संबंधाबाबत आजच्या इंग्लिश स्त्रीनें मिळविलेले हक्क म्हणजे या कालांतील स्त्रियांच्या तपश्चर्येचें फळ होय, हें विसरून भागणार नाहीं. स्त्री–पुरुषांना निदान लैंगिक व्यवहाराबाबत तरी समान हक्क असावेत, या विचाराची भूमिका याच कालांत इंग्लंडमध्यें तयार झाली; आणि ती तशी होण्यांत अनेक कारणेंहि पण घडलीं. कायदे करून स्त्रियांवरील जुलूम नष्ट करावेत अशी मागणी प्रथम याच कालांत झाली. लोकमत तयार करण्याच्या खटपटी प्रथम याच कालांत विशेष जोरानें सुरू झाल्याचें दिसतें. १९१८ सालीं, महायुद्धानंतर इंग्लिश स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त होऊन त्यांच्या जीवनांत बरीच मोठी क्रांति झाली; परंतु १९१८ सालीं प्राप्त झालेले हक्क निव्वळ महायुद्धाच्या कालांत झालेल्या घडामोडींचेंच दृश्यफल नसून त्याची पूर्वपीठिका त्याच्याहि पूर्वी सुमारें ५० वर्षें जाते. १८६४–१८६६–१८६९ या सालीं तीन कायद्यांची भर इंग्लिश कायद्यामध्यें घालण्यांत आली आणि ती निव्वळ स्त्रीहितवर्धनासाठीं. या कायद्यांचा

उद्देश स्त्रियांना कोणतेंहि राजकीय अगर सामाजिक हक्क प्राप्त करून देण्याचा नव्हता; फक्त दुष्ट अशा गुप्त रोगांच्या अमर्याद प्रसारापासून इंग्लिश जनतेचें रक्षण व्हावें एवढाच हेतु त्यांत होता. परंतु या कायद्यांचा जो अप्रत्यक्ष परिणाम इंग्लिश स्त्री-समाजावर झाला तीच इंग्लिश स्त्री-जीवनांतील प्रथम जबाबदार क्रांति म्हणावयास हरकत नाहीं. या कायद्याचें स्वरूप वेश्यांपुरतें मर्यादित असें जरी असलें तरी, वेश्याजीवन आणि सामान्य स्त्रीजीवन यांमधील भेददर्शक असा जीवनक्रमच इंग्लंडमध्यें त्या काळांत जवळ जवळ नष्टप्राय झाला असल्यानें सर्वसाधारणपणें सर्वच स्त्रियांना या कायद्यांच्या कक्षेंत यावें लागलें. या कायद्यानें वेश्यांवर जे निर्बंध घालण्यांत आले, त्यांच्या निषेधार्थ स्त्रियांनीं प्रथम उचल खाल्ली; कारण त्यांचें म्हणणें असें कीं, रोगप्रसाराला स्त्रियाइतकेच पुरुष जबाबदार असल्यानें फक्त स्त्रियांचे बाबतच कडक निर्बंध घालणें म्हणजे शुद्ध अन्याय आहे. वेश्या आणि त्यांचा उपभोग घेणारे या दोघांनाहि एकाच पातळींत ठेवून कायद्याची अम्मलबजावणी व्हावी, अशा अर्थाची मागणी सार्वजनिक सभा भरवून स्त्रियांचेकडून करण्यांत आली. आपल्या हक्कांसाठीं सामुदायिक रीतीनें झगडण्याचा इंग्लिश स्त्रीचा हा प्रथम प्रयत्न म्हणावयास हरकत नाहीं. खालच्या वर्गांतील स्त्रियांमध्यें वेश्याव्यवसायाचा इतका प्रसार झाला होता कीं, या कायद्यान्वयें त्या वर्गांतील प्रत्येक स्त्री अपराधी ठरूं लागली. या अन्यायाचें परिमार्जन करण्यासाठीं 'लेडीज नॅशनल असोसिएशन' या संस्थेची पुढारी जोसेफाइन बटलर हिनें सुरवात केली. स्त्रियांवर अगदीं एकतर्फी होत असलेल्या या अन्यायाविरुद्ध तिनें बरीच ओरड केली. तिचा परिणाम होऊन १८७१ सालीं या कामीं चौकशी करण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशनपुढें साक्ष देतांना एक गृहस्थ म्हणतो, 'मिसेस बटलरच्या प्रचारानें लोकांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला आहे. स्त्रियांना ज्या गोष्टी कधींहि कळल्या नसत्या त्या त्यांना आतां पूर्णपणें समजूं लागल्या आहेत.' याच कमिशनपुढें साक्ष देतांना मिसेस बटलर म्हणते 'पुरुषांच्या दुर्गुणाबद्दल कायदा बेफिकीर आहे, त्याचा सारा कटाक्ष काय तो आम्हां स्त्रियांवर!' वर नमूद केलेल्या कायद्यान्वयें वेश्यावृत्तीचा अवलंब करणाऱ्या स्त्रियांची वैद्यकीय तपासणी व्हावी असें ठरविण्यांत आलें, त्यामुळें स्त्रियांच्या स्वाभाविक विनयशीलतेला धक्का बसतो असें कांहीं लोकांचें मत पडलें; दुसरे

म्हणजे यामुळें अमुक अमुक स्त्री वेश्या आहे असा जाहीरनामा लागतो. परंतु कमिशनपुढें आलेल्या साक्षिदारांनीं या दोन्ही आरोपांचें निरसन करतांना सांगितलें, 'अशा स्त्रियांना विनय असतो म्हणणें म्हणजे शुद्ध वेडेपणाच आहे. त्यांच्यापाशीं विनय नाहीं, स्त्रीत्व नाहीं; लाज त्या केव्हांच कोळून प्यालेल्या आहेत. वैद्यकीय तपासणींत कांहीं कमीपणा, लाज वाटण्याजोगी वृत्ति त्यांच्यापाशीं मुळींच नाहीं.'

## संमती-वयाचा कायदा

याच कालांत संमती वयाचा प्रश्न चर्चेला निघाला. १२ व्या वर्षीं मुली 'स्त्रिया' या सदरांत मोडूं शकतात, असा त्या वेळीं इंग्लिश कायदा होता. १८७१ च्या रॉयल कमिशननें हा प्रश्न विचारांत घेण्याचें ठरविलें. त्या वेळीं साक्ष देतांना मिसेस बटलर म्हणाली, 'सध्यां १२ वर्षांची मुलगी स्त्रींत जमा होते व तिच्यावर कोणी अत्याचार केल्यास तो अल्पवयी मुलीवर झाला असें समजण्यांत येत नाहीं, यामुळें बारा वर्षांच्या कोवळ्या मुलीवर अत्याचार करण्याचा प्रघात सर्रास सुरू आहे. एकदां बळी पडलेल्या या मुली सरळ सडकेवर येऊन वेश्यावृत्तीचें प्रदर्शन करीत पोट जाळतात. कायद्यानें त्यांना कोणतेंहि संरक्षण दिलेलें नाहीं. प्रत्यक्ष आईबाप आपल्या या अल्पवयी मुलींना कुंटणींना विकून पैसे घेतात. १२ ते १७ वर्षांपर्यंतच्या हजारों मुली आज उघड उघड वेश्या म्हणून दाखल केल्या जात आहेत, आणि १५ ते १८ वर्षांपर्यंतची पोरेंही पण त्यांचा उघड उघड उपभोग घेतांना दृष्टीस पडत आहेत.' या कालांत इंग्लंडमध्यें खलाशी व सोजीर यांचा फार पुंडावा असे. साम्राज्याची वाढ कमालीची झाली असल्यानें व त्याच्या वृद्धीची आणि संरक्षणाची जबाबदारी या दोन वर्गांवर असल्यानें त्यांना भलतेंच महत्त्व इंग्लंडमध्यें प्राप्त झालें होतें. रजेवर असलेले शिपाई व खलाशी मदिरा व मदिराक्षी याशिवाय दुसऱ्या गोष्टी जाणतच नसत, आणि त्यामुळें हजारों स्त्रिया त्यांच्या आसुरी तृष्णेला हातोहात बळी पडत. या नरपशूंच्या तावडींत त्यांचे काय हाल होत याचें वर्णन करतांना एक गृहस्थ म्हणतो,

'When a woman becomes a soldier's prostitute, she could scarcely become anythlng lower; it was almost the lowest grade in human existence.'

## अविवाहित मातांचे हाल !

१८५८ च्या विवाह व काडीमोडीच्या कायद्यान्वयें स्त्रियांना काडीमोड मिळे, पण त्यांत पुरुषाइतक्या सवलती मात्र त्यांना नसत. पुरुष स्त्रीच्या बदफैलीपणाचा एखादा दाखला पुढें करून काडीमोड मिळवूं शके; पण स्त्रीला त्याचा नुसता बदफैलीपणा शाबीत करून चालत नसे, त्याचबरोबर तिला मारहाण, टाकून देणें इत्यादि गुन्ह्यांचीहि शाबिती करून दाखवावी लागे तरच काडीमोड मिळे. अविवाहित मातांचे हाल तर या कालांत कुत्राहि खात नसे; कित्येक माता तर अगदीं अल्पवयी असत. बारा हें संमती वय बदलून १८७५ सालीं फक्त तेरा करण्यांत आलें, त्यामुळें ११ ते १३ वर्षांपर्यंतच्या मुली फूस लावून अगर अन्य उपायांनीं सर्रास भ्रष्ट करण्यांत येत. कित्येक वेळां अशा संभोगामुळें त्यांना अल्पवयांतहि संतति होई. १८७३ च्या पूर्वी अशा पोरींना झालेल्या बेवारस संततीला कायद्यानें कांहींच संरक्षण दिलें नव्हतें. विशेषतः शिपाई अगर खलाशी या जावई खात्यांतील लोकांना याबाबत कोणतीच तोशीस देण्यास सरकार तयार नव्हतें. सामान्य नागरिकाकडून ही संतति झाली असेल तर मात्र आठवड्यास २॥ शिलिंगप्रमाणें पोटगी संततीच्या योग्य पित्याकडून तिला देवविली जात असे, व ती त्या मुलाला १३ वर्षें होईपर्यंत मिळे; परंतु मध्यंतरींच्या कालांत आईनें लग्न करतां कामा नये अशी अट असे. या कायद्यांत पुढें सुधारणा होऊन पोटगी आठवड्यास ५ शिलिंग करण्यांत आली व ती मुलाला १६ वर्षें होईपर्यंत देण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें. या कायद्यासंबंधीं पार्लमेंटमध्यें वादाविवाद सुरू असतां डॉ. लियान प्लेकेअर म्हणाला, ‘ या देशांत दरसाल जन्माला येणाऱ्या ५० हजार बेवारस मुलांपैकीं सुमारें ३० हजार पहिलें वर्ष पुरें होण्याच्या आंतच मृत्युमुखीं पडतात, याचें कारण योग्य संरक्षणाचा अभाव हेंच होय ! ’ १८७३ च्या कायद्यान्वयें शिपाई व खलाशी यांना मिळालेली सवलत काढून घेण्यांत येऊन त्यांचें पितृत्व शाबीत होतांच त्यांच्याकडूनहि पोटगी घेण्यांत यावी असें ठरविण्यांत आलें.

## संमतिवय आणि अल्पवयी मुलींचा व्यापार

मुलींच्या व्यापारांबद्दल मागें एकदां उल्लेख करण्यांत आलाच आहे. अल्पवयी मुलींच्यावर होणारे अमर्याद अत्याचार थांबावेत म्हणून संमती वय बाराचें

चौदा करण्यांत यावें अशी मागणी करण्यांत आली, पण पार्लमेंटनें ती फेटाळून लावून १८७५ सालीं तें फक्त तेरा केलें. संमतीवयाच्या प्रश्नाचा निकाल समाधानकारक लागावा म्हणून मिसेस बटलरनें खूप खटपट केली व पुष्कळ पुरावाहि पुढें आणला. त्यांत या अल्पवयी मुलींची, युरोपांतील इतर देशासाठीं कशी सरांस विक्री केली जाते याचा उलगडाहि तिनें केला. मिसेस बटलरचा पुरावा खोटा असल्याचा गंभीर आरोप खुद्द पोलिसांकडूनाहि करण्यांत आला व अशा तऱ्हेचीं विधानें न करण्याबद्दल तिला समजहि देण्यांत आली. पण तिनें शपथेवर आपला पुरावा शाबीत करून देण्याची घोषणा केली व पुष्ट्यर्थ आणखी कित्येक गोष्टी पुढें आणल्या. इंग्लिश मुलींना प्रथम ब्रुसेल्समध्यें पाठविण्यांत येत असे, या गोष्टीचा मागें एके ठिकाणीं उल्लेख करण्यांत आलाच आहे. मिसेस बटलरनें ती गोष्ट पुराव्यानिशीं पुढें मांडतांच सरकारनें बॅरिस्टर स्नॅगी या गृहस्थाला अधिकृत रीत्या चौकशी करण्यासाठीं ब्रुसेल्सला पाठविलें. त्यानें आपल्या निवेदनामध्यें मिसेस बटलरच्या गंभीर आरोपांना पुष्टी तर दिलीच, पण शिवाय असें नमूद केलें कीं, इंग्लंडहून पाठविण्यांत येणाऱ्या मुली सर्व चांगल्या असतात, ब्रुसेल्समध्यें आल्यानंतर त्यांच्यावर अनन्वित अत्याचार करण्यांत येतात. आपल्या निवेदनांत शेवटीं तो म्हणतो,

> 'I have to report that, the life of the women who are immured within these 'mansions de debauche' is practically, a form of captivity which is enforced by several different means.'

इंग्लिश कायद्यामध्यें या व्यापाराला बळी पडणाऱ्या मुलींच्या संरक्षणाची कांहींच सोय नसल्यानें फिरून १८८१ सालीं याबावत रॉयल कमिशनची नेमणूक करण्यांत आली. एक वर्षपर्यंत चौकशी करून या कमिशननें परदेशांत पाठविल्या जाणाऱ्या इंग्लिश मुलींच्या जीवनावर व त्या व्यापारावर बराच प्रकाश पाडला, पण त्याचबरोबर देशांत चाललेला सावळागोंधळहि उजेडांत आणला. या कमिशननें आपल्या निवेदनांत स्पष्ट लिहिलें कीं, युरोपांतील वेश्यागृहें भरण्यासाठीं २१ वर्षांचे आंतील कित्येक इंग्लिश मुली दरसाल विकल्या जातात. या विक्रेत्यांना दर मुलीगणिक सुमारें आठ ते बारा पौंड मिळतात. भीति, अज्ञान, दारिद्य

इत्यादि अनेक कारणांनीं या अडत्यांच्या तावडींत सांपडलेल्या मुली सुटूंच शकत नाहींत. इंग्लंडमधील एकंदर परिस्थितीसंबंधीं या निवेदनांत पुढीलप्रमाणें विधान आहे—

'The evidence before the committee proves beyond doubt that juvenile porstitution from an almost incredibly early age is increasing to an appalling extent in England and especially in London.'

हॉवर्ड व्हिन्सेंट या पोलिसांच्या प्रमुखाकडून पुढें आणण्यांत आलेल्या पुराव्यावरून असें आढळून आलें कीं, बारा वर्षांच्या मुलीसुद्धां सर्रास वेश्या-व्यवसाय करतात, आणि रस्त्यामधून त्यांचा धिंगाणा इतका चालतो कीं, सभ्य स्त्री–पुरुषांना जा ये करणें ही अशक्यप्राय होऊन बसते.

[ From 3 o'clock in the afternoon it is impossible for any respectable man or woman to walk from the top of Hay–market to Willington street strand ].

सेंट जेम्स परगण्याचा अधिकारी म्हणतो,

'In each of the rooms in that house I found an elderly gentleman in bed with two of these children.'

एलिस हॉप्किन् ही प्रत्यक्ष आपण पाहिलेली हकिकत निवेदन करतांना म्हणते,

'In one week I had to do with three children, one was 12 years of age, who was a prostitute; another was nine years of age who was a prostiutute, so diseased that she never reached the Christian home that I provided for her; the third was of 9 and was mother at that age, that was a most exceptional case.'

ही कबुली इतकी स्पष्ट आहे कीं, यासंबंधीं अधिक टीका करीत बसण्याचें आम्हांस कारणच दिसत नाहीं. याशिवाय अशा प्रकरणांकडे पोलीस कसा काना डोळा करतात हें सांगतांना सदर बाई म्हणते,

'The last child was out–raged and the police in this case allowed the man to escape under their very eyes.'

न्यायाधीशांनाहि या बाबत छेडण्यास तिनें कमी केलें नाहीं. ती म्हणते—

'The magistrates too were found indifferent.'

वेश्याव्यवसायाला भराभर बळी पडणाऱ्या असंख्य अल्पवयी कुमारिकांना कायदेशीर संरक्षण मिळावें म्हणून अनेक खटपटी झाल्या; पण १८८३ पर्यंत म्हणावें तसें यश पदरांत पडलें नाहीं. या खटपटी करण्यामध्यें मिसेस बटलर-बरोबरच स्टीड या 'पालमाल गॅझेट'च्या संपादकाचाहि उल्लेख करणें प्राप्त आहे. स्टीडवर करण्यांत आलेल्या आरोपांची व त्याला झालेल्या शिक्षेची हकिकत मागें सांगण्यांत आलीच आहे. लंडन येथील बड्या लोकांचीं कित्येक गुप्त कृत्यें त्यानें वेशीवर टांगल्यामुळें चांगल्या चांगल्या बड्या धेंडांची त्याच्यावर खप्पा मर्जी झाली व त्याचाच परिणाम त्याला भोगावा लागला. पण त्याच्या लिखाणाची बहुजनसमाजावर बरीच छाप पडून मोठी खळबळ उडाली व शेवटीं सरकारला कायद्यांत दुरुस्ती करण्याचा विचार करणें भाग पडलें आणि अल्पवयी मुलींना संरक्षण देण्याच्या हेतूनें त्याची पुनर्घटना करण्याचें घाटूं लागलें. मिसेस जेलिझ या नांवाच्या एका स्त्रीवर कुंटणखाना चालवून अल्पवयी मुलींचा व्यापार केल्या-बद्दल खटला घालण्यांत आला, या खटल्याची हकिकत प्रसिद्ध करतांना स्टीड म्हणतो, 'राजपुत्र, सरदार, राजमंत्री असलीं बडींबडीं धेंडें तिचीं गिऱ्हाइकें आहेत. यांत पार्लमेंटचे कित्येक सभासदहि पण आहेत. परदेशस्थ बड्या धेंडांनाहि माल पुरविण्याचें काम ही स्त्री करते.' याच खटल्यासंबंधीं आणखी एक गृहस्थ म्हणतात—

'To our own infinite horror and disgust, names of certain of the greatest in the land are at this hour openly mentioned in connection with the filthiest debauchery. Deep in our shame when we know that our judges are not clear in this matter, but social purity has been put to the blush by magistrates of mean degree; yet it is said that the courts of justice have lent themselves to the covering and hushing up of the inequities of the great.........'

स्त्रियांचीं दुःखें बहुजनसमाजाचे नजरेस आणून त्यांवर प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठीं स्टीडनें अतोनात खटपट केली, पण शेवटीं त्यांत त्यास तुरुंगवासहि पत्करावा लागला. पण त्यानें आपलें कार्य सोडलें नाहीं. त्याला शिक्षा झाल्या-नंतर मिसेस हेन्री फॉसेट नांवाची बाई एका सभेंत त्याच्यासंबंधीं धन्योद्गार काढतांना म्हणाली—'या शूर इंग्लिश गृहस्थानें आपलें स्वातंत्र्य आणि कीर्ति

पणाला लावून जगांतील अत्यंत हीन अशा व्यापाराला पायबंद घालण्यासाठीं शक्तिसर्वस्व एकवटून आघात केला आहे.'

[ The hero i. e. English-man who risked his liberty, his fair name and all that a man holds dear, for the sake of dealing a heavy blow at the most devilish traffic which exists in the world. ]

## लैंगिक व्यवहारांत समता

इंग्लिश स्त्रीहितवर्धक चळवळीचें खरेंखुरें श्रेय स्टीडला देण्यास मुळींच हरकत नाहीं. स्टीडच्या एकंदर उलाढालींचा परिणाम म्हणजे इंग्लिश समाजाला उपलब्ध झालेलें व त्याला नवें वाटणारें एक तत्त्व होय आणि तें म्हणजे 'लैंगिक व्यवहाराबाबत तरी स्त्री-पुरुष समान धरण्यास हरकत नाहीं' हें होय. नाहीं तर स्त्रीनें पुरुषांच्या वासनेला, इच्छा असो वा नसो बळी पडावें असा गुलामगिरीचा प्रकार अद्यापपर्यंत चालत आलेला होता. स्त्रिया ह्या गुलाम समजल्या जाऊन लैंगिक व्यवहार अनिर्बंधपणें केले जात, पण लैंगिक व्यवहारांत स्त्री-पुरुष एकमेकाला सारखेच पूरक असल्यानें याबाबत तरी समतेचें तत्त्व अंमलांत यावें व एकाचा जुलूम दुसऱ्यावर होऊं नये अशी विचारसरणी पुढें आली. विवाहोत्तरहि पुरुष धनी व स्त्री दासी हा जो प्रकार होई त्याविरुद्ध बंडाळी करण्याची सिद्धता स्त्रियांनीं व स्त्रीहितेच्छु पुरुषांनीं केली. त्यांचा सर्व रोष पूर्वीच्या कायद्याविरुद्ध होता. गुप्तरोग प्रतिबंधक कायद्यामध्यें प्रामुख्यानें स्त्रीला दोष देण्यांत येई. या नवीन विचारसरणीच्या प्रमुखांनीं प्रथम या कायद्यावर हल्ला चढविला. लैंगिक व्यवहारांत दोघांनाहि सारखेंच प्राधान्य असल्यानें या रोगप्रसाराच्या कामीं दोघांनाही सारखेच दोषी धरण्याचा आग्रह या मंडळींनीं धरला. १८७० पासून १८९० पर्यंत सुमारें २० वर्षें इंग्लंडमध्यें हा झगडा सुरू होता. इंग्लिश स्त्रीसमाजाची या काळांतली स्थिति पाहिली म्हणजे हिंदी स्त्री सुखांतच होती व आहे असें म्हणावें लागेल. स्त्रीपुरुष समतेची चळवळ या काळांत सुरू करणाऱ्या व्यक्तींपैकीं आज कोणी फारशा हयात नाहींत, पण त्यांनीं टाकलेल्या बीजाचा वृक्ष मात्र आज इंग्लंडमध्यें तयार झालेला दिसत आहे. स्त्रियांची स्थिति सुधारावी, त्यांना राजकीय, सामाजिक हक्क मिळावेत म्हणून गेल्या ५० वर्षांत झालेल्या सर्व चळवळींत पुरुषांचा मोठा

भाग आहे ही गोष्ट नाकबूल करून चालवयाचें नाहीं. इंग्लिश स्त्रीहितवादाच्या चळवळीनें आजची स्त्री आणि ४०–५० वर्षांपूर्वीची स्त्री यामध्यें महद्‌तर निर्माण करून ठेविलें आहे. विशेषतः अल्पवयी मुलींवर जसे अत्याचार होत तसे अल्पवयी मुलांवरहि होत. पण या अत्याचारांपासून त्यांची आतां मुक्तता झाली आहे; १९३३ च्या कायद्यानें मुलांना १७ वर्षांपर्यंत सरसहा संरक्षण देण्यांत आलें.

## वेश्यागृहांचें कडक नियंत्रण

वेश्यागृहें आतां बेकायदेशीर ठरलीं आहेत. अद्यापहि जी अस्तित्वांत आहेत त्यांवर सरकारची करडी नजर आहे. कायद्याच्या कक्षेत येणारा गुन्हा घडल्याचा किंचितहि संशय येतांच त्यांचे बारा वाजविण्यांत येतात. १८७५ पर्यंत वेश्यागृहें अवश्य म्हणून समजलीं जात, पण आतां वेश्यागृहें चालविणारास तर शिक्षा आहेच, पण अशा कामासाठीं जागा भाड्यानें देणारालाहि शिक्षा आहे. १९१२ आणि २२ मध्यें वेश्यागृहें बंद करण्यासंबंधाचे कायदे अधिक कडक करण्यांत आले व १९२८ सालीं या कामीं कुचराई केल्याबद्दल कित्येक पोलिस अधिकाऱ्यांना व पोलिसांना कामावरून कमी करण्यांत आलें. या कायद्यान्वयें इंग्लंमध्यें दरसाल सुमारें २५० व स्कॉटलंडमध्यें सुमारें ४० खटले भरण्यांत येतात. १९२८ सालीं सडकेवर होणाऱ्या गुन्ह्यांची चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली. कारण या काळामध्येंसुद्धां वेश्यांचे चाळे भर सडकेवर सुरू असत. त्यामुळें सभ्य स्त्रीपुरुषांची फजिती होण्याचा प्रसंग कित्येक वेळां येई. १९३३ सालीं इंग्लंडमधून परदेशी पाठविल्या जाणाऱ्या मुलींच्या व्यापारावर निर्बंध घालण्यासाठीं एक कायदा पास करून घेण्यांत आला व त्यान्वयें या व्यापारांत अंग असणाऱ्या लोकांना कडक शासन करण्याचें ठरविलें. १९३३ सालीं हा कायदा इंग्लंडमध्यें पास करून घेण्याची जरूरी भासली, याचा अर्थ हाच कीं, स्त्रीस्वातंत्र्याच्या लंब्या चौड्या गप्पा मारणाऱ्या इंग्लंडमध्यें हा नीच व्यापार अद्यापहि थोड्याफार प्रमाणांत का होईना पण सुरू आहे. कायद्याच्या जोरावर वेश्याव्यवसायाचें संपूर्ण उच्चाटण करण्याची भाषा बोलणारे लोक आज इंग्लंडमध्यें आहेत.

अमेरिकेनेंहि हा प्रयोग करून पाहिला. वेश्याव्यवसायासाठीं स्वतःला वाहून घेणाऱ्या स्त्रीला शासन करण्याचा कायदा अमेरिकन सरकारनें पास केला, पण

याचा परिणाम मात्र उलट भयंकरच झाला. पोलिसापासून तों तहत न्यायाधीशापर्यंत सरसकट लांचलुचपतीचे व्यवहार सुरू झाले. अशा खटल्यांचा निवाडा देण्यासाठीं मुद्दाम तयार करण्यांत आलेलीं न्यायालयें शेवटीं बंद करून टाकावीं लागलीं. कुंटिणी वेश्याव्यवसाय तर चालवीतच, पण शिवाय लांचलुचपतीच्या जोरावर सरकारी नोकर वर्गांचीहि नीतिमत्ता बिघडवून टाकीत. १९३२ सालच्या निवेदनांत यासंबंधीं म्हणण्यांत आलें,

'Everyone connected with it, from District Prosecutor down to the police were receivng bribes.'

वरील प्रयोगासंबंधींचा अभिप्राय व्यक्त करतांना म्हणण्यांत आलें,

'Far from improving the moral condition of the city (New-York), everything was made worse, men were solicited by taxi-drivers and hotel porters and pages and other male touts who received commission for bringing customers to brothels.'

कांहीं असलें तरी इंग्लंडमधील स्त्रीपुरुषांच्या लैंगिक आचारांना कांहीं तरी आळा बसावा या हेतूनें ज्या खटपटी झाल्या त्यामुळें इंग्लिश स्त्रीची थोडी फार सुटका झाली यांत शंका नाहीं, व आतां तरुण स्त्रीपुरुषांना समतेच्या नात्यानें एकमेकांकडे पहातां येऊं लागलें. संतति-नियमनाच्या साधनांच्या आगमनानें थोडेंफार वाटत असलेलें पारतंत्र्यहि नष्ट झाल्यानें आज इंग्लिश स्त्री, आम्ही पुरुषांच्या मार्गे काडीमात्रही नाहीं असें सांगण्यास समर्थ झाली आहे.

## अनौरस संततीचें संरक्षण

आविवाहित मातांची स्थितिहि आतां १८७० सालाइतकी अनुकंपनीय राहिलेली नाहीं. १८७२-७३-८१ व १९१४-१८-२३ या सालीं याबाबतच्या कायद्यांमध्यें अनेक सुधारणा झाल्या. आतां आठवड्यास सुमारें २० शिलिंगांपर्यंत तिला मुलाच्या पित्याकडून पोटगीदाखल मिळूं शकतात. कोर्टाकडून सर्व पैसे वसूल करण्यांत येऊन अशा मातेला पोंचते करण्यांत येतात. बाप खालच्या दर्जाचा नोकर अगर खलाशी, सोजीर या वर्गांतील असेल तर त्यांना दर आठवड्यास मिळणाऱ्या सुमारें १२ शिलिंग वेतनांतील कांहीं भागच फक्त पोटगीदाखल देवविण्यांत येतो. अपत्य झाल्यानंतर त्याच स्त्री-पुरुषांनीं

विवाह केल्यास सदर अपत्याला वारसासंबंधींचे सर्व हक्क प्राप्त करून देण्याचा कायदा १९२६ सालीं पास करण्यांत आला; परंतु स्त्रीचा एकापेक्षां अधिक पुरुषांशीं संबंध असल्याचें आढळून आल्यास अगर अपत्य-जन्मानंतर तिनें भिन्न व्यक्तीशीं विवाह केल्यास मग मात्र सदर संतति ही वारस संतति होऊं शकत नाहीं व कायद्यानें कोणतेहि अधिकार तिला प्राप्त होऊं शकत नाहींत. अद्यापहि इंग्लंडमध्यें सुमारें २५,००० मुलें दरसाल अनौरस या सदराखालीं जन्माला येतात. स्कॉटलंडमध्यें ही संख्या ६,००० आहे. वारस संततीपेक्षां यांच्या मृत्यूचें प्रमाण अधिक आहे याचें कारण मातांच्याकडून त्यांची होणारी आबाळ हेंच होय. १८७२ सालीं बेवारस मुलांपैकीं सुमारें ३/५ मुलें मृत्युमुखीं पडत. आज मात्र तशी स्थिति नाहीं, एवढी गोष्ट खरी! १९३३ सालीं बेवारस अपत्यमृत्यूचें प्रमाण दर हजारीं १०७ होतें तेंच वारस संततीचें ६२ होतें. बेवारस संततीला जन्म देणाऱ्या मातेला रुग्णालयांत सर्व परिचर्या मोफत मिळण्याची सोय आतां झाली आहे. जर अशी स्त्री कामगार वर्गांतील असेल तर तिला आणखीहि बऱ्याच सवलती देण्यांत येतात. पूर्वी अशा स्त्रीला व तिच्या संततीला बऱ्याच यातना सहन कराव्या लागत, पण आतां समाज त्यांच्याकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पहातो. १९२३ च्या कायद्यान्वयें काडीमोडी-बाबत स्त्रीपुरुषांना सारखेच हक्क प्राप्त करून देण्यांत आल्यानें बेवारस संततीची वाढ झाली असावी असाहि कित्येकांचा अभिप्राय आहे. काडीमोड मिळण्याच्या कायद्याच्या कलमांचें सूक्ष्म परीक्षण करतां स्त्री ही पुरुषाची मत्ता आहे ही भावना अद्यापहि गेल्याचें दिसून येत नाहीं. पत्नीशीं व्यभिचार करणाऱ्या तिऱ्हाइत इसमाकडून पतीला नुकसानभरपायी मागतां येते; याचा अर्थच हा कीं, आपली मत्ता या दृष्टीनेंच तो आपल्या पत्नीकडे पहात असतो. याच्या उलट आतां पत्नीलाहि तसा हक्क देण्यांत आला आहे यामुळें व्यभिचाराच्या गुन्ह्यांत काडीमोड घेण्याच्या भरीस न पडतां इंग्लंडमध्यें स्त्री–पुरुष नुकसानभरपाई मागण्याचाच मार्ग अधिक पसंत करतात व यामुळें इंग्लंडमध्यें कांहीं काळापूर्वी दिसून येणारी वेश्यावृत्ति अद्यापहि शाबूत आहे; फक्त तिचा भाव वाढला आहे एवढेंच म्हणावें फार तर!

**पैशाचें दास्य!**

१९२९ च्या कायद्यान्वयें स्त्रीपुरुषांच्या विवाहवयाची मर्यादा १६ करण्यांत

आली. पूर्वी मुलीचें वय १२ व मुलाचें १४ ग्राह्य धरण्यांत येत असे. अलीकडे या दोनहि मर्यादांचें संपूर्ण उल्लंघन करण्यांत आलें आहे. तरीहि वैवाहिक जीवनांचें बंधन इंग्लिश स्त्री–पुरुषांना जरा जाचकच वाटत असावें. कारण स्वैराचार-प्रवृत्ति नष्ट करण्यासाठीं अनेक खबरदाऱ्या घेऊन व कायदे करण्यांत येऊनहि अजून सुमारें ३,००० स्त्रियांना दरसाल वेश्यावृत्तीचें भर रस्त्यांत प्रदर्शन करून शिकार मिळविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल अटक करण्यांत येतें व त्यांच्यावर खटले भरण्यांत येतात; या कामीं साक्षीपुराव्याची उसाभरहि करण्यांत येत नाहीं. पोलिसनें फक्त जबानींत घडलेला प्रकार सांगावा, तत्काळ सदर स्त्रीला शिक्षा ठोठावून तुरुंगांत धाडण्यांत येते. याचा अर्थच हा कीं, इंग्लिश स्त्रियांच्या दुर्वर्तनाची न्यायालयास इतकी खात्री झाली आहे कीं, साक्षी पुराव्याची आवश्यकता त्यांना भासत नाहीं. या स्त्रियाहि इतक्या बनलेल्या असतात कीं, बिनतक्रार त्या शिक्षा भोगतात, दंड भरतात, फिरून 'येरे माझ्या मागल्या'! बाहेर पडतांच दुप्पट उत्साहानें आपला धंदा सुरू करतात. या सर्व गोंधळाचा निश्चित परिणाम असा झाला आहे कीं, इंग्लंडमध्यें जन्मसंख्येचें प्रमाण घटत आहे व जी थोडीफार प्रजा जन्माला येत आहे त्यांतील बराचसा भाग बेवारस या सदरांत मोडत आहे. यामुळें इंग्लिश समाजाचें भविष्य कालांत काय होणार, असा प्रश्न सूज्ञ लोकांना भेडसावूं लागला आहे. नीति-अनीतीच्या सर्व कल्पना फोल ठरवून निव्वळ आर्थिक पायावर समाजधारणा करण्याचा रशियांतील नवा दृष्टिकोन इंग्लिश जनतेला कांहीं अंशांनीं पटला आहे, त्यामुळें सामाजिक नीतिमत्ता व लैंगिक आचार यांचें महत्त्वमापन करीत न बसण्याची वृत्ति इंग्लिश समाजामध्यें बळावूं लागली आहे आणि त्याचा दृश्य परिणाम म्हणजे वाढती बेवारस प्रजा होय. रशियाचें संपूर्ण अनुकरण नाहीं, धड वैवाहिक संस्थेला महत्त्व नाहीं अशा चमत्कारिक मधल्या स्थितींत इंग्लिश समाज सध्यां येऊन पडला आहे.

## लालसेपुढें 'द्वेष'हि फिका पडतो !

कृष्णवर्णीयांचा दीर्घद्वेष करणाऱ्या इंग्लिश समाजांतील स्त्रिया कृष्णवर्णी पुरुषांच्या गळीं पडण्यास मात्र उत्सुक असतात, आणि याचें खरें कारण म्हणजे त्यांच्या हाडीमांसीं आज कित्येक शतकें खिळलेली तीव्र संभोग व संपत्तिलालसा होय ! आजपर्यंत इंग्लिश स्त्रीपुरुषांकडून त्यांना ज्या तऱ्हेनें वागविण्यांत आले

व त्यामुळें त्यांच्या ज्या वृत्ति बनल्या त्या इतका काळ पुढें जाऊनहि सुधारेनाशा झाल्या आहेत. श्री. कारक यांनीं इंग्लिश स्त्रीचें चित्र फारच उठावदारपणें काढलें आहे. ते म्हणतात, 'सर्वच इंग्लिश स्त्रिया सारख्या दिसत असल्यानें प्रथम चटकन् त्यांची ओळख ठेवणें जड जातें. शिवाय त्यांच्याबद्दल हिंदु तरुणांमध्यें जो एक भीतियुक्त आदर असतो त्यामुळें तो जरा बिचकतच असतो. प्रथम प्रथम व्यक्तिशः त्यांच्याशीं मैत्री करणें अशक्यच वाटतें त्याला, शिवाय स्वतःचा कृष्णवर्णहि त्याच्या मनांत एक प्रकारें न्यूनगंड निर्माण करीत असतो. पण पुढें या सर्व कल्पना चुकीच्या ठरून रुळलेल्या हिंदी मनुष्याला इंग्लिश स्त्रीची दाट मैत्री म्हणजे हातचा मळ वाटूं लागतो. त्यांच्या रंगविलेल्या ओठांचीं चुंबनें बेफिकीरपणें झिडकारून लावण्याची धमक त्याच्या अंगीं येते आणि जितके जितके तो त्यांना झिडकारून दूर लोटील तितके तितके त्या त्याला अधिकच बिलगतील.'

याच गृहस्थानें एका रात्रीच्या क्लबमध्यें पाहिलेला प्रकार पुढीलप्रमाणें आहे—

'हा क्लब म्हणजे पुष्कळशा कृष्णवर्णीय लोकांचें रात्रीं भेट देण्याचें एक आवडतें ठिकाण आहे. त्याचबरोबर कित्येक आंग्ल युवतीहि आपल्या पतीसमवेत या क्लबमध्यें मजा मारण्यासाठीं म्हणून येतात. आंत येतांच तेथें वावरणाऱ्या भल्या दांडग्या जाड ओठांच्या निग्रोकडे पाहून त्या किंचित् बिचकल्यासारखें करतात. थोडा वेळ तेथें वावरल्यानंतर त्या जरा धीट होत असाव्या असें दिसतें. कारण आतां त्या निग्रोकडे जरा धिटाईनें लक्षपूर्वक पहात असल्याचें दिसून येतें. तें त्या टेबलापाशीं मदिरेचे घोंट घेत बसलेलें इंग्लिश जोडपें पहा. गृहस्थानें दारू जरा बरीच घेतली असल्यानें त्याची मान कशी टेबलावर लडलड लोंबत आहे; आणि त्याच्या सहचरीला तर आतां नृत्याची हुक्की आली आहे. ती त्याला सारखा उठविण्याचा प्रयत्न करीत आहे. पण आतां तो कसचा उठतो? टेबलावर डोकें ठेवून निजलाहि बिचारा! आतां तिनें त्याचा नाद सोडला आहे. ती पहा, तृषार्त नजरेनें ती इकडे तिकडे कशी पहात आहे. हा भला जाडजूड निग्रो तिकडेच येत आहे. त्याचा तो रुंद चेहरा, वळकटीसारखे ओंठ, चपटें नाक, डांबरी वर्ण—छे पण ती या कशाकडेच आतां लक्ष देण्यास तयार नाहीं. तिनें नृत्यासाठीं त्याच्या बाहुपाशाचा आश्रय केलासुद्धां. त्यांच्या नृत्याकडे मी बारकाईनें पहात आहे. माझी खूप करमणूक होत आहे. ती त्याच्याकडे

पाहून मधुर स्मित करीत आहे. अधिकाधिक दृढपणानें त्याच्या वक्षस्थलाला बिलगत आहे. नजरेंत किती कृतज्ञता भरली आहे तिच्या! तिच्या उष्ण श्वासांनीं पुलकित झालेला त्या कृष्णवर्ण निग्रोचा चेहरा मला एथून अगदीं स्पष्ट दिसत आहे. पांचच मिनिटांच्या नृत्यानें ती सर्वस्वीं त्या निग्रोच्या आधीन झाली आहे. अर्ध्या एक तासानें तिचा पति शुद्धीवर आला. त्याला हलवीत ती म्हणते, 'चलायचे ना, रात्र बरीच झाली.' तो बिचारा धडपडत उठला आणि तिच्याबरोबर चालूं लागला. हिंदी तरुण इंग्लंडमध्यें कां फसतात याचा उलगडा मला आज झाला!' हाच गृहस्थ पुढें म्हणतो, 'वरच्या वर्गांतील इंग्लिश स्त्रिया सुशिक्षित आहेत, पदव्यांनीं विभूषित आहेत, पण त्यांचें सारें लक्ष खाणें पिणें व कपडा यांत; व खरा उद्योग म्हणजे एखादा सरदार, जमीनदार, मग तो कोणत्याहि देशांतील का असेना, कसा गांठावा हाच होय.' 'लैंगिक उपासमार चाललेल्या या मध्यम व गरीब वर्गांतील कुमारिका पहा. कोणा तरी राजपुत्राच्या संगतीचें सुखस्वप्न मनांत रेंगाळत ठेवून त्या बिछान्यावर पडतात. या गरजू कुमारिकांची अपेक्षा असते आपणांस कोणीतरी क्लार्क गेबल, रॉबर्ट टेलर दिसेल म्हणून? यासाठीं त्या जगाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंतहि प्रवास करण्यास सिद्ध होतील. त्यांना घरें पाहिजेत, मुलें पाहिजेत, रात्रीं कोणी तरी गोड सांगाती पाहिजे. अपेक्षा! अपेक्षा! गोड हुरहुर! पण या सर्वांची पूर्तता कधीं होणार? तोंपर्यंत प्रत्यहीं चेहऱ्यावर उठणाऱ्या मोडांची शुश्रूषा करण्यांतच त्यांना वेळ काढला पाहिजे. हें पहा, सध्यांच्या इंग्लिश कुमारिकेचें खरेंखुरें शब्दचित्र—

Under a starry Hawaiian sky a dark-haired Romeo whispered in her ear an enchanted tale of love and romance. Sweet music was in the air. There, under the heavens in the pale blue moon-light he held her close, his warm lips on her neck. 'I have got you under my skin', he said. So she dreams at night and with the awakening comes a fresh crop of pimples. Poor little sex-starved girls. They strike the red pimples as communists strike for red principles.'

**याच्या बुडाशीं काय आहे?**

१९–२० व्या शतकांतील इंग्लिश स्त्रीचें लैंगिक जीवन हें असें आहे. तें किती विलोभनीय आहे याचा विचार ज्याचा त्यानें करावा. त्यासंबंधीं निश्चित

असें मत आम्हीं कांहींच देऊं शकत नाहीं. गेल्या युद्धामुळें जी प्राणहानी झाली त्यामुळें युरोपियन राष्ट्रांतील स्त्रियांत लैंगिक स्वैराचाराचा फैलाव झाला. हें कदाचित् इतर राष्ट्रांचे बाबतींत खरें असेल, पण इंग्लिश स्त्रीचें आतांपर्यंतचें चारित्र पाहिल्यानंतर तिच्या बाबतींत मात्र वरील मुद्द्याचा आश्रय करण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं. कांहींही असो, पूर्वीची वेश्यावृत्ति अद्यापहि इंग्लिश स्त्रीमध्यें दिसून येत आहे ही गोष्ट खरी. एक इंग्लिश स्त्रीच याबद्दल म्हणते,

'Men can now find sexual partners who do not ask for payment. It does not at all follow that such women and girls are anymore prostitutes than are the men.'

अमेच्यूर प्रास्टिटयूट्स ही संज्ञा आतां अशा स्त्रियांना प्राप्त होऊं लागली आहे. सडकेवर, ट्राममध्यें, आगगाडींत, आजची आंग्ल तरुणी ओठांना रंग लावीत व तोंडाला पावडर फाशीत बसलेली दृष्टीला पडते. त्या वेळीं आपल्या भोंवतीं कोण लोक आहेत हेंही ती विसरते. नेपथ्यरचनेंत ती अगदीं गढून गेलेली असते. सिगरेट तर ती अशा झोकांत ओढते कीं, तिच्या वयाच्या पुरुषालाहि तें जमणार नाहीं ! आणि इतकें करूनहि लोक म्हणतात, 'इंग्लिश स्त्रीची मजा गेली, तिचा बहर ओसरला.' हा बहार कशानें ओसरला ? इंग्लिश पोरींचा चिमखडेपणा कशानें नाहींसा झाला ? या प्रश्नांचीं उत्तरें तिनें आपल्या सामाजिक व राजकीय जीवनांमध्यें केलेल्या क्रांतीचें परीक्षण केल्यावांचून मिळूं शकणार नाहींत. आज तिनें पुरुषांच्या गुलामगिरींतून आपली सुटका करून घेतली आहे. आज सर्व दालनें तिला खुलीं आहेत. ती आतां कारखान्यांत जाते; शाळा, कॉलेजे, कचेऱ्या यांतून जाते; पार्लमेंटमध्यें जाते; वादविवाद करते; निवडणुकी लढविते. ५० वर्षांपूर्वी दाव्याला लावून बाजारांत विक्रीसाठीं मांडली जाणारी इंग्लिश स्त्री आज स्वच्छंदानें वाटेल तशी वागूं शकते. हें स्थित्यंतर कांहीं सामान्य नव्हे ! स्त्रीपुरुषांमध्यें विषमता आहे हें तुम्हीं आतां तिच्यापुढें प्रतिपादन करूं शकणार नाहीं. तुमचें ती ऐकणार नाहीं. 'मिल'ची ती अनुयायी आहे. स्त्रीपुरुष समता प्रस्थापित करणें हें तिचें ध्येय आहे. तिच्या आणखी कांहीं उपद्व्यापांचा पुढील प्रकरणीं विचार करून आम्ही तिची रजा घेणार आहोंत.

---

## नव्या मनूचा प्रवेश

विसाव्या शतकाच्या आरंभापासून इंग्लिश स्त्रीच्या जीवनाचा ओघ बराचसा बदललेला दिसतो. तिच्या दास्यविमोचनासाठीं इंग्लिश स्त्रीपुरुषांकडून करण्यांत आलेली तपश्चर्या बऱ्याच अंशानें या कालांत फलद्रुप झाल्याचें दिसतें. स्त्रीपुरुषसमता प्रस्थापनेसाठीं सर्वांत अधिक उपयोग कशाचा झाला असेल तर तो गेल्या महायुद्धाचा होय ! वीस ते चाळीस वर्षांपर्यंतचे बहुतेक पुरुष सैन्यांत गुंतले असल्यानें देशाला कामगारांची अत्यंत जरूर होती. स्वाभाविकपणेंच राष्ट्रीय कार्याला हातभार लावण्याच्या बुद्धीनें स्त्रिया पुढें आल्या व निरनिराळ्या औद्योगिक क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीनें कार्य करूं लागल्या. त्यांना स्वाभाविकच अनुभवानें ज्ञान प्राप्त होऊन, जी गोष्ट पुरुषांच्या माघारीं आपण करूं शकतो ती तशीच चालू ठेवण्यांत काय बिघडतें असें त्यांना वाटूं लागलें. त्याचबरोबर पुरुषांनाहि थोडेंफार कळून चुकलें कीं, 'स्त्री' आपण म्हणतो तितकी दुर्बळ नाहीं. ह्या चार वर्षांच्या कालांत स्त्रिया शेताभातावर कामें करीत. कारखान्यांत करीत. निरनिराळ्या कचेऱ्यांमधून महत्त्वाच्या जागांवरहि पण त्या कामें करीत. आतांपर्यंत ज्या ज्या क्षेत्रांपासून त्यांना सर्वस्वीं अलिप्त ठेवण्यांत आलें होतें त्या त्या प्रत्येक क्षेत्रांत कार्य करून दाखविण्याची आपली पात्रता आहे ही गोष्ट सिद्ध करून देण्याची संधि गेल्या महायुद्धानें आपणांस आणून दिली असें इंग्लिश स्त्रियांना वाटल्याशिवाय राहिलें नाहीं, आणि त्याचा पुरेपुर फायदाहि पण करून घेण्यास त्यांनीं कुचराई केली नाहीं. सध्यां इंग्लंडमध्यें १८ ते २० वर्षें वयाच्या स्त्रियांपैकीं शेंकडा ८० स्त्रिया कामावर आहेत. २१ ते २४ वर्षें वयाच्या स्त्रियांपैकीं शेंकडा ६५ कामावर आहेत. यांतील सर्वच स्त्रिया स्वतंत्रपणें चरितार्थ

चालवूं शकतील इतका पैसा मिळवितात असें मात्र नाहीं. यांतील कित्येकींचें उत्पन्न त्यांच्या नेपथ्यरचनेस पुरेल एवढेंच असतें. याशिवाय घरीं राहून संसारशकट ओढण्याचें काम करणाऱ्या स्त्रियाहि इंग्लंडमध्यें बऱ्याच आहेत.

## भांडवलदारांचा संधिसाधुपणा

विसाव्या शतकाच्या आरंभीं सुमारें ४० लाख स्त्रिया स्वतंत्रपणें मोलमजुरी करून पोट भरीत, परंतु त्यांतील बहुतेक कारखाने व घरगुती मजुरीचीं कामें यांतच गुंतलेल्या असत. १९२१ च्या खानेसुमारीप्रमाणें वरच्या आंकड्याच्या भरीला सुमारें ८० हजार स्त्रिया शेताभातावर राबत असल्याचें आढळून आलें. ह्याशिवाय सुमारें ८७ लाख स्त्रिया शिक्षणव्यवसायांत कार्य करीत होत्या. मध्यम वर्गांतील स्त्रियांमध्यें स्वतंत्रपणें अर्थनिष्पत्ति करण्याचें वेड या काला-पर्यंतहि नव्हतें. कारण वर देण्यांत आलेले आंकडे हल्लींच्या दृष्टीनें कितीतरी कमीच आहेत. याचें कारण म्हणजे स्त्रीनें स्वतंत्र व्यवसाय करून अर्थनिष्पत्ति करणें हें त्या वेळीं अत्यंत हीन समजलें जाई व त्यामुळें मध्यम व वरिष्ठ वर्गांतील स्त्रिया या भानगडींत पडत नसत. स्त्रियांची शक्ति फक्त गृहकार्यांतच खर्च व्हावी, ही विचारसरणी या कालापर्यंतहि इंग्लंडमध्यें बलवत्तर होती. जास्तींत जास्त शिक्षणव्यवसाय व नर्सिंग यापलिकडे स्त्रियांनीं दुसऱ्या उद्योगधंद्यांत पडूं नये अशा स्पष्ट मताची मंडळी इंग्लंडमध्यें बरीच होती. आतां टंकलेखन, दुकानांतील मालाची देवघेव, केशकर्तन, इत्यादि व्यवसायांत स्त्रियांची अतोनात गर्दी झालेली दिसते; कारण त्यांचें चापल्य, मजुरीचे कमी दर यामुळें बऱ्याचशा व्यवसायांत मालकांना स्त्रिया कामावर नेमणें फार सोईचें पडतें. स्त्रियांना मिळणारें शिक्षण, स्त्री-हितवाद्यांच्या चळवळीमुळें पुरुषी थाटाचें मिळूं लागलें. अर्थात् अशा शिक्षणाचे संस्कार होणाऱ्या स्त्रियांत स्वाभाविकच पुरुषांच्या कार्य-क्षेत्रांत वावरून समत्व प्रस्थापित करून घेण्याची इच्छा निर्माण होई. आपण स्वतंत्रपणें जगूं शकतो, तो मक्ता कांहीं एकट्या पुरुषांनाच देण्यांत आलेला नाहीं, हें दाखविण्यासाठीं त्यांनीं भराभर निरनिराळ्या व्यवसायांत पदार्पण कर-ण्याची खटपट सुरू करतांच भांडवलदार वर्गाला फावलें. या वर्गाला तेंच पाहिजे होतें. त्यानें या मनोवृत्तीचा बरोबर फायदा तर घेतलाच, पण शिवाय तिला उत्तेजन देण्यासाठीं स्त्री-हितवाद्यांच्या 'अव्यापारेषु व्यापाराला' हातभार लावला. प्रत्यक्ष पैसा हातीं देतें तेंच 'काम' अशी या स्त्रियांची समजूत झाली

असल्याकारणानें, प्रपंचदक्ष गृहिणी म्हणजे दुसऱ्याच्या अन्नावर जगूं पहाणारी नालायक बेकार स्त्री अशी त्यांची समजूत झाली. घरगुती कामानें प्रत्यक्ष अर्थनिष्पत्ति झाली नाहीं तरी त्याला मोल नाहीं म्हणणें कधींहि रास्त होणार नाहीं; पण ही कल्पनाच मुळीं त्यांना नव्हती.

## महायुद्धाचे परिणाम

पुरुषी शिक्षण घेतलेल्या मुलींचा हा सरळ सरळ सवाल असे कीं, आम्ही पुरुषांप्रमाणेंच कामें करून अर्थनिष्पत्ति कां करूं नये ? आणि 'घरगुती काम म्हणजे कालाचा अपव्यय होय' असें इंग्लंडमधील सुशिक्षित म्हणविणाऱ्या स्त्रिया बोलून दाखवूं लागल्या. १९१४ सालच्या महायुद्धानें तर त्यांना त्यांच्या दृष्टीनें व भांडवलदार वर्गाला त्याच्या दृष्टीनें सुवर्णसंधीच आणून दिली. स्त्रियांच्या औद्योगिक क्षेत्रांतील पदार्पणाला या कालानें भलतेंच महत्त्व प्राप्त करून दिलें. एक अपूर्व राष्ट्रकार्य या दृष्टीनें स्त्रियांच्या या स्थित्यंतराकडे पहाण्यांत येऊं लागलें. बहुतेक सर्व स्त्रियांनीं घराचा उंबरा ओलांडून बाहेरच्या कार्यक्षेत्रांत पदार्पण केलें व त्या दृष्टीनें खूपसा प्रचारहि पण झाला. त्या काळीं ही एक राष्ट्रीय गरजच होऊन बसली असल्यानें या क्रांतीच्या इष्टानिष्टतेची चिकित्सा कोणीच फारशी केली नाहीं व या कार्यक्रमाला सर्वांनीं एकजात उचलून धरलें. प्रत्येक धंद्यांत स्त्री कामकऱ्यांना वाव मिळाला, व त्याच बरोबर त्यांचा रोजमुराहि झपाट्यानें वाढला. चैनीच्या वस्तू निर्माण करणारे उद्योगधंदे महायुद्धाच्या प्रथम कालांतच विराम पावले व शस्त्रास्त्रांचें आणि दारूगोळा तयार करणाऱ्या कारखान्यांचें काम अतोनात वाढलें. त्याचप्रमाणें हरकामासाठीं स्त्रियाच गुंतविण्यावांचून गत्यंतर नसल्यानें स्त्रिया व पुरुष यांच्या कामामध्यें कमी श्रमाचीं कामें स्त्रियांसाठीं व अधिक कष्टप्रद तीं कामें पुरुषांसाठीं असा जो एक भेद पूर्वीपासून करण्याची पद्धत होती ती नष्ट झाली [manly and womanly work]. कोळशाच्या खाणी, घरें रंगविणें, सुतारकाम, लोहार काम इत्यादि मेहनतीच्या धंद्यांमधूनहि स्त्रिया राबतांना दिसूं लागल्या व आजपर्यंत, स्त्रिया पुरुषांपेक्षां सर्वसाधारणपणें शारीरिक श्रमाचे कामाचे दृष्टीनें कमी दर्जाच्या असतात असा जो एक समज होता त्याला चांगलाच धक्का बसल्याप्रमाणें झालें. पण हा सर्व चमत्कार युद्धाकाळापुरताच मर्यादित राहिला, युद्धाचा निकाल लागून लाखों लोक परत येतांच 'त्यांच्यासाठीं स्त्रियांनीं जागा

खालीं कराव्यात, आतांपर्यंत त्यांनीं दाखविलेली कर्तबगारी स्तुत्य असली तरी आतां फिरून त्यांनीं घरीं जाण्यास हरकत नाहीं' असा सूर वाहूं लागला. प्रथम प्रथम स्त्रियांनींहि पण यासंबंधीं फारशी तक्रार केली नाहीं. हजारों-लाखों स्त्रिया भराभर कामावरून दूर झाल्या, बेकार झाल्या. यांतील कांहींचे विवाह झाले नव्हते व आतां त्यांची जागा पुरुषांनीं घेतल्या कारणानें त्यांचें स्वतंत्र निर्वाहाचें साधनहि नष्ट झालें, आणि यामुळें त्यांचे अतोनात हाल सुरू झाले. 'आपण पुरुषासाठीं काय म्हणून जागा खालीं केल्या?' या प्रश्नाचें उत्तर त्यांना मिळेना. आपण या कामीं जरा घाईच केली असेंहि त्यांना वाटूं लागलें. ज्या पुरुषांनीं या कार्यक्षेत्रांत पडल्याबद्दल प्रथम आपलें अभिनंदन केलें तेच आतां आपली येथून उचलबांगडी करण्यास सिद्ध झालेले पाहून त्यांना चांगलाच अचंबा वाटला व अशा दिङ्मूढ स्थितींतच त्या भराभर बेकार होऊं लागल्या. कांहींनीं या प्रकाराला विरोध केला, पण एक काळ या कारणास्तवच देशभक्त ठरलेल्या स्त्रियांवर त्याच कारणास्तव देशद्रोही म्हणवून घेण्याचा प्रसंग आला. कारण विजयी होऊन परत आलेल्या देशभक्त सैनिकांस कामधंदा मिळवून देण्याच्या पवित्र कामांत त्या आतां व्यत्यय आणूं लागल्या होत्या. सामान्य जनांनीं जरी या हटवादी स्त्रियांचा निषेध केला तरी, एक विशिष्ट वर्ग मात्र या कालांत त्यांचा कैवार घेण्यास सिद्ध झाला आणि या वर्गाच्या सहाय्याच्या जोरावर स्त्रियांना आपलें महायुद्धकालीन स्थान, कांहीं प्रमाणांत कां होईना पण टिकवून धरणें शक्य झालें.

## उद्योगधंद्यांतील स्त्रियांची परिस्थिति

हा वर्ग म्हणजे भांडवलदार, कारखानदार वर्ग होय. युद्धकालांत स्त्री कामगाराशीं त्यांचा जो परिचय झाला त्यामुळें त्यांना एक गोष्ट स्पष्ट कळून चुकली ती ही कीं, पुरुष कामगारापेक्षां स्त्री-कामगार आपल्या फायद्याच्या दृष्टीनें अधिक उपयुक्त होतात. त्यांचे हातून दंगेधोपे होत नाहींत, संप होत नाहींत, धमक्या दिल्या जात नाहींत; आणि वर कामें व्यवस्थित होऊन थोडक्या मजुरींत त्यांना अधिक काळ राबविलें तरी त्या कुरकुर करीत नाहींत. अशा या सर्व गोष्टींमुळें कारखानदार वर्ग स्त्रियांच्या वतीनें प्रचार करण्यास उभा राहिला, एवढेंच नव्हे, तर त्यानें पुरुषांपेक्षां स्त्रियांनाच कामावर घेण्याचें सर्रास धोरण ठेविलें. यासंबंधीं पार्लमेंटची एक स्त्री सभासद म्हणते,

'It was true that the women had been cheap, it was no wonder that the employers did not want to let them go.'

परंतु इतकें असूनहि हळूहळू लोकमताच्या दाबामुळें स्त्रिया परत घरीं जाऊं लागल्या. महायुद्धामुळें स्त्री–सुधारणेचें पुढें [!] गेलेलें घड्याळ बेताबेतानें मागें करण्यांत येऊं लागलें, पण इतकें असूनहि अद्याप १४ ते ६५ वर्षे वयाच्या स्त्रियांपैकीं शेंकडा ३७ टक्के स्त्रिया उद्योगधंद्यांत राबत आहेत, व यापैकीं बहुसंख्य स्त्रिया अविवाहित आहेत. विवाहानंतर बऱ्याच स्त्रिया काम करण्याचें सोडून देतात असें आढळून आलें आहे. विवाहित असूनहि कामावर असलेल्या स्त्रियांची संख्या अत्यंत अल्प आहे. यावरून हेंच दिसून येतें कीं, स्त्रियांचें वैवाहिक जीवन व त्यांचें आर्थिक स्वातंत्र्य या गोष्टी परस्परांना तितक्याशा पोषक नाहींत. स्त्रियांना कामावर ओढण्याची वृत्ति इंग्लिश भांडवलदार वर्गांत कशी बोकाळली आहे याचें प्रत्यंतर आतां इंग्लिश जनतेला चांगलेंच आलें आहे. बेकारीच्या ऐन दिवसांतहि स्त्रियांना नोकऱ्या सहजासहजीं मिळत. परवां परवांपर्यंत स्त्रियांना पुरुषांपेक्षां अधिक जलद नोकऱ्या मिळत, त्यामुळें कित्येक महाभागांना आपल्या मुलींना अगर बायकांना कामाला जुंपून आपला चरितार्थ चालविणें भाग पडे. कित्येक इंग्लिश पालक आपल्या मुलीच्या विवाहाबाबत उदासीन असतात, त्याचें कारणहि पण हेंच आहे. कारण आपली मुलगी दुसऱ्या घरीं जाण्यानें आपली एक आर्थिक हानि होईल ही भीति त्यांना वाटत असते. स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर इंग्लिश स्त्रीहितवाद्यांनीं दिलेला भर म्हणजे इंग्लिश भांडवलशाहीची एक कारवाईच होय, त्यांत रशियाची वेडी का होईना पण ध्येयनिष्ठा नाहीं, ही गोष्ट उघड आहे. स्त्रियांच्या या उद्योगधंद्यांतील पदार्पणामुळें पुरुष बेकारीचा एक मोठाच प्रश्न इंग्लंडमध्यें निर्माण झाला आहे. यावर तोडगा म्हणून स्त्रियांना पुरुषांचें इतकेंच वेतन देण्यांत यावें, अशी चळवळ सुरू करण्याचा कित्येकांनीं घाट घातला, म्हणजे आपोआपच पुरुषांना कामावर घेण्याची वृत्ति बळावेल असें त्यांना वाटलें. सारखीच मजुरी द्यावयाची मग पुरुषच बरे, असें स्वाभाविकच कारखानदारवर्गाला वाटूं लागेल व हा पेंचप्रसंग दूर होईल असें त्यांचें म्हणणें पडलें.

[ The men workers should insist that women should receive the same rates of pay as themselves and the whole course would be changed ].

या भांडवलशाही कारवायांमुळें स्त्रियांचें हित साधलें असें नाहीं. उद्योगधंद्याच्या नादानें व पुरुष बेकार राहिल्यामुळें त्यांचे विवाह लांबणीवर पडतात व सुमारें तिसाव्या वर्षी स्त्री उद्योगधंद्याला नालायक ठरते. तिला कामावरून दूर करण्यांत येऊन दुसऱ्या एखाद्या तरुणीची नेमणूक त्या ठिकाणीं करण्यांत येते व यामुळें भयानक तऱ्हेनें आयुष्यक्रम कंठणाऱ्या तीस वर्षांपुढील असंख्य कुमारिका इंग्लंडमध्यें दिसूं लागल्या आहेत. त्यांना हक्काचीं घरें नाहींत, नोकऱ्या नाहींत. गोरगारिबींत दिवस कंठणाऱ्या प्रापंचिक स्त्रियांपेक्षांहि त्यांची अवस्था अत्यंत कठिण असते. यासंबंधीं एक स्त्री म्हणते,

'Life may not be very bright or easy for the married women with small means, but it is often sheer misery for the numarried worker, and her plight if she falls out of her job is desparate.'

## कुटुंबसंस्थेवर गंडांतर

स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यानें व्यक्तिशः त्यांचा कांहीं फायदा तर झाला नाहींच, पण निष्कारण गृहसंस्थेचा मात्र नाश झाला. गृहाची बरीचशी जबाबदारी स्त्रियांवर असते हा जगानें मान्य केलेला सिद्धांत इंग्लंडमध्येंहि बऱ्याच लोकांना मान्य असल्यानें, स्त्रीनें घराचा त्याग करून गृहजीवनाचा नाश केला असें तेथेंहि बऱ्याच लोकांना वाटलें. ज्यांनीं गृह व बाह्य व्यवसाय या दोहोंचीहि सांगड घालण्याचा प्रयत्न केला त्यांच्यावर दुहेरी कामाचें दडपण पडलें. व्यवसायावरून यावें व गृहकृत्याला लागावें, असा प्रकार होई. अगर व्यवसायावरून यावें व घरच्या कामासाठीं ठेविलेल्या स्त्रीशीं पतीचे चाललेले प्रेमालाप ऐकावे, असा सर्रास प्रकार होऊं लागला; आणि त्यामुळें स्त्रियांना दोन्ही सुखांना आंचवण्याचा प्रसंग आला. धड नोकरीचें सौख्य नाहीं कीं गृहाचें ! शिवाय पुरुषी व्यवसायामुळें त्यांची अत्यंत पिळवणूक होई तें निराळेंच. त्यांना निसर्गतः लाभलेलें मृदुत्व अशा व्यवसायांत पडल्यानें नष्ट तर होईच, पण त्यांचे अत्यंत हालहि पण होत. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें कामें करूं शकतात म्हणाऱ्या पंडितांनीं पुढील अनुभव जरूर वाचावा—

'During the war when the substitution of women for men was carried out in all directions, it was roughly found that on heavy work such as hovelling coal, three women were required to replace one man.'

म्हणजे एका पुरुषाऐवजीं तीन स्त्रिया राबविणेंहि भांडवलशाहीला अधिक परवडत असलें पाहिजे ही गोष्ट उघड दिसते. यावरून स्त्रियांच्या पिळवणुकीच्या मानानें काय मजुरी त्याच्या पदरांत पडत असेल देव जाणें.

## युद्धकालीन सहानुभूति

इंग्लंडच्या लोकसंख्येमध्यें स्त्रियांची संख्या निम्याहून अधिक आहे. हा निव्वळ महायुद्धाचाच परिणाम आहे असें मात्र नाहीं, कारण इंग्लंडची ही स्थिति आज कित्येक दिवसांपासूनची आहे. तेथें स्त्रिया पुरुषांपेक्षां जास्त बरेच दिवसांपासून आहेत. महायुद्धामुळें हें प्रमाण जरा जास्त वाढलें, इतकेंच! १९३३ सालच्या लोकसंख्येचे आंकडे पुढीलप्रमाणें आहेत. या सालीं एकंदर लोकसंख्या ४०,३५०,००० इतकी भरली, त्यांपैकीं पुरुष १९,२५७,००० इतके असून स्त्रिया २०,९९३,००० इतक्या होत्या. इंग्लंडमधील स्त्रियांची बहुसंख्या ही अशी इतकी स्पष्ट आहे. त्यामुळें निम्याहून अधिक लोकसंख्येचा घटक म्हणून वावरणाऱ्या स्त्रीला इंग्लंडचें भवितव्य ठरविणाऱ्या गोष्टींत कोणताच अधिकृत भाग घेण्याचा हक्क असूं नये हें शल्य इंग्लिश स्त्रीच्या मनांत बरेच दिवस बोंचत होतें, व त्यामुळेंच इंग्लिश स्त्रियांना राजकीय हक्क संपादण्याची मोहिम सुरू करण्याची आवश्यकता भासूं लागली. विशेषतः बहुसंख्य असूनहि राजकीय दृष्ट्या कायदेशीर संरक्षण नसल्यानें, पुरुषांचेकडून मागें वर्णन केल्याप्रमाणें जे त्यांचे हाल होत त्यावर इलाज म्हणून कां होईना पण, कांहीं तरी राजकीय हक्क संपादन करणें आवश्य आहे असें इंग्लिश स्त्रीला फार दिवसांपूर्वीपासून वाटत असे. 'स्त्रिया म्हणजे मनुष्य प्राणीच आहेत, हें सुद्धां आतां पुरुषांना सांगण्याचा, शिकविण्याचा प्रसंग आला आहे' हे एका इंग्लिश स्त्रीच्या मुखांतील उद्गार वाचल्यानंतर इंग्लिश स्त्रियांना किती यातना व गुलामगिरी सहन करावी लागली असेल याची कल्पना येते. सुमारें पाऊणशें वर्षें इंग्लिश स्त्रीनें दास्य-विमोचनाची धडपड करून तिला जें मिळूं शकलें नाहीं तें मात्र गेल्या महा-युद्धाच्या चारच वर्षांनीं तिला प्राप्त करून दिलें. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सर्वच क्षेत्रांमध्यें या चार वर्षांनीं स्त्रियांच्याबाबत मोठीच क्रांति घडवून आणली. ही क्रांति घडून येण्यांत अर्थात् पूर्वीच्या ७५ वर्षांच्या चळवळींची भूमिका थोडीफार उपयोगी पडली यांत शंकाच नाहीं. या चार वर्षांच्या कालांत घडलेल्या गोष्टी अगदीं सहज व स्वाभाविक अशाच आहेत. पुरुषांच्या अभावीं

सर्वत्र स्त्रिया कामें करूं लागल्या, त्यांनीं तीं बऱ्याच अंशानें यशस्वी करून दाखविलीं व आपली योग्यता सिद्ध केली. पेढ्यांमधून, कारखान्यांमधून, दवाखान्यांमधून, लष्करी–बिनलष्करी कचेऱ्यांमधून, ज्या ज्या ठिकाणीं त्यांना कामें करण्याची संधि मिळाली, त्या त्या ठिकाणीं त्यांनीं कामें करून आपली लायकी प्रस्थापित केली. स्त्रीस्वातंत्र्याचा फारसा पुरस्कार न करणाऱ्या ॲस्क्वीथनेंहि शेवटीं १९१६ सालीं म्हटलें, 'युद्ध यशस्वी करण्याच्या दृष्टीनें स्त्रियांची होत असलेली मदत बिनमोल आहे; त्यांच्या हिताशीं संबंध असलेल्या प्रश्नांचा राष्ट्रानें जरूर सहानुभूतिपूर्वक विचार करावा.'

## राजकारणांत प्रवेश, लैंगिक आचार, आणि शिक्षण

यानंतर १९१८ सालीं लढाई संपली, अर्थात् युद्धामध्यें कामगिरी करून राष्ट्राला वांचविणाऱ्या पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांनीं केलेल्या कामगिरीचाहि गौरव होणें स्वाभाविक होतें. १९१७ सालींच कॉमन्ससभेनें 'रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल' हें बिल बहुमतानें पास करून घेतलें होतें, तें हाऊस ऑफ लॉर्ड्स्‌कडे मंजुरीसाठीं पाठविलें. लॉर्ड कर्झन या कट्ट्या स्त्री–स्वातंत्र्य–विरोधकानें या बिलास मान्यता देण्याबद्दल सभागृहास विनंति केली व शेवटीं १९१८ सालीं त्यावर खुद्द राजेसाहेबांची सही होऊन हें बिल निर्विघ्नपणें पसार झालें. या कायद्यान्वयें तीस वर्षांच्या पुढील प्रत्येक स्त्रीला राष्ट्रीय व स्थानिक निवडणुकींत मतें देण्याचा अधिकार प्राप्त होऊन त्यांना पुरुषांच्या बरोबरीनें राष्ट्राचे नागरिक होण्याचा मान प्रथम मिळाला. यानंतर सुमारें वर्षानेंच पार्लमेंटच्या निवडणुकीला उभें राहण्याचा हक्क स्त्रियांना प्राप्त करून देणारा कायदा एकमतानें पसार झाला व निवडणुकींतील लैंगिकभेदाचें प्राधान्य समूळ नष्ट झालें. स्थानिक राजकारणांत पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांना हक्क असल्यानें, राजकीय क्षेत्रांतील महत्त्वांच्या जागांवर स्त्रिया आतां दृष्टीला पडूं लागल्या आहेत. हाऊस ऑफ लॉर्ड्स्‌मध्यें मात्र स्त्रियांना अद्याप प्रवेश मिळालेला नाहीं. या ठिकाणीं स्त्रीपुरुषविषमता अद्यापहि काय आहे. कांहीं झालें तरी, घरच्या कोंडवाड्यांतून आपली मुक्तता करून घेण्याचा मार्ग आपणांस उपलब्ध झाला, एवढें समाधान मात्र इंग्लिश स्त्रीला या सर्व घटनांमुळें प्राप्त झालें. घराबाहेर करावीं लागणारीं कामें हीं त्रासदायक व कंटाळवाणीं आहेत याची त्यांना जाणीव आहे; पण एवढें समाधान त्याचबरोबर आहे कीं, गृहकृत्याबद्दल पुरुषवर्ग आभारी नसे व राष्ट्राच्या

राजकीय प्रपंचांत त्याचा हिशेबहि लागत नसे. पण आतां मात्र स्त्रियांचें अस्तित्व सर्वत्र जाणवत आहे.

या नवीन सुधारणेमुळें स्त्रीपुरुष–संबंधाला एक निराळेंच स्वरूप आलें. एकाच कार्यक्षेत्रांत काम करणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या मनामध्यें केवळ लैंगिक भेदांमुळें वावरत असलेले न्यूनगंड व अहंगंड पूर्ण नाहींसे होऊन आपला दर्जा समान आहे याची जाणीव दोघांनाहि झाली. स्त्री–शुद्धत्वाच्या कल्पनांना महायुद्धानें धक्का दिलाच होता. पण या नवीन सुधारणांनीं [ ? ] त्यांचा पुरताच चक्काचूर उडविला. आज आपला प्रियकर म्हणून वावरणारा तरुण उद्यां समरभूमीवर पतन पावूं शकतो, हें सत्य तरुण स्त्रियांना कळून आल्यानंतर लैंगिक आचाराबाबतची एकनिष्ठा त्यांच्यामध्यें कशी राहूं शकणार ? [ Road Back ] युद्धकालांतील बहुतेक विवाह म्हणजे तात्पुरते लैंगिक संबंध या सदरांतच पडतात, व यामुळें पुरुषांची भ्रमरवृत्ति स्त्रियांचे ठिकाणींहि जागृत झाली. मुलांमुलींत लैंगिक संबंध सहजासहजीं होऊं शकतील अशीच परिस्थिति राष्ट्रामध्यें निर्माण झाल्यानें, या व युद्धोत्तर कालांत विवाहसंस्था नामशेष होण्याच्या पंथाला लागली. या कालानें स्त्रियांचें पूंसीकरण एवढ्या मोठ्या प्रमाणांत केलें कीं, सिगरेट ओढणें, मद्यपान करणें इत्यादि गोष्टीहि स्त्रियांच्यामध्यें शिरल्या. स्त्रियांची संख्या पुरुषांच्यापेक्षां बरीच अधिक असल्यानें आजची तरुण इंग्लिश स्त्री लैंगिक–स्वातंत्र्याची जितकी भोक्ती आहे तितकी इतर कशाचीच नसेल. एका कॉलेजमधील कॉलेजकन्यकांनीं आम्हांस बौधिक स्वातंत्र्यापेक्षां लैंगिक स्वातंत्र्याची अधिक मातब्बरी आहे असें स्पष्ट बोलून दाखविलें. कॉलेजमधील शिस्तीवर टीका करतांना त्या म्हणाल्या, ‘ **अध्यापकवर्गानें आमच्या मनांवर फार तर दडपण ठेवण्याचा प्रयत्न करावा, आमच्या बिछान्यावर त्यांचा कटाक्ष असूं नये.** ’ लैंगिक विषय हा इंग्लिश स्त्रीच्या भाषणाचा आवडता विषय होय.

### स्त्रिया म्हणजे राजकारणांतील शोभा

चालू जमान्यांतील या विचारनाविन्याचा परिणाम कुटुंबावरहि झाला आहे. आईबाप आपल्या मुलांना शिक्षण देतांना मुलगा मुलगी असा भेद करून त्यांच्या शिक्षणाची दिशा न ठरवितां दोघांनाहि सारखीच संधि देतात आणि ही परिस्थिति सरासरी त्यांच्या वयाच्या १४ वर्षांपर्यंत टिकते. परंतु यापुढें मात्र आईला

वाटूं लागते कीं, मुलीनें घरीं राहून आपल्या कार्यांत हातभार लावावा, व बहुतेक मध्यम कुटुंबियांमधून अद्यापिहि याच विचारांचा सूर वाहतो. परंतु बापाला बाह्य परिस्थितीची जाणीव असते. प्रत्येकाला स्वतंत्रपणें चरितार्थाला समर्थ करावें असें त्याला वाटत असतें. त्याचबरोबर शिक्षणव्यवसायांत असणाऱ्या स्त्रियांचेकडूनहि स्त्रीशिक्षणप्रचाराला अप्रत्यक्षपणें हातभार लावला जातो. यामुळें बहुतेक शाळाकॉलेजांमधून मुलांमुलींची संख्या समसमान आढळते. कित्येक ठिकाणीं तर मुली मुलांपेक्षांहि अधिक आढळून येतात. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज या दोन विश्वविद्यालयांत मात्र मुलांच्या संख्येच्या एक दशांश मुलींची संख्या असावी असा दंडकच असल्यानें स्वाभाविकपणेंच तेथें मुलींची संख्या अल्प आहे. उच्च वर्गातील लोकांना मुलांमुलींना समान शिक्षण देण्यांत कोणतीच अडचण भासत नाहीं. परंतु मध्यम व गरीब वर्गातील लोक शिक्षण देतांना शिक्षणोत्तर चटकन् प्रथम कोणास नोकरी मिळूं शकेल व प्रपंचामध्यें आपणास कोणाकडून अधिक मदत मिळूं शकेल याचा विचारच प्रथम त्यांच्या डोक्यांत असतो. रशियाप्रमाणें इंग्लंडमध्यें सर्व क्षेत्रें स्त्रियांना अद्याप खुलीं नसल्यानें स्वाभाविकच त्यांना नोकऱ्या मिळणें कठीण जातें. पण पुरुषांपेक्षां त्या त्यांना अधिक लौकर मिळूं शकतात असा अनुभव असल्यानें, टंकलेखनादि कारकुनी पेशाचीं कामें स्त्रियांवर सोंपवून पुरुष अधिक कष्टप्रद कामाचा आश्रय करूं लागले; त्यामुळें उच्च शिक्षणाचे संस्कार फक्त एका ठराविक वर्गालाच राखून ठेविल्याप्रमाणें झालें आहे. स्त्रिया शिकल्या तरी पुरुष गृहकृत्यें करूं शकत नाहींत ही गोष्ट जगाप्रमाणें इंग्लंडमध्येंहि ग्राह्य धरण्यांत आली असल्यानें कांहीं ठिकाणीं स्त्रियांना दोन्ही कार्यें करावींच लागतात. सर्वसाधारण कामकरी स्त्रियांच्या कपाळची ही कर्मकटकट तर मुळींच चुकूं शकत नाहीं. कारखान्यांतून राबून यावें व फिरून घरच्या उस्तावारीला लागावें असा प्रकार सर्रास घडतो. यामुळें फिरून कांहीं स्त्रिया घरचा आश्रय करूं लागल्या आहेत. बऱ्याचशा जुन्या स्त्रिया व त्यांच्या हाताखालीं वावरणाऱ्या या मुली फिरून आपल्या सनातनी दृष्टिकोनाचा पाठपुरावा करतांना दृष्टीस पडत आहेत. स्त्रियांना प्राप्त झालेल्या अनेक हक्कांनीं निसर्गतः स्त्रियांवर पडलेली जबाबदारी नष्ट होऊं शकत नाहीं; व तशी करण्याचा प्रयत्न केल्यास समाजाचे हाल होतात याचें प्रत्यंतर इंग्लंडमध्येंहि इतर देशाप्रमाणें येत आहे, आणि यामुळें स्त्रियांना अनेक हक्क

प्राप्त होऊनहि त्या याबाबत उदासीनच असतात. स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त होऊन आज २२ वर्षें झालीं, सध्यां पुरुष मतदारापेक्षां स्त्रीमतदारांचीच संख्या इंग्लंडमध्यें कितीतरी मोठी आहे. परंतु या मतांचा उपयोग एखाद्या पक्षाला विजय प्राप्त करून देण्यापलिकडे स्वतंत्रपणें केल्याचें कधींच आढळून येत नाहीं. १९२९ सालीं मजूर पक्षाला पाठिंबा देऊन स्त्रियांनींच विजयी केले. १९२८ सालीं अमेरिकेंत 'हूवरची' उचल बांगडी करण्यास स्त्रियाच कारणीभूत झाल्या. पण स्त्रियांचें स्वतंत्र राजकीय तत्त्वज्ञान उदीत होऊन यशस्वी झाल्याचें कोठेंच दृष्टीला पडत नाहीं. इंग्लंडच्या लोक-सभेंत दिसणारीं स्त्रियांचीं शेलकीं डोकीं मागील बांकावर राहून झोपा काढण्या-पलिकडे अगर कोणाच्या तरी तंत्रानें वागून हात वर करण्यापलिकडे आपल्या अधिकारांचा व हक्कांचा उपयोग करूं शकत नाहींत. ही टीका इंग्लिश पत्रांचीच आहे. सभागृहांतील स्त्री सभासदांवर करण्यांत आलेली पुढील टीका पहा.

> 'The house as a club behaves in the main as though nothing had happened, it assigns to women M. P. S. room of their own, but excludes them from more and takes little specific notice of them.'

आपल्या इकडे खेळांत लिंबलोणचें म्हणून कांहीं भिडू घेण्याचा प्रघात आहे त्यांतीलच हा एक प्रकार नाहीं का ?

इंग्लिश स्त्री राजकीय क्षेत्रांत कोणतेंच विधायक कार्य करूं शकत नाहीं याचें प्रत्यंतर या बावीस वर्षांच्या अनुभवानें दिलें आहे. परराष्ट्रीय राजकारणाचें क्षेत्र तर त्यांना पूर्ण बंदच आहे. उमरावांच्या सभेंत त्यांचा अद्याप शिरकाव झालेला नाहीं. इंग्लिश स्त्रीच्या सामाजिक जीवनांत मात्र पूर्वीच्या मानानें बराच फरक पडला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. गेल्या पन्नास वर्षांमध्यें पास करण्यांत आलेल्या अनेक कायद्यांनीं स्त्रीदास्यविमोचनाचें कार्य अल्पस्वल्प प्रमाणांत केलें आहे. त्यांतील कांहीं महत्त्वाच्या कायद्यांचें ओझरतें परीक्षण या ठिकाणीं केल्यास वावगें होणार नाहीं.

## समतेतहि विषमता

१९१८ सालीं स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त करून देणारा कायदा पास झाल्याचें वर सांगण्यांत आलेंच आहे. परंतु वरील कायद्यानें स्त्रीपुरुषांत संपूर्ण समता प्रस्थापित झाली असें मात्र नाहीं. कारण पुरुषांच्या मानानें स्त्रियांचे

हक्क किती तरी मर्यादित होते. सरकारी नोकऱ्यांमधूनहि दाखविण्यांत येणारें धोरण स्त्रीपुरुष समतेला पोषक होतें असें म्हणतां येत नसे. १९२१ सालीं पास झालेल्या व आजतागायत अमलांत असलेल्या कायद्यांत पुढील दोन कलमांचा समावेश करण्यांत आला आहे—[ १ ] कोणत्याहि सरकारी नोकरींत प्रवेश करूं इच्छिणारी स्त्री अविवाहित अगर विधवा असली पाहिजे, [ २ ] विवाहोत्तर तात्काळ तिनें आपल्या नोकरीचा राजीनामा दिला पाहिजे; याबाबत कांहीं विशेष सवलत सरकारला द्यावीशी वाटल्यास तो हक्क सरकारनें राखून ठेविला आहे. याचा अर्थच हा कीं, स्त्रींचें वैवाहिक जीवन आणि त्यांची नोकरी यांचा मेळ बसूं शकत नाहीं, याची जाणीव इंग्लंडमध्यें आहे. स्त्रीपुरुषांच्या वैवाहिक संबंधाबाबतहि अनेक कायदे इंग्लंडमध्यें पास करण्यांत आले आहेत. पद्धतशीर रीतीनें विवाहबद्ध न होतां जर एकादि स्त्री एकाद्या पुरुषाच्या सहवासांत पत्नीच्या नात्यानें राहिली तर तिला पत्नीत्वाचे सर्व अधिकार त्यानें नकार दर्शवीपर्यंत प्राप्त झालेले असतात. त्याच्या मालमत्तेची वहिवाट ती करूं शकते, अगर नवऱ्याच्या पतीचा उपयोग करून स्वतंत्रपणें उधारी सारखे व्यवहार करूं शकते व ते त्या मानलेल्या पतीवर बंधनकारक होऊं शकतात. सदर गृहस्थानें मुद्दाम जर सदर व्यवहारांना आपण जबाबदार नसल्याचें जाहीर केलें तर मात्र तिला कांहींहि करतां येत नाहीं. व्यभिचारादि बाबतींत पतीला जे हक्क असत तेच पत्नीलाहि असल्याचें १९२३ सालीं न्यायालयाकडून प्रस्थापित करण्यांत आलें. याच सालीं घटस्फोटाबाबतहि स्त्री–पुरुषांना समान हक्क देण्यांत आले. पत्नी व्यभिचारी आहे एवढ्या एकाच मुद्द्यावर पुरुषाला घटस्फोट मागतां येई, पण स्त्रियांना निव्वळ पती व्यभिचारी आहे एवढ्या मुद्द्यावर तो मिळत नसे. त्यासाठीं आणखी कांहीं गोष्टी त्यांना प्रस्थापित कराव्या लागत. पण १९२३ च्या कायद्यान्वयें स्त्रियांना याबाबत आणखी जादा हक्क देण्यांत आले. मद्यपी, क्रूर, आपणांकडे दुर्लक्ष करणारा, मुलाबाळांना मारहाण करणार असा पती या कायद्यान्वयें दोषी ठरूं शकतो व पत्नी त्याच्या कचाट्यांतून कायदेशीरपणें मुक्त होऊं शकते. गुप्तरोगानें पीडिलेला अगर पत्नीला व्यभिचारास प्रवृत्त करूं पहाणारा पती आज स्त्रीला कायदेशीरपणें दोषी ठरवितां येऊं शकतो व त्याच्यापासून ती आपली सहज मुक्तता करून घेऊं शकते. पतीहि पण याच भूमिकेवर पत्नीपासून फारकत मागूं शकतो.

विधवा व कुमारिकांनाच फक्त सरकारी नोकरींत मान्यता असल्याचा

उल्लेख आलाच आहे. १९२५ सालीं याबाबत घडलेल्या एका प्रकारानें इंग्लिश स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या कल्पनांवर बराच प्रकाश पडणारा असल्यानें, त्याचा उल्लेख या ठिकाणीं करणें अवश्य आहे. 'पूल कॉरपोरेशन' नांवाच्या एका संस्थेनें कामावरून दूर केलेल्या एका स्त्रीनें सदर कॉरपोरेशन विरुद्ध दावा केला. कॉरपोरेशनचें म्हणणें असें कीं, सदर स्त्रीचा आतां विवाह झाला असल्यानें तिला योग्य तें आर्थिक संरक्षण देण्याची जबाबदारी आतां पतीवर आहे व तो तसा समर्थहि पण आहे, सबब तिला नोकरीवर ठेवून घेण्यास आम्ही तयार नाहीं. कॉर्पोरेशननें आपल्या समर्थनार्थ पुढील महत्त्वाचे मुद्दे मांडले–[ १ ] विवाहित स्त्री या दृष्टीनें तिचें प्रमुख कर्तव्य म्हणजे गृहकृत्यांत संपूर्ण लक्ष घालणें हें होय, अशा स्थितींत पत्नी व शिक्षिका ही दोन्ही कार्यें तितक्याच दक्षतेनें तिला पार पाडतां येणार नाहींत; [ २ ] कित्येक तरुण अविवाहित शिक्षक बेकार असतां विवाहामुळें आर्थिक स्वास्थ्य प्राप्त झालेल्या स्त्रियांना कामावर ठेवून अशा तरुणांची कुचंबणा करण्याची आम्हांस जरूर नाहीं. पहिल्या कोर्टानें वादीच्या म्हणजे त्या स्त्रीच्या बाजूनें निकाल दिला होता, पण अपिलांत प्रतिवादीचें म्हणणें खरें धरण्यांत येऊन कार्पोरेशनचें म्हणणें अयोग्य म्हणतां येत नाहीं असा निकाल तर दिलाच, पण निकालांत कार्पोरेशननें केलेल्या 'गृहकृत्यें व शिक्षण व्यवसाय हीं दोन्ही कामें एकाच स्त्रीचे हातून सारख्याच कसोशीनें पार पडणार नाहींत' या विधानाचा चांगलाच पुरस्कार केला. उदाहरणादाखल वरील हकीकतीचा उल्लेख करण्यांत उद्देश एवढाच कीं, स्त्रियांच्या, विशेषतः विवाहित स्त्रियांच्या खऱ्या कार्यक्षेत्राची कल्पना इंग्लिश जनतेला कितपत आहे याचें दिग्दर्शन व्हावें. आर्थिक संरक्षण नसल्यास स्त्रीनें नोकरीच्या फंदांत पडावें पण विवाहानें तें प्राप्त होण्याजोगें असल्यास जरूर त्याचा स्वीकार करावा व नोकरीस रामराम ठोकावा, ही इंग्लिश जनतेची मनोभूमिका या खटल्यानें फार उत्तम तऱ्हेनें स्पष्ट करून दाखविली आहे. शिक्षणक्षेत्रांत स्त्रियांना भरमसाट जागा करून देण्याचा स्तुत्य उद्योग करणाऱ्या हिंदी सरकारनें हें उदाहरण जरूर डोळ्यापुढें ठेवावें. देशांत लाखों लायक तरुण बेकार असतां पोरांच्या शाळांमधूनहि स्त्रियांचा सुळसुळाट करूं पहाणारे लोक एकसमयावच्छेदें करून दोघांचाहि बळी घेत असतात.

बरेच दिवसपर्यंत संमती वय मुलीसाठीं १२ व मुलासाठीं १४ होतें. हीं वयें वाढविण्यांत यावीत म्हणून कित्येक दिवस खटपट चालू होती. शेवटीं १९२९ सालीं सोळा वर्षांच्या आंतील मुलामुलींचीं लग्नें तर बेकायदा ठरविण्यांत आलींच

पण संमती वयही भिन्न न ठेवितां दोघांनाहि एकच ठेविण्यांत आलें. विवाह-विषयक कायद्यांमध्यें १९३३ सालचा कायदा विशेष महत्त्वाचा आहे. या कायद्यान्वयें विवाहित इंग्लिश स्त्रीच्या राष्ट्रीयत्वाची भूमिका स्पष्ट करण्यांत आली. कोणाहि परकीय स्त्रीस इंग्लिश गृहस्थाशीं विवाह करून इंग्लंडचें राष्ट्रीयत्व प्राप्त करून घेतां येतें. त्याचप्रमाणें कोणाहि परकीयाशीं विवाह करण्याच्या इंग्लिश स्त्रीचें राष्ट्रीयत्व तिला त्या देशाचें राष्ट्रीयत्व प्राप्त होईपर्यंत अबाधित राहूं शकतें.

**सारांश—**

इंग्लिश स्त्रीचें जीवन–चरित्र हें असें आहे. सुधारणेच्या आघाडीवर जाण्याची जितकी मनीषा इंग्लिश जनतेंत असतें तितकीच आपल्या जुनाट संस्कृतीला चिकटून राहण्याचीहि असतें. इंग्लंड जितकें सुधारक तितकें कट्टर सनातनी आहे. प्रसंग पडेल त्याप्रमाणें या दोन भिन्न मनोवृत्तींचा उपयोग करून घेण्याची कला या समाजाइतकी जगांत दुसऱ्या कोणालाच साधलेली नाहीं. अमेरिकन स्त्री आणि इंग्लिश स्त्री यामध्यें वस्तुतः भेद नाहींच. फ्रेंच स्त्रियांबद्दल कितीहि विपर्यस्त कल्पना प्रसृत असल्या तरी इंग्लिश स्त्रीनें मिळविलेलें स्वातंत्र्य आणि तिचा एकंदर जीवनक्रम फ्रेंच स्त्रीहून फारसा भिन्न आहे असें प्रत्यक्ष परिस्थिति पाहून आलेले कोणीच म्हणूं शकणार नाहीं. आजच्या महायुद्धानें युरोपांतील सर्वच राष्ट्रांतील स्त्रियांमध्यें फिरून क्रांति होण्याचा संभव आहे, पण त्यासंबंधीं आतांच कांहीं तर्ककुतर्क करीत बसणें योग्य होणार नाहीं. युरोपांतील प्रातिनिधिक राष्ट्रांतील समाजाचें परीक्षण करतांना निव्वळ त्रयस्थाची भूमिका आम्हीं ठेविली आहे. हीं चित्रें अशीं आहेत, कोणाला बरें वाईट म्हणण्याचा आमचा मानस नाहीं. स्त्री–जीवनाचा आद्य हेतु काय आहे हें आम्हीं आमच्या मागील लेख-मालेंत स्पष्ट केलें असल्यानें तो हेतु साध्य होण्याच्या दृष्टीनें कोणता स्त्रीसमाज कार्य करीत आहे याचा निर्णय वाचकांनींच घ्यावा. शेवटीं इंग्लिश स्त्रीच्या भवितव्याबद्दल एका इंग्लिश पार्लमेंटच्या स्त्री सभासदाचेंच मत देऊन आम्हीं इंग्लिश स्त्री–समाजाची रजा घेत आहोंत—

'If the world goes to war, (it has gone) women employment in England will boom. If a communist revolution comes, the really unfettered opportunity which now prevails in Russia will be theirs. If Fascism, or some sort of military dictatorship, is established, women will probably loose every scrap of freedom thy have won.'

---

## प्रकरण १२ वें

## उपसंहार

### स्त्रीजीवनाचा राष्ट्रावर परिणाम

पाश्चात्य–स्त्री–समाज दर्शन घेऊन आणि वाचकांनाहि त्याचा थोडाफार वांटा देऊन आम्ही आमचा प्रवास आतां पुरे करणार आहोंत. आतांपर्यंत पायाखालीं गेलेली वाट प्रवासाच्या शेवटीं एकदां मागें वळून पहाण्याची प्रथा आहे; नव्हे, ती एक संवयच आहे. या पहाण्यामध्यें एक प्रकारची तृप्ती आहे, समाधान आहे. अमेरिका, जर्मनी, रशिया, इंग्लंड इत्यादि राष्ट्रांचा कानाकोंपरा पाहून आल्यानंतर मातृभूमीवर पाय ठेवतांना जो आनंद एखाद्या प्रवाशाला होणें शक्य आहे तोच आनंद आणि समाधान पुस्तकाच्या शेवटीं येतांना आम्हांला होत आहे. पाश्चात्य स्त्रियांचें बहुरंगी जीवन पाहून आल्यानंतर, एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणें स्थिर, निश्चल, अशी आर्य स्त्री पाहून आम्हांला तर अवर्णनीय समाधानच वाटतें. पाश्चात्य स्त्रियांचें वादळी जीवन आणि ते रंगढंग, तें स्वातंत्र्य, तिच्या वांट्यास आलें नाहीं म्हणून कोणी दुःखाचे सुस्कारे खुशाल सोडोत; पाश्चात्य स्त्रियांच्या अंतर्गत व्यथांची व कळ्यांच्या निश्वासांची खरी कल्पना त्यांना नाहींच असें म्हणावें लागेल. पाश्चात्यांचें वैवाहिक जीवन आणि त्याचा बोजवारा, त्यामुळें स्त्रीजीवनाला आलेलें अस्थिर स्वरूप, यांचें यथासांग परीक्षण आम्हीं आतांपर्यंत केलें असल्यानें, त्यासंबंधीं आतां कांहीं एक न लिहितां, सर्व आर्य स्त्रियांना आम्हांला एकच सवाल विचारावासा वाटतो कीं, आपल्या जीवना-पेक्षां पाश्चात्य–स्त्रीचें जीवन तुम्हांला अधिक प्रलोभनीय वाटतें का ? संपूर्ण निर्दोषी अशी समाजरचना जगावर अस्तित्वांत नाहीं, येणें शक्य नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. आपल्या जीवनांतील दोष पहातांना तर ही गोष्ट अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे. जगांतील कोणत्याहि समाजाचा व त्यांतील

स्त्रीजीवनाचा अभ्यास करणाऱ्यांना सूक्ष्म विचारांतीं असेंच आढळून येणार आहे कीं, आर्य स्त्री–जीवनामध्यें असलेले दोष जगांतील इतर स्त्रीसमाजाच्या मानानें अत्यंत अल्प आहेत. चालू जगांत सर्वत्रच नकली मालाचा उठाव झाला आहे; आणि तोच न्याय समाजशास्त्रांतहि घुसूं पहात आहे. झटकन् डोळ्यांत भरणाऱ्या रंगेल समाजांची नक्कल करण्याची वृत्ति बळावत चालल्यानें आपली प्रत्येक गोष्ट त्याज्य वाटूं लागली आहे. आणि राष्ट्रांत शिरलेल्या अनेक दुर्गुणांचें खापर पारतंत्र्यापेक्षां पूर्वीच्या समाजरचनेवर फोडण्यांतच देशभक्तीचें सारसर्वस्व येऊन बसलें आहे. फ्रान्सच्या अधःपाताचीं कारणें आतां पुढें आलीं आहेत. **सामाजिक नीतिमत्तेच्या अधःपातानें फ्रान्ससारखीं पहिल्या दर्जाचीं राष्ट्रें कोणत्या स्थितीला येतात याचें ताजें उदाहरण डोळ्यापुढें असल्यानें पूर्वीच्या ग्रीक आणि रोमन साम्राज्यांच्या अधःपाताची कारणमीमांसा आम्हीं आतां करीत बसत नाहीं.** ‘ स्वारी शिकारीवर कबिले निघाले कीं समजावें, राष्ट्राचा अधःपात जवळ आला म्हणून ’ हा जणूं सिद्धान्तच ठरूं पहात आहे. स्त्रीजीवनाची पाश्चात्य राष्ट्रांनीं चालविलेली विटंबना म्हणजे स्त्रीस्वातंत्र्य, म्हणजे स्त्रियांचा स्वर्ग, या कल्पना आतां जुन्या होऊं लागल्या आहेत. महाराष्ट्रांतील पहिल्या सुधारकांनीं [ ! ] आणलेलें हें लोण आतां शिळें-पाकें होऊन उकिरड्यावर टाकण्याची पाळी आली आहे. स्त्री पुरुष हीं माणसें आहेत म्हणून तीं सारखींच समजावीं, हें जुनें तर्कशास्त्र आजच्या शास्त्रीय युगानें कुचकामीं ठरविलें आहे. युरोपांतील औद्योगिक क्रांतीमुळें निर्माण झालेल्या आर्थिक विषमतेच्या युगानें स्त्रीपुरुषांतील विषमता नष्ट करण्याचा डाव स्वार्थासाठीं टाकला आहे हें आतां उघड झालें आहे. गेल्या महायुद्धांत कामाच्या गाड्याला जुंपलेली स्त्री आजहि फिरून त्याच प्रचाराला बळी पडून राबत आहे. निसर्गापासून दूर जाणाऱ्या पाश्चात्य स्त्रीला अनेक यातनामय प्रसंगांतून मार्गक्रमण करावें लागत आहे. पुरुषांच्या भांडवली जोरावर त्यांच्या असुरी वृत्तीला बळी पडणारी पाश्चात्य स्त्री हिंदी स्त्रीची क्वचितच गुरु होऊं शकेल ! स्त्रियांना पाश्चात्य राष्ट्रामध्यें मिळणारा मान [!] कित्येकांना मोह पडतो. पण पाश्चात्य स्त्रीपुरुषांचा शिष्टाचार हा नाटकी स्वरूपाचा असतो, याची त्यांना कल्पना नसते. पाश्चात्य पुरुष स्त्रियांना जितक्या बेदरकारपणें, बेमुर्वतखोरपणें वागवितो तितक्या तऱ्हेनें वागविण्याची छाती इकडे फार क्वचित ठिकाणीं दृष्टीला पडते, याचें प्रत्यंतर पाश्चात्यांच्या कुटुंबांत

चावरणाऱ्या लोकांना आल्याशिवाय राहणार नाहीं. हिंदी स्त्रियांच्या दास्यत्वाची ग्वाही देतांना विवाहपद्धतीवर प्रामुख्यानें शिंतोडे उडवीत असतात, परंतु हें किती फोल आहे याचा विचार आमच्या मागील पुस्तकांत विस्तृतपणें केलाच आहे. विवाहाचें वय काय असावें याबद्दल निरनिराळ्या राष्ट्रांच्या कल्पना मागें येऊन गेल्याच आहेत; **परंतु शास्त्रज्ञांचे दृष्टीनें पहावयाचें झाल्यास मुलींचे विवाह १४ ते १६ च्या दरम्यान व्हावेत असें जवळ जवळ सर्वांचें मत आहे.** हॅवलॉक एलिस, डॉ. फिश, डॉ. मॅगीन, डॉ. पॅटन, प्रो. न्यूरेथ, डॉ. ब्लांड सटन आणि गाइल्स, डॉ. रॅन्च, डॉ. क्रीटलेट या सर्वांचीं मतें मुलींचीं लग्नें या वयांत व्हावींत अशींच आहेत. कित्येकांनीं तर १२ अगर १३ वर्षेंच सांगितलें आहे. अलिकडे प्रौढ विवाहाची निघालेली हुल्लड व अठराअठरा, वीसवीस, वर्षांच्या मुलींची शाळा कॉलेजें करीत हिंडणारी फलटण, म्हणजे समाजाच्या नाशाची पूर्वतयारी आहे. इंग्लंडमधील कुमारिकांचे विवाह आतां सरासरी पंचविसावे वर्षी होतात; आणि यामुळें डॉ. गिलर्ड थॉमससारख्या तज्ञ डॉक्टरला म्हणावें लागतें, ‘ यापैकीं कट्टाकट्टी शेंकडा चार पत्नी व माता होण्यास योग्य असतात.’

‘Only four percent are physiologically fit to beome good wives and mothers-’ हाच डॉक्टर आणखी पुढें म्हणतो. ‘Hypoplasia of the female reproductive organs is a common condition of 100 wives whose marriages were sterile, 42 were demonstratably hypoplastic ?’ यानंतर तो पुढें म्हणतो, ‘The most important type of menstrual disturbance is in our opinion delayed menarche.’

**हें घ्या प्रौढ कुमारिकांचें चित्र !**

लहानपणीं लग्नें झाल्यानें बालमृत्यूंची संख्या वाढून स्त्रियांचें आरोग्य बिघडतें, असा अजब वर्तमानपत्रीं शोध लावून त्या अंदाजावर जगूं पहाणारांनीं आपले आंकडे जरूर पुढें आणावेत. **गेल्या पिढीपेक्षां चालू प्रौढ विवाहांतील पिढीचें आरोग्य सुधारलें आहे व त्यांतील बालमृत्यूचें प्रमाण कमी झालें आहे, हें सप्रमाण सिद्ध करणें फार कठीण आहे, नाहीं अशक्य आहे. बालमृत्यूचें प्रमाण व बाळंतपणानें होणारी स्त्रियांची**

**दुर्दशा या प्रौढ विवाहाचें कालांतच अधिक दिसून येईल.** याचा अर्थ मुलामुलींचीं पाळण्यांत लग्नें लावा अगर आठव्या वर्षांच्या परकऱ्या पोरींचीं लग्नें लावा, असा खास नाहीं, १४–१६ वर्षांपुढें मात्र प्रौढा कुमारी म्हणून वावरण्याची त्यांच्यावर पाळी येऊं नये एवढाच आमचा आग्रह आहे. मुलीला मत येण्याची वाट पहात बसणाऱ्या पालकांनीं ही गोष्ट जरूर लक्षांत ठेवावी कीं, स्वतःचें मत बनवून मुलगी लग्नास सज्ज होण्यापूर्वी निसर्गानें तिला सज्ज केली आहे; आणि निसर्गाची सिद्धता मार्गे सारून मतासाठीं वाट पहाणारी अगर आईबापांच्या सल्ल्यानें वाट पहात बसणारी मुलगी आपल्या दुःखांना पाचारण करीत आहे. वयांत आल्यानंतर जास्तींत जास्त तीन वर्षेंपर्यंत पित्यावर विसंबून राहण्यास सांगून त्यापुढें कुमारिकेनें आपला मार्ग स्वतंत्रपणें चोखाळावा असा सल्ला स्त्रीसमाजाला देणारा मनू शारीर, मानस व समाजशास्त्रवाद्यांमध्यें अग्रणी होता यांत शंका नाहीं. मनूच्या नांवानें ओरडा करून स्त्रीस्वातंत्र्याच्या आघाडीवर निघालेल्या प्रौढा कुमारिकांचें फार मार्मिक वर्णन दोघा इंग्लिश–शास्त्रज्ञांनीं केलें आहे. या वर्णनांत आपला समावेश होऊं नये म्हणून प्रत्येक कुमारिकेनें अवश्य जपलें पाहिजे. हें पहा तें वर्णन—

**'तिच्या गालांचा रंग फिका होतो, ते कोमेजतात...केस रखरखीत होऊन ओंठ फिक्के व पातळ होतात. त्यांचा मांसलपणाच नाहींसा होतो......डोळ्याच्या खोबणीला खालीं–वर काळ्या छटा मारूं लागतात...आणि सर्व चेहऱ्यावर उदासीनतेची कशी दाट छाया पसरते! शरीर लुकडें बनून आवाज कर्कश होतो, वक्षस्थलाचा मांसलपणा पार नष्ट होऊन त्याला आंबोळयाच्या तव्याची कळा येते....मानेचा वासा उंचावून गळयाच्या खालच्या भागाचीं हाडें प्रामुख्यानें दिसूं लागतात'**...नंतर हेच गृहस्थ पुढें म्हणतात. '**कुमारीचें हें भूत तयार होण्यास तिच्या २३–२४ वे वर्षापासून सुरुवात होते. ३० वे वर्षीं ही क्रिया जवळ जवळ पूर्ण होते.**' शिक्षणाच्या मार्गे लागून लग्नाचा प्रश्न मार्गे टाकणाऱ्या कुमारींनीं अगर त्यांच्या पालकांनीं वरील वर्णन जरूर ध्यानांत घ्यावें. **हीच गोष्ट ध्यानांत घेऊन इंग्लंडच्या रजिस्टार जनरलनें इंग्लिश कुमारिकांना सल्ला दिला कीं, ही कोमजण्याची क्रिया सुरू होण्याच्या आंत विवाहबद्ध होऊन संसाराला लागा.**

विवाह व संतती लांबणीवर टाकण्यानें स्त्रियांच्यावर कॅन्सरची आपत्ति हटकून ओढवते, हा डॉ. जनेट लेनचा अभिप्राय मागें एकदां आम्हीं विचारांत घेतलाच असल्यानें त्यासंबंधीं अधिक विवेचन आतां या ठिकाणीं करीत नाहीं; फक्त त्याच्या आणखी एका अभिप्रायाचा उल्लेख करणें मात्र अवश्य आहे. तो म्हणतो,

'It can be hardly doubted that the absence of the normal function of the breast must be of importance in unmarried women. It is possible that the continued recurrence in the breast of the changes which occur with each menstrual cycle, without the stimulus due to pregnancy and lactation, may be the prejudical factor.'

कुमारिकांमध्यें व संततिहीन स्त्रियांमध्यें वाढणाऱ्या कॅन्सरला उद्देशून हें विधान करण्यांत आलें आहे, हें निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. इंग्लिश कुमारिकांची वाढलेली विवाहवयोमर्यादा भांडवलदार वर्गाला जरी पथ्यावर पडत असली तरी अनेक डॉक्टर्सनां व समाजशास्त्रज्ञांना ती दुःसह झाली आहे, यांत शंका नाहीं. म्हणूनच अगदीं १९३५ सालीं प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथांत लुडोव्हिसी म्हणतो...'**तेरावे वर्षीं सरसहा ऋतुस्नात होणाऱ्या कोणाही इंग्लिश कुमारीनें आपला विवाह वयाच्या १६ व्या वर्षाच्या आंतच उरकून घ्यावा. कोणत्याहि सुदृढ मुलीनें पंधराव्या वर्षाच्यापुढें अविवाहित राहूं नये !**' सतराव्या शतकापर्यंत विवाहाचा हा दंडक पाश्चात्य राष्ट्रांमध्यें सरसहा पाळला जात असे, असें दिसतें. कर्नीवालनें आपल्या पुस्तकांत बारावे वर्षीं सरसहा विवाह होत असल्याचें नमूद केलें आहे. वाल्टर स्कॉटच्या विवाहप्रसंगीं त्याच्या पत्नीचें वय अकरा वर्षांचें होतें. फ्रान्समध्यें याहूनहि लवकर विवाह होत. कारण इंग्लंडपेक्षां तेथील कुमारिका अधिक लौकर ऋतुस्नात होतात. लवकर विवाहानें संततीची हानि होते असा, कोणताहि शास्त्रीय आधार नसतांना, ओरडा करणाऱ्या लोकांच्यासाठीं खास इंग्लिश तज्ञाचा त्याच्याच शब्दांत पुढील अभिप्राय आम्हीं देत आहों—

'Owing to the suppleness of her limbs and to the pristine vigour of her constitution, she is in an ideal condition



११

for child bearing, and statistics of child-birth confirm this. To begin with we do not hear of dramatic and sudden collapses or deaths, in the women who marry young.'

बिचाऱ्या स्त्रिये, नाहीं त्या हट्टाला पेटून उगीच स्वतःची व दुसऱ्याची फसवणूक कां करतेस? प्रत्यक्ष अनुभवांतीं आम्हीं असें सांगू शकतों कीं, प्रौढपणीं विवाह झालेल्या स्त्रियांची व त्यांच्या संततीची जी हानि होते ती लहानपणीं म्हणजे १३ ते १७ च्या दरम्यान विवाह झालेल्या स्त्रियांची होत नाहीं. डॉ. मार्गारेट स्कूल्ट्झे म्हणते,

'Abnormal Presentation and contracted pelvis are more common in the elderly than the young mothers; the frequency of inadequate pains increases with advancing age. Higher percentage of Caeserian sections will probably always be neccessary in the elder women and in those with previous long standing sterility.'

डॉ. एविन्सन म्हणतो 'वाढत्या वयांत आई होऊं पहाणाऱ्या स्त्रियांना मृत्यूपासून अधिक धोका असतो. अगदीं शक्य तों लवकर माता होणाऱ्या स्त्रियांना बाळंतपणांत फारसा धोका असत नाहीं.' पंचवीस वर्षांपुढें माता होऊं पहाणारी स्त्री पंधरावें वर्षी माता होणाऱ्या स्त्रीच्या मानानें चौपट अधिक धोक्यांत असते, असें याच गृहस्थानें पुढें म्हटलें आहे. डॉ. जॉन हॅरिसनें पांचशें बाळंतपणें आपल्या देखरेखीखालीं करून फिरून वरीलच सिद्धान्त काढला आहे. याशिवाय दुसरी एक अत्यंत महत्त्वाची त्यानें सांगितलेली गोष्ट म्हणजे चौदा ते सोळा वर्षांपर्यंत माता झालेल्या स्त्रियाचीं मुलेंच अधिक धष्टपुष्ट असतात ही होय. आणि शेवटीं तो शेरा देतो 'हें वय [१४-१६] हें प्रथम बाळंतपणास सर्वोत्कृष्ट वय होय.' आमच्या गेल्या पुस्तकामध्यें आम्हीं हीच गोष्ट पूर्ण विस्तारानें मांडली असल्यानें यांत आम्हीं आतां वाचकांचा अधिक काल घेऊं इच्छित नाहीं. शेवटीं एका इंग्लिश तज्ञाच्या शब्दांतच सांगावयाचें झाल्यास एवढेंच म्हणतां येईल कीं, बालविवाहविरुद्ध उठविण्यांत आलेले सर्व काहूर सर्वस्वीं चुकीचें, गैरसमजुतीवर आधारलेलें आणि स्त्रीहितवादाच्या पोकळ कल्पनांनीं भारलेलें असतें. या भावनाप्रधान लेखनानें शास्त्राचाहि उपमर्द

करण्याचा आव आणला आहे आणि म्हणूनच समाजानें या अशास्त्रीय प्रचाराचा प्रतिकार एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून केला पाहिजे.

[And it is the readers' patriotic duty to resist it with all his might.]

कोणत्याहि प्रकारें आर्थिक परिस्थिति आड येत नसतां आपले विवाह लांबणीवर टाकणाऱ्या मुलींनीं व त्यांच्या पालकांनीं डॉ. फ्रीझलेंझचा अभिप्राय लक्षांत ठेवावा. तो म्हणतो, '**आर्थिक परिस्थिति अनुकूल असलेल्या मुलींचे विवाह सोळा वर्षांपुढें चुकूनसुद्धां ढकलूं नयेत.**'

## थोड्यांचें नव्हे—पुष्कळांचें हित पहा!

विवाहाचा काल साधारणपणें काय असावा याचा बोध वाचकांना आतांपर्यंतच्या लिखाणावरून झालाच आहे. आतां यापुढील प्रश्न म्हणजे स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य व इतर राजकीय हक्क यासंबंधीं होय. आर्थिक स्वातंत्र्य व राजकीय हक्कांचे प्रश्न विवाह झालेल्या स्त्रियांमुळें निर्माणच होऊं शकत नाहींत, हें आतांपर्यंतच्या लिखाणावरून दिसून आलेंच आहे. स्त्री विवाहित होतांच तिच्यावर पडणारी जबाबदारी व कर्तव्यें हीं अशा विशिष्ट स्वरूपाचीं आहेत कीं, त्यामुळें तिचें सामाजिक जीवन जवळजवळ नष्ट होतें म्हटलें तरी चालेल, आणि त्यामुळें स्वाभाविकच घरचें राजकारण पहाण्यापलिकडे जाण्याची तिला सहसा गरज राहात नाहीं. आर्थिक संरक्षणाची जबाबदारी पतीवर असल्यानें त्याबाबतहि तिला फारशा आकांक्षा बाळगण्याचें कारण राहात नाहीं. हल्लीं एक उलट जमाना निघाला आहे. पुरुषांनीं आपली जबाबदारी टाळल्यास, अनिर्वाह पक्ष म्हणून कां होईना पण स्त्रियांनीं आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होण्याच्या दृष्टीनें शिक्षण घेतलें पाहिजे, असें कित्येकांचें मत आहे. त्यांना आम्हांला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, **हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या बेजबाबदार नवऱ्यांना ताळ्यावर आणण्याची सोपी कामगिरी करावयाची सोडून अखिल स्त्रीजातीचा संहार करणारी घातुक शिक्षणपद्धति सर्वांचे डोक्यावर लादण्याची उस्तवार तुम्ही कां करतां?** कालमानाप्रमाणें अवश्य ती सुधारणा होऊं नयेच असें आमचें म्हणणें मुळींच नाहीं; पण सुधारणा म्हणून आंधळेपणानें सुधारणेचा स्वीकार समाजाकडून केला जाऊं

नये, एवढाच आमचा आग्रह आहे. लिहितांवाचतां येऊन चालू जमान्यांतील घडामोडींची माहिती व ज्ञान स्त्रियांना व्हावयास हरकत नाहीं, येथपर्यंत कोणीहि सूज्ञ मनुष्य स्त्रीशिक्षणाला अडथळा आणणार नाहीं; परंतु विवाहाचा अनुकूल काल निघून जात असतांहि ती भूमिती, बीजगणित, तें पदार्थविज्ञानशास्त्र यांची रुक्ष व त्यांच्या आयुष्यांत सर्वस्वीं निरुपयोगी अशीं पुस्तकें काखेंत मारून, हृदय दुसरीकडे खेंचलें जात असतांहि, शाळा कॉलेजचीं बाकें अडवून कंटाळवाणी व्याख्यानबाजी ऐकत बसणाऱ्या मुलींना उत्तेजन द्यावें, असें आम्हीं कधींच म्हणणार नाहीं. ही न पटणारी गोष्ट असल्यानें तिला विरोध व्हावा असेंच आम्हीं म्हणणार. पूर्वीच्या गार्गी मैत्रेयींचीं उदाहरणें आम्हांलाहि माहीत आहेत. या ऋषी कन्यांचा आश्रमी जीवनक्रम व आजच्या कुमारिकांचा धकाधकीचा जीवनक्रम यांतील तफावत लक्षांत घेतांना हीं उदाहरणें अपवादात्मक आहेत ही गोष्टहि लक्षांत घेऊनच वागलें पाहिजे. स्त्रीशिक्षणाचा उदोउदो करणारांची मजल अद्याप या दोन नांवापलिकडे जाऊं शकत नाहीं, ही गोष्टहि विसरून चालणार नाहीं. हिंदुस्थानांतील कोणत्याहि प्रांतांतील स्त्रीहितवाद्यांचें लिखाण काढून पाहिल्यास ही जोडी त्यांत आधारादाखल आलीच म्हणून समजावें. भास्कराचार्यांच्या लीलावतीचा शोधहि यांत समाविष्ट करण्यास हरकत नाहीं. तेव्हां त्याच त्याच शिळया कढीला फिरून फिरून कितीहि ऊत आणला तरी तिला नवी रुची प्राप्त होणें फार कठीण आहे. बुद्धकाळांत स्त्रियांनीं धर्मप्रचाराचें कार्य हातीं घेऊन सामाजिक जीवनक्रमांत प्रवेश केला; पण ख्रिश्चन धर्मपीठांच्या परसांत ज्याप्रमाणें पोलिसांना जोग–जोगिणींच्या दुष्कृत्यांचा पुरावा गाडलेला आढळला त्याचप्रमाणें बुद्ध विहारांतूनहि भिक्षु–भिक्षुणींच्या प्रेमलीलांचीं जिवंत स्मारकें गाडलेलीं आढळून आलीं, आणि फिरून बुद्ध धर्माची इभ्रत नाहींशी झाली. गौतम व त्याच्या सच्च्या अनुयायांना मग कळलें कीं, ‘मानी पची हूं’ हा आत्मसाक्षात्कार क्वचितांसाठीं आहे, त्याची प्रचीति डोकीचे खलवाट करून व पीतवस्त्र गुंडाळून येतेच असें नाहीं. पीतवस्त्र गुंडाळून धर्मप्रसारासाठीं मठांत घुसणाऱ्या भिक्षुणी, अष्टपुत्री नेसणाऱ्या नवऱ्या मुलीच ठरल्या. नाशिकच्या आसपास असलेल्या विहारांचा इतिहास या गोष्टी सांगण्यास पुरेसा आहे.

**आर्थिक घटना बदलली तरच तरणोपाय !**

स्त्रियांना घराच्या बाहेर खेंचून सामाजिक जीवनक्रमांत पुरुषांच्या बरोबरीनें खेचण्याचे एक ना दोन असे अनेक प्रयत्न निरनिराळ्या देशांमधून आजपर्यंत झाले आहेत. परंतु त्यांची घराकडील ओढ इतकी जबरदस्त आहे कीं, फिरून परत त्या आपल्या आश्रयस्थानाकडे गेल्याशिवाय राहात नाहींत. आणि हें अगदीं स्वाभाविक आहे. आज हिंदी स्त्रीची दुःस्थिति नाहीं असें आम्हीही म्हणूं शकत नाहीं; पण तिचा दोष मात्र तिला स्वातंत्र्य नाहीं, शिक्षण नाहीं अशा भाकडकथांना द्यावयास आम्ही तयार नाहीं. औद्योगिक क्रांतीनें सर्व जगाचाच तोल सुटल्यासारखा होऊन विषम अर्थ विभागणीमुळें व नफेबाजीच्या सोसामुळें हिंदुस्थानसारखा देश परक्यांची मोलकरीण होऊन बसला आहे. जीवन-ध्येय इतकें उतरून गेलें आहे कीं, लाखो लोकांना कुत्र्यामांजराच्या मोलानें पोट जाळण्याचा प्रसंग आला आहे व त्यामुळें स्वाभाविकच बेजबाबदार-बेपर्वा जीवन कंठण्याची पाळी आली आहे. आपल्या पानापुरतें पहाण्याची वृत्ति बळावली आहे. बेकारी, आर्थिक विपन्नावस्था नैसर्गिक सुखांच्या आड येऊं लागल्यानें आगींत सांपडलेला समाज निराशेनें तेथून सुटण्यासाठीं धडपड करतांना फोफाट्यांत जाऊन पडत आहे. पाश्चात्य राष्ट्रांतहि संपत्तीची विभागणी समप्रमाणांत न झाल्यानेंच कित्येक स्त्रियांना जीवनासाठीं धडपडावें लागत आहे व पुरुषांना तें नाइलाजानें पहावें लागत आहे. ज्यांनीं आर्थिक विषमतेचे दुष्परिणाम नाहींसे केले त्यांनीं समतेची व्याख्या इतकी ताणली कीं, फिरून स्त्रियांना आपल्या नैसर्गिक सुखांना तेथेंहि वंचित होण्याचा प्रसंग आला. **गाडीघोडे मोटारी उडविणाऱ्या खुशालचंदांनीं व त्यांच्या वायकांनीं करमणुकीसाठीं म्हणून स्त्रीशिक्षण, सहशिक्षण, स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य, यावर बाता माराव्यात व भांडवलशाहीनें या प्रचाराचा उपयोग करून घेऊन स्वस्तांत मजुरी पाडावी आणि लाखों तरुणांना बेकार ठेवावें असा सिद्धसाधकन्याय सर्व पाश्चात्य राष्ट्रामध्यें चालू झाला आहे, व त्याच्याच आहारीं हिंदी समाज हळुहळू जाऊं लागला आहे;** नाहीं बराच गेला आहे. जगाचें आर्थिक नियंत्रण एका नवीनच [ पण आम्हांस जुन्याच ] मार्गानें झाल्याखेरीज ही विसकटलेली घडी बसणें शक्य नाहीं. चालू

महायुद्धानंतर नवीन समाज व नवीं सत्यें यांचा पुरस्कार करण्याची घोषणा चर्चिलसाहेबांनीं केली आहे. या नव्या जगांत हिंदुस्थानला समाविष्ट करण्याचा त्यांचा मानस आहे किंवा नाहीं हें आजच कळण्यास मार्ग नाहीं, परंतु जगाची नाहीं तर नाहीं, निदान हिंदुस्थानची तरी आर्थिक घटना करण्याचा मार्ग महात्माजींनीं खुला केला आहे, ही गोष्ट निश्चित. महात्माजींच्या आर्थिक कार्यांत सहभागी होण्यानें समाजाची ही चाललेली कुतरओढ खास थांबेल. पाश्चात्य भांडवलशाहीच्या आहारीं गेलेला हिंदी समाज सर्वंच बाबतींत त्यांचें अनुकरण करूं लागला आहे व त्यामुळें आर्थिक अधःपाताबरोबरच त्याचा नैतिक अधःपातहि फार झपाट्यानें होत आहे. ब्रिटिश अमदानीच्या या दीडशें वर्षांमध्यें अनेक धंदे ठार मरून बहुजन समाज सर्वस्वीं शेतकीवर येऊन ठेपला व यामुळें स्त्री ही भारभूत वाटूं लागली. **हिंदुस्थानचें औद्योगीकरण करण्यानें हा अनर्थ दूर होणें शक्य नाहीं, कारण बाहेर दुसऱ्या बाजारपेठा आतां शिल्लक नाहींत. मनुष्यशक्ति विपुल असल्यानें घरगुती धंदेच हिंदुस्थानला आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीनें अधिक उपयुक्त ठरतील हाच महात्माजींचा दृष्टिकोन अधिक प्रभावी झाल्याशिवाय राहाणार नाहीं.** आणि हा आर्थिक पेचप्रसंग समाधानकारक सुटतांच आज त्रासदायक वाटणारे कित्येक प्रश्न आपोआपच सुटणारे आहेत. आम्हांला माहीत आहे कीं, कित्येक प्रसंगीं पालकांची इच्छा असूनहि मुलींचीं लग्नें वेळेवारी होत नाहींत; कारण मुलें मिळवतीं झाल्याशिवाय विवाह करण्यास तयार नसतात. बरें, मुलांची ही विचारसरणी एका अर्थानें बरोबरच असते. परंतु याचा **अर्थ मात्र असा नाहीं कीं, मुलामुलींचीं वाढतीं वयें ही एक अवश्य बाब आहे आणि ती उत्तेजनार्ह आहे. मुलांना शक्य तों लवकर उपजीविकेचें साधन निर्माण होईल व मुलींची योग्य कालांत लग्नें होतील या दृष्टीनें कांहीं विधायक कार्यक्रम आंखून जर स्त्रीहितवाद्यांनीं आपली शक्ति तिकडे खर्च केली तर समाजाला तिचा अधिक उपयोग होईल.** आज नाझी अंमलाखालीं जर्मनीला लागलेलें वळण युरोपियन समाजाच्या मानानें अगदीं नवीन आहे, यांत शंकाच नाहीं. परंतु या मार्गानें संपादन केल्या जाणाऱ्या सुस्थितीचा व प्रचंड शक्तीचा उपयोग हत्याकांडाकडे करण्यांत आल्यानें जगांत त्यांचें समाजशास्त्र तुच्छ लेखलें गेल्याशिवाय

राहणार नाहीं. हिंदूंचें समाजशास्त्र व अर्थशास्त्र उपेक्षणीय खास नाहीं, एवढी कल्पना आणून देण्यापुरता कां होईना जर्मनीचा उपयोग झाला, यांत शंका नाहीं. त्या राष्ट्राला मिळालेल्या पुढाऱ्याच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेनें व दुष्ट प्रवृत्तीनें आज जरी जगावर संकट ओढवलें असलें तरी जर्मनीचें आजचें समाजशास्त्र त्यामुळें त्याज्य ठरतेंच असें नाहीं. ज्या गोष्टी हिंदी समाजांत आहेत म्हणून पाश्चात्यांनीं आजपर्यंत कुचाळी केली त्याच गोष्टींचा स्वीकार करण्याची पाळी युरोपियन राष्ट्रांवर आज आली आहे. **मनूची हेटाळणी करण्यांत येथें कांहीं लोकांना फुशारकी वाटत असेल पण पाश्चात्य ग्रंथकारांना आतां त्याला 'दी वाइज ब्रॅह्मीन सेज' म्हणण्याची पाळी आली आहे.** आम्हीं मागें समाजाला 'अनेक दात्यांच्या चक्रांचें यंत्र' म्हटल्याचें वाचकांना कदाचित् स्मरत असेल. आज यंत्रांत जर खरा बिघाड कोठें झाला असेल तर तो आर्थिक व्यवहारांचें नियंत्रण करणाऱ्या चक्रामध्यें झाला आहे; आणि तो एकट्या या समाजाच्याच यंत्रामध्यें झालेला नसून जागतिक समाजयंत्रामध्यें झालेला आहे. अर्थात् आतां येणारी सुधारणा अगर दुरुस्ती एखाद्या राष्ट्रापुरती मर्यादित न ठेवितां तिला जागतिक स्वरूप दिल्यासच सर्व गोष्टी, व्यवहार फिरून सुरळीत चालू होणार आहेत; आणि यासाठीं यंत्र आणि निसर्ग यांच्यामध्यें निर्माण झालेलें धनी आणि सेवक हें नातें नष्ट करण्यांत आलें पाहिजे. यंत्राचे मालक आज धनी झाले आहेत आणि निसर्गशक्ति त्यांची बटीक झाली आहे. हें नातें बदलून टाकल्याशिवाय समाजाच्या पाठीमागें हात धुऊन लागलेला हा विपत्काल नष्ट होणें शक्य नाहीं. प्रस्तुत ग्रंथांत अर्थशास्त्राचा ऊहापोह करण्याचा उद्देश नसल्यानें आम्हीं या प्रश्नांत अधिक खोल शिरूं इच्छित नाहीं.

## आर्थिक स्वातंत्र्य आणि चारित्र्य

चालू काळांत स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा पाश्चात्य राष्ट्रामध्यें कसा बोजवारा उडाला आहे हें आम्हीं मागें पाहिलेंच आहे. आज हिंदी स्त्रीला आर्थिक दृष्ट्या परतंत्र म्हणणारे लोक या नवीन आर्थिक सिद्धान्ताप्रमाणें तिचे आर्थिक व्यवहारांतील मौल्य ठरवीत असतात, **परंतु जुन्या अर्थशास्त्राप्रमाणें हिंदी स्त्री अर्थोत्पादक** होतीच. फक्त तिच्या अर्थोत्पादनाचें क्षेत्र अगदीं मर्यादित व आकुंचित होतें एवढेंच!

आर्थिक स्वयंपूर्णतेच्या सिद्ध्यर्थ कराव्या लागणाऱ्या अनेक घरगुती धंद्यांत स्त्रियांचा मोठ्या प्रमाणांत भाग असल्यानें स्त्रिया भारभूत अशा कधींच वाटत नसत. चालू काळांत स्त्रियांनीं आर्थिक स्वातंत्र्य संपादन करण्याचा चंग बांधल्यानें व संततिनियमनाच्या साधनांनीं ही गोष्ट त्यांना सुलभ करून देण्याचा विडा उचलल्यानें, पाश्चात्य राष्ट्रांत वेश्यावृत्तीचा अत्यंत फैलाव झाला आहे. एखादा पुरुष एखाद्या स्त्रीला आतां विचारूं शकतो, 'जर तूं या रात्रीपुरती माझी पत्नी म्हणून राहावयास तयार असशील तर मी तुला सहा पेन्सापासून सहा शिलिंगापर्यंत मजुरी द्यावयास तयार आहे. शिवाय म्हटल्यास खाऊपिऊ, मोटारींतून फिरूं. चल, आहे तयारी?' स्त्री असा विचार करते, कारखानदारीच्या इमालखान्यांत दहा तास राबून मिळणाऱ्या वेतनापेक्षां विनाश्रम मिळणारें हें वेतन खास सुखाचें आहे. शारीरिक सौख्य मिळून शिवाय पैसा, ही मजुरी कांहीं वाईट नाहीं. काड्याच्या पेट्यांच्या कारखान्यांत काम करणाऱ्या छोकरीला ताशीं दोन आणे मजुरी मिळते, पण त्यासाठीं गंधकाच्या विषद्रावांत हात बुडवून कोंदटलेल्या हवेंत ७–८ तास जिवाचें रान करावें लागतें. अशी एखादी मुलगी वरील सारख्या मोहाला कां बळी पडणार नाहीं? याच्या उलट पुरुष म्हणतो, 'मिळणाऱ्या अल्पवेतनांत बायकापोरांचा सांभाळ करण्याची नसती कटकट मागें लावून घेण्यापेक्षां खुशाल एकट्यानें चैन करावी, चार आठ दिवसांनीं असा एखादा सौदा ठरवून मजा मारावी कीं, झाले मोकळे.' **एखाद्या सभ्य गृहस्थाला थोडा काळ स्वतःला विकणें काय किंवा एखाद्या कारखानदाराला विकणें काय हिशोब सारखाच. पहिला निदान शरीराला सौख्य देऊन तरी पैसे देत असतो.' पाश्चात्य राष्ट्रांतील स्त्रीवर्ग आर्थिक स्वातंत्र्याच्या मागें लागून घालूं लागलेला हा मेळ पाहिला म्हणजे सुसंस्कृत मानवाला लज्जेनें मान खालीं घालावी लागेल. घटणारी लोकसंख्या, बावळी, दुर्बळ, शरीरानें, मनानें कमकुवत अशी वाढती प्रजा हे आजच्या इंग्लंड फ्रान्सचे महत्त्वाचे सामाजिक प्रश्न आहेत. उभें जग लुबाडून व स्वतःची भर करून सुद्धां वरील सारख्या पेचप्रसंगांना तोंड देण्याचा प्रसंग या राष्ट्रांना यावा हा केवढा अधःपात आहे! आणि याला कारण म्हणजे निव्वळ त्यांचा स्त्रीपुरुष संबंधाबाबत झालेला चुकीचा दृष्टिकोनच होय.**

वयाच्या चोविसाव्या वर्षी स्त्रिया सरसहा कामास निरुपयोगी म्हणून नोकरीवरून कमी केल्या जातात व त्या जागीं नवीन तरुणपोरींची भरती केली जाते. नोकरीवर स्त्रियांना घेणाऱ्या या लोकांचें हें धोरण आतां स्त्रीवर्गाच्या ध्यानांत आल्यानें, आपली यांतून सुटका करून घेण्यासाठीं म्हणून त्यांनीं एक साळसूद मार्ग काढला आहे. या मार्गानें गेलें असतां त्यांना पोटाला मिळण्याची व गिऱ्हाइकांचा तुटवडा पडण्याची भीति सहसा राहात नाहीं—

'For the women who sell labour are often out of work through periods of bad trade and consequent unemployment; but the women who sell pleasure are seldom at a loss for a customer-"

## स्त्रियांचें स्त्रीत्व हिरावून काय साधणार ?

स्त्रियांची सुधारणा म्हणजे पुंसीकरण हा दृष्टिकोन आतां जुनाट होऊन गेला आहे, हें आम्हीं मागेंच सांगितलें आहे. 'मुलांना जन्म देणें आणि त्यांचा प्रतिपाल करणें एवढ्याचसाठीं स्त्री आहे म्हणणें म्हणजे स्त्रीजातीचा उपमर्द आहे !' हीं जोरदार वाक्यें नवीन शास्त्रांच्या उदयामुळें आपला जोर गमावून बसलीं आहेत. 'लग्न ही एक बेडी आहे, पारतंत्र्य आहे,' ही हिंदुस्थानांतील नवोदित स्त्रीहितवाद्यांची गर्जना युरोपमधील त्यांच्या गुरूंनीं २०० वर्षांपूर्वीपासून केली आहे. ॲवेद प्युरी या फ्रेंच ग्रंथकारानें आपल्या एका कादंबरीमध्यें 'लग्न म्हणजे पारतंत्र्य आणि कौमार्य म्हणजे स्वातंत्र्य' हा महामंत्र नाइकेच्या तोंडीं घातला आहे. 'मरेपर्यंत पायांत अडकविली जाणारी ही लग्नाची बेडी, या परता दुष्टावा, क्रूरता, जगांत दुसरीकडे कोठें असेल का ?'

Y a...t...il une tyrannie au mende plus cruelle, plus serere plus insupportable que celle de ces fers qui durent 'Ju squ' au tom beau-,'

मोलीयरनेंहि Les Femmes Savautes या नाटकामध्यें दोघां बहिणींचा संवाद घालून विवाहाची निरर्थकता पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे, आणि तेव्हांपासून आजतागायत प्रत्येक स्त्रीहितवादी हेंच तुणतुणें वाजवीत सुटला आहे. गरोदरपण ही एक स्त्रियावरील फार

मोठी आपत्ति आहे, हा मुद्दा लग्नाप्रमाणेंच त्यांचा एक आवडता मुद्दा आहे. परंतु या सर्वांना बगल देऊन या दोन संस्था अद्यापहि टिकून आहेत आणि त्या राहणार. सृष्टीच्या अंताबरोबरच त्यांचा अंत होईल; कारण त्यांचा जन्महि पण सृष्टिबरोबरच झाला आहे. पंचमहाभूताशीं फारकत करून घेण्याचा वेडेपणा मानवांच्या जितका अंगाशीं येईल तितकाच नैसर्गिक शरीरव्यापाराशीं फारकत करून घेऊं म्हणण्याचा वेडेपणा येईल. पाश्चात्य स्त्रीसमाजानें स्वतःच्या जीवनाचा करून घेतलेला खेळखंडोबा लक्षांत घेऊन व तिला होऊं लागलेली उपरति ध्यानांत आणून तरी निदान आमच्या हिंदी भगिनींनीं, व विशेषतः बंधूंनीं योग्य तो घडा घ्यावा अशी आमची अपेक्षा आहे. विशेषतः बंधु असें म्हणण्याचा आमचा उद्देश इतकाच कीं, हिंदुस्थानांतील स्त्रीस्वातंत्र्याची मोहीम अद्यापहि सर्वस्वीं स्त्रियांच्या हातीं गेलेली नाहीं, त्यांतील प्रेरकशक्ति अद्याप बऱ्याच अंशीं पुरुषांच्याच हातीं आहे. पाश्चात्य राष्ट्रांतहि तीच स्थिति आहे, नाहीं असें नाहीं. कारण स्त्रियांच्या अंगीं एवढी धमक असती तर जर्मनींत असलेली स्त्रीहितवादाचीं सोंगें अशीं तात्काळ घडून बसलीं नसतीं.

आज काल मोठा आणीबाणीचा आहे. समाजाची शिस्त, नीतिमत्ता, धडाडी शाबूत असेल तर भावी काळांत त्याच्या जीविताची कांहीं आशा आहे. **विस्कटलेला, अनीतीनें पोखरलेला, दुराचारानें बरबटलेला समाज चालू धडाक्यांत केव्हांच नामशेष होईल. उदात्त विचारांनीं भरलेलीं, ध्येयवादानें झपाटलेलीं, तेजस्वी सुदृढ प्रजा पददलित समाजाला तारक होईल. यासाठीं हिंदी समाजानें तरुण-पिढीचा रक्तक्षय करून तिला विषयी बनविणारें कोणतेंहि विषारी-वातावरण येथें फैलावलें जाणार नाहीं याची पूर्ण खबरदारी घेतली पाहिजे.** जीवनाच्या कोणत्याहि विभागांत या नासक्या वातावरणाचा दर्प आल्यास तात्काळ त्याची शुद्धी करण्याचा चंग बांधला पाहिजे, मग कोणी सनातनी म्हणोत ! जुनाट म्हणोत !! पाश्चात्यांच्या चष्म्यांतून प्रत्येक गोष्ट पहाण्याची खोड लागलेल्या लोकांना आपल्या चांगल्या गोष्टीहि वाईट दिसल्या तर त्याबद्दल खेद वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. कावीळ झाल्यामुळें जग पिवळें झालें म्हणणाऱ्याइतकाच यालाहि मान दिला पाहिजे.

## तुझें आहे तुझ्यापाशीं !

असो. पाश्चात्य राष्ट्राकडे बोट दाखवून जातां येतां येथील स्त्रीसमाजाला हिणविण्याचा उद्योग अगदीं पद्धतशीरपणें केला जात असल्यानें स्वाभाविकच पाश्चात्य स्त्रीसमाजांचें व त्यांच्या प्रश्नांचें सूक्ष्म परीक्षण करण्याची जिज्ञासा निर्माण झाली व तीतूनच सदर ग्रंथाचा जन्म झाला. मनामध्यें कोणताहि कुत्सितभाव न ठेवतां शक्य तों निःपक्षपातीपणानें भिन्न युरोपियन स्त्रीसमाजांचा अभ्यास करावयाचा व महाराष्ट्र वाचकांना त्यांचा परिचय करून द्यावयाचा हा एकच उद्देश हा ग्रंथ लिहिण्यांत होता. त्याची सफलता–असफलता वाचकांनीं ठरवावयाची आहे. पाश्चात्य स्त्रीसमाज आज एका प्रचंड वावटळींत सांपडला आहे. अर्थात् हें वादळ आज ना उद्यां शांत होईल; न्याय अन्यायाची छाननी होईल. पण एकच तक्रार मात्र या स्त्रीसमाजाकडून केली जाणें शक्य आहे आणि ती म्हणजे सर्वस्वीं पुरुषांनीं सुरू केलेल्या अघोरी कृत्यांचे दुष्परिणाम शेवटीं त्यांच्यापुरतेच मर्यादित न राहतां निष्कारण स्त्रियांनाहि सहन करावे लागतात ! परंतु हिंदी स्त्रिया आपल्या या पीडित भगिनींच्याकडे सहानुभूतीनें पाहिल्या-शिवाय राहाणार नाहींत, एवढेंच आश्वासन देण्यापलिकडे हिंदी स्त्री काय करूं शकणार ? पुरुष वर्गाच्या उत्तान महत्त्वाकांक्षांना व हव्यासांना आळा बसून सर्व जगाचें हित पहाणारी एखादी जागतिक संघटणा अस्तित्वांत यावी म्हणून जगांतले अनेक–थोर पुरुष आज यत्न करीत आहेत. त्यांच्या यत्नांना सिद्धीचीं गोड फळें आल्यास स्त्रियांवर निष्कारण होणारे अनेक अन्याय थांबणें शक्य आहे. आर्यांच्या उदात्त तत्त्वांनीं ज्यांचीं अंतःकरणें स्फुरतील असे कोट्यवधी आर्यतरुण जगाला देण्याचें सामर्थ्य आर्यस्त्रियांना आहे. त्यांनीं आपला हक्क जरूर बजावून आम्हां आर्यांच्या पूर्वजांच्या ‘कृण्वंतो विश्वमार्यं’ या उक्ति खऱ्या करून दाखवाव्या. जगांतील सर्वच स्त्रियांना त्यांचा योग्य मार्ग दिसावा अशी अपेक्षा व त्या दृष्टीनें प्रयत्न यापलिकडे आम्हीं तरी काय करूं शकणार ? मानवाचा उत्कर्ष साधण्यासाठीं होणारी प्रत्येक धडपड स्त्रीपुरुष संबंधांतील रहस्य समजावून न घेतां केली गेली तर ती वृथा होणार आहे. भावनोद्दीपक विचार आचार मनाची चट्दिशी खात्री करतात, पटतात; वाटतें हेंच खरें आहे; पण शास्त्राच्या कसोटीवर ते कुचकामी ठरतात. म्हणूनच समाजाला आम्हांला नम्रपणें सुचवावेसें वाटतें कीं, चकाकणारी

प्रत्येक गोष्ट निकषावर घासून सुवर्ण आहे अशी खात्री करून घेऊन ग्रहण कर नाहीं तर खुशाल उकीरड्यावर फेंकून दे !

आम्हांला हा ग्रंथ लिहिण्याचे कामीं ज्या ग्रंथांचा उपयोग झाला त्यांची यादी वाचकांचे सोयीसाठीं आम्हीं पुढें देत आहों.

( 1 ) Choice of Mate. ( 2 ) Humanity uprooted. ( 3 ) Factory, Family and Woman in Soviet Russia. ( 4 ) Health in U. S. S. R. ( 5 ) Women in Soviet Russia. ( 6 ) Russia To-day. ( 7 ) Hitler. ( 8 ) MEin Kamf ( 9 ) Ribentrop. ( 10 ) My part in the Flight of Nazi Germany. ( 11 ) Women in Nazi Germany. ( 12 ) Our Freedom. ( 13 ) History of English sex moral, ( 14 ) हेरीडिरी and युजेनिक्स (Sp) (15) Problem of woman, ( 16 ) Woman ( 17 ) Sex life in America. ( 18 ) A case against birth--control. ( 19 ) Man an indictmant, ( 20 ) Sexual life in England, ( 21 ) History of European Morals ( २२ ) मनुस्मृति. ( २३ ) अर्थशास्त्र ( चाणक्य ) हिंदूचें अर्थशास्त्र.

त्याचप्रमाणें निरनिराळीं सरकारी निवेदनें, कादंबऱ्या व नाटकें यांचा उल्लेख ठिकठिकाणीं करण्यांत आलाच आहे. हें वाङ्मय अभ्यासू वाचकांनाहि उपयोगी पडेल अशी आमची खात्री आहे.

शेवटीं, या फार दूरच्या प्रवासामुळें आम्हांप्रमाणेंच वाचकांनाहि पण शीण आला असेल. या प्रवासाच्या गुजगोष्टी आपणाशीं करतांना उणा दुणा शब्द कोणासंबंधीं प्रत्यक्षाप्रत्यक्षपणें गेला असल्यास अत्यंत नम्रतापूर्वक त्यांची, तुमची आम्हीं येथेंच क्षमा मागून घेतों. त्याजबरोबर ज्या स्त्रीसमाजाची आम्हीं भेट घेतली त्यांचीहि पण अधिकउण्या शब्दाबद्दल क्षमा मागणें आम्हीं आमचे कर्तव्य समजतों. नमस्कार !

मुंबई, ता. २७–१२–४

REFBK-0006133